| PAWAR, JAYSINGRAO | SHIVCHARITRAPASUN AAMHI KAY SHIKAVE? शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे? |
| PAWAR, DAYA | JAGLYA जागल्या |
| PAWAR, JAYSINGRAO | RAJARSHI SHAHU CHHATRAPATI: EK MAGOVA राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा |
| SAWANT, SHIVAJI | MRITYUNJAY मृत्युंजय ३ अंकी नाटक |
| PAWAR, JAYSINGRAO | MARATHESHAHICHE ANTRANG मराठेशाहीचे अंतरंग |
| MURTY, SUDHA/ KATTI, MANDAKINI | PITRURUN पितृऋण |
| PAWAR, JAYSINGRAO | MARATHYANCHE SWATANTRAY YUDDH मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध |
| WALIMBE, V.S. | WARSAW TE HIROSHIMA वॉर्सा ते हिरोशिमा |
| KALE, V.P. | MAYA BAZAAR माया बाजार |
| KALE, V.P. | KA RE BHULALASI का रे भुललासी |
| KHANDEKAR, V.S. | PANDHARE DHAG पांढरे ढग |
| KHANDEKAR, V.S. | RIKAMA DEVHARA रिकामा देव्हारा |
| DESAI, RANJIT | GANDHALI गंधाली |
| YADAV, ANAND | GRAMSANSKRUTI: DASHA AANI DISHA ग्रामसंस्कृती: दशा आणि दिशा |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2022*

| Author | Title |
|---|---|
| YADAV, ANAND | MALAVARCHI MAINA माळावरची मैना |
| KALE, V.P. | THIKRI ठिकरी |
| KALE, V.P. | ONE FOR THE ROAD वन फॉर द रोड |
| KALE, V.P. | VAPU 85 वपु ८५ |
| MURTHY, SUDHA/ SOHONI, LEENA | KALPVRUKSHACHI KANYA कल्पवृक्षाची कन्या |
| MURTHY, SUDHA/ SOHONI, LEENA | TRISHANKU त्रिशंकू |
| MURTHY, SUDHA/ SOHONI, LEENA | GARUDJANMACHI KATHA गरुडजन्माची कथा |
| MURTHY, SUDHA/ SOHONI, LEENA | SARPANCHA SUD सर्पाचा सूड |
| MANGUDE, GANESH | BAJIND बाजिंद |
| JOSHI, ASHOK M. | GOSHTIRUP SHIVDARSHAN गोष्टीरूप शिवदर्शन |
| KELKAR, BHALBA | NIVADAK PASHCHATYA SHASTRADNYA AANI SANSHODHAK निवडक पाश्चात्य शास्त्रज्ञ आणि संशोधक |
| KANADE, BABURAO | CONGRESS VIRUDDH MAHARASHTRA काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र |
| GHATE, NIRANJAN | SHASTRADNYANCHE JAG शास्त्रज्ञांचे जग |
| JARAG, PRAMILA | SHIVPUTRA RAJARAM शिवपुत्र राजाराम |
| TATA, J.R.D. | KEYNOTE : excerpts from his speeches and chairman's statements to shareholders ( IN MARATHI) |
| CONFEREY, MICK / JOGLEKAR, VINITA | EVEREST 1953 एव्हरेस्ट १९५३ |
| SHAH, SUREKHA | JOHAD जोहड |
| HAWTHORNE, NATHANIEL / PATIL, SHANKAR | SHAPIT VAASTU शापित वास्तू (THE HOUSE OF THE SEVEN GABELS) |
| YADAV, ANAND | KACHWEL काचवेल |
| PATIL, SHANKAR | KHUSH KHAREDI खुश खरेदी |
| PATIL, SHANKAR | BANDHARA बंधारा |
| MATE, S.M. | UPEKSHITANCHE ANTRANG उपेक्षितांचे अंतरंग |
| DESAI, RANJIT | RAJA RAVI VERMA राजा रवि वर्मा |
| DUBEY, RUPESH / MULAY, MANJUSHA | BOL BACHCHAN बोल बच्चन |
| MADGULKAR, VYANKATESH | MANTARLELE BET मंतरलेले बेट |
| MADGULKAR, VYANKATESH | GAVAKADCHYA GODHTI गावाकडच्या गोष्टी |
| WITZEL, MORGAN | TATA: EKA CORPORATE BRANDCHI UTKRANTI टाटा : एका कॉर्पोरेट ब्रॅण्डची उत्क्रांती |
| SCHWARTZ, DAVID J. | THE MAGIC OF THINKING SUCCESS द मॅजिक ऑफ थिंकिंग सकसेस |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2022*

| Author | Title |
| --- | --- |
| MADGULKAR, VYANKATESH | CHHOTA JAWAN छोटा जवान |
| MADGULKAR, VYANKATESH | KOVLE DIWAS कोवळे दिवस |
| CARNEGIE, DALE | SWATAHLA AVISMARNIY BANWA (MAKE YOURSELF UNFORGET- |
| GERBER, MICHAEL / JOSHI, SHEK-HAR | LAGHU UDYOJAKANCHA MARGDARSHAK लघु उद्योजकांचा मार्गदर्शक |
| YEUNG, ROB/ RAUT, SUJATA | PRAYATNE DHARU YASHPANTH प्रयत्ने धरू यशपंथ (THE EXTRA ONE |
| SAWANT, MRUNALINI | UTTUNG उत्तुंग |
| DESHMUKH, NANDINI | KANDYACHA VANDHA कांद्याचा वांधा |
| GHOSH, GAUTAM / MORDEKAR, MADHAV | AADHUNIK BHARATACHE PRESHIT SWAMI VIVEKANAND आधुनिक |
| MURTHY, SUDHA/ SOHONI, LEENA | HARAVLELYA MANDIRACHE RAHASYA हरवलेल्या मंदिराचे रहस्य |
| DESAI, RANJIT | SWAMI स्वामी |
| DESAI, RANJIT | RADHEY राधेय |
| KHER, B.D. | CHANAKYA चाणक्य |
| YADAV, ANAND | ZOMBI झोंबी |
| BEDI, KIRAN/ VAKIL, SUPRIYA | I DARE आय डेयर |
| JAMPOLSKY, LEE | SMILE FOR NO GOOD REASON: 12 PRINCIPLES FOR LASTING HAPPI-NESS |
| GIARRATANA, NEIL | SURVIVE AT THE TOP: MASTER THE CEO PRIORITIES |
| DESHPANDE, P.L. | BATATYACHI CHAL बटाट्याची चाळ |
| TRACY, BRIAN | THE PEAK PERFORMANCE WOMAN |
| TRACY, BRIAN | EFFECTIVE LEADERSHIP |
| TRACY, BRIAN | PERSONAL ACHIEVEMENT |
| BINGHAM, JANE | FACT CAT HISTORY: NEIL ARMSTRONG FIRST MAN ON THE MOON |
| KULAGA, JAIME | THE SUPER WOMAN'S GUIDE TO SUPER FULFILMENT |
| ANDERSON, MICHAEL | HEAVEN'S ABOVE |
| COLSON, ROB | SCIENCE IS EVERYWHERE: FORCES IN ACTION |
| PALING, SUZANNE | THE SALES LEADER'S PROBLEM SOLVER |
| BEDI, KIRAN/ SHANBAG, MADHURI | AS I SEE: STRIYANCHE SAKSHAMIKARAN ऍज आय सी : स्त्रियांचे |
| BHAIRAPPA, S.L./ KULKARNI, UMA | GRUHBHANG गृहभंग |
| BRINKLEY, DANNION/ BRINKLEY, KATHRYN | SECRETS OF THE LIGHT: SWARGATUN MILALELE DHADE सिक्रेट्स |
| PATIL, VISHWAS | PANIPATCHE RANANGAN पानिपतचे रणांगण |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2022*

| Author | Title |
|---|---|
| SAWANT, SHIVAJI | MORAWALA मोरावळा |
| NADKARNI, SURESH CHANDRA | NOSTRADAMUSCHI BHAVISHYAVANI नॉस्ट्रडॅमसची भविष्यवाणी |
| BHAIRAPPA, S.L./ KULKARNI, UMA | UTTARKAND उत्तरकांड |
| GUPTA, ATUL/ BHARADWAJ, VASU | VEDIC GANITACHE SAMARTHYA वैदिक गणिताचे सामर्थ्य त्रिकोणमितीसहित |
| SIRSAMKAR, MEERA | NOBLE LALNA PART-1 (1901 TO 2000) नोबेल ललना १९०१ ते २००० |
| FREUD, SIGMUND/ SOMAN, KAMLESH | SWAPNA MIMANSA (INTERPRETATION OF DREAMS) स्वप्नमीमांसा |
| ROBBINS, ANTHONY/ SOMAN, KAMLESH | AWAKEN THE GIANT WITHIN अवेकन द जायंट विदिन |
| ROBBINS, ANTHONY/ SOMAN, KAMLESH | UNLIMITED POWER अनलिमिटेड पॉवर : अमर्याद चैतन्यक्षमता |
| COLLINS, SUZANNE/ BORSE, SUMITA | THE HUNGER GAMES द हंगर गेम्स |
| PANDYA, PRADEEP / LELE, SUSHMA | MISSION BHARAT मिशन भारत |
| WALLACE, IRWIN/ DEODHAR, VIJAY | THE SEVENTH SECRET द सेव्हन्थ सिक्रेट |
| DOYLE, ARTHUR CONAN | COMPLETE WORKS OF SHERLOCK HOMES. VOLUME 1 |
| DALVI, SHARAD | EKLAVYA एकलव्य |
| GANJEWAR, BABU | CHANAKSHA चाणाक्ष |
| JADHAV, L.S. | DHARMAVEDH धर्मवेध |
| PATIL, VISHWAS | BANDA RUPAYA बंदा रुपाया ! |
| CHRISTER, SAM/ PATHARKAR, ASHOK | THE STONEHENGE LEGACY द स्टोनहेंज लेगसी |
| JAHAGIRDAR, VIJAYA | KARMYOGINI (AHILYABAI HOLKAR) कर्मयोगिनी : अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावरील कादंबरी |
| KALAM, A.P.J ABDUL | TURNING POINTS |
| SOMAN, KAMLESH | RASGRAHAN, AASWADAN, ABHYAS AANI SAMIKSHA UPSC रसग्रहण,आस्वादन, अभ्यास आणि समीक्षा (प्रश्नोत्तरी स्वरूपात) पेपर-२ |
| SOMAN, KAMLESH | SANDARBH MARGDARSHAK PUSTIKA UPSC संदर्भ मार्गदर्शक पुस्तिका (प्रश्नोत्तरी स्वरूपात) पेपर-१ |
| KATTIMANI, PRAKASH/ GOTHE, SHIVALINGAYYA | POLITICAL THOUGHTS OF PANDIT DEENDAYAL UPADHYAY |
| KALE, SUDHAKAR | MARATHI SHABDKOSH PURAVANI मराठी शब्दकोश पुरवणी |
| KELUSKAR, KRISHNARAO ARJUN | CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ CHARITRA छत्रपती शिवाजी महाराज चरित्र |
| MAHADIK, GHANSHYAM | MAHARASHTRACHI KALA AANI SANSKRUTI महाराष्ट्राची कला आणि संस्कृती |
| SINGH, HARMAHENDRA / SARDAR, NIRANJAN KAUR | HISTORICAL ASPECTS, IMPORTANCE AND PRESENT RELEVANCE OF THE TEACHINGS OF SHRI GURU GOBIND SINGH JI |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2022*

| Author | Title |
|---|---|
| PATEL, AVINASH | BIOGRAPHY OF MADAN MOHAN MALAVIYA |
| RAMASWAMY, B./ SETHI, DIVYA | SOURCEBOOK OF NATIONAL EDUCATION POLICY 2020: A COMPREHENSIVE OVERVIEW |
| KATTI, RAGHAVENDRA | BRAHMAN, THE SUPREME BEING, IN BRAHMASUTRAS |
| KATTIMANI, PRAKASH | PANDIT DEENDAYAL UPADHYAYA: LIFE AND WORKS |
| VIBHUTE, BHALBA | RASHTRIYA SHAIKSHANIK DHORAN, 2020-CHIKITSA राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,२०२०-चिकित्सा |
| VIBHUTE, BHALBA | RASHTRIYA SHAIKSHANIK DHORAN, 2020-CHIKITSA राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,२०२०-चिकित्सा |
| BHARADWAJ, AJAY | YOGA EDUCATION AND SPIRITUAL JOURNALISM |
| BHANGE, RAVINDRA | AARAKSHANACHI VATCHAL AANI OBC AARAKSHAN आरक्षणाची |
| SHARMA, PRIYABHISHEK/ VARTAK, AVANTI | HIMALAYAVASI GURU AANI ANTINDRIY SHAKTI हिमालयवासी गुरु आणि अतींद्रिय शक्ती |
| PHADKE, V.K. | SAMPOORNA KATHA RAMAYAN संपूर्ण कथारामायण |
| HAWKIN, STEPHEN / HAWKIN, LUCY | GEORGE AND THE SHIP OF TIME जॉर्ज अँड द शिप ऑफ टाइम |
| HAWKIN, STEPHEN / HAWKIN, LUCY | GEORGE AND THE BLUE MOON जॉर्ज अँड द ब्लू मून |
| DHOLE, SANJAY | PLANTON प्लॅन्टोन |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT RAMAKRISHNA PARAMAHANSA |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT ARCHIMEDES |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT JAWAHARLAL NEHRU |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT BHAGAT SINGH |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT RABINDRANATH TAGORE |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT MAHATMA GANDHI |
| MAPLE KIDS | KNOW ABOUT VINOBA BHAVE |
| GODBOLE, ACHYUT/ DESHPANDE, AMRUTA | ANNA अन्न |
| ALTER, STEPHEN/ GORE, ASHLESHA | HIMALAYARANYAK हिमालयारण्यक |
| WATTLES, W.D./ SOMAN, KAMLESH | THE SCIENCE OF GETTING RICH अधिकाधिक श्रीमंत होण्या मागचे शास्त्र |
| SAWANT, SHIVAJI | MRITYUNJAY मृत्युंजय |
| SAWANT, SHIVAJI | CHHAVA छावा |
| SOMAN, KAMLESH | CHANAKYANEETI चाणक्यनीती : चाणक्य सूत्रांसह |
| PATIL, VISHWAS | MAHANAYAK महानायक |
| CORBETT, JIM/ BHUNJE, SAURABH | SHIKARYACHE MITR: NIVADAK KATHA शिकाऱ्याचे मित्र निवडक कथा |
| CORBETT, JIM/ BHUNJE, SAURABH | BHAGYAWAN VAGH भाग्यवान वाघ: आणि इतर काही चित्तथरारक शिकारी |
| AALLEN, JAMES/ SOMAN, KAMLESH | AAPAN JASA VICHAR KARTO, TASECH AAPAN ASTO (AS A MAN THINKETH) आपण जसा विचार करतो , तसेच आपण असतो |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2022*

| Author | Title |
|---|---|
| • GANGULY ANIRBAN | • AMIT SHAH AUR BHAJAPA KI YATRA |
| • DWIVEDI SHIVANAND | • SHABDANSH AMIT SHAH KE CJUNINDA BHASHAN |
| • | • A BOOKLET FOR JEE MAIN PHYSICS. VOL.1 |

# *News Paper Clippings : December 2022*



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** **.**



# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## उच्च शिक्षणासाठी गरीबी अडसर असू शकत नाही

### प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांचे प्रतिपादन

प्रभात वृत्तसेवा



पुणे : गणेश कला क्रीडा येथील सोहळ्यात पुस्तक प्रकाशन करताना डॉ. गजानन एकबोटे, वालचंद संचेती यांच्यासह मान्यवर.

**पुणे, दि. ३** - उच्च शिक्षण घेण्यामध्ये गरीबी ही अडसर कधीच नसते. इच्छा असेल तेथे मार्ग मिळतो. सकारात्मकता, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची सवय विद्यार्थ्यांना हवी. मनाने आणि शरीराने सक्षम झाल्यास यश नक्कीच मिळेल, असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त १२५वा दत्त जयंती सोहळा येत्या दि. ६ डिसेंबरपर्यंत गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वालचंद संचेती, पराग शहा, माजी आमदार दीपक पायगुडे, बँक ऑफ महाराष्ट्राचे सहायक जनरल मॅनेजर सतीश कुंभार आणि अतुल जोशी, महाराष्ट्र एसएससी बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी, पुरुषोत्तम लोहिया, आदित्य लोहिया, ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, कार्यकारी विश्वस्त ॲड. शिवराज कदम जहागिरदार, महेंद्र पिसाळ, ॲड. रजनी उकरंडे, उत्सव उपप्रमुख युवराज गाडवे, विश्वस्त सुनील रुकारी, डॉ. पराग काळकर, युवराज गाडवे, राजू बलकवडे, अक्षय हलवाई उपस्थित होते.

वालचंद संचेती, म्हणाले की, जीवनामध्ये यश संपादन करायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. यावेळी डॉ. सुलभा विधाते, डॉ. जयश्री अत्रे, सुवर्णा कऱ्हाडकर, अर्चीता मडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रभात PuneCity, 04 Dec 2022, Page:005 https://epaper.dainikprabhat.com

## विद्यार्थ्यांना कष्ट करण्याची सवय हवी : प्रा. डॉ. एकबोटे

**पुणे** : सकारात्मकता, प्रामाणिकपणा आणि कष्ट करण्याची सवय विद्यार्थ्यांना हवी. मनाने आणि शरीराने सक्षम झाल्यास यश नक्कीच मिळेल, असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त १२५ वा दत्त जयंती सोहळा दिनांक ६ डिसेंबर पर्यंत स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वालचंद संचेती, पराग शहा, डॉ. गजानन एकबोटे, माजी आमदार दीपक पायगुडे, सतीश कुंभार आणि अतुल जोशी, महाराष्ट्र एसएससी मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, पुरुषोत्तम लोहिया, आदित्य लोहिया, ट्रस्टचे अध्यक्ष प्रताप परदेशी, कार्यकारी विश्वस्त शिवराज कदम जहागिरदार, खजिनदार महेंद्र पिसाळ, उत्सवप्रमुख रजनी उकरंडे, उत्सव उपप्रमुख युवराज गाडवे, विश्वस्त सुनील रुकारी, डॉ.पराग काळकर, युवराज गाडवे, राजू बलकवडे, अक्षय हलवाई आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या प्रश्नसंचाचे अनावरणदेखील करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सुलभा विधाते, डॉ. जयश्री अत्रे, सुवर्णा कऱ्हाडकर, अर्चीता मडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Kesari 4.12.2022

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

पुढारी



संचेती यांच्या गौरव समारंभाप्रसंगी उद्योगपती पुरुषोत्तम लोहिया, 'मिडास'चे चीफ मेंटॉर पराग शहा, दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, बँक ऑफ महाराष्ट्राचे जोशी.

## वालचंद संचेती यांचा गौरव

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट यांच्याकडून शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या अनमोल योगदानाबद्दल वालचंद देवीचंद संचेती यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

'कॅम्प एज्युकेशन सोसायटी'च्या कार्याध्यक्षपदी कार्यरत असलेले संचेती हे गेल्या ५० वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. संस्थेच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांना व गोर-गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावलेली आहे. सन २०१२ साली महाराष्ट्रात प्रथमच संस्थेच्या सर्व शाळांमध्ये व प्रत्येक वर्गात ई-लर्निंग अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना दृक-श्राव्य माध्यमातून उत्तमोत्तम शिक्षण देण्याचा निर्णय हा त्यापैकीच एक आहे.

विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण घेता यावे व स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, या उदात्त हेतूने 'कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सायरस पूनावाला स्किल डेव्हलपमेंट सेंटर' सुरू करण्यात आले आहे. त्यात संचेती यांचे मोठे योगदान आहे.

संचेती यांच्या एकूणच कार्याचा गौरव म्हणून त्यांना कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट यांच्याकडून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

सदर प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

My Pune Edition
Dec 4, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सकाळ



स्वारगेट : कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे वालचंद संचेती यांचा गौरव केला गेला. या वेळी पुरुषोत्तम लोहिया, पराग शहा, वालचंद संचेती, प्रताप परदेशी आदी उपस्थित होते.

## शैक्षणिक क्षेत्रात योगदानासाठी वालचंद संचेती यांचा गौरव

**पुणे :** कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे मंदिराच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी वालचंद संचेती यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संचेती यांनी कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून समाजातील शिक्षणापासून वंचित घटकांना तसेच होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये मोलाची कामगिरी केली आहे. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. संचेती हे कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत. मागील ५० वर्षे ते शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे या हेतूने कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे 'डॉ. सायरस पूनावाला स्कील डेव्हलपमेंट सेंटर' सुरू केले आहे. त्यातही संचेती यांचे योगदान आहे.

Pune, Pune-Today
06/12/2022 Page No. 3

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ



स्वारगेट : कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे वालचंद संचेती यांचा गौरव केला गेला. या वेळी पुरुषोत्तम लोहिया, पराग शहा, वालचंद संचेती, प्रताप परदेशी आदी उपस्थित होते.

## शैक्षणिक क्षेत्रात योगदानासाठी वालचंद संचेती यांचा गौरव

**पुणे :** कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे मंदिराच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी वालचंद संचेती यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संचेती यांनी कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून समाजातील शिक्षणापासून वंचित घटकांना तसेच होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये मोलाची कामगिरी केली आहे. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. संचेती हे कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत. मागील ५० वर्षे ते शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे या हेतूने कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे 'डॉ. सायरस पूनावाला स्कील डेव्हलपमेंट सेंटर' सुरू केले आहे. त्यातही संचेती यांचे योगदान आहे.

Pune, Pune-Today
06/12/2022 Page No. 3

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# विद्यार्थ्यांनी गिरवले धडे

पुणे, ता. १० : अचानक हल्ला झाला, पाठीमागून कोणी हात पकडला, समोरून गळा दाबला, तर क्षणार्धात स्वसंरक्षणासाठी घ्यायचा आक्रमक पवित्रा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शनिवारी अभ्यासला. तोही चित्रपट जगतात गेली ३५ वर्षे मार्शल आर्टचे प्रशिक्षण देणाऱ्या चित्ता यज्ञेश शेट्टी यांच्याकडून. निमित्त होते 'सकाळ माध्यम समूहा'ने आयोजित केलेल्या 'स्वास्थ्यम्' उपक्रमाचे!



शत्रूला नेस्तनाभूत करण्यासाठीचे प्रात्यक्षिक दाखविताना चित्ता शेट्टी.

शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळपासूनच एनसीसी कॅडेट्ससह शेकडो विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. बॉलिवूडच्या देवानंदपासून ऋतिक रोशनपर्यंत आणि हॉलिवूडच्या रॉजर मूरपासून जॅकीचॅनपर्यंत शेकडो अभिनेत्यांना शेट्टी यांनी चित्रपटात सुपरस्टार बनविले आहे. त्यामुळे त्यांच्या भेटीची त्याहीपेक्षा मार्शल आर्टचे नवे धडे घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक होते. 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस यांनी शेट्टी यांचे स्वागत केले. या वेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्यामकांत देशमुख, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, डॉ. कल्याणी जोशी, डॉ. सुचेता गोलार, डॉ. अंजली सरदेसाई उपस्थित होते. सोसायटीच्या वतीने विक्रम फाले, दीपक कुटे, दुष्यंत निंबाळकर, डॉ. अभिजित सत्राळकर यांनी शेट्टी यांचे स्वागत केले.

एका चित्रपटात माझ्याशी निगडित 'शॉट'साठी अमिताभ बच्चन वेळेच्या आधी येऊन पोचले होते. मी मात्र एकतास उशिराने पोचलो. तेव्हापासून आयुष्यात वेळेचे काटेकोर नियोजन आणि त्याच्या पालनाचा धडा मी शिकलो, असे त्यांनी सांगितले.

### आवडीच्या क्षेत्रात १०० टक्के योगदान द्या

इंद्रजित चित्रपटाच्या निमित्ताने मॅंगलोर पॅलेस ग्राउंडवर आम्ही पाच हजार मुलांसोबत शूटिंग केले. शॉट पूर्ण झाल्यानंतर अमिताभ यांनी बोलावून घेतले. चहासोबतच एका चिठ्ठीवर हिंदीमध्ये काही ओळी लिहून माझ्याकडे दिल्या. मी त्यांना म्हणालो, "मला यातलं काहीच समजलं नाही, कारण मला हिंदी येत नाही." ते म्हणाले, "मलाही मार्शल आर्ट येत नाही. पण तुम्ही ज्या आवडीने आणि समर्पण भावाने केलंय ते खरंच महान आहे."

### विद्यार्थी म्हणतात..

स्वसंरक्षणासंबंधी अनेक नवीन गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या. शेट्टी सरां दिलेल्या टिप्स निश्चितच स्वसंरक्षणासाठ महत्त्वाच्या असून, आम्हा मुलींसाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण आहे.
– मृण्मयी पितळे,
मॉडर्न महाविद्यालय, फिजिओथेरपी

शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्याचे महत्त्व आम्हाला समजले. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत किंवा ताणतणावाच्या स्थितीत रोजच्या व्यायामातून मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा मंत्र आम्हाला मिळाला आहे.
– तेजस भिसे आणि कमलेश धाकड,
निलाय एज्युकेशन

विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य राखण्यासाठी प्रात्यक्षिकासह अनेक टिप्स या उपक्रमातून मिळाल्या आहेत. आपली जीवनशैली कशी असावी, फिटनेस कसा राखावा, या सर्व गोष्टींना पुढील आयुष्यात किती महत्त्वाच्या ठरतात हे चित्ता शेट्टी यांनी विषद करून सांगितल्यामुळे विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होईल.
– प्रा. डॉ. गजानन एकबोटे,
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Sakaal 11.12.2022

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## मॉडर्न हायस्कूलमध्ये गुणवंतांचा सत्कार

प्रभात वृत्तसेवा



पुणे : गुणवंत विद्यार्थिनीला बक्षीस प्रदान करताना डॉ. गजानन एकबोटे, ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. संजीव सोनवणे आदी.

पुणे, दि. १६ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर मॉडर्न हायस्कूल सभागृहामध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि दादासाहेब एकबोटे आंतर शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा बक्षीस वितरण स्पर्धा पार पडली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा.ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, डॉ. नंदकिशोर एकबोटे, मिलिंद एकबोटे, उद्धव खरे, नियमक मंडळ सदस्य मृगजा कुलकर्णी, प्रमोद शिंदे, सिनेट सदस्य दादाभाऊ शिनलकर, गणपत नांगरे, पर्यवेक्षक निवृत्ती गोपाळे उपस्थित होते. मुख्याध्यापक रोहिणी काळे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय सतीश लिंबेकर, यादी वाचन अरुंधती पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन नवेश पाटील यांनी, तर कार्यक्रमाचे आभार शुभांगी घेवडे यांनी मानले. पसायदान विद्या वायकर यांनी म्हटले.

प्रभात PuneCity, 17 Dec 2022, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## 'मॉडर्न'मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि दादासाहेब अंतर शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या प्रसंगी सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू संजीव सोनवणे, ज्योत्स्ना एकबोटे, उद्धव खरे, मृगजा कुलकर्णी, प्रमोद शिंदे आदी उपस्थित होते.

Maharashtra Times 19.12.2022

नवभारत

## मॉर्डन स्कूल में पुरस्कार वितरण कार्यक्रम सम्पन्न



■ पुणे, (सं.) प्रोगेसिव एजुकेशन सोसायटी के मॉर्डन हाईस्कूल शिवाजीनगर पुणे के सभागृह में मेधावी विद्यार्थियों का सत्कार करने के साथ ही दादासाहेब एकबोटे इंटर स्कूल संस्कृत पाठ स्पर्धा के पुरस्कार दिए गए. कार्यक्रम के अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे कार्याध्यक्ष प्रोगेसिव एजुकेशन सोसायटी, चीफ गेस्ट पुणे यूनिवर्सिटी के कुलगुरु प्र. संजीव सोनवणे, नगरसेविका व संस्था सहकार्यवाह प्रा. ज्योत्सना एकबोटे, कार्यवाहक प्रा. शामकांत देशमुख, चितरंजन कांबले, डॉ. नंदकिशोर एकबोटे, मिलिंद एकबोटे, विजिटर उद्धव खरे, नियमक मंडल सदस्य मृगजा कुलकर्णी, प्रमोद शिंदे, सिनेट सदस्य दादाभाउ शिनलकर, गणपत नांगरे, पर्यवेक्षक निवृति गोपाले उपस्थित थे. मुख्याध्यापक रोहिनी काले ने प्रस्तावना पढ़ी. अतिथियों का परिचय सतीश लिंबेकर, सूची वाचन अरुंधति पिंगले, संचालन नवेश पाटिल,कार्यक्रम का आभार शुभांगी घेवडे ने जताया.

Pune Edition
17-december-2022 Page No. 2
epaper.enavabharat.com

सकाळ

## मानवाधिकार दिन 'मॉडर्न'मध्ये साजरा

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, मॉडर्न विधी महाविद्यालय समन्वयक डॉ. चिंतामणी घाटे, प्राचार्या डॉ. सुनीता आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला. या वेळी न्यायाधीश संजय देशमुख, अॅड. राजेंद्र अंबुले यांनी विद्यार्थ्यांना 'कायद्यामधील करिअरच्या संधी' विषयावर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन सहायक प्राध्यापक प्राजक्ता पिंपळशेंडे, वैष्णवी देसाई यांनी केले. यावेळी उपप्राचार्या डॉ. अनन्या बिबवे आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
20/12/2022 Page No. 1

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## डॉ. जाधवर यांची विद्या परिषदेवर निवड

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. २८ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक जानेवारी २०२३ मध्ये होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांची विद्यापरिषदेवर बिनविरोध निवड झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघ व अखिल भारतीय प्राचार्य महासंघ यांनी विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने एकत्रितपणे निवडणूका लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापूर्वी काही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली.

विद्या परिषदेवर प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांच्यासह प्रा. डॉ. कैलास कापडणीस, प्रा. डॉ. पराग काळकर, प्रा. डॉ. वीना नारे, प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे, प्रा. डॉ. राजश्री जायभाये, प्रा. डी.मोहन कांबळे यांची निवड झाली.

या बिनविरोध निवडीकरिता राजेश पांडे, डॉ. गजानन एकबोटे, नंदकुमार झावरे, प्रा. डॉ. एस. पी. लबांडे, प्रा. डॉ. के. एल. गिरमकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर हे पुण्यातील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत. विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेचे ते सदस्य म्हणून कार्यरत होते.

राज्यातील प्राचार्यांच्या हक्क आणि मागण्यांकरीता अनेक वर्षे कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रिन्सिपल फोरम, सी. वाय. डी. पी. शिक्षण व क्रीडा मंडळ, धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, जय गणेश एज्युकेशनल फाऊंडेशन, आदित्य एज्युकेशनल फाऊंडेशन आदी संस्थांवर ते कार्यरत आहेत.

प्रभात PuneCity, 29 Dec 2022, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## डॉ. सुधाकर जाधवर यांची बिनविरोध निवड



पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक जानेवारी महिन्यात होणार आहे. मात्र, त्यापूर्वी विद्यापरिषदेवर प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघ व अखिल भारतीय प्राचार्य महासंघ यांनी विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने एकत्रितपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापूर्वी काही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. विद्यापरिषदेवर प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांच्यासह प्रा. डॉ. कैलास कापडणीस, प्रा. डॉ. पराग काळकर, प्रा. डॉ. वीणा नारे, प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे, प्रा. डॉ. राजश्री जायभाये, प्रा. डी. मोहन कांबळे यांची निवड झाली. या बिनविरोध निवडीकरिता राजेश पांडे, डॉ. गजानन एकबोटे, नंदकुमार झावरे, प्रा. डॉ. एस. पी. लबांडे, प्रा. डॉ. के. एल. गिरमकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर हे पुण्यातील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेचे ते सदस्य म्हणून कार्यरत होते. याशिवाय राज्यातील प्राचार्यांच्या हक्क आणि मागण्यांकरिता अनेक वर्षे सातत्याने कार्यरत आहेत.

Kesari
30.12.2022

लोकमत

न्यूज Inbox

## डॉ. सुधाकर जाधवर यांची विद्यापीठ विद्यापरिषदेवर निवड



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक जानेवारी महिन्यात होणार आहे. मात्र, त्यापूर्वी विद्यापरिषदेवर प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांची बिनविरोध निवड झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघ व अखिल भारतीय प्राचार्य महासंघ यांनी विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने एकत्रितपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापूर्वी काही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. विद्यापरिषदेवर प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांच्यासह प्रा. डॉ. कैलास कापडणीस, प्रा. डॉ. पराग काळकर, प्रा. डॉ. वीना नारे, प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे, प्रा. डॉ. राजश्री जायभाये, प्रा. डी. मोहन कांबळे यांची निवड झाली. निवडीकरिता राजेश पांडे, डॉ. गजानन एकबोटे, नंदकुमार झावरे, डॉ. एस. पी. लबांडे यांनी परिश्रम घेतले.

Pune Main
Page No. 2 Dec 30, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

## 'पुरुषोत्तम'ची महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'महाराष्ट्रीय कलोपासक'च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. यंदा पाच विभागांतील १८ संघांमध्ये चुरस होणार आहे.

'पुरुषोत्तम करंडक २०२२'ची महाअंतिम फेरी भरत नाट्य मंदिर येथे २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी एक आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ या दोन सत्रांमध्ये स्पर्धा होणार असून, प्रत्येक सत्रात चार संघांचे सादरीकरण होणार आहे.

पुणे आणि नागपूर विभागांतून अनुक्रमे तीन क्रमांकांचे संघ महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. रत्नागिरी, कोल्हापूर आणि जळगाव या विभागांतून प्रत्येकी चार संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत. महाअंतिम फेरीनंतर २६ डिसेंबरला बक्षीस वितरण समारंभ होणार असल्याचे 'कलोपासक'चे मंगेश शिंदे यांनी सांगितले.

### पुणे विभागातील तीन संघ महाअंतिम फेरीत

स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत प्रथम तीन क्रमांक आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ही पारितोषिके प्राप्त झालेले संघ महाअंतिम फेरीत दाखल होतात. मात्र, यंदा प्राथमिक फेरीत पुरुषोत्तम करंडक आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकासाठीचा करंडक कोणत्याही संघाला दिला नव्हता. त्यामुळे पहिली तीन बक्षिसे पटकावलेले पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), बारामतीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयांचे संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत.

Maharashtra Times 16.12.2022

## पुरुषोत्तम महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून

पुणे : महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे आयोजित 'पुरुषोत्तम करंडक २०२२' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरीला येत्या २४ डिसेंबरपासून सुरूवात होत आहे. पुण्यासह रत्नागिरी, कोल्हापूर, जळगाव-औरंगाबाद आणि अमरावती-नागपूर विभागातील १८ संघांमध्ये 'पुरुषोत्तम'चा महाकरंडकासाठी चुरस रंगणार आहे.

सदाशिव पेठेतील भरत नाट्य मंदिर येथे २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत सकाळी ९ ते दुपारी १ व सायंकाळी ५ ते रात्री ९ अशा दोन सत्रांमध्ये स्पर्धा होणार आहेत. प्रत्येक सत्रात चार संघांचे सादरीकरण होणार आहे. तर, २६ डिसेंबरच्या सायंकाळच्या सत्रात बक्षीस वितरण समारंभ पार पडेल. पुणे व अमरावती-नागपूर विभागात सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचा करंडक कोणालाच न मिळाल्याने या विभागातून केवळ प्रथम तीन क्रमांकाचे संघ महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. तर, रत्नागिरी, कोल्हापूर आणि जळगाव-औरंगाबाद विभागातून प्रत्येकी चार संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत.

पुणे विभागाच्या प्राथमिक फेरीत पुरुषोत्तम करंडक कोणालाही न देण्याचा ऐतिहासिक निर्णय परीक्षकांनी घेतला होता. पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी) या संघाच्या 'कलीगमन' या एकांकिकेला करंडक न देता केवळ प्रथम क्रमांक देण्यात आला होता. या निर्णयाची चांगलीच चर्चा रंगली होती. मात्र करंडक मिळाला नसला तरी महाअंतिम फेरीत 'पीआयसीटी'चा संघ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय यांच्यासह संघ पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करेल.

Kesari 16.12.2022

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# 'पुरुषोत्तम'ची महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून

## १८ संघांमध्ये होणार रस्सीखेच : भरत नाट्य मंदिर येथे सादरीकरण

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६** - 'महाराष्ट्रीय कलोपासक'तर्फे आयोजित 'पुरुषोत्तम करंडक २०२२' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी येत्या २४ डिसेंबरपासून पुण्यात रंगणार आहे. पुण्यासह रत्नागिरी, कोल्हापूर, जळगाव-औरंगाबाद आणि अमरावती-नागपूर विभागातील १८ संघांमध्ये 'पुरुषोत्तम'चा महाकरंडकासाठी रस्सीखेच होणार आहे.

### करंडक न देण्याचा ऐतिहासिक निर्णय

पुणे विभागाच्या प्राथमिक फेरीत पुरुषोत्तम करंडक कोणालाही न देण्याचा ऐतिहासिक निर्णय परीक्षकांनी घेतला होता. 'पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी' (पीआयसीटी) या संघाच्या 'कलीगमन' या एकांकिकेला करंडक न देता केवळ प्रथम क्रमांक देण्यात आला होता. या निर्णयावरून वादाचा फैरी झडल्या होत्या. अनेक चर्चा रंगल्या होत्या. मात्र करंडक मिळाला नसला तरी महाअंतिम फेरीत 'पीआयसीटी'चा संघ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय यांच्यासह संघ पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

सदाशिव पेठेतील भरत नाट्य मंदिर येथे २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत सकाळी ९ ते १ आणि सायंकाळी ५ ते ९ अशा दोन सत्रांमध्ये स्पर्धा होणार आहे. प्रत्येक सत्रात चार संघांचे सादरीकरण होणार आहे. तर, २६ डिसेंबरला सायंकाळच्या सत्रात बक्षीस वितरण समारंभ पार पडेल. पुणे आणि अमरावती-नागपूर विभागात सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचा करंडक कोणालाच न मिळाल्याने या विभागातून केवळ प्रथम तीन क्रमांकाचे संघ महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. तर, रत्नागिरी, कोल्हापूर आणि जळगाव-औरंगाबाद विभागातून प्रत्येकी चार संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत.

प्रभात PuneCity, 17 Dec 2022, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

# मॉडर्न महाविद्यालयात 'अविष्कार' संशोधन स्पर्धा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६** - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात 'अविष्कार' या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य के. सी. मोहिते, तसेच प्रा. संजय ढोले, प्रा. रवींद्र जायभाय आदी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धेचे महत्त्व सांगितलेच. शिवाय आपल्या प्रगतीसाठी अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. स्पर्धेचे हे १६ वे वर्ष आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांच्या मदतीने स्पर्धेची पहिली फेरी संबंधित महाविद्यालयात महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आली. यात निवडलेल्या प्रकल्पांचे स्पर्धेच्या विभागीय फेरीसाठी मूल्यमापन करण्यात आले. या स्पर्धेसाठी राज्यातील तज्ज्ञांनी परीक्षण केले. या स्पर्धेसाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे, संस्थेच्या सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सचिव शामकांत देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

प्रभात PuneCity, 17 Dec 2022, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# ...अन् स्वप्न साकार झाल्यासारखे वाटले

पुढारी ANCHOR

### युवा कलाकारांची भावना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत एकांकिका सादर केली आणि प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसादही दिला. फेरीत सहभागी झाल्याने स्वप्न साकार झाल्यासारखे वाटले आणि आम्ही एकांकिकेतून दिलेला 'सर्वधर्मसमभावा'चा संदेशही प्रेक्षकांपर्यंत समपर्कपणे पोहचला. या रंगमंचावर सादरीकरण करण्याची संधी मिळाल्याने आम्ही स्वत:ला 'लकी' समजतो, अशी भावना देवगिरी महाविद्यालयाच्या (औरंगावाद) 'आम्ही सगळे' या एकांकिकेतील फैजान खान, सौरभ वाघ आणि अविनाश राठोड यांनी रविवारी व्यक्त केली.

पुरुषोत्तम करंडक

'महाराष्ट्रीय कलोपासक'तर्फे आयोजित 'पुरुषोत्तम करंडक २०२२' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीच्या दुसऱ्या दिवशीही युवा कलाकारांचा जोश अन् जल्लोष पाहायला मिळाला. भरत नाट्य मंदिरात रंगलेल्या या स्पर्धेसाठी राज्यभरातून संघ पुण्यात आले असून, प्रत्येक संघातील कलाकारांमध्ये कमालीचा उत्साह अन् आनंद पाहायला मिळत आहे. कोणी औरंगाबाद तर कोणी रत्नागिरीहून आले असून, विविध ठिकाणांहून आलेले हे युवा कलाकार आपल्या एकांकिकांतून अभिनयाची चमक दाखवत प्रेक्षकांची मने जिंकत आहेत अन् वेगळ्या धाटणीच्या विषयांनी, मांडणीने दाद मिळवत आहेत. पुरुषोत्तम करंडकच्या महाअंतिम फेरीत सहभागी झाल्याचा आनंदही त्यांच्यात पाहायला मिळत आहे. दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात चार आणि सायंकाळच्या सत्रात चार अशा एकूण आठ संघांचे सादरीकरण झाले. त्यात मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव या संघाची 'अबुटभर', प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन केंद्र, बडनेरा या संघाची 'आकार', स. ह. केळकर कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, देवगड संघाची 'डू ऑर ड्राय' आणि मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव संघाची 'कंदील' या एकांकिका सकाळच्या सत्रात सादर झाल्या. तर सायंकाळच्या सत्रात देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद संघाची 'आम्ही सगळे', शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद संघाची 'भानगड', गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी संघाची 'कुपान' आणि पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, पुणे संघाची 'कलिगमन' या एकांकिका सादर करण्यात आल्या. एकांकिका पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली अन् दिलखुलास दादही दिली. सोमवारी (दि. २६) सायंकाळी महाअंतिम फेरीचे पारितोषिक वितरण होणार आहे.



**देवगिरी महाविद्यालयाच्या (औरंगाबाद) 'आम्ही सगळे' या एकांकिकेतील एक प्रसंग.** (संग्रहित छायाचित्र)

### आज होणारे सादरीकरण

- सकाळी नऊ ते दुपारी एक
- मॉडर्न कला, शास्त्र आमि वाणिज्य महाविद्यालय (पुणे) : गाभारा
- डी. बी. जे. महाविद्यालय (चिपळूण) : बिऱ्हाड
- राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, साखराळे : तुम्ही ऑर नॉट टू मी

Pune Edition
Dec 26, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# संशोधन केंद्रांची होणार तपासणी

## तपासणीमध्ये योग्य आढळलेल्यांनाच 'पीएचडी' प्रवेश

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत पीएचडी प्रवेश देणाऱ्या सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक 'ऑडिट' केले जाणार आहे. या 'ऑडिट'मध्ये योग्य आढळणाऱ्या संशोधन केंद्रांनाच पीएचडी प्रवेशांची परवानगी दिली जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाकडून पीएचडी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, मुलाखतींचे सत्र सुरू करण्यात आले आहे. यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून पुणे, नगर, नाशिक आणि सिल्वासा या चार ठिकाणी असलेल्या संशोधन केंद्रांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत या सर्व संशोधन केंद्रांची तपासणी विद्यापीठाकडून नियुक्त करण्यात आलेली जिल्हानिहाय समिती करणार आहे. या समितीच्या सर्वेक्षणात एखादे केंद्र बोगस आढळल्यास त्याची मान्यता तातडीने रद्द केली जाईल व तिथे 'पीएचडी'चे प्रवेश दिले जाणार नाहीत, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. या संशोधन केंद्रांचे सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून सविस्तर वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वेबसाइटवर हे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, ५ ते १५ डिसेंबर दरम्यान सर्व संशोधन केंद्रांचे 'ऑडिट' केले जाणार आहे.त्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाईल.



### संशोधन केंद्रांचा तपशील

| जिल्हा | संशोधन केंद्र |
|---|---|
| पुणे शहर | १२३ |
| नगर | ३५ |
| नाशिक | २९ |
| पुणे ग्रामीण | २८ |
| एकूण | २१५ |

### खरेच कारवाई होणार का?

विद्यापीठाअंतर्गत असलेल्या अनेक संशोधन केंद्रांबाबत अनेक तक्रारी यापूर्वीही करण्यात आल्या आहेत. काही संशोधन केंद्रांमध्ये बोगस संशोधन चालते, अशाही तक्रारी वारंवार केल्या जातात. अशा बोगस असलेल्या केंद्रांवर विद्यापीठ प्रशासन खरेच कारवाई करणार का, असाही प्रश्न शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केला जात आहे.

### 'अहवाल प्रसिद्ध करा'

'विद्यापीठाच्या अंतर्गत येणारी जी संशोधन केंद्र बोगस आढळतील त्या केंद्रांची यादी विद्यापीठाकडून प्रसिद्ध केली जावी,' अशी मागणी होत आहे. अनेकदा ही सर्वेक्षणे होतात. मात्र, त्यामध्ये आढळून आलेली माहिती ही कागदपत्रांमध्येच पडून राहते. त्याचे पुढे काहीही होत नाही. यंदा तरी विद्यापीठाने ही माहिती प्रसिद्ध करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

Maharashtra Times 1.12.2022

## News Paper Clippings During December 2022

### Section: Education

# कुलगुरू निवड कधी?

## 'यूजीसी'च्या परिपत्रकाचा सरकारला विसर; जाहिरातीची प्रसिद्धी पुन्हा?

मटा विशेष

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT

**काय आहेत आक्षेप?**

- कुलगुरू निवड समितीत यूजीसीचे प्रतिनिधी नाहीत.
- अनुभवाच्या पात्रतेत बदल
- शैक्षणिक पात्रतेबाबत भिन्नता
- यूजीसी आणि राज्य सरकारच्या अधिसूचनेत तफावत

**गुजरातमध्ये कुलगुरूंचा राजीनामा**

गुजरातमध्ये 'यूजीसी'च्या नियमावलीनुसार कुलगुरू निवड प्रक्रिया न राबवता, सरकारच्या नियमावलीप्रमाणे राबविण्यात आली. याबाबत प्राध्यापकाकडून न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेचा निकाल संबंधित प्राध्यापकाच्या बाजूने लागल्यानंतर गुजरात सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, हा निकालही प्राध्यापकाच्या बाजूने आल्यानंतर, कुलगुरूंना राजीनामा द्यावा लागला. असाच काहीसा प्रकार केरळमध्येही झाल्याने, राज्य सरकारने बोध घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**"राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरू निवड प्रक्रियेला आधीच उशिराने सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारने तातडीने 'यूजीसी'ने नमूद केलेल्या नियमावलीप्रमाणे कुलगुरू निवड प्रक्रिया राबवावी. याप्रमाणे निवड प्रक्रिया न राबवल्यास, गुजरातप्रमाणे राज्यातही पुढे अडचण येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

– डॉ. ए. पी. कुलकर्णी, नेते, राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ

**"विद्यापीठांची कुलगुरू निवड प्रक्रिया ही 'यूजीसी'च्या परिपत्रकाप्रमाणे होणे गरजेचे आहे. हे परिपत्रक अनिवार्य आहे. मात्र, कुलगुरू निवड प्रक्रिया या परिपत्रकाप्रमाणे होत नसल्याने, आम्ही मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर एक सुनावणी झाली असून, राज्य सरकारला आपले म्हणणे मांडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

– डॉ. एस. पी. लवांडे, अध्यक्ष, एमफुक्टो

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अनिवार्य केलेले कुलगुरू निवडीचे निकष पाळण्यात आले नाहीत. त्यामुळे निवड प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात पुन्हा नव्याने प्रकाशित करावी लागण्याची शक्यता आहे.

असाच प्रकार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबाबतही घडल्याने, निवड प्रक्रियेची अंतर्गत मुलाखत प्रक्रिया थांबवली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाची कुलगुरू निवड प्रक्रिया रखडण्याची शक्यता आहे.

माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १८ मे रोजी निवृत्त झाले. त्यानंतर विद्यापीठाला पूर्ण वेळ कुलगुरू मिळालेले नाहीत. त्यातच राज्यात सत्ताबदल झाल्याने कुलगुरू निवडीची प्रक्रिया रखडली. त्यामुळे ही निवड प्रक्रिया काही दिवसांपूर्वी सुरू झाली आहे. या अंतर्गत 'कुलगुरू शोध समिती' स्थापन झाली असून, त्यात विद्यापीठ प्रतिनिधी, राज्य सरकारचे प्रतिनिधी आणि कुलपती कार्यालयाचे प्रतिनिधी आहेत. या समितीच्या अध्यक्षांनी कुलगुरू निवड प्रक्रियेला गती देण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार इच्छुकांना १४ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करायचे आहेत. मात्र, या प्रक्रियेवर आक्षेप घेतला आहे.

'यूजीसी'ने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाद्वारे कुलगुरू निवड प्रक्रिया होत नाही, असा आक्षेप 'महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन'ने (एमफुक्टो) नोंदवला आहे. 'यूजीसी'ने नमूद केलेल्या कार्यप्रणालीप्रमाणेच कुलगुरू निवड प्रक्रिया व्हायला पाहिजे, यासाठी 'एमफुक्टो'ने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यावरील सुनावणीनंतर राज्य सरकारला आपले म्हणणे मांडण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मुक्त विद्यापीठाची कुलगुरू निवड प्रक्रिया अचानक थांबविण्यात आली आहे. त्यामुळे सध्याच्या जाहिरातीनुसार कुलगुरू निवड झाल्यास, ते योग्य ठरणार नाही, अशी टिप्पणी अभ्यासकांनी केली आहे.

या परिस्थितीत राज्य सरकार आणि विद्यापीठाने यूजीसीने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाद्वारे कुलगुरू निवड प्रक्रिया राबवण्याची आवश्यकता असल्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. के. एल. गिरमकर यांनी सांगितले. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेबाबत राज्य सरकारने सावध भूमिका घेतल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

Maharashtra Times 1.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# पीएच.डी. संशोधन केंद्रांतील गैरप्रकारांना चाप?

## शैक्षणिक, प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याचा विद्यापीठाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत पीएच.डी. प्रवेश देणाऱ्या सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. संशोधन मान्यता आणि अन्य पूर्तता करणाऱ्या केंद्रांनाच पीएच.डी. प्रवेशांसाठी परवानगी दिली जाणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मुलाखती पूर्ण झाल्यावर उमेदवारांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून पुणे, नगर, नाशिक आणि सिल्वासा येथील संशोधन केंद्रांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. मात्र प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सर्व संशोधन केंद्रांची तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून जिल्हानिहाय समिती नियुक्त करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संशोधन केंद्रांच्या लेखापरीक्षणाचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. ५ ते १५ डिसेंबर दरम्यान सर्व संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण करण्यात येईल. या लेखापरीक्षणासाठी संशोधन केंद्रांना माहिती सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

संशोधन मान्यता आणि अन्य बाबींची पूर्तता करणाऱ्या आणि समितीने शिफारस केलेल्या संशोधन केंद्रांवरच पीएच.डी.चे प्रवेश करण्यास मान्यता देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे नमूद केले आहे.

### खरोखरच कारवाई होणार?

विद्यापीठाने मान्यता दिलेल्या संशोधन केंद्रांकडून अतिरिक्त शुल्क घेतल्यासह विविध गैरप्रकारांच्या तक्रारी अनेकदा करण्यात आल्या आहेत. आता या लेखापरीक्षणातून संशोधन केंद्रातील गैरप्रकार निदर्शनास येण्याची शक्यता आहे. विद्यापीठाने लेखापरीक्षणाची केवळ कागदोपत्री प्रक्रिया न करता गैरप्रकार आढळल्याने मान्यता रद्द केलेल्या संशोधन केंद्रांची नावे जाहीर करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

**संशोधन केंद्रांचा तपशील**

| जिल्हा | संशोधन केंद्र |
|---|---|
| पुणे शहर | १२३ |
| नगर | ३५ |
| नाशिक | २९ |
| पुणे ग्रामीण | २८ |

लोकसत्ता Fri, 02 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71026092

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

सकाळ

# शिक्षण संस्थांच्या दर्जाचे होणार 'अॅकॅडमिक ऑडिट'

## उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांची माहिती; पुण्यात पत्रकारांशी साधला संवाद

पुणे, ता. २ : ''शैक्षणिक संस्थांनी दर तीन वर्षांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यामध्ये आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थी आणि पालकांना संबंधित शैक्षणिक संस्थेची माहिती मिळण्यासाठी लेखापरीक्षण आवश्यक असते. आतापर्यंत संस्थांचे लेखापरीक्षण हा विषय दुर्लक्षित राहिला आहे. परंतु आता राज्यातील शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक दर्जा तपासण्यासाठी 'अॅकॅडमिक ऑडिट' करण्यात येईल,'' असे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले.

डॉ. देवळाणकर यांनी राज्याचे नवे उच्च शिक्षण संचालक म्हणून नुकताच पदभार स्वीकारला. त्यानिमित्त त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह उच्च शिक्षणातील विविध मुद्द्यांवर त्यांनी चर्चा केली. उच्च शिक्षण संस्थेमधील पायाभूत सुविधा, प्राध्यापकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान होणे, प्राध्यापकांची भरती, अध्ययन आणि अध्यापन पद्धती यासंदर्भातील 'संस्था विकास नियोजन' (इन्स्टिट्यूशनल डेव्हलपमेंट प्लॅन-आयडीपी) करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने जानेवारी २०२२ मध्ये मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार आता शासकीय महाविद्यालयांचा आयडीपी तयार करण्यात येणार असल्याचे डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, ''येत्या शैक्षणिक वर्षापासून चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम लागू होईल, त्यादृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत. धोरणानुसार आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी क्लस्टर संस्था हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राज्यात राबविण्यात येणार आहे.'' उच्च शिक्षण विभागांतर्गत असणाऱ्या अनेक महाविद्यालयांनी अद्याप एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतलेले नाही, अशा महाविद्यालयांचे मूल्यांकन करण्यासाठी पावले उचलण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

### 'श्रेयांका'त समानता आणण्याचा प्रयत्न

राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांमधील श्रेयांकांची (क्रेडिट) रचना वेगवेगळी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना वेगवेगळा श्रेयांक असल्यामुळे गोंधळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा गोंधळ टाळण्यासाठी स्वायत्त महाविद्यालयांसाठी श्रेयांकांची समान नियमावली लागू करण्यात येणार असल्याचेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

### 'विचार गट' म्हणूनही संचालनालयाचे कामकाज

महाविद्यालये, विद्यापीठांकडून माहिती घेऊन शासनाला अहवाल देणे आणि शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करून घेणे, अशी कामे उच्च शिक्षण संचलनालयाकडून प्रामुख्याने करण्यात येतात. परंतु आता या प्रशासकीय कामाबरोबरच उच्च शिक्षणातील विविध मुद्द्यांवर 'विचार गट' (थिंक टँक) म्हणूनही काम करण्याचा प्रयत्न होईल, असेही डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.

Pune, Main
03/12/2022 Page No. 4

# स्वायत्त महाविद्यालयांसाठी एकच नियमावली

## श्रेयांकातील गोंधळ दूर करणार : उच्च शिक्षण संचालक डॉ. देवळाणकर यांची माहिती

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २ - राज्यातील स्वायत्तता महाविद्यालयात श्रेयांकपद्धतीची अंमलबजावणी करताना अथवा नवे अभ्यासक्रम सुरू करताना एकरूप परिनियमात तफावत दिसून येत आहे. स्वायत्त महाविद्यालयातील श्रेयांकातील गोंधळ दूर करण्यासाठी व त्यात सुसूत्रता राहण्यासाठी सर्व स्वायत्त महाविद्यालयांसाठी एकच समान नियमावली करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

डॉ. देवळाणकर यांनी उच्च शिक्षण संचालक पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला. त्यानिमित्ताने त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'नव्या शैक्षणिक धोरणाची येत्या जूनपासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असेल. त्याशिवाय शासकीय महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येईल. या धोरणामध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी समूह संस्थांची तरतूद आहे. त्याचा प्रायोगिक प्रकल्प औरंगाबाद आणि नागपूर येथे करण्यात येणार आहे. त्यातून संस्था आणि महाविद्यालयांच्या अडचणी दूर होण्यास मदत मिळणार आहे. यासाठी वेगाने कार्य करण्यास आमचे प्राधान्य असेल.'

### 'नॅक' मूल्यांकनासाठी पुढाकार

'उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या महाविद्यालयांपैकी अनेक अनुदानित महाविद्यालयांनी अद्याप एकदाही 'नॅक' मूल्यांकन करून घेतलेले नाही. 'नॅक' मूल्यांकन बंधनकारक असल्याने महाविद्यालयांच्या मूल्यांकन करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालयांना येत्या काळात मूल्यांकन करून घ्यावे लागेल. अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल,' असेही डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.

**नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून-२०२३ पासून**

प्रभात
PuneCity, 03 Dec 2022, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# नव्या शैक्षणिक धोरणात एकाच ठिकाणी शिक्षण

प्रभात वृत्तसेवा

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती



पुणे, दि. २ - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सर्व प्रकारचे शिक्षण एकाच ठिकाणी देण्याचे नियोजन आहे. यामध्ये सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने योगदान द्यावे, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि 'इंडियन जिओटेक्निकल सोसायटी' (आयजीएस) यांच्या विद्यमाने सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ येथे आयोजित 'आयजीएस'च्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त बोधचिन्हाचा ई-अनावरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, सीओईपी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुकुल सुतावणे, आयजीएसचे अध्यक्ष विकास पाटील, युवा संकल्प अभियान समितीचे अध्यक्ष राजेश पांडे आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, संरचनांचा पाया मजबूत करण्यासोबतच त्यावर संशोधन करण्याचे कार्य सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठामध्ये होते. शहरात इमारती, मेट्रो, उड्डाणपूल उभारणी सुरु आहे. त्यामुळे या क्षेत्राचे महत्व लक्षात घेता त्यादृष्टीने उपक्रम राबवून संशोधनात्मक काम करण्याची गरज आहे. आयजीएसचे संस्थापक अध्यक्ष रमेश कुलकर्णी, जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र हिरेमठ आणि सीओईपीचे पहिले कुलगुरु प्रा. डॉ. सुतावणे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि आयजीएस संस्थेची माहिती देणाऱ्या चित्रफितीचे अनावरणही करण्यात आले.

### जी- २० परिषदेत सहभागी व्हा

जानेवारी-२०२३ मध्ये जी- २० परिषदेतील सत्रांचे महाराष्ट्रात मुंबईसह पुणे व औरंगाबाद येथे आयोजन करण्यात येणार आहे. परिषदेचे प्रतिनिधी पुण्यातील ऐतिहासिक व महत्वाची वारसा ठिकाणे, शैक्षणिक ठिकाणे, उद्योग आदी ठिकाणी भेटी देणार आहेत. नागरिकांनी यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रभात PuneCity, 03 Dec 2022, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

# स्वायत्त महाविद्यालयांच्या श्रेयांकांसाठी समान नियमावली

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांमध्ये सध्या श्रेयांकांची रचना वेगवेगळी आहे. मात्र आता नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना श्रेयांकांचा गोंधळ टाळण्यासाठी स्वायत्त महाविद्यालयांसाठी श्रेयांकांसाठीची समान नियमावली लागू करण्यात येणार असल्याची माहिती माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

उच्च शिक्षण संचालक म्हणून डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्या अनुषंगाने त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. डॉ. देवळाणकर म्हणाले, की नव्या शैक्षणिक धोरणाची जून २०२३ पासून अंमलबजावणी सुरू होईल.चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असेल. त्याशिवाय शासकीय महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येईल. या धोरणामध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी समूह संस्थांची तरतूद आहे. त्याचा प्रायोगिक प्रकल्प औरंगाबाद आणि नागपूर येथे केली करण्यात येणार आहे. संचालनालयाच्या अखत्यारितील महाविद्यालयांपैकी अनेक अनुदानित महाविद्यालयांनी अद्याप एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतलेले नाही. आता महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन न केल्यास कारवाई करण्यात येईल. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, गुणवत्ता वाढ या बाबत थिंक टँकप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाने काम करण्याचा प्रयत्न असल्याचेही डॉ. देवळाणकर यांनी नमूद केले.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sat, 03 December 2022
https://epaper.loksatta.com/

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# राज्यातील महाविद्यालयांचे होणार ऑडिट

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांची माहिती**

म. टा. प्रतिनिधी, पुणे



डॉ. शैलेंद्र देवळाणकर

'राज्यातील सर्व महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण (ऑडिट) करण्यात येणार आहे,' अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी शुक्रवारी दिली.

नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२३पासून करण्यात येणार आहे. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असून, त्यासाठी सरकारी महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येणार असल्याचेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

उच्च शिक्षण संचालक म्हणून डॉ. देवळाणकर यांनी नुकताच पदभार स्वीकारला. या पार्श्वभूमीवर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह विविध मुद्द्यांवर डॉ. देवळाणकर यांनी भाष्य केले. 'सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयांचे दर तीन वर्षांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची तरतूद आहे. महाविद्यालयांबाबत विद्यार्थी-पालकांना माहिती मिळणे आवश्यक असूनही आतापर्यंत या लेखापरीक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आगामी काळात महाविद्यालयांचे लेखापरीक्षण करण्यात येईल. त्यासोबतच नॅक मूल्यांकन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. नव्या शैक्षणिक धोरणाची जून २०२३पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असेल. त्याशिवाय सरकारी महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येईल. या धोरणामध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी समूह संस्थांची तरतूद आहे. त्याचा प्रायोगिक प्रकल्प औरंगाबाद आणि नागपूर शहरात करण्यात येणार आहे,' असेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

महाविद्यालये, विद्यापीठांकडून माहिती घेऊन सरकारला अहवाल देणे आणि सरकारचा आदेश, उपक्रमांची माहिती विद्यापीठे, महाविद्यालयांपर्यंत पोहोचवणे या प्रकारचे काम उच्च शिक्षण संचालनालयाकडून करण्यात येते.



**"प्रशासकीय कामाच्या पलीकडे जाऊन नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, गुणवत्ता वाढ अशा विविध मुद्द्यांवर 'थिंक टँक'च्या धर्तीवर उच्च शिक्षण संचालनालयाचा काम करण्याचा प्रयत्न आहे.**

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

**'नॅक मूल्यांकन करणे गरजेचे'**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या महाविद्यालयांपैकी अनेक अनुदानित महाविद्यालयांनी अद्याप एकदाही 'नॅक' मूल्यांकन करून घेतलेले नाही. 'नॅक' मूल्यांकन बंधनकारक असल्याने महाविद्यालयांचे मूल्यांकन करून घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. त्यासाठी नॅक मूल्यांकन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासह मूल्यांकन करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया विशिष्ट वेळेत पूर्ण करावी लागणार आहे. त्यानुसार महाविद्यालयांना येत्या काळात नॅक मूल्यांकन करून घ्यावे लागेल. अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 3.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

पुढारी

# महाविद्यालयांचे आता शैक्षणिक लेखापरीक्षण

**ऑडिट करण्याकडे शिक्षण संस्था करताहेत दुर्लक्ष**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयांचे दर तीन वर्षांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखा-परीक्षण करण्याची तरतूद आहे. महाविद्यालयांबाबत विद्यार्थी-पालकांना माहिती मिळणे आवश्यक असताना आतापर्यंत या लेखापरी-क्षणाकडे दुर्लक्ष झाले आहे. मात्र आता राज्यातील सर्व महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

**उच्च शिक्षण संचालक देवळाणकर यांची माहिती**

उच्च शिक्षण संचालक म्हणून डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्या अनुषंगाने त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह विविध मुद्द्यांवर डॉ. देवळाणकर यांनी भाष्य केले. डॉ. देवळाणकर म्हणाले की, नव्या शैक्षणिक धोरणाची जून २०२३पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असेल.

त्याशिवाय शासकीय महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येईल. या धोरणामध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी समूह संस्थांची तरतूद आहे. त्याचा प्रायोगिक प्रकल्प औरंगाबाद आणि नागपूर येथे करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या महाविद्यालयांपैकी अनेक अनुदानित महाविद्यालयांनी अद्याप एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतलेले नाही. नॅक मूल्यांकन बंधनकारक असल्याने महाविद्यालयांचे मूल्यांकन करून घेण्यासाठी नुकतीच एक कार्यशाळाही घेण्यात आली. त्यात नॅक मूल्यांकन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासह मूल्यांकन करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालयांना येत्या काळात नॅक मूल्यांकन करून घ्यावे लागेल. अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. देवळ-णकर यांनी सांगितले.

### 'थिंक टँक'प्रमाणे काम...

राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठांकडून माहिती घेऊन शासनाला अहवाल देणे आणि शासनाच्या आदेश, उपक्रमांची माहिती विद्यापीठे, महाविद्यालयांपर्यंत पोहोचवणे या प्रकारचे काम उच्च शिक्षण संचालनालयाकडून प्रामुख्याने करण्यात येते. मात्र आता या प्रशासकीय कामाच्या पलीकडे जाऊन नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, गुणवत्ता वाढ अशा विविध मुद्द्यांवर थिंक टँकच्या धर्तीवर उच्च शिक्षण संचालनालयाने काम करण्याचा प्रयत्न असल्याचेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Dec 3, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# मातृभाषेतील शिक्षणाने आकलन समृद्ध होईल

**देशात उच्च शिक्षण मातृभाषेत करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. २०१० ला भारत सरकारने पारित केलेल्या शिक्षण हक्क कायद्याने देखील प्राथमिक शिक्षण मातृभाषेत असावे असे म्हटले आहे. ३४ वर्षांनंतर आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानेदेखील मातृभाषेतील शिक्षण दिले जावे, असे म्हटले आहे.**

मातृभाषेत शिक्षण देण्याचा विचार केंद्र सरकारने केल्याने मुलांच्या आकलनाचा प्रवास सुलभ आणि समृद्ध होईल. भाषेच्या प्रतिष्ठेबरोबर मुलांचे शिकणे अधिक परिणामकारक होण्याचा हा प्रवास आहे. त्यादृष्टीने शासनाचे हे पाऊल अभिनंदनीय आहे. शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते. संकल्पना न समजता आपण पुढे जात राहिलो, तर विद्यार्थ्याला उत्तीर्ण होता येते; मात्र जीवनासाठीचे शिक्षण मिळण्याची शक्यता नाही

महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे सूतोवाच करताना राज्यात मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात येईल अशी आग्रही भूमिका प्रतिपादन केली. उच्च शिक्षण विभागाने वैद्यकीय शिक्षणदेखील मराठीत करण्यासाठी समिती गठीत केली. देशात उच्च शिक्षण मातृभाषेत करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. २०१० ला भारत सरकारने पारित केलेल्या शिक्षण हक्क कायद्याने देखील प्राथमिक शिक्षण मातृभाषेत असावे, असे म्हटले आहे. ३४ वर्षांनंतर आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने देखील मातृभाषेतील शिक्षण दिले जावे, असे म्हटले आहे. पायाभूत शिक्षणाची संकल्पना पुढे नेताना मातृभाषा शिक्षणाचा विचार प्रतिपादित करण्यात आला होता. जगभरातील शिक्षणतज्ज्ञ आणि भाषा अभ्यासक यांनी शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह केला आहे. त्यामुळे सरकारी भूमिकेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शैक्षणिक गुणवत्तेचा प्रश्न निकाली निघण्याची शक्यता अधिक आहे. मातृभाषेत शिक्षण याचा अर्थ इंग्रजी भाषेचा अथवा इतर भाषांचा द्वेष असा नाही. भाषा अभ्यासकांच्या मते स्वतःची भाषा उत्तम आली की, इतर भाषा शिकणेदेखील सुलभ होते. त्यामुळे इतर भाषा आत्मसात करण्याचा मार्ग खुला होतो.

देशाचे शिक्षणाचे चित्र बदलण्यासाठी सातत्याने बोलले जात आहे. अनेक समित्यांचे अहवाल येताहेत. शैक्षणिक धोरणे आखली जाता आहेत. शिक्षणासाठी विविध प्रकारची गुंतवणूक करण्याचे सूतोवाच केले जात आहेत; मात्र विविध समित्यांच्या अहवालांच्या शिफारशी मातृभाषेतून शिक्षण याच आहेत. महात्मा गांधीजींनी देखील शिक्षण सक्तीचे करण्याची भूमिका घेताना मातृभाषेत शिक्षणाचा विचार प्रतिपादित केला होता. जगातील अनेक प्रगत राष्ट्रांमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जात आहे. मातृभाषेतील शिक्षण हेच प्रगती लक्षण आहे. महात्मा गांधी हे प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञ होते. येथील मातीची आणि माणसांची असणारी मानसिकता, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पार्श्वभूमी त्यांना चांगली ज्ञात होती. त्यामुळे येथील परीस्थितीत परिवर्तन करण्याचा राजमार्ग शिक्षणाच्या महाद्वारातून जातो, हे त्यांनी ओळखले होते. महात्मा गांधी यांनी आपल्या शिक्षण संकल्पनेत शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, तसेच मातृभाषेतून शिक्षणाची भूमिका मांडली होती. त्यांच्या मातृभाषेच्या आग्रहामागे शिक्षण जीवनाभिमुख करण्याचा विचार होता.



मातृभाषेचा आग्रह हा अभिमान असेल; मात्र शैक्षणिकदृष्टया मातृभाषेतून शिक्षण म्हणजे गुणवत्तेचा प्रवास आहे. जोवर शिक्षणाची प्रक्रिया ही समजावून केली जात नाही तोवर आपल्याला गुणवत्तेचा आलेख उंचावता येणार नाही. शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते. संकल्पना न समजता आपण पुढे जात राहिलो, तर विद्यार्थ्याला उत्तीर्ण होता येते; मात्र जीवनासाठीचे शिक्षण मिळण्याची शक्यता नाही. निरंतर शिक्षण हे आपले ध्येय आहे; मात्र जेथे पाठ्यक्रमातील पुस्तक समजावून घेणे ही मोठी अवघड गोष्ट बनते तेथे निरंतर शिक्षणाचा प्रवास कठीण आहे. गांधीजींनी सतत मातृभाषेच्या विचारांचे समर्थन केले आहे. त्यांनी इंग्रजांना जसा विरोध केला तसा इंग्रजीला देखील केला. त्या विरोधामागे शिक्षणाची विचारधारा होती. मुलांच्या विकासाचा विचार होता. ते म्हणत, मुलांवर इंग्रजी लादणे, त्याला बळजबरीने इंग्रजीच्या शिक्षणांशी जोडणे म्हणजे त्याच्या नैसर्गिक शिक्षणप्रक्रियेला बाधा आणणे आहे. त्यांच्या मूळ स्वरूपालाच नष्ट करणे आहे. शिक्षणाचा पाया हा मातृभाषाच असायला हवा, ही जगभरातील भाषातज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांची भाषा गांधीजी बोलत होते. त्यामागे सामाजिक धारणा आणि समाजाच्या विकासप्रक्रियेचे मूळ होते. त्यामुळे वर्धा शिक्षण परिषदेत मातृभाषा शिक्षणाचे जोरदार समर्थन करण्यात आले होते.

अलीकडे मातभाषेतील शिक्षण नाकारणाऱ्या माणसांची विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तर ते सांगतात की, जगण्याची शक्ती देणारी व्यवस्था मातृभाषेत नाही. आज जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरणाचा विचार करता इंग्रजी ही भाषा जगाला जवळ आणणारी वाटू लागली आहे. अर्थात, कोणत्याही भाषेचे उद्दिष्ट हे संवाद, विचारांचे आदान-प्रदान, ज्ञानाची निर्मिती हेच राहिले आहे. त्यामुळे इंग्रजी म्हणजे जगाला मुठीत घेणारी भाषा असे वाटणे साहजिक आहे; मात्र त्याचवेळी शासनाने उच्च शिक्षण मराठीतून देण्याचा सुरू केलेला विचार अधिक स्वागतार्ह आहे. यामुळे भाषेत नवनवीन शब्दांची भर पडणार आहे. जगात होणाऱ्या संशोधनातील विविध संकल्पना, तेथील ज्ञान मातृभाषेत आले, तर येथील पिढी जशी ज्ञानसंपन्न होईल त्याप्रमाणे भाषेच्या शब्दसंपत्तीत नवी भर पडणार आहे. भाषा समृद्ध होत राहिली, तर तिचा लोकव्यवहारात उपयोग वाढत जातो. लोकव्यवहारात भाषा आली, तर भाषेच्या मृत्यूची चिंता व्यर्थ ठरते. इंग्रजी भाषा जगभरातील अनेक शब्दांची भर टाकत दरवर्षी वाढत जाते. सातत्याने इंग्रजीत नवनवीन शब्दकोष बाजारात उपलब्ध होतात. मराठी भाषेतून उच्च शिक्षण घेताना भाषाकोषांची गरज भासणार आहेच. भाषा समृद्धतेचा मार्ग आहे. त्यामुळे प्राथमिक स्तरावर मराठी शिकून काय करायचे, असा पडणारा प्रश्नदेखील निकाली निघेल. उच्च शिक्षणाची भाषा म्हणून पालक मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाठवतात. शेवटी शिक्षणाची भाषा आणि तिचा भविष्यासाठी होणारा उपयोग याचे नाते असतेच. उच्च शिक्षण मराठीत आल्याने गुणवत्ता उंचावण्यास मदत होईल. त्याचा परिणाम प्राथमिक,माध्यमिक शाळांमधील प्रवेश उंचावण्यावर होईल.

- **संदीप वाकचौरे**, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

Pune Edition
Dec 3, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रमासाठी श्रेणीबद्ध विद्यापीठांनाही पूर्वपरवानगी बंधनकारक

## नियमावलीमध्ये दुरुस्ती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील श्रेणीबद्ध स्वायत्तता (ग्रेडेड ऑटॉनॉमी) प्राप्त विद्यापीठांना मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आता विद्यापीठ अनुदान आयोगाची (यूजीसी) पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. यूजीसीने २०१८ मधील नियमावलीमध्ये दुरुस्ती करून श्रेणीबद्ध विद्यापीठांनी मान्यता घेण्याचा नियम समाविष्ट केला असून, त्याबाबतचे राजपत्रही प्रसिद्ध करण्यात आले आहे.

उच्च शिक्षणासंदर्भात यूजीसीकडून अलीकडे काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. त्यात आता श्रेणीबद्ध विद्यापीठांच्या मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रमांबाबतही महत्त्वपूर्ण बदलाचीही भर पडली आहे. श्रेणीबद्ध विद्यापीठांनी मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत यूजीसीने २०१८ मध्ये नियमावली केली होती. त्या नियमावलीनुसार श्रेणीबद्ध विद्यापीठांना यूजीसीच्या मान्यतेशिवाय मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम थेट सुरू करण्याची मुभा होती. केवळ संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक बाबींची पूर्तता विद्यापीठांनी करणे आवश्यक होते. आता या नियमात यूजीसीकडून दुरुस्ती करण्यात आली आहे. आता श्रेणीबद्ध विद्यापीठांनाही मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी यूजीसीची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आल्याचे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने श्रेणीबद्ध स्वायत्ततेअंतर्गत २०१९ पासून दूरशिक्षण अभ्यासक्रम थेट सुरू केले आहे. श्रेणीबद्ध विद्यापीठांना मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीच्या खुल्या मान्यतेमुळे यूजीसीकडे काही अभ्यासक्रमांची नोंदणी झालेली नसल्याचा प्रकार घडलेला असू शकतो. त्यामुळे हा बदल यूजीसीकडून करण्यात आल्याची शक्यता आहे. दूरशिक्षण अभ्यासक्रमांच्या नियमनासाठी हा बदल स्वागतार्ह असल्याचे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी नव्या नियमाबाबत मांडले.

लोकसत्ता Tue, 06 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71060580

---

लोकमत

# विद्यापीठाचे दीडशे शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार

## रोजगाराभिमुख शिक्षण, संशोधनासाठी होणार मदत : शैक्षणिक, तंत्रज्ञानाची होणार देवाण-घेवाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तीन वर्षांत दीडशेपेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार केला आहे. या माध्यमातून शैक्षणिक आणि तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण तसेच संशोधनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात अकॅडमिक क्रेडिट बँक, द्विलक्षी अभ्यासक्रम, क्रेडिट बेस चॉईस



सिस्टीम, संशोधन आदींबाबत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. रोजगाराभिमुख शिक्षण, उद्योगांशी समन्वय, संशोधन आणि संशोधनातून तंत्रज्ञान विकास यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी विद्यापीठाने करार केले आहेत.

> राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून शैक्षणिक देवाण-घेवाण, संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान आदी गोष्टी मोठ्या प्रमाणावर साध्य करणे शक्य झाले आहे. अकॅडमिक क्रेडिट बँक, बहुसंस्था धोरण, उद्योग क्षेत्राशी संबंध, संशोधन याचा फायदा विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना होणार आहे.
>
> **- डॉ. कारभारी काळे, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

आंतरराष्ट्रीय करारामध्ये विद्यापीठाने हार्वर्ड बिझनेस स्कूल, मेलबर्न युनिव्हर्सिटी, द युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कचे सिटी कॉलेज, जपान, ऑस्ट्रिया, पॅरिस, फ्रान्स, ग्रीस, जर्मनी, नॉर्वे, लंडन, यूएसए, पोलंड आदी देशांत असणाऱ्या विद्यापीठ आणि तेथील नामांकित शैक्षणिक संस्थांशी करार केले आहेत. राष्ट्रीय पातळीवर देखील इस्रो, मारुती सुझुकी, चार्टर्ड अकाऊंटंट इन्स्टिट्यूट, आयबीएम इनोवेशन सेंटर, आयुष इन्स्टिट्यूशन, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी, सिरम इन्स्टिट्यूट, एएफएमसी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी, सेंटर फॉर मटेरियल फॉर इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी, अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय आदी संस्थांसोबत करार झाले. स्थानिक पातळीवर राजा दिनकर केळकर संग्रहालय, पिंपरी चिंचवड पालिका, पुणे महापालिका, संचेती हेल्थकेअर, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटल, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, ड्रोन आचार्य एरियल इनोवेशन यासह इतर संस्थांचा समावेश आहे.

Pune Main
Page No. 2 Dec 06, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

**लोकमत**

### 'महाविद्यालयांचेही होणार लेखापरीक्षण'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील सर्व महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयांचे दर तीन वर्षांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची तरतूद असून, त्यानुसार हे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

डॉ. देवळाणकर म्हणाले की, राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठांकडून माहिती घेऊन शासनाला अहवाल देणे आणि शासनाच्या आदेश, उपक्रमांची माहिती विद्यापीठे, महाविद्यालयांपर्यंत पोहोचवणे या प्रकारचे काम उच्च शिक्षण संचालनालयाकडून प्रामुख्याने करण्यात येते. आता यापुढे जात प्रशासकीय कामाच्या पलीकडे जाऊन नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, गुणवत्ता वाढ अशा विविध मुद्द्यांवर थिंक टँकच्या धर्तीवर काम करण्यात येईल. नव्या शैक्षणिक धोरणाबाबत बोलताना ते म्हणाले की, जून २०२३ पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यानुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम हा त्यातील पहिला टप्पा असेल. तसेच शासकीय महाविद्यालयांचा 'संस्था विकास आराखडा' (आयडीपी) तयार करण्यात येईल.

Pune Main
Page No. 2 Dec 06, 2022
Powered by: erelego.com

**पुढारी**



### विद्यापीठाचे तीन वर्षांत दीडशे सामंजस्य करार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची घोडदौड कायम आहे. मागील तीन वर्षांत विद्यापीठाने १५० हून अधिक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार केले आहेत. याचा लेखाजोखा नुकत्याच झालेल्या कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी मांडला.

**राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामांकित संस्थांशी करार**

नवीन शैक्षणिक धोरणात अॅकॅडमिक क्रेडिट बँक, द्विलक्ष्यी अभ्यासक्रम, क्रेडिट बेस चॉईस सिस्टिम, संशोधन आदींबाबत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. रोजगाराभिमुख शिक्षण, उद्योगांशी समन्वय, संशोधन आणि संशोधनातून तंत्रज्ञान विकास यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी विद्यापीठाने करार केले आहेत.

आंतरराष्ट्रीय करारांमध्ये विद्यापीठाने हार्वर्ड बिझनेस स्कूल, मेलबर्न युनिव्हर्सिटी, द युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफॉर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कचे सिटी कॉलेज, जपान, ऑस्ट्रिया, पॅरिस, फ्रान्स, पॅरिस, ग्रीस, जर्मनी, नॉर्वे, लंडन, यूएसए, पोलंड आदी देशांत असणाऱ्या विद्यापीठ आणि तेथील नामांकित शैक्षणिक संस्थांशी करार केले आहेत. तर, राष्ट्रीय पातळीवर इस्रो, मारुती सुझुकी, चार्टर्ड अकाउंटंट इन्स्टिट्यूट, आयबीएम इनोव्हेशन सेंटर, आयूष इन्स्टिट्यूशन, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी, सीरम इन्स्टिट्यूट, एएफएमसी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी, सेंटर फॉर मटेरियल फॉर इलेट्रॉनिक टेक्नॉलॉजी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपथी, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय आदी महत्त्वाच्या संस्थांसोबत करार झाले आहेत. तर, स्थानिक पातळीवर राजा दिनकर केळकर संग्रहालय, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महापालिका, संचेती हेल्थकेअर, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटल, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, ड्रोन आचार्य एरियल इनोव्हेशन आदींसह अनेक संस्थांचा समावेश आहे.

> राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून शैक्षणिक देवाण-घेवाण, संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान आदी गोष्टी मोठ्या प्रमाणावर साध्य करणे शक्य झाले आहे. अॅकॅडमिक क्रेडिट बँक, बहुसंस्था धोरण, उद्योग क्षेत्राशी संबंध, संशोधन याचा फायदा विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांना होणार आहे.
>
> **- डॉ. कारभारी काळे, कुलगुरू,**
> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Edition
Dec 6, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

पुढारी ANCHOR

# सर्व संशोधन संस्थांची विद्यापीठ करणार तपासणी

## आता केंद्रातील गैरप्रकारांना पायबंद बसणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पीएच.डी. प्रवेश देणाऱ्या सर्व संशोधन केंद्रांची शैक्षणिक आणि प्रशासकीय तपासणी करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. या तपासणीतून निकष पूर्ण केलेल्या संशोधन केंद्रातच पीएच.डी. प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पीएच.डी. प्रवेश देणाऱ्या संशोधन केंद्रातील गैरप्रकारांना आळा बसणार आहे.

विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. मुलाखती पूर्ण झाल्यावर उमेदवारांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. यासाठी विद्यापीठाकडून पुणे, नगर, नाशिक आणि सिल्वासा येथील संशोधन केंद्रांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. त्यातून संशोधन केंद्रातील अद्ययावत स्थिती समोर येणार आहे.

### अशी होणार तपासणी

| जिल्हा | दिनांक | संशोधन केंद्रांची संख्या |
|---|---|---|
| नाशिक | ५ आणि ६ डिसेंबर | २९ |
| नगर | ७ आणि ८ डिसेंबर | ३५ |
| पुणे शहर | ९, १० आणि ११ डिसेंबर | १२३ |
| पुणे ग्रामीण | १२, १३ आणि १४ डिसेंबर | २८ |
| एकूण संशोधन केंद्रे : | | २१५ |

प्रत्यक्ष प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय तपासणी करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सर्व संशोधन केंद्रांची तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून जिल्हानिहाय समिती नियुक्त केली आहे. तसेच, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संशोधन केंद्रांच्या तपासणीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सोमवारपासून तपासणी सुरू झाली आहे. १५ डिसेंबरपर्यंत सर्व संशोधन केंद्रांची तपासणी करण्यात येईल. या तपासणीसाठी संशोधन केंद्रांना माहिती सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. संशोधन मान्यता आणि अन्य बाबींची पूर्तता करणाऱ्या आणि समितीने शिफारस केलेल्या संशोधन केंद्रांवरच पीएच.डी.चे प्रवेश करण्यास मान्यता देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे.

Pune Edition
Dec 6, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*



# विद्यापीठाचे पाऊल पडते पुढे...

## पुढील वर्षीपासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचा श्रीगणेशा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राबविण्याची तयारी केली आहे.

त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षात पुणे, नगर आणि नाशिकच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बीए, बी कॉम, बीएस्सी या पारंपरिक तीन वर्षांच्या अभ्यासक्रमांऐवजी चार वर्षांचे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमांचा कालावधी चार वर्षांचा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगानेही (यूजीसी) चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम राबविण्याविषयी बजावले आहे. त्यालाच अनुसरून उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यातील महाविद्यालयांमध्ये जून २०२३ पासून तीन वर्षांऐवजी चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यासाठी येत्या काही दिवसांमध्ये कार्यशाळा घेण्यात येणार आहे. पुणे विद्यापीठाने त्यासाठी एक पाऊल पुढे टाकले असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी कृती कार्यक्रम आखण्याची तयारी केली आहे. प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे म्हणाले, 'चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सविस्तर परिपत्रकाची वाट पाहत आहोत. हे परिपत्रक चालू आठवड्यात प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. त्यानंतर तातडीने कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येईल.'

### अतिरिक्त वर्षात काय असणार?

- राज्यातील महाविद्यालयांमध्ये बीए, बीकॉम, बीएस्सी असे तीन वर्षांचे पारंपरिक अभ्यासक्रम वर्षानुवर्षे सुरू आहेत.
- या अभ्यासक्रमांमध्ये आता बदलत्या काळानुसार आणि तंत्रज्ञानानुसार कौशल्यपूर्ण घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.
- उद्योगांना अपेक्षित मनुष्यबळाची गरज पूर्ण करणाऱ्या घटकांचा समावेश केला जाणार आहे.
- त्यामुळे रोजगार मिळण्यास मदत होईल. त्यासोबतच काही महिने विद्यार्थ्यांना इंटर्नशिप आणि संशोधनात्मक कार्य करावे लागेल.
- या कालावधीत विद्यार्थ्यांना त्यांचे आवडीचे शिक्षण घेता येईल. त्याचे 'क्रेडिट पॉइंट' विद्यार्थ्यांना घेता येतील.
- याचा फायदा विद्यार्थ्यांना नोकरी आणि करिअरच्या दृष्टीने होणार आहे.

### मटा गाइड

नाविन्यपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि कौशल्याभिमुख शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या तीन वर्षांत दीडशे करार केले आहेत.

**रोजगाराभिमुख शिक्षणावर भर**

नवीन शैक्षणिक धोरणात ॲकॅडमिक क्रेडिट बँक, लवचिक अभ्यासक्रम, क्रेडिट बेस चॉइस सिस्टीम, संशोधन आदींबाबत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. रोजगाराभिमुख शिक्षण, उद्योगांशी समन्वय, संशोधन आणि संशोधनातून तंत्रज्ञान विकास या साठी हे करार महत्वपूर्ण ठरणार आहेत.

**जगविख्यात संस्थांशी करार**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील करारांमध्ये विद्यापीठाने हार्वर्ड बिझनेस स्कूल, मेलबर्न युनिव्हर्सिटी, द युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कचे सिटी कॉलेज, जपान, ऑस्ट्रिया, फ्रान्स, ग्रीस, जर्मनी, ब्रिटन आणि पोलंड आदी देशांतील विद्यापीठे आणि तेथील नामांकित शैक्षणिक संस्थांशी करार केले आहेत.

### तीन वर्षांमध्ये दीडशे करार

"राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय करारांच्या माध्यमातून शैक्षणिक देवाण-घेवाण, संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान आदी गोष्टी मोठ्या प्रमाणावर साध्य करणे शक्य झाले आहे. अकॅडमिक क्रेडिट बँक, बहुसंस्था धोरण, उद्योग क्षेत्राशी संबंध, संशोधन याचा फायदा विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना होणार आहे.

- डॉ. कारभारी काळे, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

हार्वर्ड बिझनेस स्कूल, अमेरिका

**देशातील संस्थांशीही भागीदारी**

राष्ट्रीय पातळीवरील 'इस्रो', 'मारुती सुझुकी', 'चार्टर्ड अकौंटंट इन्स्टिट्यूट', 'आयबीएम इनोव्हेशन सेंटर', 'आयुष इन्स्टिट्यूशन', 'इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी', 'सीरम इन्स्टिट्यूट', 'एएफएमसी', 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी', 'सेंटर फॉर मटेरियल फॉर इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी', 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी', 'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय' आदी महत्त्वाच्या संस्थांसोबत विद्यापीठ जोडले गेले आहे.

Maharashtra Times 6.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम नव्या शैक्षणिक वर्षापासून

## उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नव्या स्वरूपाच्या पदवी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून मल्टिपल एन्ट्री आणि मल्टिपल एक्झिट पर्यायासह चार वर्षांचा (आठ सत्रांचा) बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रम राबवण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिले आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीच्या शिफारसी शासनाने स्वीकारल्यानंतर अंमलबजावणी, अभ्यासक्रमांचे स्वरूप, श्रेयांक रचना, मूल्यमापन या बाबतचे निर्देश शासन निर्णयाद्वारे देण्यात आले. नव्या रचनेनुसार तीन वर्षांचे १२० श्रेयांक पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळेल. चार वर्षांचे १६० श्रेयांक पूर्ण केल्यावर ऑनर्स किंवा संशोधन पदवी दिली जाईल. प्रत्येक सत्रातील ४० टक्के अभ्यासक्रम हा स्वयम् प्लॅटफॉर्मवरून ऑनलाइन पद्धतीने शिकण्याची मुभा राहणार आहे. या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात दहा श्रेयांकांचा रोजगारक्षम जोड अभ्यासक्रम आणि कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप) समाविष्ट आहे. तसेच पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमासाठी दोनशे श्रेयांक प्राप्त करावे लागतील.

अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांना काही कारणास्तव शिक्षण सोडून काही काळाने पुन्हा शिक्षण घेण्याची सुविधा मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिटमुळे उपलब्ध होईल.

मात्र विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेशित करून घेण्यासाठीचे निकष विद्यापीठांना तयार करावे लागणार आहेत. तसेच नव्या अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीसाठी राज्य विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, मुक्त विद्यापीठांना नियमावली, परिनियम तयार करण्याची मुभा असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

| अभ्यासक्रम | श्रेयांक | कालावधी |
|---|---|---|
| प्रमाणपत्र | ४० | एक वर्ष, दोन सत्रे |
| पदविका | ८० | दोन वर्ष, चार सत्रे |
| पदवी | १२० | तीन वर्षे, सहा सत्रे |
| पदवी ऑनर्स | १६० | चार वर्षे, आठ सत्रे |
| संशोधन पदवी | १६० | चार वर्षे, आठ सत्रे |
| अभियांत्रिकी पदवी | १६० | चार वर्षे, आठ सत्रे |

### पदव्युत्तर पदवीचे स्वरूप

- पदवी अभ्यासक्रमानंतर ४० श्रेयांकांचा एका वर्षाचा, दोन सत्रांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम
- तीन वर्षांच्या पदवीनंतर दोन वर्षे, चार सत्रांचा, ८० श्रेयांकांचा पूर्ण वेळ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम. द्वितीय वर्षात संशोधन आवश्यक.
- चार वर्षांच्या ऑनर्स किंवा संशोधन पदवी अभ्यासक्रमानंतर एक वर्षाच्या अभ्यासक्रमाद्वारे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम

### पदवीचे स्वरूप

- चार वर्षांच्या ऑनर्स अभ्यासक्रमात अंतिम वर्षातील दोन्ही सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात स्पेशलायझेशन आणि इंटर्नशीप. त्यासाठी वीस श्रेयांक.
- चार वर्षांच्या संशोधन अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील दोन्ही सत्रांमध्ये संशोधन प्रकल्प, प्रबंध, कार्यशाळा आणि कार्यप्रशिक्षणासाठी वीस श्रेयांक.
- १२०० तासांच्या शिक्षणानंतर ४० श्रेयांक

लोकसत्ता Wed, 07 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71069242

*News Paper Clippings During December 2022*

*Section: Education*

सामना

# आता सहावीपासूनच व्यवसाय शिक्षण

## ▪ नवीन शिक्षण धोरणानुसार जून २०२३ पासून अंमलबजावणीची शक्यता

▪ मेघा गवंडे-किटे

मुंबई, दि. ६ – राज्यात नवीन शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांना इयत्ता सहावीपासूनच व्यवसाय शिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. राष्ट्रीय कौशल्य पात्रता फ्रेमवर्क (एनएसक्यूएफ) नुसार सध्या नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम निवडता येतो. पण लवकरच सहावीपासून विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम निवडता येणार आहे.

देशात कुशल कामगार निर्मिती व्हावी, हा व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा हेतू आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात नववी, दहावीला व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचे पाच ट्रेंड राबविण्यात येत आहेत. व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख लहान वयातच विद्यार्थ्यांना होण्यासाठी तसेच त्यांच्यातील विविध कौशल्यांना चालना देण्यासाठी शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाचे प्रात्यक्षिक अभ्यासता येणार आहे. नवीन शिक्षण धोरणात व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व विशद करण्यात आले असून राज्यात या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहे.

### सध्या सुरू असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रम

- नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी, कृषी, होम सायन्स, ऊर्जा आणि पर्यावरण हे चार ट्रेंड राबविले जातात.
- अभ्यासक्रमाद्वारे या विषयांची तोंडओळख करण्यावर भर.
- ७० गुणांचे प्रात्यक्षिक व ३० गुणांच्या लेखी परीक्षेमुळे स्कोअरिंग अभ्यासक्रम.
- हिंदी, सामाजिक शास्त्रे हे विषय वगळून व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम निवडता येतो.
- मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान हे विषय मात्र सक्तीचे आहेत. कुशल कारागीर घडतील.

### *पण जूनपासून अंमलबजावणी अशक्य*

*सहावीपासून हा अभ्यासक्रम राबविताना अभ्यासक्रमाची कन्सेप्ट काय असेल, विषय कोणते असतील याविषयी काही ठोस हालचाली दिसत नाहीत. याशिवाय अद्याप या अभ्यासक्रमासाठी अभ्यास गट मंडळाची स्थापनादेखील झालेली नाही, असे राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य प्रवक्ते महेंद्र गणपुले यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम निवडल्यास जास्तीत जास्त घरात कुशल कारागीर निर्माण होतील, असेही ते म्हणाले.*

Mumbai Edition
Dec 7, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

# आदिवासी समाजावर संशोधनाची संधी

### २६ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देशातील आदिवासी समाज, विविध राज्यांमधील आदिवासी जमाती, त्यांची संस्कृती आणि विकास यासंदर्भात देशपातळीवरील संशोधन करण्याची संधी विद्यापीठे, शिक्षण संस्था, समाजशास्त्राचे संशोधक आणि अभ्यासकांना मिळणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आयसीएसएसआर) या संस्थेतर्फे हा प्रकल्प सुरू करण्यात आला असून, संशोधन करू इच्छिणाऱ्या संस्था, व्यक्तींना २६ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. दिल्ली येथे नुकत्याच राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'आदिवासी संशोधन - अस्मिता, अस्तित्व आणि विकास' या राष्ट्रीय परिषदेत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. परिषदेला देशभरातील नामवंत विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. आदिवासी समाज हा निसर्गाशी शेकडो वर्षांपासून जोडलेला आहे, त्यातून त्यांची संस्कृती, कला, औषधी वनस्पतींची जाण, जल, जंगल, जमीन साठी त्यांचा संघर्ष जगासमोर येण्यासाठी त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे. संशोधन करण्यासाठी 'आयसीएसएसआर'कडून काही मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये देशातील नामवंत विद्यापीठे, केंद्रीय संस्थांची (यूजीसी, एआयसीटीई) मान्यता असलेल्या शिक्षण संस्था; तसेच पीएचडीधारक आणि दीर्घ अनुभव असलेले व समाजशास्त्राचा अभ्यास असलेले तज्ज्ञ अभ्यासक यांना अर्ज करता येणार आहेत.

एखाद्या गुणवंत व्यक्तीलाही हे संशोधन करणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी त्याला अर्ज केल्यानंतर 'आयसीएसएसआर'कडे आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. याशिवाय त्याला एखादा विषय घेऊन त्यावरच संशोधन करता येईल, असेही 'आयसीएसएसआर'कडून स्पष्ट करण्यात आले आहे.




**असा करा अर्ज...**

देशातील विविध प्रकारच्या आदिवासी समाजावर संशोधन करू इच्छिणाऱ्या इच्छुक विद्यापीठ, शिक्षणसंस्था, तज्ज्ञ व्यक्तींना https://icssr.org/special-call-tribal-2022-notice या लिंकद्वारे २६ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

> " आदिवासी समाज हा कायम निसर्गासोबतच राहिल्याने त्यांचे औषधी वनस्पती विषयाचे ज्ञान सखोल आणि प्रभावी आहे. यावर संशोधन होऊन ही औषधी जगासमोर येणे गरजेचे आहे. आदिवासी समाजातील बहुतांशी जाती, प्रजातींची भाषा ही केवळ बोली स्वरूपात आहे. लिखित स्वरूपात ती भाषा तयार करून त्यावर अभ्यास होणे गरजेचे आहे. यासाठी विद्यापीठातील प्राध्यापक व संशोधकांनी या संशोधनात अधिकाधिक सहभाग नोंदवावा
>
> - डॉ. कारभारी काळे, प्रभारी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 7.12.2022

# पदवीची नियमावली जाहीर

## 'मल्टिपल एंट्री आणि एक्झिट' पर्यायांवर आधारित नवा पदवी अभ्यासक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील सर्व विद्यापीठांना पुढील शैक्षणिक वर्षापासून 'मल्टिपल एंट्री आणि एक्झिट' पर्यायांवर आधारित चार वर्षांचा (आठ सत्रांचा) कौशल्यांवर आधारित पदवी अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांमध्ये राबविण्याच्या सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्णयाद्वारे दिल्या आहेत.

त्यानुसार १६० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना चार वर्षांची ऑनर्स किंवा रीसर्च पदवी मिळणार आहे. पहिल्या एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, तर दोन वर्षांचे शिक्षण घेतल्यानंतर डिप्लोमाचे प्रमाणपत्र मिळणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून हा नवा अभ्यासक्रम सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करणे राज्यातील सर्व विद्यापीठांना आणि शैक्षणिक संस्थांना अनिवार्य आहे. या नव्या अभ्यासक्रमाचे मोड्युल मल्टिपल एंट्री आणि एक्झिट पर्यायांवर आधारित असल्याने, पहिल्या तीन वर्षांचे (१२० क्रेडिट) शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळणार आहे. चार वर्षांचा अभ्यासक्रम (१६० क्रेडिट) पूर्ण केल्यानंतर, ऑनर्स किंवा रीसर्च पदवी मिळणार आहे, असे सांगितले आहे. या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना काही कारणास्तव शिक्षण सोडावे लागल्यानंतर, पुन्हा प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना ४० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवावे लागणार आहे. प्रत्येक सत्रात ४० टक्के अभ्यासक्रम स्वयम प्लॅटफॉर्मवरून ऑनलाइन शिकण्याची मुभा आहे. या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात १० क्रेडिटचा जॉब ओरिएंटेड ब्रिज कोर्स आणि इंटर्नशिप आहे. नव्या निर्णयानुसार पाच वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम राहणार असून, त्यासाठी २०० क्रेडिटचे शिक्षण पूर्ण करावे लागणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

**चार वर्षांच्या पदवीबाबत महत्त्वाचे**

- चार वर्षांच्या ऑनर्स अभ्यासक्रमात अंतिम वर्षातील दोन्ही सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात स्पेशलायझेशन आणि इंटर्नशीप करावी लागणार आहे. त्याला २० क्रेडिट देण्यात आले आहे.
- चार वर्षांच्या रीसर्च अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील दोन्ही सत्रांमध्ये रीसर्च प्रोजक्ट, डेझर्टेशन, सेमिनार आणि इंटर्नशीप करावी लागणार आहे. या सर्वांना २० क्रेडिट देण्यात आले आहे.
- या नव्या आराखड्यानुसार १२०० तासांचे शिक्षण घेतल्यानंतर, विद्यार्थ्याला ४० क्रेडिट मिळवता येणार आहे.



| शैक्षणिक अर्हता | क्रेडिट | कालावधी |
|---|---|---|
| प्रमाणपत्र | ४० | १ वर्ष, दोन सत्रे |
| डिप्लोमा | ८० | २ वर्ष, चार सत्रे |
| पदवी | १२० | ३ वर्षे, सहा सत्रे |
| पदवी ऑनर्स | १६० | ४ वर्षे, आठ सत्रे |
| पदवी रीसर्च | १६० | ४ वर्षे, आठ सत्रे |
| पदवी इंजिनीअरिंग | १६० | ४ वर्षे, आठ सत्रे |

**मास्टर्स पदवीबाबत महत्त्वाचे**

- पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्याला ४० क्रेडिटचा एका वर्षाचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा करता येणार आहे. त्यात दोन सेमिस्टर असतील.
- तीन वर्षांचे शिक्षण घेतल्यानंतर मिळणाऱ्या पदवीच्या आधारे दोन वर्षांचा पूर्ण वेळ मास्टर्स डिग्री (चार सत्रांचा) अभ्यासक्रम शिकता येणार आहे. प्रत्येक वर्षाला ४० क्रेडिट असून, यातील द्वितीय वर्ष पूर्णपणे संशोधनासाठी राहणार आहे.
- चार वर्षांचा ऑनर्स किंवा रीसर्च पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, एका वर्षाच्या शिक्षणाद्वारे मास्टर्स पदवी मिळवता येणार आहे.

Maharashtra Times 7.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

सकाळ

### विद्यापीठांसाठी एकसमान आराखड्याची होणार अंमलबजावणी

# पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा

**पुणे, ता. ६ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत सध्या सुरू असलेल्या तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमावरून चार वर्षांच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतराची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अभ्यासक्रमांसाठी करण्यात यावी, असा आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारने आदेश दिले आहेत. त्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून तीन वर्षांच्या अभ्यासक्रमावरून चार वर्षांच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करण्याची योजना व त्याबाबतचा आराखडा तयार करणे, एकसमान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, सामान्य अध्यापनाऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा वापर करणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करणे यासंदर्भात डॉ. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला असून त्यातील शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहेत. तसेच या शिफारशींची विद्यापीठाच्या प्राधिकारणांची मान्यता घेऊन तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत निर्णय घ्यावा, असे संबंधित विद्यापीठांना यापूर्वीच पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची २०२३-२४ पासून प्रभावी आणि एकसमान अंमलबजावणी करण्याचे आदेश आता सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे आणि सर्व शैक्षणिक संस्थांना दिले आहेत. या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर यांनी अध्यादेश काढला आहे.

### धोरणानुसार कार्यवाहीचे टप्पे

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये लागू
- धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अभ्यासासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑक्टोबर २०२०मध्ये कार्यबल गट स्थापन
- कार्यबल गटाने ३० जून २०२१ रोजी सरकारला अहवाल सादर करत केल्या शिफारशी केल्या
- डॉ. माशेलकर समितीने दिलेल्या शिफारशींना २७ जानेवारी २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळाली मान्यता
- शिफारशींनुसार आराखडा तयार करण्यासाठी २६ एप्रिल २०२२ च्या सरकारी निर्णयानुसार मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन
- डॉ. कुलकर्णी यांच्या समितीच्या अहवालानुसार निर्णय घेण्याबाबत सर्व विद्यापीठांना २० ऑक्टोबर, चार नोव्हेंबरला पत्राद्वारे कळविले

**चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षांपासून प्रत्यक्षात राबविण्याचा आदेश राज्य सरकारने दिला आहे. विद्यापीठांमधील विविध अधिकार मंडळांनी आता त्यादृष्टीने अंमलबजावणीसाठी तातडीने आवश्यक त्या प्रक्रिया राबवून याची सुकर व सुसूत्रतेने काम केले पाहिजे. विद्यार्थी आणि इतर सर्व घटकांपर्यंत हा बदल पोचविण्यासाठी विशेष उपक्रम व संवाद साधला पाहिजे. नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र पद्धती आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवून हे सर्व बदल अपेक्षित आहेत.**

**– डॉ. पराग काळकर,** अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
07/12/2022 Page No. 7

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# दहावीपर्यंतची पोरं होणार हुश्शार!

## राज्यात आता निपुण भारत गुणवत्तावृद्धी उपक्रम; ३१ जानेवारी २०२३ पर्यंत होणार अंमलबजावणी

**पुढारी विशेष**

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे :** राज्यात मार्च २०२२ मध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान सर्वेक्षण घेण्यात आले. यामध्ये तिसरीच्या मुलांची संपादणूक क्षमता कमी असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत गुणवत्तावृध्दी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. याची अंमलबजावणी ३१ जानेवारी २०२३ पर्यंत करण्यात



येणार असून, फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पहिली ते पाचवीच्या प्रत्येक विद्यार्थ्यास २०२६ पर्यंत मूलभूत स्तरावर वाचन, लेखन व अंकगणिताच्या क्षमता प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार भारत सरकारने निपुण भारत अभियानाची सुरुवात केली आहे. संबंधित अभियानाची राज्य ते जिल्हास्तरावर सुयोग्य पध्दतीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी उपक्रम राबविण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेकडे देण्यात आली आहे.

### असे होणार मूल्यमापन...

कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली असून, आठ आठवडे करण्यात येईल. फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येईल. मूल्यमापनाचे साधन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत विकसित केले जाईल. मूल्यमापन करण्याबाबतचे प्रशिक्षण व प्रपत्रात गुण भरणे इत्यादी माहिती प्रशिक्षणाद्वारे दिली जाईल. मूल्यमापनासाठी शिक्षक स्वत:च्या शाळेऐवजी आपल्या केंद्रातील इतर शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतील. मूल्यमापनासाठी केंद्रांतर्गत शिक्षकांना शाळा बदलून देण्याचे नियोजन केंद्रप्रमुखांनी केंद्रपातळीवर तयार करून ठेवावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कोरोना परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा झालेला अध्ययन ऱ्हास जाणून घेण्यासाठी पायाभूत साक्षरता व मूलभूत संख्याज्ञानविषयक अध्ययन स्तरनिश्चिती करण्यात येईल. विद्यार्थी स्तरनिश्चितीनुसार उपचारात्मक अध्यापनासाठी शिक्षक उद्बोधन व पालकांना मार्गदर्शन करण्यात येईल. त्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेने अध्यापन मॉड्यूल, मूल्यमापन आणि उपक्रम यांचा समावेश असलेली योजना तयार केली आहे. हा कार्यक्रम तज्ज्ञ शिक्षकांच्या मदतीने निपुण भारत कार्यक्रमांतर्गत भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित आहे.

Pune Edition
Dec 7, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*



City | PuneTimesMirror | Wednesday, Dec

# Now, DHE to scan all colleges

## Academic & administrative assessment is normally done at univeristy level every yr

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The Directorate of Higher Education (DHE) will conduct an assessment of colleges affiliated with all 15 public universities in the state. The government agency will examine whether the academic and administrative criteria, including National Assessment and Accreditation Council (NAAC) ratings and other required fulfilments have been adhered to. As per the University Grants Commission (UGC) guidelines, this audit of all the colleges will be conducted from the new year. Normally, the academic and administrative assessment is done at the university level every year.

Dr Shailendra Devlankar, director of DHE, said, "We are taking information from the colleges and universities of the state. After data collection, we will submit a report to the state government. We will proceed with the government orders to the universities and colleges, mainly done by the DHE. Now, going beyond administrative work, implementation of the New National Education Policy 2020 (NEP), quality improvement, and other issues will be worked on along the lines of a think-tank."

The NEP will be fully implemented from June 2023, and the four-year degree course will be in the first phase of its implementation.

"Also, we are introducing an institution development plan (IDP) for all government colleges. The policy also provides for group institutions for interdisciplinary education. It is a pilot project that will be done in the Aurangabad and Nagpur region during the first phase. Regarding NAAC evaluation, there are many aided colleges that have not conducted a NAAC evaluation even once. A workshop was conducted recently to evaluate these colleges as NAAC evaluation is mandatory for all. The workshop provided guidance on the assessment process, along with instructions for conducting the assessment," he added.

Sanjeev Sonawane, pro-vice-chancellor of SPPU, said, "We welcome the step taken by DHE. Already, at the university level every year, an academic audit of all affiliated colleges is done. But now, DHE has come forward to do the academic and administrative audit. It will definitely help all public universities."

Pandit Vidyasagar, vice-chancellor of Swami Ramanand Theertha Marathwada University, said, "The audit system will prepare the college management to be better. It will also speed up academic and administrative fulfillment. It will directly help all universities."

Pramod Yeole, vice-chancellor of Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad, said, "The academic and administrative audit system will motivate all college and university management. Any kind of audit creates challenges for management officials. It will affect academic and administrative discipline."

The directorate will submit a report to the government after collecting data from colleges and universities. FILE PHOTO

**Varsities in Maha**

In Maharashtra, there is one central university, 15 public universities and 21 deemed universities. There are a total of 1,777 aided colleges, 2,141 permanently unaided colleges and 28 government colleges. DHE will carry out an academic and administrative audit next year.

Pune Mirror 7.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

लोकमत

# शिक्षणाचा गाडा कंत्राटी प्राध्यापकांवर

## आठ हजार जागा रिक्त : भरतीला वेग कधी येणार

**कंत्राटी प्राध्यापकांची व्यथा** भाग १



**प्रशांत बिडवे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात एकीकडे सहायक प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त आहेत, तर दुसरीकडे पात्रता मिळवलेले हजारो युवक अत्यंत तुटपुंज्या पगारात कंत्राटी, तासिका तत्त्वावर राबत आहेत. या कंत्राटी प्राध्यापकांच्या जिवावर शिक्षण क्षेत्राचा गाडा ओढला जात आहे.

राज्यातील महाविद्यालय आणि अकृषी विद्यापीठात साडेआठ हजार सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. शिक्षणातून देशाची नवी पिढी घडविण्याचे काम करणारे उच्चशिक्षित प्राध्यापकच शोषणाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत, नव्या पिढीचे भविष्य घडवणार कसं, अशी व्यथा तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांनी मांडली.

**पदे भरण्यास दिरंगाई**

राज्यातील महाविद्यालयात २०१७च्या आकृतिबंधानुसार सहायक प्राध्यापकांच्या ८ हजार ९४९ जागा रिक्त होत्या. सन २०१८ मधील शासन निर्णयानुसार ३ हजार ५८० पदे भरायला परवानगी मिळाली. त्यातील १४९२ पदे कोरोनापूर्व काळात भरली. उर्वरित २ हजार ८८ पदे भरण्यात येत आहेत. तसेच राज्यातील अकृषी विद्यापीठात २०१९ च्या आकृतिबंधानुसार १ हजार १६६ पदे रिक्त असून, २०१९ मध्ये ६५९ जागा भरावयास परवानगी मिळाली आहे. त्यातील एकही जागा भरलेली नाही. शासनाने चार वर्षांपूर्वी मंजूर केलेली पदे भरण्यास दिरंगाई होत असल्याने असंख्य पात्रताधारक मिळेल त्या पगारात वर्षानुवर्षे राबत आहेत.

### पदे भरण्यास का होतोय विलंब?

- शैक्षणिक संस्थांना शेड्यूल ९ नुसार चेंज रिपोर्ट द्यावा लागतो. मात्र, कोविड काळात अनेक संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत.
- विद्यापीठ, समाजकल्याण आयुक्त आणि मंत्रालय अशा तीन स्तरावर रोस्टर तपासणीला होणारा विलंब
- संस्थांतर्गत संचालकामध्ये सुरू असलेले वाद, न्यायालयीन खटले.
- विद्यापीठांना पूर्णवेळ कुलगुरु नसल्याने निर्णय प्रक्रियेत अडथळा

### सहा महिन्यांत भरती

महाविद्यालयातील मंजूर पदे भरण्यास सुरुवात झाली असून, त्याला गती देण्याचे काम सुरु आहे. तसेच राज्यातील विद्यापीठात सिनेटच्या निवडणुका सुरु आहेत. त्यामुळे विद्यापीठातील रिक्त जागा पुढील सहा महिन्यांत भरल्या जातील, अशी माहिती शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

सेट परीक्षेचा निकाल दीड-दोनवरुन आता ६-७ टक्क्यांवर गेला आहे. परीक्षेचे स्वरुपही बदलले. काठिण्य पातळीही घसरली आहे. त्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने पात्रता धारक निर्माण केले जात आहेत. त्यामुळे सध्या पात्रताधारकांचा विचार करुन सर्व रिक्त जागा लवकरात लवकर भराव्यात.

**- सुरेश देवढे-पाटील, समन्वयक, नेट सेट पीएचडीधारक संघर्ष समिती**

### शिक्षणाच्या दर्जावर परिणाम

- राज्यातील सर्वच महाविद्यालयांत प्राध्यापकांच्या रिक्त जागांअभावी प्राध्यापक आणि विद्यार्थी संख्या यांचे प्रमाण एकास शंभर एवढे व्यस्त झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण शैक्षणिक मूल्यमापन करण्यास असंख्य अडचणी येत आहेत.
- प्राध्यापक भरतीकडे राज्य तसेच केंद्र सरकारच्या दुर्लक्षामुळे उच्चशिक्षणाचा दर्जा ढासळत असल्याचा आरोप काही प्राध्यापकांनी केला.

### असे होते शोषण

- रिक्त जागांवर तासिका तत्त्वावर सीएचबी प्राध्यापकांची नेमणूक केली जाते. एका व्यक्तीस आठवड्याला ९ तासिकांचा वर्कलोड दिला जातो. सन २०२१ मधील जीआरनुसार एका तासासाठी ६२५ रुपये एवढा दर ठरविला आहे. मात्र, ५० मिनिटाच्या एका तासिकेला ५२० रुपये मिळतात.
- महिन्याला ३६ तासिकांचा १८ हजार रुपये पगार मिळाला पाहिजे. मात्र, सुट्या, परीक्षा, सण आदींमुळे महिन्याचे ३६ तास केव्हाच पूर्ण होत नाही आणि दहा ते बारा हजार रुपये पगार मिळतो. यात कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करणार? एवढ्या अल्प पगारात आम्ही वर्षभर शिक्षण संस्थाचालकांच्या दावणीला बांधलेले असतो, अशी भावना सीएचबीवरील प्राध्यापकांनी व्यक्त केली.

Hello Pune
Page No. 6 Dec 08, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

लोकमत

# शिक्षण म्हणजे कंत्राटी कामगारांची भरती नव्हे!

## महाराष्ट्रातील महाविद्यालयांत प्राध्यापकांची संख्या खूपच अपुरी आहे. सरकारने त्यावर कंत्राटी शिक्षक नेमण्याची अनोखी पद्धत शोधून काढली!

**विद्यापीठे आणि** महाविद्यालयांत पुरेशा संख्येने पात्र शिक्षक उपलब्ध असणे, ही दर्जेदार शिक्षणाची पहिली अट आहे. महाराष्ट्रात विद्यापीठे आणि महाविद्यालयांत प्राध्यापकांची संख्या खूपच अपुरी असल्याने तो गंभीर प्रश्न झाला. स्वाभाविकपणे उच्च शिक्षणाच्या दर्जावर त्याचा परिणाम होत आहे. २०१९-२० मध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या सुमारे १.६१ लाख जागा मंजूर होत्या. त्यापैकी ९६५७ या विद्यापीठांसाठी होत्या आणि बाकीच्या जागा महाविद्यालयांसाठी. विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या विद्यार्थी शिक्षक प्रमाणानुसार या मंजूर जागा कमीच होत्या आणि मंजूर झालेल्या जागांपैकी पुष्कळशा जागा भरल्याही गेल्या नाहीत.


सुखदेव थोरात



माजी अध्यक्ष,
विद्यापीठ अनुदान आयोग


परिणामी, पात्र शिक्षकांची कमतरता भासत होती. महाविद्यालय आणि विद्यापीठात मंजूर झालेल्या १,६१,४१९ पदांपैकी १.४७ लाख पदांवर भरती झाली आणि उर्वरित १४४५९ जागा रिकाम्याच राहिल्या. अशा प्रकारे महाविद्यालय आणि विद्यापीठांत मंजूर झालेल्या पदांपैकी नऊ टक्के पदे रिक्त राहिली. सर्व विद्यापीठांत हा एकंदर फरक २०.५५ टक्के आहे. सरकारी विद्यापीठांत ३७ टक्के आणि महाविद्यालयांत आठ टक्के असे हे प्रमाण दिसते.

सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांचा विचार करता १० टक्के प्राध्यापक, १७ टक्के सहयोगी प्राध्यापक आणि नऊ टक्के सहायक प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत तर सर्व विद्यापीठांत मिळून हा फरक प्राध्यापकांच्या बाबतीत ५.५ टक्के ३५ टक्के सहयोगी प्राध्यापक, २० टक्के सहायक प्राध्यापक असा आढळतो. सरकारी विद्यापीठांमध्ये हा फरक विशेषत्वाने जास्त आहे. प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापक यांच्या बाबतीत अनुक्रमे १५ टक्के, ५० टक्के आणि ३८ टक्के असे कमी असलेल्या प्राध्यापकांचे प्रमाण आहे. तुलनेने महाविद्यालयांमध्ये ही संख्या कमी म्हणजे प्राध्यापकांसाठी १०.५५ टक्के, सहयोगी प्राध्यापकांसाठी १७ टक्के आणि सहायक प्राध्यापकांसाठी सहा टक्के असेही चित्र दिसते. सरकारी विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक ३८ टक्के, सहयोगी प्राध्यापक ५० टक्के इतक्या पदांवर भरती झालेली नाही. ही विद्यापीठे हा उच्च शिक्षणाचा कणा असल्याने दर्जाच्या दृष्टिकोनातून ही गोष्ट अत्यंत गंभीर आहे.

शिक्षकांची ही उणीव भरून काढण्यासाठी सरकारने



शोधलेला शॉर्टकट हा दुर्दैवीच म्हणावा लागेल. कंत्राटी पद्धतीने तात्पुरते शिक्षक नेमून वेळ मारून नेली जाते. २०१९-२० मध्ये अशा तात्पुरत्या कंत्राटी शिक्षकांचे प्रमाण एकंदर पातळीवर ६.४ टक्के होते. विद्यापीठांत ३.४ टक्के आणि महाविद्यालयांत ७.६ टक्के.

कंत्राटी कामगारांनी उपलब्ध करून द्यावी, अशी शिक्षण ही वस्तू नाही हे खरेतर आपण मान्य केले पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये सातत्याने संवाद होण्यातून अध्यापन होत असते. त्यासाठी नियमित शिक्षक असणे गरजेचे आहे. शिक्षकांची अपुरी संख्या भरून काढण्यासाठी सरकारने कंत्राटी शिक्षक नेमण्याची अनोखी पद्धत शोधून काढली. अर्थपूर्ण शिक्षण घड्याळी तासावर नेमलेले शिक्षक देऊ शकत नाहीत. त्यासाठीची परिपूर्ण व्यवस्थाच आपण तयार केली नाही.

महाराष्ट्रासह विविध राज्य सरकारांनी प्रशासकीय आदेश काढून शिक्षक भरतीवर बंधने घातली आहेत, असे ११व्या योजनेच्या काळात (२००७ ते २०११-१२) केंद्र सरकारच्या लक्षात आले. नियमित शिक्षक नेमण्यावर आणलेली बंदी उठवावी, असे केंद्र सरकारने राज्यांना सुचवले. पुष्कळ राज्यांनी त्याला प्रतिसादही दिला. शिक्षणाच्या व्यवसायात चांगली गुणवत्ता यावी यासाठी केंद्र सरकारने काही पावलेही उचलली आहेत. सनदी अधिकाऱ्यांच्या बरोबरीने त्यांना पगार देणे, बढतीच्या योजना राबवणे, निवृत्तीचे वय ६५ पर्यंत वाढवणे, डॉक्टरेटच्या संशोधनासाठी शिष्यवृत्त्या देणे अशा काही उपायांचा त्यात समावेश होता. शिक्षक भरतीवर बंधने आणण्याचे महाराष्ट्र सरकारचे पाऊल शहाणपणाचे नक्कीच नव्हते.

अर्थकारण आणि समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण अनेक प्रकारे उपयोगी ठरते, हे सरकारला कळायला हवे होते. व्यक्ती आणि समाज अशा दोघांनाही त्याचा फायदा होतो. व्यक्तीची मूलभूत गरज आहे, त्याचप्रमाणे देशाचीही; म्हणून सरकारने शिक्षण आणि इतर क्षेत्र यात फरक करायला हवा. निधीची कमतरता हे पदे न भरण्याचे क्षम्य कारण होऊ शकत नाही. प्रश्न पैशाचा नाही. दीर्घकालीन धोरणात्मक अग्रक्रमाचा आहे.

माझ्या मते, विद्यापीठे आणि महाविद्यालयांत किती पदे रिक्त आहेत हे सरकारने विद्यार्थी शिक्षक प्रमाण लक्षात घेऊन निश्चित करावे. किती निधी लागेल ते पाहावे आणि एका झटक्यात सर्व पदांवर भरती करावी. ही त्वरेने करावयाची गोष्ट आहे. तसे झाले नाही तर उच्च शिक्षणाच्या दर्जावर याचा नक्कीच परिणाम होईल. शिवाय व्यक्ती आणि समाजाच्या वाढीवरही त्याचे दुष्परिणाम होतील.


Pune Main
Page No. 6 Dec 08, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*



# 'सेट' वेळेवरच

## विद्यापीठाला तीन वर्षांसाठी परीक्षेची परवानगी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सलग तीन वर्षे सहायक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) परीक्षा घेण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे यापुढील 'सेट' परीक्षा निर्धारित वेळापत्रकानुसार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठातर्फे महाराष्ट्र आणि गोव्यात 'सेट' परीक्षेचे आयोजन केले जाते. दर वर्षी परीक्षा घेण्यासाठी 'यूजीसी'ची परवानगी घ्यावी लागते. ती वेळेत मिळत नसल्याने विद्यापीठाला परीक्षेचे आयोजन करण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मागणीनुसार 'यूजीसी'ने सलग तीन वर्षे 'सेट' परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. 'यंदाची परीक्षा २६ मार्चला होणार आहे. परीक्षेसाठी साधारण एक लाख १० हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. यंदा परभणी आणि रत्नागिरी अशी दोन केंद्रे वाढविल्याने एकूण केंद्रांची संख्या १७वर पोहोचली आहे,' अशी माहिती 'सेट' विभागाचे समन्वयक डॉ. बी. पी. कापडणीस यांनी दिली. 'सेट'साठी केलेल्या अर्जात संबंधित उमेदवारांनी आठ ते १० डिसेंबरदरम्यान लॉगइनवरून दुरुस्ती करावी. या कालावधीत उमेदवारांना विषय, नाव, छायाचित्र, सही, परीक्षा सेंटरमध्ये आवश्यक बदल करता येणार आहेत. त्यानंतर अर्जात बदल करता येणार नसल्याचे 'सेट' विभागाने स्पष्ट केले.

परीक्षेची तारीख
**२६ मार्च २०२३**

अर्जांची संख्या
**एक लाख १० हजार**

केंद्रांची संख्या
**१७**

**'वर्षातून एकदाच परीक्षा'**

मार्चमधील 'सेट' परीक्षेची तारीख जाहीर झाली होती. मात्र, परीक्षा घेण्यासाठी 'यूजीसी'कडून वेळेत परवानगी मिळाली नाही. अखेर 'यूजीसी'ची मान्यता मिळाल्यानंतर २६ सप्टेंबर २०२१नंतर आता दीड वर्षांनी परीक्षा होत आहे. 'यूजीसी'ने तीन वर्षांसाठी 'सेट' परीक्षा घेण्यास अनुमती दिली. वर्षातून दोनदा ही परीक्षा घेता येऊ शकते. मात्र, तूर्तास वर्षातून एकदाच परीक्षा घेण्याचे नियोजन असल्याचे विभागाचे समन्वयक डॉ. बी. पी. कापडणीस यांनी सांगितले.

Maharashtra Times 8.12.2022



# बौद्ध शब्दकोशासाठी पुढाकार

**विद्यापीठाच्या पाली, बौद्ध अध्ययन विभागाचे कार्य; चिनी भाषेचाही समावेश**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'पाली व बौद्ध अध्ययन विभागा'त बौद्ध पारिभाषिक शब्दकोशाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू असून, त्या अंतर्गत चार भाग प्रकाशित झाले आहेत. या शब्दकोशात पाली, संस्कृत, तिबेटी, इंग्रजी या भाषांचा समावेश होता. मात्र, आता कोशाच्या पाचव्या भागापासून चिनी भाषेचाही समावेश करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी 'खेन्त्से फाउंडेशन'कडून ८८ हजार डॉलर अनुदान प्राप्त झाले आहे. शब्दाकोशाचे ५० भाग प्रकाशित केले जाणार आहेत. पुढील १५ वर्षे हा प्रकल्प सुरू राहणार आहे.

विद्यापीठाने गेल्या तीन वर्षांत अनेक नामांकित संस्थांबरोबर १५० करार केले. त्यातील पाच करार विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागासोबत झाले आहेत. याबाबत विभागाचे प्रमुख डॉ. महेश देवकर म्हणाले, 'खेन्त्से फाउंडेशन इंडिया'सोबत २०१५पासून विभागाने करार केला आहे. यात देशविदेशातील पाली व बौद्ध अध्ययन या विषयातील तज्ज्ञ किमान दोन महिने विभागात येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. यासाठी विभागाला दर वर्षी १९ लाख ७० हजार रुपयांचे अर्थसाह्य मिळते. यातील काही प्राध्यापकांसोबत पाली आणि बौद्ध साहित्याच्या हस्तलिखितांचे संपादन; तसेच भाषांतर सुरू आहे. विभागात २०२०पासून बौद्ध पारिभाषिक शब्दकोशाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू आहे. यात विभागातील डॉ. लता देवकर आणि दोन विद्यार्थी काम करीत आहेत. 'खेन्त्से फाउंडेशन इंडिया' यांच्यासोबत 'भाषा अध्ययन कार्यक्रम' या अंतर्गत आणखी एक करार झाला आहे. त्या माध्यमातून विभागात चालू असलेल्या नऊ विनाअनुदानित भाषाविषयक अभ्यासक्रमांना शिक्षकवृत्ती व विद्यार्थी शिष्यवृत्ती या स्वरूपात रुपये १० लाख अर्थसाह्य मिळणार आहे. या योजनेंतर्गत दोन एकत्रित पदवी अभ्यासक्रम, तर पदविका अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे, असे डॉ. देवकर यांनी सांगितले.

**बौद्ध वारसा, पर्यटनाविषयी कोर्स**

डेक्कन अभिमत विद्यापीठासोबत झालेल्या कराराच्या माध्यमातून या दोन्ही संस्थांनी एकत्रित येऊन बौद्ध वारसा आणि पर्यटन विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याच्या हेतूने संशोधन प्रकल्प व इंटर्नशिप प्रस्तावित आहे. या दृष्टीने विभागाने, राज्य सरकार, पुरातत्त्व व वस्तु संग्रहालय संचालनालय यांच्यासोबत करार केला आहे.

**तैवानला शिकण्याची संधी**

तैवान येथील नामांकित 'धर्मड्रम इन्स्टिट्यूट ऑफ लिबरल आर्ट्स' या संस्थेसोबत करार करण्यात आला असून, या माध्यमातून विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधन साहित्य यांचे आदानप्रदान करण्यात येत आहे. यातून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना तैवान येथे जाऊन शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**बौद्ध साहित्य ग्रंथाच्या मराठी भाषांतराचा प्रकल्प**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेसोबतच्या (बार्टी) करारातून पाली तिपिटक (बौद्ध साहित्य ग्रंथ) मराठी भाषांतराचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. यात २५ हजार पानांचे भाषांतर विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व तज्ज्ञ व्यक्ती अशा २० जणांच्या गटामार्फत करण्यात येणार आहे. यासाठी चार कोटी ९५ लाख रुपयांचे अनुदान राज्य सरकारकडून मंजूर झाले आहे.

Maharashtra Times 8.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# बौद्ध पारिभाषिक शब्दकोशात चिनी भाषेचाही समावेश

कोशाच्या पाचव्या भागापासून चिनी भाषेचाही समावेश करण्यात येणार आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. महेश देवकर यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या तीन वर्षांत अनेक नामांकित संस्थांबरोबर दीडशे सामंजस्य करार केले. त्यातील पाच करार हे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभागासोबत झाले आहेत. २०१५ पासून विभागाने खेन्त्से फाउंडेशन इंडिया यांच्यासोबत केलेल्या कराराद्वारे विभागाला दरवर्षी ११ लाख ७० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य मिळते. पाली आणि बौद्ध साहित्याच्या हस्तलिखितांचे संपादन आणि भाषांतराच्या कामामध्ये डॉ. महेश देवकर यांच्यासह डॉ. लता देवकर आणि दोन विद्यार्थी काम करत आहेत. पुढील पंधरा वर्षांत शब्दकोशाचे पन्नास भाग प्रकाशित केले जातील.

भाषा अध्ययन कार्यक्रमाद्वारे नऊ विनाअनुदानित भाषाविषयक अभ्यासक्रमांना शिक्षकवृत्ती, विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या रूपाने दहा लाख रुपयांचे अर्थसाहाय्य मिळेल. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेसह (बार्टी) केलेल्या कराराद्वारे 'पाली त्रिपिटक' या ग्रंथाचे मराठी भाषांतर करण्यात येत आहे. पुढील पाच वर्षांत २५ हजार पाने भाषांतरित केली जातील. त्यासाठी ४ कोटी ९५ लाखांचे अनुदान मंजूर झाले आहे, असे डॉ. देवकर यांनी सांगितले.

## तैवानमध्ये शिकण्याची संधी

तैवान येथील धर्मड्रम इन्स्टिट्यूट ऑफ लिबरल आर्ट्स या संस्थेसोबत कराराद्वारे विद्यार्थी, प्राध्यापक, आणि संशोधन साहित्य यांचे आदानप्रदान शक्य झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना तैवानमध्ये जाऊन शिकण्याची संधी मिळणार आहे.

लोकसत्ता Thu, 08 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71079303

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# State sets 4-yr degree plan in motion but colleges sceptical

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** By releasing the first government resolution on Tuesday to start the four-year undergraduate programme in colleges from the next academic session, the Maharashtra government has set things in motion for the implementation of the National Education Policy of 2020 across the state.

While the GR repeats the guidelines laid down in the national policy, colleges are sceptical, pointing to the practical difficulties they are likely to face with the sudden change. From concerns over lack of infrastructure to manpower, lack of internship opportunities to funding, colleges claim the implementation will not be as easy as it appears to be.

The GR mentions that the guidelines framed by the committee under the chairmanship of Ravindra Kulkarni, former pro-vice-chancellor of Mumbai University, as per the NEP must be implemented across courses from 2023-24. Opting for the four-year degree will be optional for students, but colleges have to mandatorily offer it, said a government official. "There will be resistance in the beginning, but eventually things will ease out. If colleges are given an option, they may not even want to offer a single degree programme for four years," he added.

A former vice-chancellor, though, said the sudden change in the duration of all programmes is not feasible. "The government could have made the implementation mandatory in colleges offering postgraduate courses. These colleges could have offered the programme without any strain on their current resources. After the four-year degree, the master's programme will only be for a year, which will eventually turn out to be a total of five years only," he said.

Principal of a suburban college said, "Unlike other states, some of the colleges here offer several courses. The total strength of undergraduate students in some of the larger colleges exceeds 5,000 across three years. Even if 50% of the students enrolled with us in the first year wish to pursue the four-year programme, we will need additional infrastructure for at least 1,000 students."

He added that this can be circumvented by sending these students off for internships or projects, infrastructure needs to be readied till the batch reaches the fourth year.

Workload of teachers is likely to increase, pointed out a teacher from a south Mumbai college. "There is no clarity, but hopefully, we will have some examples from Karnataka, as students will graduate in the four-year programmes two years before us," she said. Another principal pointed out that the centre only wants states to implement the NEP, but no funding has been set aside and colleges are on their own. "Many of our departments do not have permanent teachers, the state government is also not giving sanctions to fill all the teaching posts, and this will be an additional burden," he said.

A principal of an autonomous college said that they are planning to start it for two to three courses in the first year and then extend it to other courses.

## PRINCIPALS CITE MANY ISSUES

- Infrastructure-related problems, accommodating additional classes across courses could be a problem in big cities like Mumbai
- Lack of internship/research project options for students in cities other than Mumbai, Pune & Nagpur
- Lack of clarity on distribution of workload of teachers
- Students' willingness to pursue a 4-year programme is not assessed. Only about 15% students in the country pursue post-graduation
- Fourth year will require addt'l fees
- Colleges will require addt'l funding
- Govt may also have to increase funding for aided institutions
- For large colleges with over 5,000 UG students, even if 50% of them want to pursue the four-year programme, they may have to create infrastructure for at least an additional 750-1,000 students



Colleges/universities to be assessed on 21 Key Result Areas

"In the initial phase, only colleges offering PG programmes should have been asked to start the 4-year undergraduate degree as there would not have been strain on infrastructure — **An educationist**"

**OTHER STATES**

Colleges in Karnataka launched 4-year degree programme last year. Reportedly no student has opted for exit option. Colleges are not forced to offer course

The Times of India 8.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

सकाळ

# बौद्ध संस्कृतीवरील 'महासंशोधन'

## विद्यापीठात पाली भाषेत शब्दकोश आणि भाषांतराचे प्रकल्प

पुणे, ता. ८ : पाली भाषा व बौद्ध संस्कृतीवर दीर्घकालीन संशोधन करणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरू असून, त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पाच सामंजस्य करार केले आहेत. यामध्ये बौद्ध पारिभाषिक शब्दकोश, भाषांतर आणि संशोधनाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहे.

### बौद्ध शब्दकोश

२०२० पासून बौद्ध पारिभाषिक शब्दकोशावर काम सुरू असून, आतापर्यंत शब्दकोशाचे चार भाग प्रकाशित झाले आहेत. शब्दकोशात पाली, संस्कृत, तिबेटियन, इंग्रजी या भाषांचा समावेश होता. परंतु या कोशाच्या पाचव्या भागापासून यामध्ये चिनी भाषेचाही समावेश करण्यात येईल. या प्रकल्पासाठी खेन्त्से फाउंडेशनकडून आतापर्यंत ८८ हजार अमेरिकन डॉलर्स एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. शब्दाकोशाचे असे एकूण ५० भाग प्रकाशित केले जाणार आहेत. पुढील पंधरा वर्षे हा प्रकल्प सुरू राहणार आहे.

### बौद्ध वारसा व पर्यटन

डेक्कन अभिमत विद्यापीठासोबत झालेल्या कराराच्या माध्यमातून बौद्ध वारसा आणि पर्यटन विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याच्या हेतूने संशोधन प्रकल्प व इंटर्नशिप प्रस्तावित आहेत. या दृष्टीने विभागाने महाराष्ट्र राज्य, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांच्याबरोबर सामंजस्य करार केला आहे. याद्वारे चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना या संस्थेच्या महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे, डॉ. देवकर यांनी सांगितले.

### भाषा अध्ययन कार्यक्रम

खेन्त्से फाउंडेशनकडून नऊ विनाअनुदानित भाषाविषयक अभ्यासक्रमांना शिक्षकवृत्ती व विद्यार्थी शिष्यवृत्ती या स्वरूपात रुपये दहा लाख एवढे अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. या योजनेअंतर्गत दोन एकत्रित पदवी अभ्यासक्रम तर काही पदविका अभ्यासक्रमांचा समावेश केला आहे.

### मराठी भाषांतराचा करार

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) साहाय्याने पाली तिपिटक (बौद्ध साहित्य ग्रंथ) मराठी भाषांतराचा प्रकल्प
- २५ हजार पानांच्या भाषांतरावर विभागातील २० प्राध्यापक, विद्यार्थी व तज्ज्ञ व्यक्तींचा गट काम करणार
- पुढील पाच वर्षांचा प्रकल्प
- राज्य शासनाकडून ४ कोटी ९५ लाखांचे अनुदान मिळणार

"२०१५ पासून विभागाने खेन्त्से फाउंडेशन इंडिया यांच्यासोबत करार केला आहे. यामध्ये देशविदेशातील पाली आणि बौद्ध अध्ययन या विषयांतील तज्ज्ञ किमान दोन महिने विभागात येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. याकरिता विभागाला दर वर्षी ११ लाख ७० हजार इतके अर्थसाहाय्य मिळते. यातील काही प्राध्यापकांसोबत पाली आणि बौद्ध साहित्याच्या हस्तलिखितांचे संपादन आणि भाषांतर आम्ही करत आहोत.

- डॉ. महेश देवकर, विभागप्रमुख, पाली व बौद्ध अध्ययन

**विभागाची व्याप्ती...** | स्थापना : वर्ष २००६ | विभागातील एकूण अभ्यासक्रम : १८ | अनुदानित : ४ | विनाअनुदानित : १४

Pune, Pune-Today
09/12/2022 Page No. 1

सकाळ

# विद्यापीठाची आंतरविद्याशाखीय शिक्षणाची मुहूर्तमेढ

पुणे, ता. ८ : नव्या शैक्षणिक धोरणाच्या आधीच आंतरविद्याशाखीय शिक्षणाचा अभ्यासक्रम राबविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातील पहिले सार्वजनिक क्षेत्रातील विद्यापीठ ठरले आहे. आजमितीस जवळपास अडीचशे विद्यार्थ्यांनी अशी आंतरविद्याशाखीय पदवी प्राप्त केली असून, ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठासोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सामंजस्य करार करीत विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

आंतरविद्याशाखीय विज्ञान प्रशालेचे विभागप्रमुख डॉ. अविनाश कुंभार म्हणाले, "मेलबर्नसोबतच्या करारात आपण युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न आणि सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी ॲकॅडमी विद्यापीठात स्थापन केली आहे. या अंतर्गत विद्यापीठातील १७ जणांचा गट मेलबर्न विद्यापीठात आयोजित परिषदेत सहभागी झाला होता. या कराराच्या माध्यमातून अत्यंत महाग असणारे शिक्षण परवडणाऱ्या दरात देणे, विज्ञान आणि अन्य विषयांतील संधींचा विस्तार करणे, परदेशी शिक्षणाच्या संधी देणे हा आमचा प्रयत्न आहे."

### प्रशालेचे कौशल्याभिमुख करार...

- **सॉइल टेक कंपनी :** या माध्यमातून मोठे रस्ते, बोगदे, पूल अशा महत्त्वाच्या प्रकल्पांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. त्यामध्ये सहा विद्यार्थी सखोल संशोधन करत आहेत.
- **गुन्हे अन्वेषण विभाग :** याद्वारे गुन्हेगारांची रेखाचित्रे हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.
- **इतर करार :** संचेती हेल्थकेअर, जेम्स ॲंड ज्वेलरी यांच्यासोबत करार करत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे.

### द्विलक्षी अभ्यासक्रम

आंतरविद्याशाखीय प्रशालेत कोणत्याही विद्याशाखेतील कोणताही विषय घेत विद्यार्थी त्यांची पदवी पूर्ण करू शकतात. या प्रशालेच्या माध्यमातून पर्यावरणशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि भूशास्त्र या विषयांमध्ये 'बीएस्सी ब्लेंडेड' हा द्विलक्षी अभ्यासक्रम करता येतो. तर 'बीए लिबरल आर्ट्स' या पदवीच्या माध्यमातून मानसशास्त्र, अर्थशास्त्र यांपासून ते माध्यम शिक्षणापर्यंत मेकिंगपासून अनेक विषयांत पदवी घेण्याची संधी असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.

Pune, Main
09/12/2022 Page No. 4

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# आंतरविद्याशाखीय शिक्षणाची विद्यापीठाची मुहूर्तमेढ

## राज्यातील पहिले विद्यापीठ, अडीचशे विद्यार्थ्यांनी प्राप्त केली पदवी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नव्या शैक्षणिक धोरणाच्या आधीच आंतरविद्याशाखीय शिक्षणाच्या मूल्यावर आधारित अभ्यासक्रम राबविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातील पहिले सार्वजनिक क्षेत्रातील विद्यापीठ ठरले आहे. आजमितीस जवळपास अडीचशे विद्यार्थ्यांनी अशी आंतरविद्याशाखीय पदवी प्राप्त केली आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठासोबत पुणे विद्यापीठाने सामंजस्य करार करीत विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

विद्यापीठातील या विज्ञान प्रशालेची (आयडीएसएस) स्थापना २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात झाली. आंतरविद्याशाखीय प्रशालेत कोणत्याही विद्याशाखेतील कोणताही विषय घेत विद्यार्थी त्यांची पदवी पूर्ण करू शकतात. या प्रशालेच्या माध्यमातून पर्यावरणशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि भूशास्त्र या विषयांमध्ये 'बीएससी ब्लेंडेड' हा व्दिलक्ष्यी अभ्यासक्रम करता येतो. तर, 'बीए लिबरल आर्ट्स' या पदवीच्या माध्यमातून मानसशास्त्र, अर्थशास्त्र यांपासून ते माध्यम शिक्षणापर्यंत अनेक विषय घेत पदवी घेण्याची संधी आहे. याखेरीज जे विद्यार्थी पारंपरिक पदवी घेत आहेत. त्यांनाही या प्रशालेच्या माध्यमातून विषय निवडत पदवी घेण्याची संधी उपलब्ध आहे. याबाबत माहिती देताना आंतरविद्याशाखीय विज्ञान प्रशालेचे विभागप्रमुख डॉ. अविनाश कुंभार म्हणाले, की प्रशालेंतर्गत मागील तीन वर्षांत सहा सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यातील मेलबर्नसोबतच्या करारात आपण ' युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न आणि सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी ॲकॅडमी' विद्यापीठात स्थापन केली आहे. यामुळे विद्यापीठासोबतच संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम घेता येईल व विविध उपक्रमांत सहभागी होता येईल.

काहीच दिवसांपूर्वी विद्यापीठातील १७ जणांचा गट मेलबर्न विद्यापीठात आयोजित परिषदेत सहभागी झाला होता, ज्यात विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा समावेश होता. या कराराच्या माध्यमातून अत्यंत महाग असणारे शिक्षण परवडणाऱ्या दरात देणे, विज्ञान आणि अन्य विषयांतील संधींचा विस्तार करणे, परदेशी शिक्षणाच्या संधी देणे, हा आमचा प्रयत्न आहे. यासोबतच प्रशालेने ' सॉइल टेक कंपनी'शी सामंजस्य करार केला आहे. त्या माध्यमातून मोठे रस्ते, बोगदे, पूल अशा महत्त्वाच्या प्रकल्पांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. त्यामध्ये सहा विद्यार्थी सखोल संशोधन करीत आहेत, असेही डॉ. कुंभार यांनी सांगितले.

Pune Edition
Dec 9, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# आदिवासी समाजजीवनावर संशोधनाची संधी

## अर्जांसाठी २६ डिसेंबरची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> आदिवासी समाज हा कायम निसर्गासोबतच राहिल्याने त्यांचे औषधी वनस्पतींचे ज्ञान प्रभावी आहे. यावर संशोधन करून ही औषधी सर्व जगासमोर येणे गरजेचे आहे. तसेच आदिवासी समाजातील जाती-प्रजातींची केवळ बोली स्वरूपात असलेली भाषा लिखित स्वरूपात तयार करून त्यावर अभ्यास होण्याची गरज आहे. या प्रक्रियेला तंत्रज्ञानाची जोड दिल्यास ते अधिक सक्षमपणे होईल.
> - **डॉ. कारभारी काळे**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे :** देशभरातील आदिवासी समाज, त्यांची संस्कृती आणि विकास या बाबत संशोधनाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रीसर्च (आयसीएसएसआर) यांच्यातर्फे हा प्रकल्प सुरू करण्यात आला असून, त्यासाठी २६ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येईल.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगातर्फे 'आदिवासी संशोधन- अस्मिता, अस्तित्व आणि विकास' ही परिषद नुकतीच दिल्ली येथे झाली. या परिषदेला विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. जगदेश कुमार, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे अध्यक्ष हर्ष चौहान, सचिव अल्का तिवारी, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषदचे अध्यक्ष डॉ. जे. के. बजाज यांच्यासह देशभरातील १०४ विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. या परिषदेत आदिवासी समाजजीवनावरील संशोधन प्रकल्प जाहीर करण्यात आला.

अनेक शतकांपासून निसर्गाशी जोडलेल्या आदिवासींची संस्कृती, कला, औषधी वनस्पतींची जाण, जल-जंगल-जमिनीसाठी त्यांचा संघर्ष जगासमोर आणून त्यावर संशोधन होण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. संशोधनाबाबत आयसीएसएसआरकडून मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या. अधिक माहिती https:// icssr. org/ special- call- tribal- 2022- notice दुव्यावर उपलब्ध आहे.

लोकसत्ता Fri, 09 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71091023

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# पाहुणे अनिश्चित; पदवी प्रदान लांबणीवर

## विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राची प्रतीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रमासाठी अद्याप पाहुणे निश्चित झालेले नाहीत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारा कार्यक्रम यंदा लांबणीवर पडल्याने विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी प्रतीक्षा करावी लागत असून, पदवी प्रदान कार्यक्रम तातडीने आयोजित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार विद्यापीठाकडून वर्षातून दोन वेळा पदवी प्रदान कार्यक्रम आयोजित केला जातो. नियमित पदवी प्रदान कार्यक्रमाशिवाय ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रम होतो. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील काही विद्यार्थी स्वतः उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र स्वीकारतात. उर्वरित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र पोस्टाने घरी पाठवले जाते. मात्र यंदाचा पुरवणी प्रदान कार्यक्रम रखडल्याने विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राची प्रतीक्षा करावी लागत आहे. माजी अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांना निवेदन देऊन १५ डिसेंबरपूर्वी पदवी प्रदान कार्यक्रमाची तारीख जाहीर करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, नोकरीसाठी पदवी प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रम रखडल्याने विद्यापीठ विनाकारण विद्यार्थ्यांना वेठीस धरत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पदवी प्रदान कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती आहे. अद्याप राष्ट्रपतींनी संमती दिली नसल्यास विद्यापीठाने तातडीने अन्य पाहुण्यांना निमंत्रित करून पदवी प्रदान कार्यक्रम आयोजित करावा किंवा पदवी प्रमाणपत्र पोस्टाने सर्व विद्यार्थ्यांच्या घरी पाठवावे, असे ढोरे यांनी निवेदनात नमूद केले आहे.



> **“ विद्यापीठाकडून पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे. जानेवारीमध्ये कार्यक्रम होणे अपेक्षित आहे.**
> **- डॉ. कारभारी काळे,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## संलग्न महाविद्यालयांकडून विद्यापीठाची फसवणूक ?

### विद्यापीठ मान्यता नसलेल्या अध्यापकांच्या नावाची महाविद्यालयांकडून नोंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालयांनी विद्यापीठ मान्यता नसलेल्या अध्यापकांच्या नावाची नोंद विद्यापीठाच्या संकेतस्थळावर केल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब फसवणूक आणि दिशाभूल करणारी असून, विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे, अशी माहिती विद्यापीठाने दिली. तसेच विद्यापीठ मान्यता अध्यापकांचीच माहिती भरावी, अन्यथा संबंधितांना जबाबदार धरण्यात येणार असल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव डॉ. एम. व्ही. रासवे यांनी या बाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये निश्चित केलेल्या पद्धतीद्वारे किंवा निवड समितीद्वारे नेमणूक केलेल्या प्राचार्य, संचालक, अध्यापकांना विद्यापीठ मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील त्यांच्या ऑनलाइन खात्यामध्ये मान्यतेबाबतची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. मात्र काही महाविद्यालयांनी ही माहिती अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे वेळेवर संपर्क होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच काही महाविद्यालयांनी विद्यापीठ मान्यता नसलेल्या अध्यापकांच्या नावाचाही समावेश केला आहे. हे कृत्य फसवणूक आणि दिशाभूल करणारे आहे.

लोकसत्ता Fri, 09 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71088732

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# शिक्षण व्यवस्थेतील 'अछूत कन्या'

भाष्य डॉ. राजेश खरात



**मानवी हक्कांबाबत व्यासपीठावर चर्चा होते, आदेश निघतात, कार्यक्रमही होतात. तथापि, मानवी हक्कांचा आदर करून त्यांचे पालन करण्याबाबत उदासीनता आढळते. शिक्षणक्रमात त्याबाबतच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यासाठी पावलेही उचलली गेली; मात्र शिक्षणासह अनेक क्षेत्रांमध्ये हक्कांची पायमल्ली होताना दिसते.**



मानवी अधिकारांचा जागतिक जाहीरनामा दिवस १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. पण मानवी अधिकारांच्या उल्लंघनाच्या आणि अवमुल्यनाच्या घटनांचा आलेख मात्र कमी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अगदी संयुक्त राष्ट्रांच्या मानवी अधिकार आयोगाने देखील अशा घटनांच्या नोंदी घेण्यापलीकडे ठोस असे कार्य केलेले नाही. कारण जागतिक राजकारणात मानवी हक्कांचे उल्लंघन होत असेल तर त्याबाबत हाळी देण्याचा मक्ता हा अमेरिका आणि अमेरिका-अंकित युरोपातील काही देशांनाच असल्याने इतर देश आणि काही संघटना यांच्या भूमिका आपसूकच अर्थहीन होताना दिसत आहेत. मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा संदर्भ हा केवळ युद्ध, देशांतर्गत बंडाळी, दहशतवादी हल्ले, वांशिक, धार्मिक आणि जातीय दंगली एवढ्यापुरताच राहिला आहे. थोड्या फार प्रमाणात स्वायत्तता आणि स्वयं-निर्णयासाठी लढणाऱ्या अल्पसंख्यांक समुदायाबाबत गरज पडेल तसा त्याचा उल्लेख केला जातो, असे चित्र आहे.

एक व्यक्ती म्हणून दैनंदिन जीवनात समाजातील अनेक संस्थांशी आपला संबंध येत असतो, विशेषत: प्रशासकीय किंवा शिक्षण-व्यवस्था, या ठिकाणी आपले काम करून घेण्यासाठी जो काही अनुभव येतो, तो मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या चौकटीत बसतो की नाही हे आजमितीस पाहणे गरजेचे आहे. शासन व्यवस्थेतील कारभार कितीही पारदर्शी आणि एकल खिडकीच्या कक्षातून केला जात असला तरी प्रत्यक्षात तो कसा आहे? हे सात-बाराचा उतारा घेण्यासाठी आणि वडिलोपार्जित मिळकतीवर नावे लावून घेण्यासाठी येणाऱ्या अनुभवातून उमजून येतो. याला व्यक्तिशः कोणी जबाबदार नसले तरी, प्रशासकीय-संरचनेमुळे मानवी हक्कांच्या बाजूने लढणारे भले-भले लढवय्ये, प्रशासकीय व्यवस्थेपुढे नांगी टाकताना दिसतात. अशीच अवस्था, किंबहुना यापेक्षा बेदरकार आणि भीषण वस्तुस्थिती शिक्षण-व्यवस्थेत अनुभवाला येते. शिक्षण क्षेत्राचा सहवास म्हणजे कधी काळी भारतीय संस्कृतीचे दर्शन असे मानले जाते. म्हणून आजही नालंदा, तक्षशीला यांचा उल्लेख भारतीय संस्कृती आणि संस्कारांची मंदिरे म्हणून केला जातो. पण आधुनिक काळात शिक्षण क्षेत्राचे स्वरूप एवढे बदलले आहे की 'तिथे कर माझे जुळती' हे फक्त भाषणांतून म्हटल्या जाणाऱ्या सुभाषितापुरते मर्यादित राहिले आहे.

बाल्यावस्थेतच ज्या प्राथमिक शाळांतून मुलांना मानवी हक्क आणि अधिकार यांची ओळख जे प्राथमिक शिक्षक-शिक्षिका करून देत असतात, त्यांच्याच मानवी हक्कांची गळचेपी व्यवस्थेकडून होताना दिसते. यात सर्वात जास्त शोषण होणारा वर्ग म्हणजे प्राथमिक शाळेतील शिक्षक होय. गेली अनेक वर्षे जनगणनेतील असणाऱ्या शिरगणती/खानेसुमारीच्या कामापासून ते निवडणूक काळातील मतदार नोंदणी, पोलिओ डोस आणि त्याबाबत जागृती करण्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षक, शिक्षिकांना वेठीस धरले जाते. अन्यथा प्रशासकीय दंडुक्याची टांगती तलवार डोक्यावर असते. या व्यतिरिक्त इतरही अनेक पातळीवर शोषण होत आहे, त्याची तर वाच्यता करणे देखील अनेकांना जिकीरीचे होऊन जाते.

## 'डिजिटल डिव्हाइड'ने दरी

अनेक नामांकित शैक्षणिक संस्था शिक्षक महिलांच्या हक्क आणि अधिकारांबाबत उदासीन आहेत असे निरीक्षण आहे, तसेच विशाखा मार्गदर्शिकेनुसार कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा त्यांना उपलब्ध होत नाहीत. महिला विकास केंद्र नाहीत. दुसरीकडे अंगणवाडी शिक्षिका आहेत, ज्यांना कामाच्या स्वरूपानुसार योग्य ते मानधन मिळत नाही. त्यामुळे शासनाकडे दोन दशकांपासून त्या आपली कैफियत मांडताना दिसताहेत. अशी अनेक उदाहरणे आपल्या सभोवताली आढळतात. 'नागरी' म्हणविणाऱ्या समाजात इतरांच्या मानवी हक्कांबाबत जनजागृती कधी होणार हा गहन प्रश्न आहे. याची प्रचीती आली ती कोविड काळात. ज्यांच्याकडे साधने आणि आर्थिक संसाधने होती केवळ त्यांनाच कोविड काळातील आभासी शिक्षण पद्धतीचा फायदा झाला. उरलेले एक तर वंचित राहिले आणि काहींनी वैफल्यापोटी जीव गमावला. शिक्षण क्षेत्रातील 'डिजिटल-डिव्हाइड'मुळे समाजातील आहे रे आणि नाही रे यांच्यातील दरी आणखीन रुंदावली. परिणामी, कोणी कुणाच्या हक्कांसाठी झगडायचे याबाबत संभ्रम झाला.

मानवी हक्क, मूल्ये यांचे तर अर्थच बदलले. नैतिक आणि अनैतिक दरम्यान असणाऱ्या सीमारेषा पुसल्या गेल्या. आज आहे, तर उद्याची शाश्वती नाही, अशा अवस्थेत सर्व समाज ढवळून निघाला असताना शिक्षण क्षेत्राला विचारतो कोण? मात्र या क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या काही प्रस्थापितांनी, दलालांच्या मध्यस्थीने आपले उखळ पांढरे करून घेतले. कोविड काळ यांच्यासाठी सुवर्णकाळ ठरला. अडले-नडले विद्यार्थी, संशोधक, नव-नियुक्त शिक्षक-वर्ग, शिक्षण सेवक हे यांचे सावज झाले. कोणत्याही गोष्टीची तमा आणि मुलाहिजा न बाळगता जसे जमेल तसे विविध शैक्षणिक संस्थांतील या सावकारांनी ओरबाडून खाल्ले. मानवी आणि अमानवी असा जिथे काही फरकच राहिला नाही, तेथे हक्कांच्या बाबत 'ब्र' उच्चारण्याचा प्रश्नच नव्हता. याला पार्श्वभूमी म्हणजे शिक्षक म्हणजे 'सेवक' असं एकदा शासन मान्य नामकरण झाल्याने समाजाचा या पेशाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलला. त्यातच राजकीय पक्ष आणि पुढारी पुरस्कृत शिक्षण संस्थांतून निवडणूक प्रचारासाठी हा शिक्षक सेवक जुंपला गेला. त्याचेदेखील एक वेगळे गणित आहे, ते म्हणजे निवडणुकीच्या दिवशी हाच शिक्षक वर्ग निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी म्हणून कधी पोलिंग तर कधी बूथ अधिकारी म्हणून मिरवत असतो.

मानवी हक्क शिकविणाऱ्या शिक्षकाला स्वत:च्या मानवी हक्कांबाबत दाद मागता येत नाही. तसे केल्यास त्याचे परिणाम भोगायची तयारी नसते. त्यामुळे या शिक्षण कम राजकीय संस्थांचे आणखीनच फावते. मानवी हक्कांबाबत उदासीन होऊ पाहणाऱ्या समाजासाठी २० वर्षांपूर्वी शासकीय स्तरावर 'मानवी हक्क शिक्षण' हा एक नवीन आणि स्वतंत्र अभ्यासक्रम इयत्ता नववी ते बारावीच्या वर्गासाठी सुरु करायचे योजले होते. जेणे करून विद्यार्थी, शिक्षक वर्ग आणि समाजातील इतरही काही घटक यांच्या मानवी हक्कांबाबतच्या संवेदनांना आणखी जागृत करता येईल. अनेक विद्यापीठांतून 'मानवी हक्क' यावर आधारित डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स सुरू केले गेले. राष्ट्रीय आणि राज्य मानवी हक्क आयोगांतर्फे तर कधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक संस्थांतून मानवी हक्क आणि 'समान संधी तत्त्व' या विषयावर व्याख्याने, चर्चासत्र, संशोधन आणि प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला. कोविड काळातील रात्र सरत असताना १० डिसेंबरनिमित्ताने पुन्हा एकदा या सगळ्या योजनांना संजीवनी मिळणे आवश्यक आहे. नाही तर उद्या मानवी हक्क म्हणजे आधुनिक काळातील 'अछूत कन्या' म्हणून हिणवली जाईल.

**(लेखक मुंबई विद्यापीठातील माजी अधिष्ठाता आहेत**

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

**सामना**

# राज्य सरकारला शिक्षकांच्या समस्यांचे देणेघेणे नाही

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे हिवाळी अधिवेशनात धरणे

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) – राज्य सरकारला शिक्षकांच्या समस्या सोडविण्याची काळजी नसून केवळ सरकार सांभाळण्याचे काम मंत्र्यांकडून सुरू असल्याचा आरोप राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने केला आहे. महासंघाच्या कार्यकारिणीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत अकार्यक्षम सरकारविरोधात आवाज उठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील हजारो कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक २२ डिसेंबरला नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर धडकणार आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्यांना पदोन्नतीची वेतनवाढ देण्यात यावी, अर्धवेळ शिक्षक पूर्णवेळ झाल्यावर त्यांच्या अर्धवेळ सेवेचा कालावधी वेतनवाढ व इतर लाभासाठी ग्राह्य धरण्यात यावा, १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना त्वरित लागू करावी. निवड श्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी. वाढीव पदांना रुजू दिनांकापासून मंजुरी द्यावी व आय.टी. विषय अनुदानित करावा, विनाअनुदानितकडून अनुदानितमध्ये बदलीला १ डिसेंबर पासून लागू केलेली स्थगिती त्वरित रद्द करावी. शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीचा आदेश त्वरित निर्गमित करावा. तसेच विद्यार्थी हितासाठी शिक्षकांची रिक्त पदे त्वरित भरावीत. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी पटसंख्येचे निकष शाळा संहितेनुसार असावेत. एम. फिल. एम. एड. पीएच. डी. धारक कमवी शिक्षकांना उच्च शिक्षणातील शिक्षकांप्रमाणे वेतन वाढ लागू करावी. केंद्राप्रमाणे वय ६० वर्षे करावे, आदी मागण्यांच्या पूर्ततेसाठी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय महासंघाने घेतला आहे.

### अन्यथा बोर्डाच्या परीक्षांवर बहिष्कार

▮ शालेय शिक्षण विभागाने कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध मागण्यांसंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाशी चर्चा करून शिक्षकांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, असे महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर यांनी सांगितले. अन्यथा हिवाळी अधिवेशनावर होणाऱ्या निदर्शनानंतरही सरकारने दखल न घेतल्यास बोर्डाच्या आगामी परीक्षांवर बहिष्कार तसेच बेमुदत बंदचे हत्यार उपसण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

Pune Edition
Dec 10, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

# A 1st: NAAC benchmarks for affiliated colleges released

Hemali.Chhapia
@timesgroup.com

**Mumbai**: In a big push towards transparency, the National Assessment and Accreditation Council (NAAC) on Friday released the benchmarks it has set for affiliated colleges. The benchmark manual is its secret ledger of maximum scores it awards to colleges that seek assessment.

As reported by this paper on November 14, it is for the first time that NAAC has declared the benchmarks for each of the parameters it grades colleges on, allowing every institution to know the maximum achievable. The benchmarks for universities and autonomous colleges will be released later this month.

The development comes after a series of articles in **TOI** on institutes across India surpassing the NAAC score of the Indian Institute of Science and consultants being hired by colleges and universities seeking "top NAAC grades for a price".

Earlier, NAAC scores were not attached to any schemes or benefits. However, the race to get the top score began in 2016 when a high grade translated into institutions getting autonomy/ university status, securing grants, or being allowed to admit foreign students.

"As part of reforms, the executive committee had resolved to make the benchmarks public in the spirit of transparency and accountability. This is the first step," executive committee chairman Bhushan Patwardhan said. "This will be colleges' barometer, allowing them to identify areas that need to be worked on, thus resulting in a process of continuous improvement in the overall quality of education," he added.

To cite an example, if one of the questions asked is on a functional MoU with foreign universities and a college to be assessed marks itself 8, it will be given that particular score. However, now NAAC has declared that its highest score for the said parameter is 15, thus ensuring that every institute aspires to achieve that number. To date, universities and colleges had no idea about that pre-determined top score.

At present, NAAC has about a dozen manuals, one each for affiliated colleges, autonomous colleges, health university, yoga university, and one for open and distance learning, among others. And each manual has parameters that institutes applying to NAAC must fulfil. These manuals undergo constant upgradation. For instance, the affiliated colleges manual was recently truncated and has fewer parameters.

"What essentially used to happen is that when an institute was awarded an A+ or an A++, consultants would study the submission details under every parameter and guesstimate the benchmark and work accordingly with future 'clients' or educational institutes that hire them. This has weakened the assessment process and given rise to the culture of hiring consultants to prepare institutes' documentation or data validation and verification," explained a senior retired vice-chancellor. "It is a positive move by NAAC," the veteran added.

The Times of India 10.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# UGC proposes to make 4-year UG courses must for degree with honours

SOURAV ROY BARMAN
NEW DELHI, DECEMBER 9

UNDER NEW regulations, likely to be announced by the University Grants Commission (UGC) on Monday, students looking to graduate with honours in any subject will have to pursue four-year undergraduate programmes (FYUP).

However, the move will not have any impact on students who have taken admission in four-year undergraduate programmes offered by the Delhi University, which allows graduation with honours even to those exiting after six semesters or three years, said its Vice-Chancellor Yogesh Singh.

"We were aware about the new regulations being planned by the UGC. But we will stick to the regulations approved by our own academic bodies in August under which students can graduate with honours after three years as well," Singh told The Indian Express.

To be sure, the UGC had made public a draft of the proposed regulations in March itself. On Friday, the UGC did not comment on the rationale behind approving a policy which differs from the one already in force in a university as large as the DU.

"Let things stabilise. The UGC regulations will also provide students with a lot of options with respect to graduating with majors and minors," a UGC source said.

According to the draft UGC regulations on curriculum and credit framework for undergraduate programmes, "students who wish to undergo a 3-year UG programme will be awarded UG Degree in the Major discipline after successful completion of three years, securing 120 credits and satisfying the minimum credit requirement."

To obtain an undergraduate honours degree, proposes the UGC, a student will complete four-year programmes with 160 credits. At the DU, however, apart from those completing four-year courses, honours degrees are also given to students who pursue a three-year undergraduate programme in a specific discipline.

The UGC regulations will also allow students who are pursuing a three-year UG programme as per the existing Choice Based Credit System (CBCS) to pursue an FYUP. "The university may provide bridge courses (including online) to enable them to make the transition," UGC chairperson Prof M Jagadesh Kumar said.

Prof Kumar added that the changes are in step with the National Education Policy, 2020. Under the multiple entry and exit options of FYUP programmes, students can also opt out after two semesters, with a certificate, while those exiting after successful completion of four semesters will be given a diploma.

The NEP points out that the four-year programme is preferred since it "would allow the opportunity to experience the full range of holistic and multidisciplinary education in addition to a focus on the chosen major and minors as per the choices of the student."

The Indian Express 10.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

# FYUP gets new curriculum & credit framework by UGC

## Four-year Undergrad To Be Declared

**Manash Pratim Gohain & Hemali Chhapia**



**New Delhi/ Mumbai:** Study humanities or sciences, every college student across the nation will now receive a primer with essential courses aimed at "broadening" their "intellectual experience" and thus making their education more rounded. Moreover, apart from the multiple entry and exit options made available to students, candidates can re-enter within three years and start again where they left off, but complete their degree in the maximum time frame of seven years.

As per the new curriculum and credit framework for the four-year-undergraduate programme to be announced by the University Grants Commission (UGC), all undergraduate students will have to undergo three introductory-level courses in broad areas like natural and physical sciences, mathematics, statistics and computer applications, commerce and management, humanities and social sciences and library, information and media sciences.

That apart, value-added courses common to all UG students include understanding India, environmental science, digital and technological solutions and health and wellness, yoga education, sports and fitness. According to the UGC, higher education institutions can implement the curriculum from the 2022-23 academic session itself. And, students already enrolled and pursuing a three-year UG programme as per the existing Choice Based Credit System (CBCS) are eligible to pursue a four-year undergraduate programme.

National Education Policy 2020 recommends that the higher education system should enable an individual to study one or more specialised areas of interest at a deep level and also develop capabilities across a range of disciplines, including sciences, social sciences, arts, humanities, languages, as well as professional, technical, and vocational subjects. Accordingly, NEP suggests that existing Choice Based Credit System (CBCS) will be revised to instill innovation and flexibility.

As per the new curriculum and credit framework for the four-year-undergraduate programme to be announced by the UGC, it "provides for holistic education by allowing students to experience courses from multiple disciplines through a three-year or four-year UG program with multiple entry and exit options, flexible degree options with single major, double major, multidisciplinary/interdisciplinary education, integration with vocational courses, internship, skill and ability enhancement courses, among others.

The Times of India 10.12.2022

# Now, principals can seek SSC, HSC exam concessions for students with disabilities

Sandhya.Nair@timesgroup.com

**Mumbai:** In a relief for parents seeking concessions for their children having disabilities, principals have been authorised to recommend certain categories of differently-abled students for claiming concessions for the SSC and HSC 2023 exams.

Maharashtra recognises 21 categories of disability as per the Rights of Persons With Disabilities Act. As of now, the state board allows students under five categories — blind, deaf, dumb, handicapped/spastic and learning disability — to fill out forms, get them signed by a government doctor to claim exam concessions, including the mandatory 75% attendance.

Students falling under the remaining categories (see box) have to run pillar to post to prove their disabilities, and most mis out on concessions.

Last month, the state board directed principals to send proposals for disabled students who need concessions. The proposal, signed by the principal and a school stamp, will have to be attached along with the medical documents proving that a student needs concessions. Principals said getting concessions for borderline disability cases like vision, hearing problems, and depression is a task. "I have a student with 25% hearing impairment and getting a concession for her has been tough. By allowing us to give recommendations, the board has made it easier for the students," said the principal of an Andheri school.

In 2018, the state allowed students with HIV, pediatric cancer survivors, cancer-afflicted children on maintenance therapy, diabetes and neurological Wilson's disease to avail of concessions. While the process of getting identity cards for students with disabilities starts from class VIII, some disabilities are identified late, said a principal.

Activists working with disabled persons fear that such a move may see schools seeking concessions for academically weak students. "The maximum request for concessions comes for learning disabilities (LD). Schools can categorise weak students as LD and seek concessions," said an activist.

**RELIEF FOR 2023 BOARDS**



Among the disabilities that can be recommended by principals to board are low vision, intellectual disability, mental illness, thalassemia, haemophilia, sickle cell disease, acid attack victims and muscular dystrophy

**Exam concessions for disabled students**

- **30 minutes** extra time
- Writer/speaker
- Exemption from **second/third language**
- **Cursive writing is not enforced**
- **20** grace marks in case student fails in subject/s

The Times of India 10.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

पुढारी

# साधी पदवी ३ वर्षांची; ऑनर्ससाठी ४ वर्षे

## विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केली नवीन नियमावली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमांचे स्वरूप बदलले जाणार असून आता ऑनर्सची पदवी करण्यासाठी चार वर्षे लागणार आहेत; तर साधी पदवी तीन वर्षांची असणार आहे.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पदवी अभ्यासक्रमात बदल सुचवण्यात आला होता. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने आराखडा, नियमावली व संभाव्य अभ्यासक्रम तयार केला आहे. त्यानुसार साधा पदवी अभ्यासक्रम तीन वर्षांचा व ऑनर्सचा पदवीचा अभ्याक्रम चार वर्षांचा असणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना ऑनर्ससाठी शेवटच्या वर्षात संशोधन विषय घेता येणार असून त्यांना ऑनर्सची पदवी त्या संशोधन विषयाची मिळणार आहे. सध्या क्रेडिट पद्धतीनुसार पदवी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या अभ्यासक्रमाचे चार वर्षांच्या अभ्यासक्रमात रूपांतर करण्याची संधी मिळणार असून त्यासाठी विद्यापीठाने निर्धारित केलेले काही ब्रिजिंग अभ्यासक्रम करावे लागतील. दुसऱ्या सेमिस्टरनंतर विद्यार्थ्यांना आपला प्रमुख विषय बदलण्याची संधी असणार आहे. तसेच मुख्य विषय एक ठेवायचा की दोन हे देखील विद्यार्थ्याला ठरवण्यात येणार आहे. सध्याच्या पद्धतीनुसार तीन वर्षांतच ऑनर्सची पदवी विद्यार्थ्याला मिळते.



### असा असेल अभ्यासक्रम

विद्यापीठ अनुदान आयोगाने सादर केलेल्या आराखड्यात चार वर्षांच्या अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार त्यात प्रमुख विषय, द्वितीय विषय, इतर विद्या शाखांतील विषय, भाषाविषयक आणि कौशल्य विषय, पर्यावरण शिक्षण, भारताची ओळख, डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित पर्याय, आरोग्य, योगशिक्षण, क्रीडा आणि फिटनेस यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

Pune Edition
Dec 11, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

सकाळ

## 'यूजीसी'चे नवे नियम तयार; नवीन शैक्षणिक सत्रापासून राबविण्याचा मानस

# आता ४ वर्षांत 'यूजी ऑनर्स' मिळविता येणार!



**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. १० : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) उच्चशिक्षण संस्थांमध्ये चार वर्षांच्या प्रस्तावित पदवी अभ्यासक्रमासाठीचे नियम (एफवाययूपी) तयार केले आहेत. यासाठीच्या 'करिक्युलम अँड क्रेडिट फ्रेमवर्क फॉर फोर इअर अंडरग्रेजुएट प्रोग्राम्स'चा मसुदा सोमवारी (ता. १२) प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. ही योजना आगामी म्हणजे २०२३-२४ च्या शैक्षणिक सत्रापासून राबविण्याचा सरकारचा मानस असला तरी सध्या तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही चार वर्षांत पदवी (यूजी ऑनर्स) मिळवण्याची संधी मिळू शकते.

सध्या तीन वर्षांचा यूजी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनर्स पदवी मिळते. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदीश कुमार यांच्या म्हणण्यानुसार एफवाययूपी नियमावली स्वीकारणारी विद्यापीठांत आगामी शैक्षणिक सत्रापासून प्रथम द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना नवीन योजनेच्या कक्षेत आणण्याची संधी मिळू शकते. त्याबाबत संबंधित विद्यापीठाची शैक्षणिक व कार्यकारी परिषद अंतिम निर्णय घेईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमाबाबतचा नवीन आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती मिळते.

'यूजी ऑनर्स'' पदवीबाबत यूजीसीच्या योजनेनुसार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना तीनऐवजी चार वर्षे पूर्ण केल्यानंतर 'ऑनर्स' पदवी मिळू शकेल. नवीन नियमांनुसार जे विद्यार्थी तीन वर्षांत पदवी अभ्यासक्रम पूर्ण करू इच्छितात, त्यांना त्या सेमिस्टरमधील शैक्षणिक तासांच्या संख्येनुसार १२० गुणांक (क्रेडिट्स) तर, यूजी ऑनर्स पदवी मिळविण्यासाठी १६० क्रेडिट्स मिळविणे आवश्यक असणार आहे.

एफवाययूपीच्या प्रस्तावित अभ्यासक्रमानुसार पदवी अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षांच्या अभ्यासानंतर पदविका, ३ वर्षे आणि ६ सेमिस्टर पूर्ण करणाऱ्यांना बॅचलरची पदवी, तर चार वर्षांचा अभ्यास पूर्ण करणाऱ्यांना ऑनर्स आणि संशोधनाच्या (रिसर्च) पदवीसह बॅचलर म्हणजे 'पदवीधर' प्रमाणपत्र मिळेल.

Pune, Main
11/12/2022 Page No. 10

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# शिक्षकांसाठी गणित, विज्ञानातील अभ्यासक्रमाची निर्मिती

## आयसर पुणे, टाटा समाजविज्ञान संस्थेचा सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विज्ञान अध्यापनासाठी तज्ज्ञ शिक्षक घडवण्यासाठी मुंबईतील टाटा समाजविज्ञान संस्था (टीस), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर पुणे) यांनी नुकताच सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत शिक्षकांसाठी गणित आणि विज्ञानातील नवे अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार असून, प्रस्तावित अभ्यासक्रमाद्वारे आयसर पुणेच्या विद्यार्थ्यांना विज्ञान अध्यापनात प्रावीण्य मिळवता येईल.

आयसर पुणेचे संचालक डॉ. जयंत उदगावकर, कुलसचिव कर्नल जी. राजा सेखर, डॉ. भास बापट, टाटा समाजविज्ञान संस्थेच्या संचालक प्रा. शालिनी भारत, कुलसचिव नरेंद्र मिश्रा, सहायक संचालक प्रा. बिनो पॉल प्रा. पद्मा सारंगपाणी, उमा लाल आदी या वेळी उपस्थित होते. टाटा समाजविज्ञान संस्थेची शिक्षक शिक्षणातील आणि आयसर पुणेची विज्ञानातील तज्ज्ञता एकत्र आणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भर देण्यात आलेले बहुविद्याशाखीय शिक्षण आणि शिक्षकांचे प्रावीण्य साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. टाटा समाजविज्ञान संस्थेतील सेंटर ऑफ एक्सलन्स इन टीचर एज्युकेशनच्या माध्यमातून शिक्षकांसाठी काम करण्यात येते. आता सामंजस्य कराराद्वारे महत्त्वपूर्ण बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवणे शक्य होईल. त्यामुळे विज्ञान शिक्षक आणि अभ्यासकांची नवी पिढी घडवता येईल, असे प्रा. शालिनी भारत म्हणाल्या. कराराद्वारे गणित, विज्ञानातील नवे अभ्यासक्रम तयार केले जातील. त्यामुळे देशातील विज्ञान अध्यापनाची क्षमता, गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना निसर्गविज्ञान, विज्ञान शिक्षणातील अध्यापन, संशोधनासाठी सहाय्य केले जाईल, असे प्रा. उदगावकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 13 December 2022
https://epaper.loksatta.com/c

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

पुढारी

# कौशल्य अभ्यासक्रमातून रोजगाराच्या संधी

## मागील तीन वर्षांत केंद्राच्या माध्यमातून पाच संस्थांशी सामंजस्य करार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण मिळावे यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०१४ साली कौशल्य विकास केंद्राची स्थापना केली केली. या कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच मागील तीन वर्षांत केंद्राच्या माध्यमातून पाच संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले असून, या माध्यमातून या कौशल्य शिक्षणाच्या कक्षा अधिक रुंदावण्यात येत आहेत.

याबाबत माहिती देताना कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. राधाकृष्ण पंडित म्हणाले, सध्या तंत्रज्ञान सातत्याने बदलत असून, या बदलत्या काळानुसार उद्योगांना अद्ययावत कौशल्य प्राप्त असणाऱ्या मनुष्यबळाची गरज असते. म्हणूनच केंद्राने 'इंडस्ट्री अकॅडमिया फोरम' ची स्थापना केली आहे. या माध्यमातून महाराष्ट्र भरातून उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना मार्गदर्शन करतात. बाजाराचा कल, त्यानुसार आवश्यक प्रशिक्षण, प्रत्यक्ष कामाचा अनुभव, नोकरीविषयक संधी आदी विषयी माहिती दिली जाते.

दरम्यान, भविष्यात कौशल्य विकास केंद्राचा आणखी विस्तार करत विद्यार्थ्यांना अधिकाधिक अद्ययावत कौशल्ये देणे व रोजगार उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी आम्हाला वेळोवेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभत असते, असे डॉ. राधाकृष्ण पंडित यांनी सांगितले.



### पाच हजार सैनिकांना उद्योजकतेचे धडे...

कौशल्य विकास केंद्राने बॉम्बे इंजिनियरिंग ग्रुपसोबत केलेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून सेवानिवृत्त होणाऱ्या सैनिकांना उद्योजकतेचे धडे देण्यात आले आहेत. अनेक सैनिकांना निवृत्त झाल्यानंतर काम करण्याची इच्छा असते, त्यातून ते नवे रोजगार निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. या सर्व सैनिकांना तज्ज्ञांच्या माध्यमातून उद्योजकतेचे धडे देण्यात आले आहेत.

### तीन विषयांत व्यावसायिक शिक्षणाची संधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी 'बी.व्होक इन मॅन्युफॅक्चरिंग स्किल, रिटेल मॅनेजमेंट, रीन्युएबल एनर्जी आदी तीन विषयांत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्याचबरोबर केंद्राच्या माध्यमातून जेम्स अँड ज्वेलरी डिझायनिंग हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

### दिव्यांग सैनिकांना अभ्यासक्रमाचा लाभ

कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून तीन ते पाच महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येत असून यामध्ये टेक्निकल रायटिंग, सोलर पी.व्ही. सिस्टीम इंस्टॉलेशन, रिपेअर ॲण्ड मेंटेनन्स ऑफ डोमेस्टिक इलेक्ट्रोनिक अप्लायंसेस' या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यातील रिपेअर ॲण्ड मेंटेनन्स ऑफ डोमेस्टिक इलेक्ट्रोनिक अप्लान्सेस या विषयात अनेक दिव्यांग सैनिकांनी सहभाग घेत अभ्यासक्रम पूर्ण केला.

Pune Edition
Dec 13, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

---

**मटा अँकर** पुढील शैक्षणिक वर्षापासून दहावी, बारावी परीक्षेसाठी बदल होणार

# 'सीबीएसई'मध्ये येणार स्पर्धात्मक प्रश्नावली

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार पुढील वर्षीच्या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये स्पर्धात्मक प्रश्नावली देण्यात येणार आहे.

दहावीच्या परीक्षेत किमान ४० टक्के आणि बारावीच्या परीक्षेत किमान ३० टक्के प्रश्न स्पर्धात्मक असतील, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी लोकसभेत दिली. परीक्षा क्षमता आधारित असतील, अशी माहिती शिक्षण राज्यमंत्री अन्नपूर्णा देवी यांनी लोकसभेमध्ये एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

**अशी होणार परीक्षा**

- विद्यार्थ्यांच्या क्षमतेची चाचणी घेणारे प्रश्न वस्तुनिष्ठ, प्रतिसादात्मक, प्रतिपादनात्मक आणि तर्कसंगत असे विविध स्वरूपाचे असतील.
- दहावी, बारावीच्या सन २०२३च्या परीक्षेपासून अशा प्रश्नांचा अंतर्भाव
- 'सीबीएसई'ने अद्याप परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही.

**धोरणाची अंमलबजावणी**

- 'सीबीएसई'ने संलग्न शाळांना नवीन शिक्षण धोरणाच्या शिफारशींचे पालन करण्याचा सल्ला दिला होता.
- क्षमता आधारित शिक्षण, कला एकात्मिक शिक्षण, क्रीडा एकात्मिक शिक्षण, कथा सांगणे यांसारख्या शिफारशींचा समावेश
- अनुभवात्मक आणि आनंददायक शिक्षण अध्यापनाचा वापर करण्याचाही आग्रह
- माध्यमिक आणि वरिष्ठ माध्यमिक स्तरावर पात्र समुपदेशकांची नियुक्ती करणे.

### 'प्राध्यापकांच्या ११ हजारांहून अधिक जागा रिक्त'



**नवी दिल्ली :** देशभरातील केंद्रीय विद्यापीठे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मध्ये (आयआयएम) प्राध्यापकांच्या ११ हजारांहून अधिक जागा रिक्त आहेत, अशी माहिती शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीत समोर आली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सोमवारी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. देशातील ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापकांच्या १८,९५६ मंजूर पदांपैकी एकूण ६,१८० पदे रिक्त आहेत, असे प्रधान यांनी सांगितले. त्याचप्रमाणे आयआयटीमध्ये ११,१७० मंजूर पदांपैकी एकूण ४,५०२ पदे रिक्त आहेत, तर 'आयआयएम'मध्ये एकूण १,५६६ प्राध्यापकांपैकी ४९३ पदे रिक्त आहेत, असे प्रधान यांनी उत्तरात म्हटले आहे. सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना 'मिशन मोड'मध्ये रिक्त पदे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत; तसेच या भरतीसाठी मंत्रालयाने मासिक देखरेख यंत्रणा स्थापन केली आहे, असेही ते म्हणाले.

Maharashtra Times 13.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*



# विद्यापीठात हाल सोसते 'मराठी'

## अंतर्गत परीक्षणात अनेक विभागांतील अनास्था उघड

मटा विशेष

Aditya.Tanawade
@tiesgroup.com
Tweet : @AdityaTanawade

**पुणे :** मराठी भाषेतून ज्ञान प्रसार करण्याच्या उद्देशातून स्थापन झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाल्याचे अंतर्गत परीक्षणातून समोर आले आहे. मराठी विभागाला 'सी ग्रेड' (क दर्जा) मिळाला असून, विद्यापीठातील अनेक विभागांनी 'अ' दर्जा मिळवून कामगिरीत सातत्य राखले आहे. मराठीसह अन्य काही विभागांकडे विद्यापीठाचे दुर्लक्ष झाल्याने त्यांना 'ब' आणि 'क' दर्जा देऊन सुधारणा करण्यासाठी आणखी संधी देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत शैक्षणिक लेखा परीक्षणाच्या (ऑडिट) अहवालातून ही बाब समोर आली आहे. संशोधन, निधीची उपलब्धता, शिक्षण आणि प्राध्यापकांची संख्या या निकषांवर विद्यापीठातील मराठीसह काही विभागांचा दर्जा घसरला असून, त्यांना कामगिरीत सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठातील ३४ विभागांना 'अ' दर्जा मिळाला आहे.

### पन्नासहून अधिक विभागांचे सर्वेक्षण

सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदींनुसार, प्रत्येक सार्वजनिक विद्यापीठाला तीन वर्षांतून एकदा शैक्षणिक लेखा परीक्षण करून घेणे आवश्यक असते. लेखापरीक्षण करण्यासाठी २१ तज्ज्ञांच्या गटाने विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांना भेटी देऊन माहिती घेतली होती. या वेळी परीक्षा, प्रवेश, विद्यापीठातील वसतिगृह, वित्त व लेखा विभाग, स्थावर विभाग तसेच विद्यापीठाच्या सर्व ५४ शैक्षणिक विभागांचे सर्वेक्षण करण्यात आले.

### सर्वेक्षण एका दृष्टिक्षेपात...

- विद्यापीठातील एकूण ५४ शैक्षणिक विभागांपैकी ३४ विभागांना 'अ' दर्जा.
- रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी, गणित, परकीय भाषा विभागाची सर्वोत्तम कामगिरी.
- संस्कृत, प्राकृत, पाली, इंग्रजी या भाषांच्या विभागांना 'ब' दर्जा.
- विभागांमध्ये मिळणारे शिक्षण चांगले असले, तरी तेथे होणारे संशोधन, निधीची कमतरता आणि प्राध्यापकांची वानवा असल्याचे निरीक्षण.
- 'कम्युनिकेशन स्टडीज' आणि 'वृत्तपत्रविद्या' विभागाचीही अवस्था बिकट.

### वाणिज्य, भूगोल विभागाचीही घसरण

सर्वेक्षणात मराठीसह वाणिज्य आणि भूगोल या तीन शैक्षणिक विभागांना 'क' दर्जा देण्यात आला आहे. एकेकाळी प्रथितयश लेखक, उत्तम प्राध्यापकांसाठी नावाजलेल्या मराठी विभागाची सद्यस्थिती दयनीय झाल्याने विभागाचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी करण्यात येत आहे. वाणिज्य विभागाचीही स्थिती दयनीय असल्याचे सर्वेक्षणातून उघड झाले आहे. पुण्यात वाणिज्य शाखेत लाखो विद्यार्थी शिकतात. यातील बहुतांश विद्यार्थ्यांचा संबंध विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाशी येतो. या विभागामध्येही शैक्षणिकदृष्ट्या अनेक सुधारणा कराव्या लागणार असल्याचे मत तज्ज्ञांनी मांडले. विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचाही दर्जा घसरलेला आहे.

### वसतिगृह, परीक्षा विभागातही सुधारणा अपेक्षित

विद्यापीठाच्या अंतर्गत शैक्षणिक लेखा परीक्षणाच्या अहवालानुसार परीक्षा विभाग आणि वसतिगृहांना 'ब' दर्जा देण्यात आला आहे. या दोन्ही विभागांमध्ये पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय सुविधांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे मत तज्ज्ञांनी मांडले.

### सर्वेक्षणाअंती नोंदविलेले निरीक्षण

- बहुतांश विभागांना अतिरिक्त जागा उपलब्ध करून द्यावी.
- अनेक विभागांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता.
- प्राध्यापकांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याची गरज.
- अधिक चांगले संशोधन होणे अपेक्षित.

### अहवाल काय सांगतो?

| | |
|---|---|
| **'अ' दर्जा** | |
| शैक्षणिक विभाग | ३४ |
| विद्यापीठातील केंद्रे | ४ |
| प्रशासकीय विभाग | १८ |
| **'ब' दर्जा** | |
| शैक्षणिक विभाग | ११ |
| विद्यापीठातील केंद्रे | २ |
| प्रशासकीय विभाग | ४ |
| **'क' दर्जा** | |
| शैक्षणिक विभाग | 3 |

"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला येत्या दोन वर्षांत 'नॅक' मूल्यांकनाला सामोरे जायचे आहे. 'नॅक'कडून उत्कृष्ट श्रेणी मिळविण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून आम्हीचे विभागांचे मूल्यांकन केले. त्यातही मराठी, वाणिज्यसारखे विभाग सोडले, तर अनेक विभागांना 'अ' श्रेणी आहे. राज्य सरकारकडून प्राध्यापक भरती होत नसल्याने, जागा रिक्त आहेत. त्यामुळे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात अडचणी येतात. तरीही विद्यापीठाच्या खर्चातून कंत्राटी पद्धतीने प्राध्यापकांची पदे भरली.

– डॉ. संजीव सोनवणे,
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 14.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# गणित, विज्ञानातील नवे अभ्यासक्रम येणार

**'आयसर पुणे' आणि 'टीस'मध्ये करार**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विज्ञान अध्यापनासाठी तज्ज्ञ शिक्षक घडवण्यासाठी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर पुणे) आणि मुंबईतील टाटा समाजविज्ञान संस्था (टीस) यांनी नुकताच करार केला. या करारांतर्गत शिक्षकांसाठी गणित आणि विज्ञानातील नवे अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाद्वारे 'आयसर पुणे'च्या विद्यार्थ्यांना विज्ञान अध्यापनात मदत होणार आहे.

कराराच्या वेळी 'आयसर पुणे'चे संचालक डॉ. जयंत उदगावकर, कुलसचिव कर्नल जी. राजा शेखर (निवृत्त), डॉ. भास बापट, टाटा समाजविज्ञान संस्थेच्या संचालक प्रा. शालिनी भारत, कुलसचिव नरेंद्र मिश्रा, सहायक संचालक प्रा. बिनो पॉल, प्रा. पद्मा सारंगपाणी, उमा लाल आदी उपस्थित होते. टाटा समाजविज्ञान संस्थेचे शिक्षक आणि 'आयसर पुणे'चे विज्ञानातील तज्ज्ञ यांना एकत्र आणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भर देण्यात आला आहे. बहुविद्याशाखीय शिक्षण आणि शिक्षकांचे प्रावीण्य साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. सामंजस्य कराराद्वारे शिक्षकांसाठी गणित आणि विज्ञानातील नवे अभ्यासक्रम तयार केले जातील. त्यामुळे देशातील विज्ञान अध्यापनाची क्षमता आणि गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. संयुक्त अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना निसर्गविज्ञान, विज्ञान शिक्षणातील अध्यापन, संशोधनासाठी साह्य केले जाईल, असे प्रा. उदगावकर यांनी सांगितले. टाटा समाजविज्ञान संस्थेच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन टीचर एज्युकेशन'च्या माध्यमातून देशभरातील शिक्षकांसाठी काम करण्यात येते. या कराराद्वारे महत्त्वपूर्ण बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवणे शक्य होणार असून, त्यामुळे विज्ञान शिक्षक आणि अभ्यासकांची नवी पिढी घडवता येईल, असे प्रा. शालिनी भारत यांनी सांगितले.

Maharashtra Times 14.12.2022

पुढारी

# शिक्षकांसाठी गणित, विज्ञान अभ्यासक्रमाची निर्मिती

**▪ आयसर पुणे, टाटा समाजविज्ञान संस्थेमध्ये सामंजस्य करार**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विज्ञान अध्यापनासाठी तज्ज्ञ शिक्षक घडवण्यासाठी मुंबईतील टाटा समाजविज्ञान संस्था (टीस), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर पुणे) यांनी नुकताच सामंजस्य करार केला.

या करारांतर्गत शिक्षकांसाठी गणित आणि विज्ञानातील नवे अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार असून, प्रस्तावित अभ्यासक्रमाद्वारे आयसर पुणेच्या विद्यार्थ्यांना विज्ञान अध्यापनात प्राविण्य मिळवता येईल.

आयसर पुणेचे संचालक डॉ. जयंत उदगावकर, कुलसचिव कर्नल जी. राजा सेखर, डॉ. भास बापट, टाटा समाजविज्ञान संस्थेच्या संचालक प्रा. शालिनी भारत, कुलसचिव नरेंद्र मिश्रा, सहायक संचालक प्रा. बिनो पॉल आदी यावेळी उपस्थित होते. टाटा समाजविज्ञान संस्थेची शिक्षक शिक्षणातील आणि आयसर पुणेची विज्ञानातील तज्ज्ञता एकत्र आणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये भर देण्यात आलेले बहुविद्याशाखीय शिक्षण आणि शिक्षकांचे प्राविण्य साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

प्रा. शालिनी भारत म्हणाल्या, टाटा समाजविज्ञान संस्थेतील सेंटर ऑफ एक्सलन्स इन टीचर एज्युकेशनच्या माध्यमातून देशभरातील शिक्षकांसाठी काम करण्यात येते. आता सामंजस्य कराराद्वारे महत्त्वपूर्ण बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवणे शक्य होईल. त्यामुळे विज्ञान शिक्षक आणि अभ्यासकांची नवी पिढी घडवता येईल.

प्रा. उदगावकर म्हणाले, सामंजस्य कराराद्वारे शिक्षकांसाठी गणित आणि विज्ञानातील नवे अभ्यासक्रम तयार केले जातील. त्यामुळे देशातील विज्ञान अध्यापनाची क्षमता आणि गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. संयुक्त अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना निसर्गविज्ञान, विज्ञान शिक्षणातील अध्यापन, संशोधनासाठी सहाय्य केले जाईल.

My Pune Edition
Dec 15, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# विद्यापीठातील विभागांची झाडाझडती

## 'क' दर्जा मिळाल्याने स्पष्टीकरण मागविण्याचा निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत लेखा परीक्षणात 'क' दर्जा मिळवणाऱ्या मराठी, वाणिज्य आणि भूगोल विभागाकडून स्पष्टीकरण मागवण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. याशिवाय विभागांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी समितीकडून सूचना करण्यासोबतच, उपाययोजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. 'ब' दर्जा मिळालेल्या विभागांना 'अ' दर्जा मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांच्या अंतर्गत शैक्षणिक लेखा परीक्षणाबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये वृत्त प्रकाशित झाल्यानंतर, विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन चर्चा केली. बैठकीत प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, डॉ. संजय ढोले यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. बैठकीत परीक्षण अहवाल स्वीकारून 'क' आणि 'ब' दर्जा मिळालेल्या विभागांची चर्चा करण्यात आली.

> " अंतर्गत लेखा परीक्षणात 'क' आणि 'ब' दर्जा मिळवणाऱ्या शैक्षणिक विभागांवर टास्क फोर्सद्वारे विशेष लक्ष ठेवण्यात येईल. या फोर्सच्या सदस्यांकडून विभागांना भेटी देऊन, त्यांचे शैक्षणिक मूल्यांकन उंचावण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात येईल. त्यानुसार विभागांना कार्यवाही करावी लागेल. त्यामुळे आगामी काळात सर्व विभागांचा शैक्षणिक दर्जा वाढेल, असा विश्वास वाटतो.
>
> - डॉ. संजय ढोले, संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष

### 'मराठी विभागाचा दर्जा सुधारा'

विद्यापीठाच्या मराठी विभागाला 'क' दर्जा मिळाल्याने महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. परकीय भाषा विभागांना 'अ' दर्जा मिळतो आणि मराठी भाषा विभागाला 'क' दर्जा कसा मिळतो, असे प्रश्न मनविसेच्या शिष्टमंडळाने उपस्थित केला आहे. 'विभागात केवळ पुरेसे प्राध्यापक नाहीत, म्हणून मराठी विभागाचा दर्जा घसरतो, हे पुरेसे कारण नाही. विभागात अनेक त्रुटी आहेत, याचे स्पष्टीकरण विद्यापीठाने द्यावे. मराठी विभागाच्या दर्जामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने, विद्यापीठाच्या प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा शिष्टमंडळाने दिला.

'मराठी, भूगोल आणि वाणिज्य विभागाला क दर्जा मिळाल्याची गंभीर दखल विद्यापीठाने घेतली आहे. विभागांचा दर्जा का घसरला याबाबत स्पष्टीकरण मागवले आहे. संबंधित विभागाच्या प्रमुखांनाही शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सोबतच ब दर्जा मिळालेल्याही विभागांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करून दर्जा उंचाविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल,' अशी माहिती डॉ. सोनवणे यांनी दिली.

मटा इम्पॅक्ट




## 'दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना करणार'

पुणे : 'मराठी विभागामध्ये प्राध्यापकांच्या जागा रिक्त असून, ग्रंथालयासाठी पुरेशा प्रमाणात जागा नाही. मात्र, आता ही अडचण दूर करण्यासाठी मराठी विभाग आणि विद्यापीठ प्रशासनाने पावले उचलली आहे. त्यामुळे पुढील परीक्षणात दर्जा वाढेल,' अशी ग्वाही मराठी विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली.

मराठी विभागाला विद्यापीठाच्या अंतर्गत शैक्षणिक लेखा परीक्षणात 'क' दर्जा मिळाल्यानंतर डॉ. देसाई यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. 'मराठी विभागात प्राध्यापकांच्या सात जागा आहेत. मात्र, सध्या केवळ दोनच प्राध्यापक कार्यरत आहेत. त्यावर उपाय म्हणून गेल्या महिन्यांत तीन प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीद्वारे नेमणूक करण्यात आली. त्यामुळे आगामी काळात विद्यार्थी-प्राध्यापकांचे प्रमाण राखण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मराठी विभागाकडे साधारण ३० हजार पुस्तके आहेत. ती ठेवण्यासाठी पुरेशी जागा नाही. त्यामुळे विभागाचे स्वतंत्र सुसज्ज ग्रंथालय होण्यासाठी मानसशास्त्र विभागाची जागा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठ प्रशासनही त्याबाबत सकारात्मक आहे. विभागात शैक्षणिक उपक्रम आणि संशोधनाचे प्रकल्पही सुरू आहेत. या पार्श्वभूमीर आगामी काळात विभागाला अ दर्जा मिळेल,' असा विश्वास डॉ. देसाई यांनी व्यक्त केला.

वाणिज्य आणि भूगोल विभागातील प्राध्यापकांच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त असल्याने विद्यार्थी-प्राध्यापक प्रमाण राखले जात नाही. त्यामुळे शैक्षणिक दर्जावर परिणाम होत असल्याचेही दिसून आले आहे.

| ३८४ | १६६ | २१८ | १३२ |
|---|---|---|---|
| मंजूर प्राध्यापकांची संख्या | कार्यरत प्राध्यापक | रिक्त जागा | कंत्राटी प्राध्यापक |

**मराठी विभागाची स्थिती**

| ७ | २ | ३ | १५० |
|---|---|---|---|
| मंजूर पूर्णवेळ प्राध्यापक | प्रत्यक्ष कार्यरत | कंत्राटी प्राध्यापक | पीएचडी करणारे साधारणतः |



Maharashtra Times 15.12.2022

## पदवीनंतर थेट पीएच.डी.साठी प्रवेश

**नवी दिल्ली** : चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमानंतर थेट पीएच.डी.साठी आता प्रवेश घेता येणार आहे. याबाबतचा निर्णय विद्यापीठ अनुदान मंडळाने घेतला आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाचे (यूजीसी) अध्यक्ष जगदेश कुमार म्हणाले, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना आता थेट पीएच.डी.साठी प्रवेश घेता येणार आहे. पीटीआयने यूजीसीच्या हवाल्याने सांगितले की, चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्णतः अमलात आल्यावर तीन वर्षांचे पदवी अभ्यासक्रम बंद केले जाणार आहेत. पदवीपूर्व शिक्षण, तसेच संशोधन आणि पीएच.डी. अभ्यासक्रम अधिक सक्षम करण्यासाठी यूजीसी मार्गदर्शन तत्त्वे जाहीर करण्याची योजना आखत आहे.

Kesari 15.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# नव्या धोरणाने काय बदलेल?

■ आनंद मापुस्कर



नव्या शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना पसंतीप्रमाणे विविध संस्थांमधून शिक्षण घेता यावे यासाठी 'अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट'ची योजना आहे. यामुळे, विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमातील काही पाठ्यक्रम हे अन्य शिक्षण संस्थांमधून करू शकतील. यासाठी विद्यार्थी व उच्च शिक्षणसंस्थांना 'अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट'मध्ये नोंदणी करावी लागेल. पसंतीनुसार ऑनलाईन तसेच ऑफलाईन पाठ्यक्रम निवडण्याची संधी विद्यार्थ्यांना यामुळे मिळेल. विद्यार्थ्यांना बहुशाखीय पाठ्यक्रम निवडण्याची मुभा असेल. विविध संस्थांमधून जे पाठ्यक्रम विद्यार्थी पूर्ण करतील त्या विद्यार्थ्यांचे श्रेयांक त्यांच्या खात्यात जमा होतील. पदवी, पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमात हे श्रेयांक ग्राह्य धरले जातील. याशिवाय, शिक्षणात खंड पडला तरी ते पुन्हा चालू करता येईल. याची अधिक माहिती घ्यायला हवी.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मूळ मसुद्यात पदवी ही तीन किंवा चार वर्षांची असू शकेल असे स्पष्ट म्हटले आहे. पदवी अभ्यासक्रमाचे तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे.

- तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम (१२० क्रेडिट)
- चार वर्षांचा 'ऑनर्स' पदवी अभ्यासक्रम (१६० क्रेडिट)
- चार वर्षांचा 'संशोधनासह (रिसर्च) ऑनर्स' पदवी अभ्यासक्रम. (१६० क्रेडिट).

पदवीच्या प्रत्येक वर्षानंतर प्रमाणपत्र मिळेल. पदवीच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर शिक्षणामधून बाहेर पडलेले विद्यार्थी, तीन वर्षांमध्ये पुन्हा प्रवेश घेऊ शकतात व सात वर्षांमध्ये पदवी पूर्ण करू शकतात. तिसऱ्या वर्षानंतर विद्यार्थ्यांना पदवी घेऊन बाहेर जाता येईल. चौथ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचे 'ऑनर्स' व 'संशोधनासह ऑनर्स' असे दोन प्रकार असतील. चौथ्या वर्षासाठी आधी किमान ७५ टक्के गुण हवेत. तसेच, चौथ्या वर्षात १२ क्रेडिटचा संशोधन प्रकल्प करावा लागेल.

वरील तीनही पदवी प्रकारांमध्ये पुढील पर्याय असेल. एका मुख्य (मेजर) विषयासह पदवी अभ्यासक्रम - यात मुख्य विषयात ५० टक्के क्रेडिट आवश्यक असेल. तीन वर्षांच्या पदवीत किमान ६० क्रेडिटचे पाठ्यक्रम संबंधित विषयात हवेत, तर चार वर्षांच्या पदवीत ८० क्रेडिटचे पाठ्यक्रम आवश्यक असतील. याशिवाय, दोन मुख्य विषयांसह पदवी करता येईल. या अभ्यासक्रमात दोन मुख्य विषयांमध्ये पदवी दिली जाईल. दुसऱ्या मुख्य विषयामधून किमान ४० टक्के क्रेडिट पाठ्यक्रम पूर्ण केले असणे आवश्यक आहे. आंतरविद्याशाखीय पदवीसाठी पाठ्यक्रम हे संबंधित घटक विषयांमध्ये विभागले जातील. उदा. इकोनॉमेट्रिक्स या विषयातील पदवीसाठी अर्थशास्त्र, गणित व संख्याशास्त्र आदी पाठ्यक्रम आवश्यक असतात. त्यामुळे मुख्य विषयाचे पाठ्यक्रम हे या तीनही विषयातील पाठ्यक्रमामध्ये विभागले जातील. विद्यार्थ्याला बीएस्सी (इकोनोमेट्रिक्स) अशी पदवी घेता येईल. शैक्षणिक संस्थांना नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करता येतील. बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषयाचे पाठ्यक्रम हे व्यापक विषयांमध्ये विभागून अभ्यासक्रम केला जाईल. उदा. जीव विज्ञान, भौतिकीय विज्ञान, गणित व संगणक शास्त्र, डेटा अॅनालिसिस, सामाजिक शास्त्रे, मानव्य शास्त्रे.

थोडक्यात, तीन वर्षांनंतर प्रत्येक विद्यार्थ्याला पदवी मिळेल. त्यानंतर चौथ्या वर्षाला प्रवेश घ्यायचा की नाही हा सर्वस्वी विद्यार्थ्यांचा निर्णय असेल. तीन वर्षांच्या पदवीनंतर विद्यार्थी स्पर्धा परीक्षेसाठी तसेच दोन वर्षांच्या पदव्युत्तर पदवीसाठी पात्र असतील. पदवीत ७५ टक्के गुण मिळवलेले विद्यार्थी पीएचडीसाठी पात्र ठरतील. पदवी अभ्यासक्रमाचे चौथे वर्ष हे पदव्युत्तर पदवीच्या पहिल्या वर्षाशी समकक्ष असेल. त्यामुळे, पदव्युत्तर पदवीसाठी एकाच वर्षाचे पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घ्यावे लागेल. जे विद्यार्थी तीन वर्षांची पदवी घेऊन बाहेर पडतील त्यांना पदव्युत्तर पदवी घेण्यासाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. पदव्युत्तर पदवीचे पहिले वर्ष पूर्ण केल्यानंतर जे विद्यार्थी बाहेर पडतील त्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदविका दिली जाईल. पदव्युत्तर पदवीचे दुसरे वर्ष पूर्ण केल्यावर त्यांना मास्टर्स पदवी दिली जाईल.

**नव्या शैक्षणिक धोरणातील विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाच्या कल्पनेचे सर्वांनी स्वागत केले; पण विद्यार्थ्यांपर्यंत मात्र ते नीट पोहोचले नाही. पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) धोरण अमलात येणार असल्याने हे होणे आवश्यक आहे.**

यात इंजिनीअरिंग पदवीचा काळ ४ वर्षांचा राहणार आहे. पहिल्या वर्षानंतर प्रमाणपत्र घेऊन बाहेर जाता येईल. दुसऱ्या वर्षानंतर पदविका घेऊन बाहेर जाता येईल. तिसऱ्या वर्षानंतर पदवी घेऊन बाहेर जाता येईल. चार वर्षांनंतर बीई किंवा बीटेक पदवी मिळेल. पुढचे पदव्युत्तर अभ्यासक्रम दोन वर्षांचे असतील. पहिल्या वर्षानंतर बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना एमएस्सी ही पदव्युत्तर पदवी मिळेल तर दुसऱ्या वर्षानंतर एमटेक पदवी मिळेल. बारावीनंतर काही शैक्षणिक संस्था पाच वर्षांचे एकात्मिक (इंटिग्रेटेड) पदव्युत्तर पदवीचे अभ्यासक्रम सुरू करू शकतील. संस्था अन्य संस्थांशी (राज्यातील/देशातील/देशाबाहेरील) साहचर्य करू शकतील. व्होकेशनल शाखेतील (आयटीआय वगैरे) विद्यार्थी हे पारंपारिक उच्च शिक्षण घेऊ शकतील.

याशिवाय, क्रीडा व विविध खेळ, दृश्यकला, सादरीकरणाच्या कला (गायन/वादन/नाट्यविषयक), सामाजिक कार्य, एनसीसी यातही सादरीकरणाला श्रेयांक देण्याची तरतूद आहे. यामुळे, केवळ अभ्यासातील गुणवत्तेलाच नव्हे, तर विद्यार्थ्यांमधील अन्य गुणवत्तेची दखल घेतली जाईल. राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अभिप्रेत अध्ययन व अध्यापनाच्या नवनवीन पद्धतीबाबतची स्पष्टता विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे. यात केवळ वर्गांमध्ये उभे राहून शिकवणे अपेक्षित नाही. प्रात्यक्षिके, सादरीकरण, परिसंवाद, कार्यानुभव (इंटर्नशीप), कार्यशाळा उपक्रम, स्टुडिओ उपक्रम, फील्ड वर्क / प्रोजेक्ट्स, सामाजिक कामात सहभाग व सेवा आदी सर्व प्रकारे अध्ययन व अध्यापन व्हावे, अशी अपेक्षा आहे. 'क्रेडिट' हे पाठ्यक्रम मोजण्याचे एकक असेल. पाठ्यक्रमाचा कार्यभार क्रेडिट तासांमध्ये मोजला जाईल. १५ लेक्चर्ससाठी 'एक क्रेडिट' देण्यात येईल. प्रात्यक्षिक, स्टुडिओ वर्क, सामाजिक सहभाग व सेवा, फील्ड वर्क, परिसंवाद, इंटर्नशिप, प्रोजेक्ट यातील तीस घड्याळी तासांना एक क्रेडिट देण्यात येईल. पदवीसाठी प्रत्येक वर्षात विद्यार्थ्यांनी ४० क्रेडिटचा पाठ्यक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. मूल्यमापन म्हणजे केवळ लेखी परीक्षा हे चित्र बदलणार आहे. विविध उपक्रम व समाजसेवा आदींना मूल्यमापनात स्थान असेल. राष्ट्रीय शिक्षण धोरणात अपेक्षित असलेले बदल प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांनाच प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. जुने अभ्यासक्रम केवळ नवीन रचनेत बसवून चालणार नाही. सरकार, विद्यापीठ तसेच उच्च शिक्षण संस्था यांनी आपापल्या स्तरावर बदल करणे, तसेच जुनी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण हे गांभीर्याने घेण्याची गरज आहे. धोरणाप्रमाणे शिक्षणातील बदल नीट अंगिकारले व अंमलात आणले तर समाजाची आर्थिक व सामाजिक प्रगती वेगाने होईल.

**(लेखक उच्च शिक्षणाचे अभ्यासक आहेत.)**

Maharashtra Times 16.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

## कनिष्ठ महाविद्यालय तुकडीवाढीचे अधिकार राज्य शासनाकडे

**पुणे :** राज्यातील शिक्षण उपसंचालकांना असलेले बारावीच्या वर्ग मंजुरीचे अधिकार शालेय शिक्षण विभागाने रद्द केले आहेत. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली कनिष्ठ महाविद्यालये वगळून इतर कनिष्ठ महाविद्यालयांना तुकडीवाढ मंजुरीचे अधिकार केवळ राज्य शासनाकडे असतील.

राज्यात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ लागू आहे. शासनाकडून अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना अकरावीची अतिरिक्त तुकडी स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरच मंजूर करण्यात येते. बारावीसाठी नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजूर करण्याचा अधिकार १९९८मध्ये विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले होते. पहिली ते दहावीच्या वर्गांना नैसर्गिक वाढ २०१५पासून बंद करण्यात आल्याने शासनाकडून अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना बारावीची शासन स्तरावरूनच तुकडीवाढ मंजूर करण्याचे प्रस्तावित होते.

लोकसत्ता Fri, 16 https:/,

# दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात ३० टक्क्यांनी वाढ?

## राज्य मंडळ तोट्यात असल्याने प्रस्ताव

**चिन्मय पाटणकर, लोकसत्ता**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ) तोट्यात आहे. उत्पन्नाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात खर्च वाढल्याने मंडळाला ४० ते ५० कोटींचा फटका बसत असून, आर्थिक नुकसानावर नियंत्रणासाठी दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क ३० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला देण्यात आला.

राज्य मंडळ ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. दहावी आणि बारावीच्या साधारणपणे ३० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा राज्य मंडळामार्फत घेतली जाते. राज्य मंडळ स्वायत्त असल्याने आर्थिक कारभार संस्थेच्याच स्तरावर केला जातो. दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींचे शुल्क आदी माध्यमातून राज्य मंडळाला उत्पन्न मिळते. सध्या दहावीचे शुल्क ३७५ रुपये, तर बारावीचे शुल्क ४१५ रुपये आहे. परीक्षा शुल्क आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींच्या माध्यमातून साधारणपणे १८० कोटींचे उत्पन्न मिळते. राज्य मंडळाने २०१७ मध्ये केलेल्या शुल्कवाढीनंतर गेल्या सहा वर्षांत शुल्कवाढ केलेली नाही. मात्र दरम्यानच्या काळात अन्य खर्चांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ न होता खर्च वाढल्याने राज्य मंडळ तोट्यात गेल्याची माहिती राज्य मंडळातील सूत्रांनी 'लोकसत्ता'ला दिली.

संस्थेला राज्य शासनाकडून निधी दिला जात नाही. आस्थापना खर्चासह शासनाच्या नियमांनुसार कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन यासह विद्यार्थ्यांसाठीच्या सोयीसुविधा, परीक्षकांचे मानधन, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन आदी खर्च मंडळालाच करावा लागतो. पूर्वी दहावी आणि बारावीचे मिळून साधारणपणे ३५ लाख विद्यार्थी असायचे. आता विद्यार्थी संख्या ३० लाखांपर्यंत कमी झाल्याने उत्पन्नात वाढ झालेली नाही. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये इंधनाचे दर वाढले, कागदाचे दर वाढले, मनुष्यबळाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी ४० ते ५० कोटींचा तोटा मंडळाला सहन करावा लागत आहे. मंडळाच्या ठेवींचे व्याज खर्चासाठी वापरण्याची वेळ मंडळावर आली आहे. मंडळाच्या उत्पन्नात वाढ न झाल्यास मंडळ आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.



“ दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या शुल्कात ३० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाला दिला आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास पुढील वर्षापासून शुल्कवाढ लागू करण्यात येईल.

\- **शरद गोसावी**, अध्यक्ष, राज्य मंडळ

लोकसत्ता Sat, 17 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71159300

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# नव्या शिक्षणपर्वाकडे जाताना

» भाष्य डॉ. अनिल धनेश्वर



**विज्ञान-तंत्रज्ञानात वेगाने होत असलेले बदल लक्षात घेता प्रशिक्षित मनुष्यबळाला मोठी मागणी निर्माण होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणात त्यादृष्टीने अनेक चांगल्या सूचना आहेत, पण त्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करणे, त्यातील अडथळे दूर करणे ही आव्हाने कायम आहेत.**



(प्रातिनिधिक छायाचित्र)

जगात तंत्रज्ञानामध्ये आज वेगाने बदल होत आहेत, ते आत्मसात करण्यासाठी विविध कौशल्ये असणारे मनुष्यबळ लागणार आहे. सध्याच्या परिस्थितीत ते होताना दिसत नाही. त्यामुळे बेरोजगारी वाढते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील शिक्षणाची तसेच रोजगाराची परिस्थिती बिकट आहे. इथून पुढे बरीचशी कामे यांत्रिकीकरणाकडे झुकणार आहेत. त्यासाठी कौशल्य विकास आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचा उपयोग त्यादृष्टीने जास्तीत जास्त कसा करता येईल, हे त्या धोरणाच्या अंमलबजावणीवर अवलंबून असणार आहे. त्यामुळेच आता खरी गरज आहे ती नव्या धोरणाच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करण्याची. त्यातील अडथळे दूर करण्याची. सध्या शैक्षणिक संस्थांना अनेक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यात संसाधनांची उपलब्धता, सक्षम शिक्षकगण तसेच शिक्षणाची पद्धत यात आमूलाग्र बदल करावे लागतील. या दृष्टीने तयारीसाठी राज्य व केंद्र सरकारला कंबर कसावी लागेल. २०२५ पर्यंत हे व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप चालूच राहणार आहे. हे आव्हान वाटते तेवढे सोपे नाही पण हे नवीन धोरण आपण जेवढे लौकरात लौकर आत्मसात करून प्रभावीपणे राबवू शकू तेवढे चांगले आहे.

सध्याच्या १०+२ याच्या ऐवजी नवीन धोरणानुसार ५+३+३+४ अशी संरचना असणार आहे. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व व अंगभूत गुणांचा विकास हा समतोल राखण्याची अपेक्षा धोरणात व्यक्त करण्यात आली आहे. वक्तृत्व, संगीत, साहित्य, कला, टीम वर्क, नेतृत्व, संशोधन, प्रयोग, उद्योजकता, समाजसेवा, नैतिकता, साहस, राष्ट्रप्रेम, परोपकार, मानवता, खेळ, चारित्र्य अश्या विविध पैलूंची ओळख व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिला जावे, असे धोरणात नमूद करण्यात आले आहे. यासाठी लागणारी सर्व सामग्री, ग्रंथालये, संशोधन केंद्र, प्रयोगशाळा, पुस्तके, कॉम्पुटर, क्रीडांगण, शैक्षणिक साहित्ये इ. असणे हेदेखील आवश्यक आहे. याचबरोबर विद्यार्थ्याला नेमून दिलेल्या ठराविक अभ्यासक्रम देखील पूर्ण करावा लागणार आहे. परीक्षेत केवळ उत्तम गुण मिळवणे यापेक्षा त्याचा सर्वांगीण विकास कसा होईल यावर नवीन शिक्षण धोरणात जास्त भर असणार आहे.

माहितीचे संकलन आणि विश्लेषण, माहिती तंत्रज्ञान, डिजिटलायझेशन, सोशल मीडिया, सामाजिक प्रकल्पांचे व्यवस्थापन, मानवता, महिला सबलीकरण, प्रदूषण नियंत्रण, पर्यावरण संरक्षण, नर्सिंग आणि पॅरा मेडिकल सेवा अशा विविध क्षेत्रातील आव्हाने पेलवण्यासाठी प्रशिक्षित तरुणांची फार मोठी गरज आहे. अशी अनेक क्षेत्रे आज केवळ भारतात नव्हे तर जगातील अनेक देशात आव्हानात्मक आहेत. जेथे आज जग भारतातील नवयुवकांकडे मोठ्या आशेने बघत आहे. त्यामुळेच या क्षेत्रातले प्रशिक्षित मनुष्यबळ कसे तयार करता येईल, यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. बदलत्या काळाचा वेध घेत अभ्यासक्रमात बदल करावे लागतील. तो लवचिक ठेवावा लागेल. स्पेशल एजुकेशन झोन (एसइझेड) ची कल्पनाही अनोखी आहे. तिचीही अंमलबजावणी कसोशीने व्हायला हवी. शिक्षण हे सर्वसमावेशक असले पाहिजे यावर भर दिला जाईल जेणेकरून देशात कोणीही कोणत्याही कारणाने अशिक्षित राहणार नाही. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हा उपक्रम हा त्यापैकीच एक आहे. बालपण काळजी आणि शिक्षण ही एक नवीन संकल्पना ही या धोरणाची अजून एक विशेषता आहे. बालपणीची काळजी आणि शिक्षणामध्ये खेळकर, शोधकेंद्रित, क्रियाकलाप आधारित शिक्षण असते. उदाहरणार्थ वर्णमाला, भाषा, संख्या, मोजणी, रंग, आकार, कोडी, समस्या सोडवणे, नाटक, चित्रकला इत्यादी बहुपर्यायी शिक्षण असेल. राष्ट्रीय शैक्षणिक, संशोधन आणि प्रशिक्षण परिषद यांनी या बाबतचा अभ्यासक्रम विकसित केला आहे जो ०-३ वर्षे व ३-८ वर्षे अशा वयोगटातील बालकासाठी असेल. यामुळे पालक तसेच शिक्षक दोघानांही तो मार्गदर्शक ठरेल. यासाठी लागणारी यंत्रणा शासकीय तसेच खाजगी शाळां मधून उभी केली जात आहे. याबाबत शासकीय स्तरावर देखील काम होणे अपेक्षित आहे. प्रत्येक वर्गा मध्ये ३० पेक्षा जास्त विद्यार्थी असू नयेत असेही निर्देश दिले गेले आहेत; पण ते कितपत पाळले जातील याबद्दल शंका आहे. शिक्षकांची मानसिकता नव्या धोरणाला अनुरूप करणे हेही एक मोठे आव्हान आहे. त्याला आपण कसे सामोरे जाणार ते पाहावे लागेल. त्यावरच यश अवलंबून असेल. शाळा मधेच सोडून देण्याची वृत्ती वाढत असून त्याबाबत प्रतिबंधात्मक उपाय योजावे लागतील. प्रकल्पाधारित वेगवेगळे गट केले जातील उदा. कला, नाट्य, संगीत, भाषा, शास्त्र, खेळ, इत्यादी जेथे प्रत्येक विद्यार्थ्याला सादरीकरणाची संधी मिळेल व शिक्षण हे जास्ती सहज, सुंदर व आनंदायी होईल. या यंत्रणेमध्ये विद्यार्थ्यांवरील परीक्षेमुळे येणारा तणाव कमी होईल. या धोरणामध्ये शिक्षकांना फार महत्व दिले आहे. त्यांच्या प्रशिक्षणासाठी वेगळी व्यवस्था केली आहे. विविध शाळांमध्ये शिक्षकांचे आदानप्रदानदेखील करता येईल. शिक्षकांच्या वेतनश्रेणी व इतर मूलभूत सेवा सवलतीमध्ये देखील योग्य ती सुधारणा केली जाईल, असे धोरणात म्हटले आहे. त्या सुधारणेसाठी त्वरित पावले टाकायला हवीत.

शिक्षकांना अद्ययावत राहण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा संकल्प आहे. त्याचा तपशील ठरवून त्याप्रमाणे तयारीला सुरवात केली पाहिजे. विविध प्रकारचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षणसंस्थांचे देखील विद्यापीठ संकुल करावे. नजीकच्या भविष्यकाळात अनेक स्वायत्त विद्यापीठे उदयास येतील. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मापदंडदेखील विकसित केले जात आहेत. सर्व शिक्षकांनी बी.एड. करावे याला प्रोत्साह जाईल. हे सर्व करताना शिक्षणाचे बाजारीकरण होणार नाह काळजी घ्यावी लागेल. दर्जानियंत्रण ही बाब कळीची बाब ठ

## निधी उभा करण्याचे मार्ग

नवीन धोरण राबविण्यास पैसे उभे करावे लागतील. या दृष्टीने 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉंबिलिटी' या माध्यमाद्वारे कंपन्यांच्या मदतीने हातभार लावता येईल. भारतात लौकरच 'सोशल स्टॉक एक्सचेंज' सुरु होणार आहे. त्याद्वारे आवश्यक पैसे उभे करणे सोपे जाईल. पण त्यादृष्टीने आत्तापासूनच तयारीला लागणे आवश्यक आहे. शाळा-कॉलेजचे अनेक माजी विद्यार्थीदेखील या बाबतीत हातभार लावू शकतात, याचाही विचार करायला हरकत नाही. शिक्षणासारख्या चांगल्या कामाला पैसे कधीही कमी पडणार नाहीत. भारतीय शिक्षण संस्थांचे जाळे जगभर पसरावे यासाठी काही स्वायत्त विद्यापीठांना सरकार काही वर्षांनी प्रोत्साहन व मदत देऊ शकेल. भारतीय योग,आयुर्वेद, संगीत,नाट्य, चित्रपट, नृत्य, साहित्य, कला, धर्म, पर्यटन, ग्रामीण जीवन, कुटुंब व्यवस्था व संस्कृती याकडे जगातील अनेक तरुण आकर्षित होत आहेत. भारताची अर्थव्यवस्था देखील सक्षम असून वाढत आहे. हा तरुणांचा देश आहे. भारताचे नेतृत्व आज जागतिक पातळीवर देखील स्वीकारले जात आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर भारताची राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक व सामाजिक प्रतिमा ही राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चमकदार आहे. संधी उदंड आहेत. प्रश्न आहे तो त्यांचा लाभ उठविण्यासाठी सज्ज होण्याची. उत्तम शिक्षणव्यवस्थाच ते करू शकते.

Sakaal 17.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

# उच्च शिक्षणात वाढतोय मुलींचा टक्का!

पुणे, ता. १६ : भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (आयआयटी) बी.टेक. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या आठ टक्क्यांवरून (२०१६मध्ये) २० टक्क्यांपर्यंत वाढली आहे. देशात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) यामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या २०१६मध्ये सुमारे ४१ लाख ९७ हजार १८६ इतकी होती. तर २०२१मध्ये ही संख्या तब्बल ४३ लाख ८७ हजार २४८ पर्यंत पोचली आहे. संपूर्ण देशातही उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वाढत असल्याची माहिती समोर आली आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या आणि ही संख्या वाढण्यासाठी होत असलेले प्रयत्न, या संदर्भात खासदार अबीर रंजन बिस्वास राज्यसभेत प्रश्न विचारला. त्याला उत्तर देताना केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष सरकार यांनी ही माहिती दिली आहे.

> 'आयआयटी'मध्ये मुलींच्या प्रवेशाचा टक्का वाढवा, यासाठी अतिरिक्त कोटा दिला आहे. परंतु गेल्या ६० वर्षांची सरासरी पाहता आयआयटीमध्ये मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण अत्यल्प होते. पण, आता आयआयटी प्रवेशात मुलींसाठी दिलेल्या अतिरिक्त कोट्यामुळे गेल्या काही वर्षात मुलींची संख्या वाढत आहे. आता सर्वच क्षेत्रात मुली पुढे जात असल्याचे दिसून येते.
> – दुर्गेश मंगेशकर, व्यवस्थापकीय संचालक, आयआयटीयन्स प्रशिक्षण केंद्र




### गेल्या पाच वर्षातील देशभरातील आकडेवारी

('स्टेम'साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींची संख्या) (स्रोत : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण अहवाल)

| राज्य | २०२०-२१ | २०१९-२० | २०१८-१९ | २०१७-१८ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४,८४,७६३ | ४,८२,४०७ | ४,७५,२०८ | ४,७५,०१० | ४,६३,७६२ |
| आंध्र प्रदेश | ४,२७,९४२ | ४,२५,८६२ | ४,१९,५०७ | ४,१९,३३२ | ४,०९,४०३ |
| गुजरात | १,१४,११६ | १,१३,६४१ | १,११,९४५ | १,११,८१८ | १,०९,२४१ |
| उत्तर प्रदेश | ५,५२,६५८ | ५,४९,९७२ | ५,४१,७६५ | ५,४१,५३९ | ५,२८,७१६ |
| संपूर्ण देशात एकूण | ४३,८७,२४८ | ४३,६५,९२८ | ४३,००,७७१ | ४२,९८,९७७ | ४१,९७,१८६ |

### मुलींची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न

- उच्च शिक्षण आणि संशोधनात मुलींना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे देशभरातील विद्यार्थिनींसाठी विशेष शिष्यवृत्ती दिली जाते
- एक मुलगी असणाऱ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी 'इंदिरा गांधी स्कॉलरशिप फॉर सिंगल गर्ल चाइल्ड आहे.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेतर्फे (एआयसीटीई) आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या १० हजार विद्यार्थिनींना तंत्रशिक्षणासाठी 'प्रगती शिष्यवृत्ती' आहे.

Sakaal 17.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# सेवाज्येष्ठतेची ऐशी की तैशी!

## मर्जीतील प्राध्यापकांवर वरदहस्त; नामांकित महाविद्यालयांतील प्रकार

मटा विशेष

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @Harshdudhe_MT

**पुणे :** शहरातील नामांकित शिक्षण संस्थांनी प्राध्यापकांच्या सेवाज्येष्ठता नियमाला हरताळ फासला असून, पदाधिकाऱ्यांच्या जवळच्या किंवा खास मर्जीतील व्यक्तींना विभागप्रमुख आणि प्राचार्यपदी नियुक्त करण्यात येत असल्याचे समोर आले आहे.

हाच प्रकार नाशिक आणि नगरसह अन्य जिल्ह्यांतही सुरू आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या वरिष्ठ प्राध्यापकांना कायम कनिष्ठपदी कार्यरत राहण्याची वेळ आली आहे. याबाबतच्या तक्रारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे करण्यात आल्या आहेत. मात्र, कारवाई होत नसल्याने संस्थाचालकांना विद्यापीठ आणखी किती दिवस पाठीशी घालणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

विद्यापीठाशी संलग्न पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये साधारण ९००पेक्षा अधिक महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये मोठ्या संख्येने अनुदानित आणि कंत्राटी पद्धतीने प्राध्यापक कार्यरत आहेत. सेवाज्येष्ठतेच्या नियमानुसार, जुन्या प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ मिळणे अपेक्षित आहे. मात्र, शहरातील नामांकित शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापकांची सेवाज्येष्ठता डावलण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. त्यासाठी संस्थेकडील सेवाज्येष्ठतेच्या यादीत फेरफार करण्यापर्यंत मजल गेली आहे. अनेक महाविद्यालयांमध्ये संस्थाप्रमुखाच्या जवळच्या व्यक्तींना विभागप्रमुख, प्राचार्य आणि संचालकपदावर बढती देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या परिपत्रकाचा चुकीच्या पद्धतीने आधार घेण्यात येत आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे आपल्या अध्यापनाचे काम प्रामाणिकपणे करणाऱ्या प्राध्यापकांवर अन्याय होत आहे.






या प्रकाराविरोधात काही प्राध्यापकांनी संस्थेकडे तक्रारी केल्या. मात्र, त्यांना केराची टोपली दाखविण्यात आली. या पार्श्वभूमीवर न्यायाच्या अपेक्षेने या प्राध्यापकांनी विद्यापीठाकडे तक्रारी केल्या. मात्र, तक्रारींचा निपटारा होत नसून, संपूर्ण प्रक्रिया लालफितीमध्ये अडकल्याचे दिसून येत आहे. या दिरंगाईमुळे नामांकित महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे मानसिक खच्चीकरण होत आहे.

> " सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमांकडे महाविद्यालयांकडून सपशेल दुर्लक्ष करण्यात येत असून, सेवाज्येष्ठता डावलण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. कनिष्ठ प्राध्यापकाला विभागप्रमुख करण्यात येत असून, वरिष्ठ प्राध्यापकाला संबंधिताच्या आदेशांचे पालन करावे लागत आहे. हे प्रकार रोखण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडे वेळ नाही असेच चित्र आहे. प्राध्यापकांनी या प्रकारांची तक्रार करून त्याची माहिती संघटनेला द्यावी.
>
> – डॉ. के. एल. गिरमकर, अध्यक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो)

> " मी साधारणतः २५ वर्षांपासून महाविद्यालयातील कामे जबाबदारीने पूर्ण करीत आहे. असे असतानाही संस्थेशी जवळीक असणाऱ्या प्राध्यापकाला सेवाज्येष्ठता यादीत वरचे स्थान देण्यात येत आहे. संबंधित प्राध्यापकाची सेवा केवळ १२ वर्षांची आहे. हा गंभीर प्रकार असून, अशाच पद्धतीने अनेक महाविद्यालयांमध्ये कारभार सुरू आहे.
>
> – एक प्राध्यापक, मध्यवर्ती पुण्यातील एक नामांकित महाविद्यालय

> शैक्षणिक संस्थांकडून सेवा ज्येष्ठतेची यादी तयार करताना मनमानी केली जाते. असे प्रकार होत असल्यास संबंधित प्राध्यापकाने त्याची तक्रार विद्यापीठाकडे करावी. संबंधित संस्थेकडून माहिती मागवली जाईल. त्यानंतर शहानिशा करून कारवाई करण्यात येईल.
>
> – प्रा. डॉ. संजीव सोनावणे, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 17.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

### 'यूजीसी'च्या उजळणी अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानाचा समावेश

# प्राध्यापकांना पुण्य, पुराण, पंचांगांचे पाठ

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** अध्यापनकौशल्य तसेच विद्याशाखेतील नवे प्रवाह, संशोधने याबाबत प्राध्यापकांना अद्ययावत ठेवण्यासाठी बंधनकारक असलेल्या उजळणी पाठ्यक्रमात (रिफ्रेशन कोर्स) भारतीय ज्ञानाचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे हा पाठ्यक्रम पूर्ण करून वेतनवाढ वा बढतीसाठी पात्र ठरण्याकरिता प्राध्यापकांना वैदिक यज्ञ, पंचांग, पुण्य, मोक्ष, नक्षत्रे, पुराण यांचाही अभ्यास पक्का करावा लागणार आहे.

शिक्षणात भारतीय ज्ञानाचा समावेश करण्याची शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर प्राध्यापकांसाठी असलेल्या दिशासाधन वर्ग (ओरिएन्टेशन) आणि उजळणी पाठ्यक्रमामध्ये भारतीय ज्ञानाचा अभ्यास बंधनकारक करण्यात आला आहे. प्रत्येक विद्याशाखेतील शिक्षकांना उजळणी अभ्यासक्रम पूर्ण केल्यास वेतनवाढ आणि पदोन्नतीचे लाभ मिळू शकतात.

महाविद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर पहिल्या पाच वर्षांत ओरिएन्टेशन अभ्यासक्रम पूर्ण करणेही आवश्यक आहे. या अभ्यासक्रमात त्या त्या विद्याशाखेशी संबंधित अद्ययावत अभ्यास, संशोधन यांचा समावेश असतो. आता यात भारतीय ज्ञानाचीही भर पडली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) भारतीय ज्ञानरचनेबाबतचा अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला आहे. एकूण अभ्यासवर्गाच्या १० टक्के भाग हा भारतीय ज्ञानरचनेचा असणार आहे. भारतीय ज्ञानरचनेच्या अभ्यासासाठी एकूण ३० तास द्यावेत, असेही या आराखड्यात नमूद करण्यात आले आहे.

**रसशास्त्र, ज्योतिष, तीर्थक्षेत्रे...**

दिशासाधन अभ्यासक्रमात पुण्य, आत्मा, कर्म, यज्ञ, शक्ती, वर्ण, जाती, मोक्ष, लोक, दान, पुराण, प्रजा, लोकतंत्र, प्रजातंत्र, स्वराज्य, सुराज्य, राष्ट्र, देश अशा संकल्पनांची ओळख करून दिली जाईल.

रसायनशास्त्रात आयुर्वेदातील रसशास्त्र, अर्थशास्त्रात धर्मशास्त्र, महाभारताच्या अनुषंगाने अर्थशास्त्राचा अभ्यास, कला आणि वास्तुकला अभ्यासक्रमात वैदिक यज्ञ, वास्तुपुरुष या संकल्पना आणि तीर्थक्षेत्रांचा अभ्यास करावा लागेल.

भूगोलात भारतवर्षाचा भूगोल अभ्यासावा लागेल. खगोलशास्त्रात वेदांग ज्योतिष, पंचांग यांचा तर शेतीचा अभ्यास करताना नक्षत्रांनुसार शेतीचे नियोजन शिकावे लागेल.



लोकसत्ता Sat, 17 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71159189

# SPPU conducts audit of research institutions

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** With admissions for Ph.D courses currently underway across all research institutions affiliated to the Savitribai Phule Pune University (SPPU), the SPPU administration has started checking all these affiliated institutions and will also conduct an academic and administrative audit of these institutions across Pune, Nashik and Ahmednagar districts.

According to information shared by the SPPU administration, admissions for Ph.D programmes are underway with interviews being taken by various departments and affiliated research centres at present. After the interviews are over, the final admission process will be carried out.

For this purpose, the SPPU is collecting information from its research centres in Pune, Nashik, Ahmednagar and Silvasa to know the current status of these research centres. Whereas in the meetings held by the SPPU dean, it was decided to also carry out an academic and administrative audit of these centres. Accordingly, district-wise committees have been formed for audit purposes, and the detailed schedule of the audit will be provided by the university administration.

A senior official at the SPPU said on condition of anonymity, "Now, the audit of these research centres has been completed yesterday and soon, the report will be submitted by the district-wise committees. Only those research centres will be allowed to carry out Ph.D admissions that are recommended by the committee members, and if there are any problems or issues at the centres, the same will be conveyed to the centre heads."

Hindustan Times 17.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क वाढणार

## राज्य शिक्षण मंडळाकडून ३० टक्के वाढीबाबतचा प्रस्ताव सादर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावी परीक्षा अर्जांच्या शुल्कात गेल्या सहा वर्षांपासून वाढच करण्यात आलेली नाही. त्यामुळे राज्य मंडळाने दहावी-बारावी परीक्षा शुल्कात ३० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यास पुढील वर्षापासून दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क वाढणार असल्याची माहिती राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली.**

राज्य मंडळ ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. दहावी आणि बारावीच्या साधारणपणे तीस लाख विद्यार्थ्यांची परीक्षा राज्य मंडळामार्फत घेण्यात येते. राज्य मंडळ स्वायत्त असल्याने आर्थिक कारभार संस्थेच्याच स्तरावर केला जातो. दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींचे शुल्क आदी माध्यमातून राज्य मंडळाला उत्पन्न मिळते. सध्या दहावीचे शुल्क ३७५ रुपये, तर बारावीचे शुल्क ४१५ रुपये आहे. परीक्षा शुल्क आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींच्या माध्यमातून साधारणपणे १८० कोटींचे उत्पन्न मिळते. राज्य मंडळाने २०१७ मध्ये केलेल्या शुल्कवाढीनंतर गेल्या सहा वर्षांत शुल्कवाढ केलेली नाही. मात्र, दरम्यानच्या काळात अन्य खर्चांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ न होता खर्च वाढल्याने राज्य मंडळ तोट्यात जात असल्याचे सध्या चित्र आहे. संस्थेला राज्य शासनाकडून निधी दिला जात नाही. आस्थापना खर्चासह शासनाच्या नियमांनुसार कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन यासह विद्यार्थ्यांसाठीच्या सोयीसुविधा, परीक्षकांचे मानधन, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन आदी खर्च मंडळालाच करावा लागतो. पूर्वी दहावी आणि बारावीचे मिळून साधारणपणे ३५ लाख विद्यार्थी असायचे. आता विद्यार्थिसंख्या ३० लाखांपर्यंत कमी झाल्याने उत्पन्नात वाढ झालेली नाही. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंधनाचे दर वाढले, कागदाचे दर वाढले, मनुष्यबळाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याचबरोबर प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांच्या निर्मितीचा खर्च वाढला आहे. परिणामी, ४० ते ५० कोटींचा तोटा मंडळाला सहन करावा लागत असून, मंडळाच्या ठेवींचे व्याज खर्चासाठी वापरण्याची वेळ मंडळावर आली आहे. त्यामुळे तोटा भरून काढण्यासाठी परीक्षा शुल्कात वाढ करणे गरजेचे असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

> गेल्या सहा वर्षांपासून दहावी आणि बारावी परीक्षांच्या शुल्कात वाढ झालेली नाही. त्यामुळे परीक्षा शुल्कात साधारण ३० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाला दिला आहे. यंदाची परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे प्रस्तावाला मंजुरी मिळाली, तर पुढील वर्षापासून शुल्कवाढ लागू करण्याचा राज्य मंडळाचा विचार आहे.
>
> - **शरद गोसावी,** अध्यक्ष, राज्य मंडळ

Pune Edition
Dec 18, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# परीक्षा अर्जातच आता मतदार नोंदणीचा रकाना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जातच आता नवीन मतदार नोंदणीसाठी रकाना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्षातून चारवेळा मतदार नावनोंदणीसाठी संधी मिळणार आहे. तशा प्रकारची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश विद्यार्थी विकास मंडळामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.



निवडणूक आयोगाकडून नागरिकांची निवडणूक मतदार यादीमध्ये नावनोंदणी आणि अद्ययावत करण्याचा कार्यक्रम सातत्याने राबविण्यात येत असतो. यामध्ये नवीन व भावी मतदारांच्या नावनोंदणीवर विशेष भर देण्यात येतो. याआधी येणाऱ्या वर्षामधील १ जानेवारीला १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकांनाच मतदार यादीमध्ये नावनोंदणी करता येत होती; परंतु नावनोंदणी प्रक्रियेमध्ये नुकत्याच झालेल्या बदलामुळे आता येणाऱ्या वर्षामधील १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर या चार दिनांकांपैकी कोणत्याही एका दिनांकास १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांना नवीन वा भावी मतदार म्हणून नावनोंदणी करता येणार आहे.तशा प्रकारचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

विद्यार्थ्यांना मतदार नावनोंदणीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी त्याच्या वेबसाईटवर नवीन मतदार नावनोंदणीसाठी 'एक लिंक-एक जनजागृती'च्या स्लोगनसह उपलब्ध करून द्यावी, या लिंकला अर्जदाराला एनव्हीएसपी या पोर्टलवर नवीन मतदार नावनोंदणी फॉर्म ६ येथे निर्देशित करील.

शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश अर्ज व परीक्षा अर्जामध्ये शेवटी नवीन मतदारासाठी नावनोंदणीकरिता अर्ज अशा टॅगलाईनसह एक रकाना उपलब्ध करून द्यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 18, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2022

### Section: Education

# विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ पुढील महिन्यात?

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. १८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभास दिरंगाई होत आहे. तब्बल दोन महिने उलटले तरी अजूनही या समारंभाची कोणतीच तयारी नसल्याने विद्यार्थ्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. हा समारंभ जानेवारी महिन्यात होणार असल्याची चिन्हे आहेत.

विद्यापीठातर्फे वर्षातून एकदाच पदवी प्रदान समारंभाचे आयोजन केले जात होते. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने वर्षातून दोन वेळा पदवी प्रदान समारंभाचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार गेल्या काही वर्षांपासून फेब्रुवारी- मार्च आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पदवी प्रदान समारंभाचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लवकर प्रमाणपत्र मिळत होते. मात्र, तब्बल दोन महिने पदवी प्रमाणपत्र समारंभ न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.



"विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी रखडवणे योग्य नाही. पदवीप्रदान समारंभाची तयारी काही महिने अगोदर व्हायला हवी होती. विद्यापीठाचे नियोजन नसल्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे कुलगुरूंनी पुढाकार घेऊन त्वरित पदवीप्रदानची तारीख निश्चित करावी.
– संतोष ढोरे, माजी अधिसभा सदस्य

विद्यार्थी विद्यापीठाकडे पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करतात. त्यानुसार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच अथवा प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते. या समारंभासाठी दरवर्षी मान्यवर व्यक्तींना बोलवले जाते. परंतु अद्याप विद्यापीठाने या समारंभासाठी पाहुणेच निश्चित केले नसल्याची माहिती पुढे येत आहे. त्याचा फटका हा समारंभ लांबणीवर पडत असल्याची चर्चा विद्यापीठ वर्तुळातून होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर याबाबत येत्या २० तारखेला कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी बैठक बोलाविली आहे. त्यामुळे हा समारंभ नव्या वर्षात होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

**प्रभात** PuneCity, 19 Dec 2022, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

---

**पुढारी**

पुढारी ANCHOR

# उच्च शिक्षण विभागाच्या सीईटीचा अभ्यासक्रम जाहीर

## विधीसाठी १५०, बीएड-एमएड, बीपीएड-एमपीएडसाठी १०० गुणांची होणार परीक्षा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या आठ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक सीईटीचा अभ्यासक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार विधीसाठी १५०, बीएड-एमएड आणि बीपीएड-एमपीएडसाठी १०० गुणांची परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दरवर्षी सीईटी परीक्षा घेण्यात येते. तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या सीईटी परीक्षांचा अभ्यासक्रम आणि गुणांचे निकष नुकतेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलमार्फत जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाच्या सीईटीचा अभ्यासक्रम कधी जाहीर होणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. उच्च शिक्षण विभागाने ८ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी गुण आणि निकष जाहीर केल्यामुळे विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी दिशा मिळणार आहे.



उच्च शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या निकषांनुसार, विधी तीन आणि पाच वर्षे अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा १५० गुणांची होणार आहे. त्यासाठी विषय सारखे असले तरी गुणांचे 'वेटेज' मात्र वेगवेगळे देण्यात आले आहे. बीपीएड आणि एमपीएडसाठी लेखी ५० गुणांची आणि शारीरिक चाचणी ५० अशा १०० गुणांची परीक्षा होणार आहे. बीए-बीएड, बीएस्सी-बीएड, बीएडसाठी १०० गुणांची परीक्षा होणार आहे. बीएड इंग्लिश लँग्वेज कंटेंट टेस्ट अर्थात ईएलसीटी ही परीक्षा ५० गुणांची होणार आहे. तर एमएड तसेच बीएड-एमएड एकात्मिक अभ्यासक्रमासाठी १०० गुणांची सीईटी होणार आहे. संबंधित अभ्यासक्रमांची परीक्षा ऑनलाइन स्वरूपात राहणार आहे. परीक्षेत निगेटिव्ह गुण पध्दत राहणार नाही. तसेच साधारणपणे एका प्रश्नासाठी एक गुण अशा पध्दतीचे प्रश्नांचे स्वरूप राहील, असे डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 19, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

पुढारी

पुढारी ANCHOR

# आता विद्या प्राधिकरणाचेही 'टेलिग्राम' चॅनेल

## पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना होणार लाभ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य यांना शिक्षण विभागातील विविध गोष्टींची माहिती व्हावी, शासनाच्या सर्व सूचना त्यांना वेळेत मिळाव्यात, यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अर्थात विद्या प्राधिकरणामार्फत 'टेलिग्राम' चॅनेल सुरू करण्यात आले आहे. याचा राज्यातील पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना फायदा होणार असल्याची माहिती विद्या प्राधिकरणाचे संचालक राजेश पाटील यांनी दिली.

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या शाळांसाठी, शिक्षकांसाठी विविध योजना, याचसोबत शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन, विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय शैक्षणिक सर्वेक्षणे, विविध शैक्षणिक योजना, विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय, राज्यस्तरावरून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, विविध ऑनलाइन उपक्रम, विविध उपक्रमांच्या अनुषंगाने मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन, वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजन, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरावरील विविध स्पर्धा, उपक्रम, विविध शैक्षणिक कार्यक्रम व त्यांची वेळापत्रके, अशा विविध गोष्टींसाठी राज्यस्तरावरून विभाग, जिल्हा तसेच तालुकास्तरावर पत्रव्यवहार केला जातो.

राज्यस्तरावरून दिल्या जाणाऱ्या सूचना शाळास्तरावर तत्काळ उपलब्ध होतातच असे नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये राज्यस्तरावरील अशा स्वरूपाची महत्त्वाची शैक्षणिक माहिती, पत्रव्यवहार तसेच शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रसिद्धी देण्याच्या दृष्टीने घेण्यात येणारे उपक्रम यांची माहिती राज्यातील मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकांना एकाचवेळी व तत्काळ उपलब्ध व्हावी, यादृष्टीने 'टेलिग्राम' चॅनेल सुरू करण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्व शिक्षकांना कळविण्यात यावे; जेणेकरून राज्यातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्यापर्यंत शालेय शिक्षण विभागाचे उपक्रम अथवा माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल, असे पाटील यांनी सांगितले. विभागीय उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि अन्य अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

### टेलिग्रामची ही आहे लिंक...

शिक्षण विभागातील विविध गोष्टींची माहिती व्हावी, हा असा चॅनेल सुरू करण्यामागचा प्रमुख उद्देश आहे. नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या 'टेलिग्राम' चॅनेलची लिंक - : https:// t. me/ MhTeachers

Pune Edition
Dec 20, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठाचा पदवी प्रदान सोहळा येत्या १५ दिवसांत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ येत्या १५ दिवसांत घेण्यात येणार आहे. त्यासाठीची बैठक मंगळवारी होणार आहे. यामध्ये सोहळ्याची तारीख निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

**तारीख निश्चित करण्यासाठी आज बैठक**

विद्यापीठातर्फे वर्षातून एकदाच पदवी प्रदान समारंभ होत होता. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोगाने वर्षातून दोन वेळा पदवी प्रदान समारंभाचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार गेल्या काही वर्षांपासून फेब्रुवारी-मार्च आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पदवी प्रदान समारंभ होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लवकर प्रमाणपत्र मिळत होते. मात्र, तब्बल दोन महिने पदवी प्रमाणपत्र समारंभ न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

विद्यार्थी विद्यापीठाकडे पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करतात. त्यानुसार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच अथवा प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते. या समारंभासाठी दर वर्षी मान्यवरांना बोलवले जाते. यंदा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पदवी प्रदान सोहळ्यासाठी आमंत्रित करण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न होता. परंतु, त्यांची वेळ न मिळाल्यामुळे आता नवीन पाहुणे निश्चित करण्यात येतील आणि येत्या १५ दिवसांत छोटेखानी पदवी प्रदान सोहळा घेण्यात येणार आहे. तर, फेब्रुवारी महिन्यात नियमित पदवी प्रदान सोहळा होईल.

Pune Edition
Dec 20, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे काम बंद आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** तासिका तत्त्वाचे धोरण बंद करीत राज्यातील महाविद्यालयात सहायक प्राध्यापकांची पदे भरावीत, यासह इतर मागण्यांसाठी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांनी दि. २६ डिसेंबरपासून राज्यव्यापी काम बंद आंदोलन पुकारले आहे.

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयात प्राध्यापकांची शंभर टक्के भरती करणे आवश्यक आहे. मात्र, राज्य शासनाकडून या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे.

केंद्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार शंभर टक्के प्राध्यापक भरती करणे, तासिका तत्त्व धोरण बंद करून 'समान काम, समान वेतन' लागू करणे. सुरू असलेली प्राध्यापक भरती वेळेत पूर्ण करणे याकरिता शासनाकडून तात्काळ एनओसी दिल्या जाव्यात. विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची नियुक्ती करणे, या मागणीसाठी नेट, सेट, पीएच. डीधारक संघर्ष समितीतर्फे हे कामबंद आंदोलन केले जाणार आहे.

## समितीचे आव्हान

राज्य सरकारने १७ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय काढत तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना परीक्षेची कामे देण्यात येऊ नयेत अशा सूचना केल्या आहेत. तरीही या निर्णयाचे उल्लंघन करून तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना परीक्षेची कामे देण्यात येतात. त्यांना वगळून विद्यापीठाने या परीक्षा घेऊन दाखवाव्यात, असे आव्हान संघर्ष समितीतर्फे करण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 2 Dec 20, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# संस्थांना मिळणारा निधी तुटपुंजा

## नॅकच्या कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांची टीका

**पुणे** : देशात सगळीकडेच आता आयआयटी, आयआयएमसारख्या संस्था सुरू केल्या जात आहेत. मात्र, केवळ शैक्षणिक संस्था सुरू करून उपयोग नाही, तर त्यांच्या गुणवत्तेवरही भर देणे आवश्यक आहे. आयआयटीसारख्या संस्थांमध्ये प्राध्यापक नाहीत या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होत आहे, संस्थांना दिला जाणारा निधी अतिशय तुटपुंजा आहे, अशी टीका राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी मंगळवारी केली.

विश्वकर्मा पुस्तक प्रकाशनातर्फे माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर यांनी लिहिलेल्या 'विज्ञान व तंत्रज्ञान : अपेक्षा आणि वास्तव' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी डॉ. पटवर्धन बोलत होते. माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. पंडित विद्यासागर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल लचके, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. आदित्य अभ्यंकर, विश्वकर्मा प्रकाशनाचे विशाल सोनी आदी या वेळी उपस्थित होते.

भारतात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांना महत्त्व देण्यात आले. याच विषयांशी निगडित संस्थांची स्थापना करण्यात आली. मात्र, त्याच वेळी मानवशास्त्राकडे आपण दुर्लक्ष केले. त्याचीच आज मोठ्या प्रमाणावर गरज आहे. केवळ संस्था काढून चालणार नाही तर त्याची गुणवत्ता आपण तपासायला हवी, असेही डॉ. पटवर्धन यांनी सांगितले. आजकाल कोणत्याही गोष्टी विज्ञान म्हणून शिकवल्या जात आहेत. ज्योतिष विज्ञान म्हणून शिकवण्यापर्यंत विज्ञानाची चेष्टा चालवली आहे. आजही या सरकारला वैज्ञानिक संस्था विकसित करण्याऐवजी मंदिर निर्माण महत्त्वाचे वाटत असल्याचे देशमुख म्हणाले.

लोकसत्ता
Wed, 21 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71197059

# शिक्षण प्रशासनही टेक्नोसॅव्ही | राज्यभरातील शिक्षक, मुख्याध्यापक 'टेलिग्राम'वर

### विद्या प्राधिकरणामार्फत चॅनेल सुरू : तत्काळ माहिती मिळणार

प्रभात वृत्तसेवा

> राज्यस्तरावरील महत्त्वाची शैक्षणिक माहिती, पत्रव्यवहार, शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रसिद्धी देण्यायोग्य माहिती राज्यभरात एकदम उपलब्ध व्हावी, यादृष्टीने टेलिग्राम चॅनेल सुरु करण्यात आले आहे. फेसबुक, ट्विटर व युट्यूबच्या लिंक टेलिकाम वर क्लिक करुन सर्व शिक्षकांना जॉइन होता येणार आहे.
>
> – राजेश पाटील, संचालक, विद्या प्राधिकरण

**पुणे, दि. २०** - अन्य प्रशावतीने सकीय विभागांप्रमाणे शिक्षण विभागही टेक्नोसॅव्ही होत आहे. याअंतर्गत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (विद्या प्राधिकरण) टेलिग्राम चॅनेल सुरू केले आहे. याद्वारे राज्यातील इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व व्यवस्थापनाच्या, माध्यमांच्या शाळांच्या शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांना विविध योजना धोरणे, परिपत्रके, प्रशिक्षणे, स्पर्धा, सर्वेक्षण व इतर अनुषंगिक माहिती तत्काळ दिली जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागामार्फत शाळांसाठी विविध योजना व शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येते. विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय शैक्षणिक सर्वेक्षण, विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय, राज्यस्तरावरुन विविध स्पर्धा, ऑनलाईन उपक्रम, विविध उपक्रमांच्या अनुषंगाने मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन , वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजन, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावरील विविध स्पर्धा, उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम व त्यांची वेळापत्रके आदी अनेक अनुषंगिक बार्बीसाठी राज्यस्तरावरुन विभागवार, जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर पत्र व्यवहार केला जातो.

प्रभात
PuneCity, 21 Dec 2022, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

लोकमत

डॉ. पंडित विद्यासागर लिखित 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' पुस्तकाचे प्रकाशन

### संशोधनात विद्यापीठे मागेच : डॉ. पटवर्धन

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात विज्ञानाधिष्ठित शिक्षण पद्धती तयार झाली, त्यातून विज्ञानाच्या मोठमोठ्या संस्थाही तयार झाल्या. पण, तेथूनच विज्ञान आणि तंत्रज्ञान, अशी वेगवेगळी वाटचाल सुरू झाली. त्याचा गंभीर परिणाम आपल्या शिक्षणावर झाल्याने संशोधन आणि शिक्षण वेगळे आहेत, असा एक समज रूढ झाला. त्यामुळे 'एनसीएल'सारख्या संस्था एकीकडे खूप उत्तम संशोधन करत होत्या; पण विद्यापीठे त्यात मागे पडल्याची खंत नॅकच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केली.

> भारतात आजही वैज्ञानिक दृष्टिकोनाची कमतरता आहे, प्रश्न विचारण्यात आपण कमी पडतो. गेल्या काही वर्षांत देवालय निर्माण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. विज्ञान संस्था निर्माण करण्याची गती कमी झाली. विज्ञान आणि तंत्रज्ञानाशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. एकीकडे विज्ञानामुळे तांत्रिक विषमताही निर्माण झाली आहे. त्यासाठी विज्ञानाचे लोकशाहीकरण झाले पाहिजे.
> **- लक्ष्मीकांत देशमुख**

डॉ. पंडित विद्यासागर लिखित आणि विश्वकर्मा प्रकाशनातर्फे प्रकाशित 'विज्ञान आणि तंत्रज्ञान : अपेक्षा आणि वास्तव' या पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, शास्त्रज्ञ व विज्ञान लेखक डॉ. अनिल लचके, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. आदित्य अभ्यंकर, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. भूपाल पटवर्धन, विश्वकर्मा प्रकाशनाचे विशाल सोनी आदी उपस्थित होते.

'संशोधनामध्ये 'स्टेम' अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यांना आपण खूप महत्त्व दिले. त्यासाठी आयआयआयटी, आयआयएम, एम्स, आयसर अशा अनेक संस्था मोठ्या प्रमाणावर उभ्या केल्या; पण मानव्यविद्या शाखेसाठी अशी एकही मोठी संस्था आपल्याकडे नाही, असेही डॉ. पटवर्धन म्हणाले. भविष्यात संशोधन वाढवण्यासाठी त्यादृष्टीने निर्णय घ्यावे लागणार आहेत. तसेच, केंद्र सरकारने त्यादृष्टीने धोरण आखणे गरजेचे आहे. नव्या शैक्षणिक धोरणात संशोधनावर भर दिला असला तरी त्यात आणखी बदल करावे लागतील.

डॉ. आदित्य अभ्यंकर म्हणाले, संशोधनाविषयी आपण असंवेदनशील आणि वैज्ञानिकांविषयी उदासीन झालो आहोत. आपण आपली उत्पादने निर्माण करत नाही तोवर आपण विज्ञान आणि तंत्रज्ञान जगत आहोत, असे म्हणू शकणार नाही.

Hello Pune
Page No. 6 Dec 21, 2022
Powered by: erelego.com

ांमधील टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होऊन पुढच्या करार करण्या...

### केवळ शैक्षणिक संस्था सुरू करू नका

**संस्थांच्या गुणवत्तेवर डॉ. भूषण पटवर्धन यांचे ताशेरे**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशात सगळीकडेच आता 'आयआयटी', 'आयआयएम' सुरू केल्या जात आहेत. मात्र, केवळ शैक्षणिक संस्था सुरू करून उपयोग नाही, त्यांच्या गुणवत्तेवर भर द्यायला हवा. अनेक 'आयआयटी'सारख्या संस्थांना प्राध्यापक मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत,' असे सांगून राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेवर मंगळवारी ताशेरे ओढले.

अमित रुके



**'विज्ञान व तंत्रज्ञान अपेक्षा आणि वास्तव' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भूषण पटवर्धन व माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी (डावीकडून) डॉ. विद्यासागर, डॉ. अनिल लचके, डॉ. पटवर्धन व देशमुख उपस्थित होते.**

विश्वकर्मा पुस्तक प्रकाशनातर्फे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर लिखित 'विज्ञान व तंत्रज्ञान अपेक्षा आणि वास्तव' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पटवर्धन व माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी डॉ. पटवर्धन बोलत होते. पुस्तकाचे लेखक डॉ. पंडित विद्यासागर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल लचके, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. आदित्य अभ्यंकर, विश्वकर्मा प्रकाशनाचे विशाल सोनी आदी या वेळी उपस्थित होते.

'देशात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांना महत्त्व देण्यात आले. याच विषयांशी निगडित संस्थांची स्थापना करण्यात आली. मात्र, त्याच वेळी मानवशास्त्राकडे आपण दुर्लक्ष केले. केवळ संस्था काढून चालणार नाही, तर त्यांची गुणवत्ता आपण तपासायला हवी. आज अनेक शैक्षणिक संस्थांच्या निधी वितरणाची जबाबदारी माझ्याकडे आहे. या संस्थांना दिला जाणारा निधी पाहिल्यास तो अतिशय तुटपुंजा आहे, याची खंत वाटते,' असे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले. डॉ. पंडित विद्यासागर यांनी पुस्तक लेखनामागची भूमिका विशद केली.

**'मंदिरांवरच भर'**

'आज काल कोणत्याही गोष्टी विज्ञान म्हणून शिकवल्या जात आहेत. ज्योतिषाला विज्ञान म्हणून ते शिकवण्याचा प्रयत्न करीत आहोत, इथपर्यंत विज्ञानाची चेष्टा चालवली आहे. आजही या सरकारला वैज्ञानिक संस्था विकसित करण्याऐवजी मंदिर निर्माण महत्त्वाचे वाटत आहे,' अशी टीका लक्ष्मीकांत देशमुख यांनी केली.

Maharashtra Times 21.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# मानव्यविद्या शाखेकडे दुर्लक्ष : डॉ. भूषण पटवर्धन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१** - संशोधनामध्ये 'स्टेम' अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताला आपण खूप महत्त्व दिले. त्यासाठी 'आयआयटी', 'आयआयएम', 'एम्स', 'आयसर' अशा संस्था उभ्या राहिल्या; परंतु 'मानव्यविद्ये'साठी एकही संस्था आपल्याकडे नाही, अशी खंत 'नॅक'च्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केली.

### 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' पुस्तकाचे प्रकाशन

डॉ. पंडित विद्यासागर लिखित आणि विश्वकर्मा प्रकाशनातर्फे प्रकाशित 'विज्ञान आणि तंत्रज्ञान : अपेक्षा आणि वास्तव' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. हजारे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, शास्त्रज्ञ आणि विज्ञान लेखक डॉ. अनिल लचके, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. आदित्य अभ्यंकर, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, विश्वकर्मा प्रकाशनाचे विशाल सोनी आदी उपस्थित होते.

जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात विज्ञानाधिष्ठित शिक्षणपद्धती तयार झाली. त्यामुळे संशोधन आणि शिक्षण वेगळे आहेत, असा समज निर्माण झाला. 'एनसीएल'सारख्या संस्था उत्तम संशोधन करत असतानाही त्यात मागे पडल्या, असे डॉ. पटवर्धन म्हणाले.

"आज आपण संशोधनाविषयी असंवेदनशील झालो आहोत आणि वैज्ञानिकांविषयी उदासीन आहोत. आपण आपली उत्पादने निर्माण करत नाही, तोवर आपण विज्ञान आणि तंत्रज्ञान जगत आहोत, असे म्हणू शकणार नाही.

– डॉ. आदित्य अभ्यंकर,
संचालक – तंत्रज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ

"देवालये निर्माण करण्याचे काम गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात सुरू आहे; परंतु विज्ञानसंस्था निर्माण करण्याची गती कमी झाली आहे. भारतात आजही वैज्ञानिक दृष्टिकोनाची कमतरता आहे. विज्ञानामुळे तांत्रिक विषमताही निर्माण झाली आहे, परंतु त्यासाठी विज्ञानाचे लोकशाहीकरण झाले पाहिजे.

– लक्ष्मीकांत देशमुख,
माजी अध्यक्ष – अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

प्रभात PuneCity, 22 Dec 2022, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

# शाळा, महाविद्यालय परिसरांत लवकरच 'सीसीटीव्ही'

## अश्लील चित्रफितींचा मुलांवरील प्रभाव चिंताजनक : फडणवीस

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** शाळा, महाविद्यालयातील किशोरवयीन मुलांमध्ये अश्लील चित्रफीत वा तत्सम चित्रीकरणांच्या प्रभावामुळे विकृत दृष्टिकोन निर्माण होणे व त्यातून लैंगिक अत्याचार अथवा हिंसेच्या घटना घडू नयेत यासाठी परिसरात 'सीसीटीव्ही' लावण्यासह इतरही प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

मुंबईतील माटुंगा येथील महापालिकेच्या शाळेतील तेरा वर्षीय विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत उमा खापरे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले. करोनाकाळात मुलांच्या हाती दिवसभर मोबाइल राहात होते. या काळात अनेक मुले अश्लील चित्रफिती त्यावर पाहात होते. त्याचा परिणाम मुलांच्या मनावर होऊन काही ठिकाणी खुनासारख्या गंभीर घटना घडल्या. यावर सरकारने उपाययोजना करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'माटुंगा येथील घटना चिंताजनक आहे. या घटनेचा तपास सुरू आहे. अशा विकृतींना आळा घालणे अत्यंत गरजेचे आहे. सायबर गुन्ह्यांबाबत संबंधित प्राप्त तक्रारींची तांत्रिक तपासणी करण्यासाठी राज्यामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलांमध्ये अश्लील चित्रीकरणाच्या प्रभावामुळे विकृती वाढतेय. ही चिंताजनक बाब आहे. लैंगिक अत्याचारासंबंधी व्हिडीओ व अन्य मजकूर याबाबतची माहिती मिळाल्यावर समाजमाध्यम व संकेतस्थळावरून हटवण्यासंबंधी त्वरित कारवाई करण्यात येत आहे. तसेच राज्यामध्ये इंटरनेटवरील अशा प्रकारच्या मजकुरावर आणि संकेतस्थळांवरील प्रतिबंध घालण्याचे काम सुरू आहे. राज्यातील सायबर गुन्ह्यांबाबत सायबर इंटेलिजन्स युनिट प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहे. या माध्यमातून सायबर गुन्हेगारीवर वचक ठेवता येईल'.

राज्यातील काही मोठ्या शाळा, महाविद्यालयांमध्ये 'सीसीटीव्ही' बसवण्यात आले आहेत. मात्र, काही साधारण शाळा, महाविद्यालयांमध्ये 'सीसीटीव्ही' बसवण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी टप्प्याटप्प्याने 'सीसीटीव्ही' बसवण्यासंदर्भात सूचना देण्यात येतील.



**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन...** शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासंदर्भात चांगला, वाईट स्पर्श याबाबत मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. शाळा, महाविद्यालय परिसरातील 'कॅफेटेरिया' व अन्य सुविधा यांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण आणि गृह विभागाच्या सचिवांची समिती नेमून एक स्वतंत्र धोरण ठरविण्यात येईल", असे फडणवीस म्हणाले.

लोकसत्ता Thu, 22 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71203457

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# हक्काच्या शिष्यवृत्तीवर कुऱ्हाड

■ शरद जावडेकर

राज्यघटनेतील कलम १५, १६ आणि २९मध्ये अल्पसंख्याकांना समान अधिकार; तसेच कोणत्याही कारणाने भेदभाव होणार नाही, असे आश्वासन दिले आहे. सामाजिक व शैक्षणिक मागास घटकांना पुढे आणण्यासाठी विशेष सवलतीच्या योजना राबविल्या जात आहेत; पण सध्या काही समाजघटकांना वगळण्याचे धोरण अमलात येत असल्याचे दिसते. अल्पसंख्याकांचा व सामाजिक मागासलेल्यांच्या शिष्यवृत्त्या बंद करणे हा त्याचाच भाग म्हणता येईल.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये (एनईपी २०२०) एकीकडे शिक्षणाच्या महत्त्वाची विद्वत्तापूर्ण चर्चा असली, तरी प्रत्यक्षात शिक्षणावरचा खर्च कमी करण्यासाठी सरकार नवे नवे मार्ग शोधताना दिसत आहे! शाळा समायोजन किंवा शिष्यवृत्त्या बंद करण्याचे धोरण ही त्याची उदाहरणे. अल्पसंख्याक समाजातील पहिली ते दहावीतील सर्व विद्यार्थ्यांऐवजी केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय केंद्रीय अल्पसंख्याक खात्याने २९ नोव्हेंबर २०२२ रोजी जाहीर केला. म्हणजेच शिष्यवृत्तींतून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना वगळण्यात आले.

शिक्षण हक्क कायद्यानुसार, पहिली ते आठवी मोफत शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी असल्याने, हे वर्ग शिष्यवृत्ती योजनेतून वगळल्याचे या खात्याने म्हटले आहे. सामाजिक न्याय व आदिवासी कल्याण खात्याने असा निर्णय पूर्वीच घेतला आहे. अल्पसंख्याक विभागाच्या मंत्री स्मृती इराणी यांनी, अल्पसंख्याकांसाठीची 'मौलाना आझाद शिष्यवृत्ती' या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्याची घोषणा लोकसभेत केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची शिष्यवृत्ती आणि आझाद शिष्यवृत्ती यांमध्ये द्विरुक्ती असल्याने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भारतात अल्पसंख्याकांमध्ये मुस्लिम समाजाचे प्रमाण सर्वाधिक (७५ टक्के) आहे. मुस्लिम समाज हा एकूण विकासाच्या संदर्भात अनुसूचित जातींपेक्षा किंचित वर तर हिंदूंमधील इतर मागासवर्गीयांपेक्षा पुष्कळ मागे असल्याचे निरीक्षण नोंदवित सच्चर समितीने मुस्लिम समाजाचे शैक्षणिक मागासलेपण अधोरेखित केले आहे. मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन व पारशी या अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी सन २००६ मध्ये स्वतंत्र अल्पसंख्याक कार्य खाते स्थापण्यात आले. अर्थसंकल्पात त्या खात्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद होते. सन २०१८-१९मध्ये या खात्यासाठी चार हजार ७०० कोटींची तरतूद होती. अर्थसंकल्पातील एकूण खर्चाच्या तुलनेत त्याचे प्रमाण केवळ ०.१९ टक्के होते. खात्याच्या एकूण तरतुदींपैकी दोन हजार ४५३ कोटी शैक्षणिक योजनांसाठी होते; तर मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती आणि आझाद शिष्यवृत्तीसाठी अनुक्रमे ९६० कोटी आणि १५३ कोटी रुपये तरतूद होती. सन २०२१-२२ या वर्षात या खात्याची तरतूद घटवून ती चार हजार ३४६ कोटी करण्यात आली. सन २०२२-२३ या वर्षात तरतूद कमी झाली. आझाद शिष्यवृत्तीची तरतूद २०१८-१९ मधील १५३ कोटींवरून ९९ कोटी रुपये इतकी घटविण्यात आली.



**अल्पसंख्याक घटकांतील विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती आणि मौलाना आझाद शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, यासाठी सरकारकडून देण्यात आलेली कारणे चुकीची आहेत.**

अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी 'पंतप्रधान पंधरा कलमी कार्यक्रम' राबविण्यात येतो. यात मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, एमफिल आणि पीएचडी यांसाठी आझाद शिष्यवृत्ती दिली जाते. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती २००८पासून देण्यात येत आहे. केंद्र सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०१४-१५ ते २०२१-२२ या काळात शिष्यवृत्ती मिळविलेल्या विद्यार्थ्यांची समाजनिहाय संख्या पुढीलप्रमाणे : मुस्लिम ३.३६ कोटी, ख्रिश्चन ५३.१३ लाख, शीख ३५.९० लाख, बौद्ध १२.९८ लाख आणि जैन ४.५० लाख.

अल्पसंख्याक समाजातील मुलांनी शाळा सोडण्याबाबत २०१७-१८मधील 'नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल'च्या अभ्यासानुसार, शालेय शिक्षणातील मुलांच्या गळतीची कारणे आणि त्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे- पालकांची गरिबी ९२ टक्के आणि पालकांची निरक्षरता ७८ टक्के, मुस्लिम मुलींचे लवकर लग्न होणे ३७ टक्के, मुलींसाठी शाळेत स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे ३२ टक्के, स्थलांतरित कामगार २४ टक्के. या पार्श्वभूमीवर मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांच्या प्रोत्साहनाची गरज अधोरिखित होते!

मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचा लाभ अल्पसंख्याक समाजातील गरीब मुलांना होत असल्याचा निष्कर्ष या योजनेच्या मूल्यमापनासाठी करण्यात आलेल्या दोन अभ्यासांनी काढला. 'शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे बहुसंख्य पालक भूमिहीन व बिगारी काम करणारे, दारिद्र्यरेषेखालचे आहेत. या योजनेचा प्रचार पुरेसा झालेला नाही. त्यात प्रशासकीस त्रुटी आहेत; पण या योजनेमुळे अल्पसंख्य समाजाच्या मुलांची शाळेत उपस्थिती, सहयोग व प्रगती वाढली आहे,' असे या अभ्यासांनी मांडले आहे.

आझाद शिष्यवृत्ती योजना २००९पासून सुरू झाली. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना एमफील, पीएचडीसाठी या योजनेतून शिष्यवृत्ती मिळते. या योजनेची परिणामकारकता अतिशय असमाधानकारक असल्याचे 'मार्केटिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट' या संस्थेने पाहणीअंती नमूद केले. २०१९-२०मधील पाहणी अहवालानुसार उच्च शिक्षणात मुस्लिम मुलांची एकूण विद्यार्थ्यांत टक्केवारी ५.५ आहे, तर इतर अल्पसंख्याकांची टक्केवारी अडीच टक्के आहे. १८ ते २३ वयोगटातील मुस्लिम मुला-मुलींचे उच्च शिक्षणातील पटनोंदणीचे प्रमाण (ग्रॉस एन्रोलमेंट रेशो - जीईआर) १६ टक्के आहे. देशातील एकूण प्रमाण २७ टक्के आहे. अनुसूचित जातींमध्ये ते १८ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याकांसाठीच्या प्रोत्साहन योजनांची आवश्यकता अधोरेखित होते. शिष्यवृत्ती बंद करणे म्हणूनच अन्याय्य आहे.

शिक्षण हक्क कायद्याचा हवाला देत सरकारने पहिली ते आठवीची शिष्यवृत्ती बंद केली आहे; पण गेल्या १४ वर्षांत सरकारने ही जबाबदारी किती कार्यक्षमतेने पार पाडली याचा शास्त्रशुद्ध अभ्यास झालेला नाही. पहिली ते आठवीपर्यंत सरकार सर्वांना मोफत शिक्षण देत आहे हे गृहीतकच चूक आहे. २०२१-२२च्या 'यू-डायस'च्या आकडेवारीनुसार पहिली ते आठवीची एकूण पटनोंदणी १८.८५ कोटी आहे. यातील सरकारी शाळेतील पटनोंदणी ११.१० कोटी आहे, तर अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेची पटनोंदणी १.२८ कोटी आणि ५.८९ कोटी आहे. या सर्व शाळांत निरनिराळ्या कारणांनी पालकांकडून पैसे उकळले जातात. कायद्यानुसार २५ टक्के आरक्षणाची शुल्क प्रतिपूर्ती सरकार करत नाही म्हणून पालकांकडून विना अनुदान शिक्षण संस्था शुल्क घेतात.

त्यामुळे, पहिली ते आठवीपर्यंत सरकार मोफत शिक्षण देते हेच मुळात चुकीचे आहे. एका बाजूला सरकारने समाजातल्या आर्थिक कमकुवत घटकांसाठी आरक्षण दिले आहे व त्यांच्यासाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा वार्षिक आठ लाख रुपये आहे. दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्य यांच्यासाठीची शिष्यवृत्ती बंद करत आहे. या शिष्यवृत्त्यांसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा अडीच लाख रुपये आहे. चुकीच्या गृहीतकावर मागासवर्गीय व अल्पसंख्य समाजाच्या मुलांची शिष्यवृत्ती बंद करणे म्हणजे त्यांना ठरवून शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर काढण्याचे कारस्थान आहे; असेच म्हणावे लागेल.

**(लेखक शिक्षण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत.)**

Maharashtra Times 22.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

पुढारी

# दहावीऐवजी आता बारावी बोर्ड होणार

## ४ वर्षे पदवी केल्याने माध्यमिकचा शेवटचा टप्पा ११ वी ठरणार

पुढारी ANCHOR

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरण आता २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून लागू होत असून, पदवी चार वर्षांची केल्यामुळे माध्यमिकचा शेवटचा वर्ग अकरावी ठरणार आहे. त्यामुळे या स्तरावर क्षमता परीक्षा होणार आहे; तर बारावीस्तरावर बोर्ड परीक्षा होणार आहे.

दहावी बोर्ड रद्द करून अकरावी बोर्डाची परीक्षा करण्याची घोषणा सुरुवातीच्या अध्यादेशात होती; मात्र आता ती बदलून बारावी बोर्ड परीक्षा करण्यात येणार आहे. परंतु, पदवीच्या वर्षामध्ये पहिल्या वर्षी प्रमाणपत्र परीक्षा होणार असल्याचेही एका बाजूला जाहीर करण्यात आले आहे; तर दुसऱ्या बाजूला बोर्ड परीक्षा होणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे नेमके काय होणार? हा संभ्रम आहे.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षात लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये पहिला टप्पा पहिली ते पाचवीचा पूर्व प्राथमिकचा टप्पा असणार आहे. पूर्वी तो पहिली ते चौथीचा होता. त्याच्यात एक वर्ष वाढवण्यात आले आहे. त्यानंतरचा टप्पा हा प्राथमिक विभागाचा असणार आहे. यामध्ये ६ वी ते ८ वी या ३ वर्गांचा समावेश आहे. पूर्वी तो ५ वी ते ७ वी असा टप्पा होता. त्यामध्ये माध्यमिककडून ८ वी काढून ती प्राथमिकला जोडण्यात आली



आहे. त्यानंतरचा टप्पा माध्यमिकचा असणार असून, तो ९ वी ते ११ वी असा राहणार आहे. पूर्वी तो ८ वी ते १० वी असा होता आणि १० वीला बोर्डाची परीक्षा होती. आता शेवटच्या वर्षी ११ वी बोर्डाची परीक्षा घेणे अनिवार्य असताना १२ वीस्तरावर बोर्डाची परीक्षा जाहीर करण्यात आल्याने प्राथमिक आणि माध्यमिक विभागात केवळ क्षमता परीक्षा होणार आहेत. याचा फटका माध्यमिक शाळांना बसू शकतो. पूर्वीच्या धोरणात अकरावी-बारावी हा टप्पा उच्च माध्यमिक म्हणून गणला जायचा. या टप्प्यावरील ११ वी आता माध्यमिकला जोडली गेली आहे; तर १२ वी पदवीला जोडली गेली आहे. त्यामुळे उच्च माध्यमिकचा टप्पा जवळपास निकाली निघाला आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शालेय आणि उच्चशिक्षणात मोठ्या प्रमाणावर परिवर्तनात्मक शिक्षणाला वाव देण्यात आला आहे. एकविसाव्या शतकातील हे पहिले पाऊल आहे. १९८६ ला राबविलेले शैक्षणिक धोरण ३४ वर्षे कार्यरत होते. त्यात आता पुढील शैक्षणिक वर्षापासून बदल होणार आहेत. **पान ६ वर**

Pune Edition
Dec 22, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# दहावीऐवजी आता बारावी बोर्ड होणार

**(पान १ वरून...)** या धोरणामध्ये सर्वांना संधी, दर्जात्मक शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार शिक्षण, असे तीन स्तंभ यामध्ये अधोरेखित करण्यात आले आहेत. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कल्पक शिक्षण केंद्रे उभी केली जाणार आहेत. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण अशा दोन्ही पातळींचा अवलंब यामध्ये आहे. भारतात जवळपास २ कोटी मुले शाळाबाह्य आहेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा हा प्रयत्न आहे. ५+३+३+४ असा एकूण १५ वर्षांचा अभ्यासक्रम आहे.

या नव्या शैक्षणिक धोरणात बोर्ड परीक्षा कुठली, हा प्रश्न अनेक दिवस अनुत्तरित आहे. मात्र, नव्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे आता अकरावी बोर्ड करावे लागणार असताना, बारावी बोर्डाची परीक्षा जाहीर झाली आहे. यामध्ये इयत्ता ३ री, इयत्ता ५ वी, इयत्ता ८ वी, इयत्ता ११ वी या स्तरावर क्षमता परीक्षा घेण्यात येतील. शिक्षकांसाठीही राष्ट्रीय व्यावसायिक मानके तयार केली जाणार आहेत.

पदवीच्या चार वर्षांमध्ये पहिल्या वर्षी प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षानंतर प्रगत पदविका, तिसऱ्या वर्षानंतर बॅचलर डिग्री आणि चौथ्या वर्षानंतर बॅचलर विथ रिसर्च अशी प्रमाणपत्रे दिली जातील. वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता उच्चशिक्षणासाठी एकमेव उच्च संस्था असेल. त्याला राष्ट्रीय उच्चशिक्षण नियामक परिषद असे नाव असेल. दर्जा तपासण्यासाठी जनरल एज्युकेशन कौन्सिल स्थापित केली जाईल. अनुदानासाठी उच्चशिक्षण अनुदान परिषद असेल. त्याबरोबरच राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेला पदवी शिक्षणाचा दर्जा तपासता येईल. मानदंड न पाळणाऱ्या शिक्षण संस्थांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

Pune Edition
Dec 22, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

पुढारी

# द्वितीय पदवीसाठी आता तीन वर्षांचे बंधन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात द्वितीय पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांत पदवी पूर्ण करावी लागणार आहे. त्याचबरोबर प्रथम पदवी किंवा प्रथम पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर चार वर्षांत विद्यार्थ्यांनि द्वितीय पदवी, द्वितीय पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेणे अनिवार्य राहील, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने बीएस्सी, बीए, सीएसमधून बीएस्सी, मॅथेमॅटिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स आदी विषयांसाठी संबंधित निर्णय घेतला आहे. विद्यापीठ प्रशासानाने स्पष्ट केलेल्या नियमांनुसार, संलग्रित महाविद्यालय आणि स्वायत्त महाविद्यालय यांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना

**▪ विद्यापीठाचा ठराविक शाखांच्या अभ्यासक्रमांसाठी निर्णय**

द्वितीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देऊ नयेत. द्वितीय पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन पीआरएन नंबर देण्यात येईल. त्याची वैधता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे ३ वर्षे राहील. याचा अर्थ विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासून तीन वर्षांत त्याने द्वितीय पदवीचे शिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील. प्रथम पदवी किंवा प्रथम पदव्युत्तर पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांना संलग्रित महाविद्यालयातून द्वितीय पदवी किंवा द्वितीय पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देता येईल. त्याचप्रमाणे संलग्रित महाविद्यालयातून प्रथम पदवी अथवा प्रथम पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना स्वायत्त संस्था / महाविद्यालय येथे प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. अभ्यासक्रमात काही बदल असल्यास समकक्षता विद्यार्थ्यांना घ्यावी लागेल. या विषयांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावरच करण्यात येणार आहे.

निकाल प्रक्रिया राबविताना प्रथम पदवीच्या किंवा प्रथम पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाव्यतिरिक्त सर्व संपादणूक आणि द्वितीय पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा अंतिम वर्षाची संपादणूक विचारात घेऊन अंतिम निकाल किंवा अंतिम श्रेणी किंवा निश्चित होईल. त्यानुसारच पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र दिले जाईल, असेदेखील प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 22, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# दुहेरी पदवीसाठी तीन वर्षे कालावधी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दुहेरी पदवी (ड्युएल डिग्री) घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, संबंधित पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण तीन वर्षांत पूर्ण करावे लागणार आहे. त्याचबरोबर प्रथम पदवी किंवा प्रथम पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर, जास्तीत जास्त चार वर्षांत विद्यार्थ्याने दुहेरी पदवी किंवा दुहेरी पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेणे अनिवार्य राहील, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या पदवी शिक्षणाच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाविद्यालयांवर देण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने बीएस्सी, बीए, सीएसमधून बीएस्सी, मॅथेमॅटिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स आदी विषयांसाठी हा निर्णय घेतला आहे. संलग्न महाविद्यालय आणि स्वायत्त महाविद्यालय यांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना दुहेरी पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देऊ नये. दुहेरी पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन 'पीआरएन' नंबर देण्यात येईल. त्याची वैधता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमाप्रमाणे तीन वर्षे राहील. याचा अर्थ विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासून तीन वर्षांत त्याने द्वितीय पदवीचे शिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी प्रथम पदवी घेतांना सीबीसीएस पॅटर्न (श्रेयांक पद्धती) नव्हता, अशा विद्यार्थ्यांची द्वितीय पदवी निकाल प्रक्रिया टक्केवारी पद्धतीने जाहीर करावी. निकाल जाहीर करताना द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षाचा एकत्रित गुणांचा विचार केला जातो. त्यामुळे या प्रकारच्या पद्धतीने प्रथम पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची निकाल प्रक्रिया पूर्ण करताना, त्यांचे प्रथम पदवीचे गुण विचारात घेणे क्रमप्राप्त राहील. प्रथम पदवी किंवा प्रथम पदव्युत्तर पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांना संलग्न महाविद्यालयातून दुहेरी पदवी किंवा दुहेरी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देता येईल. त्याचप्रमाणे संलग्न महाविद्यालयातून प्रथम पदवी अथवा प्रथम पदव्युत्तर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना स्वायत्त संस्था / महाविद्यालय येथे प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. अभ्यासक्रमात काही बदल असल्यास समकक्षता विद्यार्थ्यांना घ्यावी लागेल. या विषयांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावरच करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

**गुणांचा एकत्रित विचार**

निकाल प्रक्रिया राबविताना प्रथम पदवीच्या किंवा प्रथम पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाव्यतिरिक्त सर्व गुण आणि दुहेरी पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे गुण विचारात घेऊन अंतिम निकाल किंवा अंतिम श्रेणी निश्चित होईल. त्यानुसारच पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र दिले जाईल, असेदेखील प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times 22.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

**सामना**

# सरकारच्या नकारात्मक शैक्षणिक धोरणाविरुद्ध शिक्षकांचा आक्रोश

### जुनी पेन्शन लागू करा, विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक द्या | विज्युक्टा, शिक्षक महासंघाचे नागपुरात धरणे

प्रचलित शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करून बाजारू शिक्षण व्यवस्थेला प्रोत्साहन देणाऱ्या राज्य सरकारविरोधात विज्युक्टा आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने नागपूर विधिमंडळासमोर जोरदार निदर्शने केली. शिक्षक भरती बंद असल्यामुळे अनुदानित शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक नाहीत, शाळा बंद पाडण्याचे हे षड्यंत्र आहे. शिक्षक व कर्मचारी आपले जीवन शिक्षकी पेशात खर्ची घालतो. त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात पेन्शन हा जीवनाचा आधार असतो. तो हक्कच या सरकारने नाकारला आहे. या विरोधात शिक्षकांमध्ये संतापाची लाट पसरली असून, हक्काची जुनी पेन्शन योजना लागू करा आणि विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक द्या, अशी मागणी आंदोलनकर्त्या शिक्षकांनी केली.

वेतनाशिवाय ज्ञानदानाच्या कार्यातील शिक्षकाला वेठबिगारीची अवस्था आली आहे. सरकारच्या या शिक्षणविषयक नकारात्मक धोरणाविरोधात विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे, महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, सरचिटणीस प्रा. संतोष फाजगे, मार्गदर्शक प्रा. मुकुंद आंधळकर यांच्या नेतृत्वात नागपूर विधिमंडळावर शिक्षकांनी धरणे आंदोलन केले. शिक्षकांच्या आंदोलनाला शिक्षक आमदार विक्रम काळे, सुधीर तांबे, अभिजित वंजारी, किरण सरनाईक, अनिल पाटील, कपिल पाटील, रणजीत पाटील आदींनी भेट देऊन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी सकारात्मक चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिले.

Pune Edition
Dec 23, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

**सामना**

### या आहेत शिक्षकांच्या मागण्या

▪ शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करा. ▪ अनुदान सूत्र प्रचलितप्रमाणे लागू करा. ▪ पटसंख्या निकष शाळा संहितेप्रमाणे करा. ▪ शिक्षण सेवक मानधनवाढीचे आदेश काढा. ▪ अनुदानित शाळेत बदलीची स्थगिती उठवा. ▪ कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्यांना पदोन्नतीची वेतनवाढ देण्यात यावी. ▪ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी पटसंख्येचे निकष शाळा संहितेनुसार असावेत.

Pune Edition
Dec 23, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

**पुढारी**

# पदवी-पदव्युत्तर प्रवेशाची सीयूईटी परीक्षा मे महिन्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**केंद्रीय विद्यापीठे आणि अन्य विद्यापीठांमध्ये पदवी- पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक विद्यापीठीय प्रवेश परीक्षा अर्थात 'सीयूईटी' येत्या मे महिन्यात घेण्यात येणार आहे. त्यासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. रजनीश जैन यांनी सांगितले आहे.**

विद्यापीठांच्या कुलगुरूंना दिलेल्या निर्देशानुसार, 'सीयूईटी' परीक्षा २१ ते ३१ मे दरम्यान घेण्यात येणार आहे. देशपातळीवरील या एकाच परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना संलग्न विद्यापीठांमध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. गेल्या वर्षापासून केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी 'सीयूईटी' ही परीक्षा घेतली जाते. सीयूईटी पीजीच्या वेळापत्रकानुसार जून २०२३ च्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सीयूईटी पीजी परीक्षा होणार आहे. या परीक्षेचे आयोजन एनटीएमार्फत होणार असून, देशात साधारण १ हजार परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेच्या दिवशी साधारण ४५० ते ५०० परीक्षा केंद्रांचा वापर केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी, हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलगू आणि उर्दूचा पर्याय देण्यात आला आहे.

**फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया**

**शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून...**

'सीयूईटी'यूजी परीक्षेचा निकाल जूनच्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर होईल, तर 'सीयूईटी'पीजी परीक्षेचा निकाल जुलैच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होईल. त्यानुसार विद्यापीठांनी पदवी आणि पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया जुलै महिन्यातच पूर्ण करावी. १ ऑगस्ट २०२३ पासून शैक्षणिक वर्ष सुरू करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

My Pune Edition
Dec 23, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# नवे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून

## 'यूजीसी'चे आदेश; एक हजार केंद्रांवर 'सीयूईटी'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** केंद्रीय विद्यापीठातील पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठीच्या केंद्रीय विद्यापीठ प्रवेश परीक्षेचा निकाल जूनच्या तिसऱ्या आठवड्यात, पदव्युत्तर पदवी परीक्षेचा निकाल जुलैच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. देशभरातील विद्यापीठांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रिया जुलैमध्ये पूर्ण करून १ ऑगस्टपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले.

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) होणाऱ्या सीयूईटीच्या पार्श्वभूमीवर यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी परिपत्रकाद्वारे माहिती दिली. केंद्रीय विद्यापीठे आणि अन्य विद्यापीठांमध्ये पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी 'सीयूईटी' येत्या २१ ते ३१ मे या कालावधीत घेण्यात येणार आहे. त्यासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. पदव्युत्तर पदवीसाठी जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशासाठी 'सीयूईटी' होईल. साधारण एक हजार परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहे. एका दिवशी ४५० ते ५०० केंद्रांचा वापर करण्यात येईल.

### अनेक भाषांचा पर्याय...

सीयूईटीसाठी विद्यार्थ्यांना इंग्रजी, हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलगू आणि उर्दू या भाषांचा पर्याय उपलब्ध असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



लोकसत्ता Sat, 24 December 2022 https://epaper.loksatta.com/c/71222085

# पीएच.डी. संशोधन केंद्रांमध्ये नियमांची पायमल्ली

## संशोधन केंद्रांकडे २ कोटी शुल्काची थकबाकी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. संशोधन केंद्रांच्या केलेल्या लेखापरीक्षणातून अनेक संशोधन केंद्रांनी विद्यापीठाचे २ कोटींचे शुल्क थकवल्याचे समोर आले. तसेच काही संशोधन केंद्रांमध्ये नियमांची पायमल्ली करण्यात आल्याचेही स्पष्ट झाले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत पीएच.डी. प्रवेश देणाऱ्या सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नुकतीच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पुणे, नगर, नाशिक आणि सिल्वासा येथील विद्यापीठाने मान्यता दिलेल्या एकूण ९० संशोधन केंद्रांची शैक्षणिक आणि प्रशासकीय तपासणी करण्यात आली. त्यात संशोधन केंद्रांची मान्यता, किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले, किती विद्यार्थ्यांनी पीएच.डी. आणि एम.फिल. पूर्ण केली, किती विद्यार्थ्यांचे संशोधन सुरू आहे, कामकाजातील पारदर्शकता, आवश्यक सोयीसुविधा केंद्रावर उपलब्ध आहेत का, केंद्राने शुल्क भरले आहे का, अशा बाबी तपासण्यात आल्या. पहिल्यांदाच अशा प्रकारे संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्यातून संशोधन केंद्रांनी जवळपास २ कोटींचे शुल्क थकवल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर संशोधन केंद्रांना तातडीने शुल्क भरण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत ऐंशी लाखांहून अधिक रक्कम भरण्यात आल्याची माहिती विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी दिली.

काही संशोधन केंद्रांमध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याचेही दिसून आले. त्यात विद्यापीठाच्या नियमानुसार संशोधन केंद्रापासून पन्नास किलोमीटरमधील मार्गदर्शक असणे अपेक्षित असताना काही केंद्रांमध्ये हा नियम पाळण्यात आला नाही. एका केंद्रावर दहा मार्गदर्शक असणे आवश्यक असताना त्यापेक्षा जास्त मार्गदर्शक असल्याचे आढळून आले. त्याशिवाय विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क घेण्यात आल्याचे प्रकारही निदर्शनास आले. आता संबंधित संशोधन केंद्रांना त्रुटी पूर्तता करण्यासाठी, थकलेले शुल्क भरण्यासाठी १५ जानेवारीची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार संशोधन केंद्रांनी पूर्तता न केल्यास केंद्रांची मान्यता रद्द करणे, संशोधक विद्यार्थी न देण्याची कारवाई करण्यात येणार आहे. ज्या उद्देशाने संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण करण्यात आले, तो हेतू बऱ्याच अंशी साध्य झाल्याचे डॉ. सोनावणे यांनी सांगितले.

### पुढील टप्प्यात गुणवत्तेची तपासणी

संशोधन केंद्रांच्या लेखापरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यात प्राधान्याने प्रशासकीय बाबी तपासण्यात आल्या. आता पुढील टप्प्यात संशोधन केंद्रांद्वारे होणाऱ्या संशोधनाची गुणवत्ता, संशोधनाची देशासाठीची उपयुक्तता, ज्ञाननिर्मितीतील योगदान या निकषांवर तपासणी केली जाणार असल्याचे डॉ. सोनावणे यांनी नमूद केले.

लोकसत्ता Sat, 24 December 2022 https://epaper.loksatta.com/c/71221592

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

**सामना**

# अकॅडमिक क्रेडिट बँकसाठी साडेचार लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

## – डॉ. संजीव सोनवणे

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) – नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केली असून, आतापर्यंत साडेचार लाख विद्यार्थ्यांनी अकॅडमिक क्रेडिट बँकसाठी नोंदणी केली आहे. महाविद्यालयांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून शैक्षणिक धोरण समजून घेत अंमलबजावणी करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी केले.




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवरील नोडल अधिकारी, संशोधक समन्वयक, प्राध्यापक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सोनवणे बोलत होते. यावेळी बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, राहुल पाखरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी उपस्थित होते.

डॉ. सोनवणे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेण्यासाठी आम्ही तुम्हाला सर्व सोयीसुविधा देऊ, मात्र ते समजावून घेत त्याची योग्य अंमलबजावणी करणे हे तुमच्याच हातात आहे. यासाठी कोणतीही अडचण आली तर ती सोडविण्यासाठी विद्यापीठ काम करेल; पण असेही डॉ. सोनवणे यांनी उपस्थितांना सांगितले.

प्रसेनजीत फडणवीस यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. ढोले म्हणाले, विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाबाबत जी समिती नेमली होती, त्या समितीने महाविद्यालयांपर्यंत धोरण पोहोचवणे, प्रशासकीयदृष्ट्या बदल करणे आणि शासनाशी समन्वय साधण्याबाबत अनेक चांगल्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. संजय चाकणे यांनी केले. कार्यशाळेसाठी दोनशे महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

Pune Edition
Dec 24, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

**सकाळ**

## प्र-कुलगुरू डॉ. सोनवणे यांची माहिती : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विद्यापीठात कार्यशाळा

# 'अॅकॅडमिक क्रेडिट बँक'साठी ४.५ लाख नोंदी

पुणे, ता. २३ : नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) प्रभावी अंमलबजावणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या आधीच प्रयत्न सुरू केले आहेत. विशेष म्हणजे आतापर्यंत साडेचार लाख विद्यार्थ्यांनी अॅकॅडमिक क्रेडिट बँकसाठी नोंदणी केली आहे. महाविद्यालयांनीही या कार्यशाळेच्या माध्यमातून शैक्षणिक धोरण समजून घेत अंमलबजावणी करावी, असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवरील नोडल अधिकारी, संशोधक समन्वयक, प्राध्यापक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सोनवणे बोलत होते. या वेळी बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अधिसभेचे नवनिर्वाचीत सदस्य प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे,



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : कार्यशाळेत डॉ. आर. एस. माळी यांचा सत्कार करताना राहुल पाखरे. या वेळी (डावीकडून) पाखरे, डॉ. माळी, डॉ. संजीव सोनवणे, प्रसेनजित फडणवीस, डॉ. संजय ढोले.**

अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते.

डॉ. सोनवणे म्हणाले, "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेण्यासाठी आम्ही तुम्हाला सर्व सोयीसुविधा देऊ, मात्र ते समजावून घेत त्याची योग्य अंमलबजावणी करणे हे तुमच्याच हातात आहे, यासाठी कोणतीही अडचण आली तर ती सोडविण्यासाठी विद्यापीठ काम करेल."

तर फडणवीस म्हणाले, "विद्यापीठाने गुणवत्ता सुधार उपक्रम राबविला असून, त्या अंतर्गत २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासाठी १६३ महाविद्यालयांचे प्रस्ताव आले होते. त्या सर्वांना मान्यता दिली आहे. तसेच नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने १६ विषय दिले होते. अधिसभा, व्यवस्थापन, विद्या परिषद आणि परीक्षा विभाग या सर्वांसोबत सेमिनार घेतले." विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाबाबत जी समिती नेमली होती, त्या समितीने महाविद्यालयांपर्यंत धोरण पोचवणे, प्रशासकीयदृष्ट्या बदल करणे आणि शासनाशी समन्वय साधण्याबाबत अनेक चांगल्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत, अशी माहिती डॉ. ढोले यांनी दिली. डॉ. वैभव जाधव यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी जवळपास दोनशे महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

Pune, Main
24/12/2022 Page No. 2

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# विद्यापीठाची सत्र परीक्षा २७ डिसेंबरपासून

## आता छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन सुविधा उपलब्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सत्र परीक्षा २७ डिसेंबरपासून प्रत्यक्ष पद्धतीने सुरू होणार आहे. आता परीक्षा ऑनलाइन होणार नसल्याने उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठाची सत्र परीक्षा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होते. मात्र करोना काळात बिघडलेल्या वेळापत्रकाचा फटका सत्र परीक्षांना बसला आहे. त्यामुळे आता २७ डिसेंबरपासून या परीक्षा सुरू होत आहेत. या परीक्षांचे वेळापत्रकही टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षेच्या मार्गदर्शक सूचना विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी प्रसिद्ध केल्या.

पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित आणि राहिलेल्या विषयांच्या (बॅकलॉग) परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर अभ्यासक्रम अंतर्गत जाहीर करण्यात आलेले समकक्ष विषय जाणून घ्यावेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा शंभर टक्के अभ्यासक्रमावर आधारित राहतील. संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी एका बेंचवर एकच विद्यार्थी अशी बैठकव्यवस्था करावी, असे आवाहन यांनी केले. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विद्यापीठ परीक्षा आणि स्पर्धात्मक परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळेस येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेतली जाईल. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्याने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास संबंधित विद्यार्थी हा कारवाईस पात्र असेल. मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित महाविद्यालयांनी परीक्षांचे नियोजन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले. ऑनलाइन परीक्षेवेळी उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकनाची सुविधा देण्यात आली नव्हती. मात्र आता प्रत्यक्ष परीक्षा होणार असल्याने ही सुविधा लागू राहील. त्याबाबत विद्यार्थ्यांना संबंधित विभागामार्फत स्वतंत्रपणे कळवण्यात येणार असल्याचेही परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Sun, 25 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71231450

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# शिक्षण धोरणातून भविष्याचा वेध : मोदी

**राजकोट, ता. २४ (पीटीआय) :** देशात आज आयआयटी, आयआयएम आणि एम्ससारख्या शिक्षण संस्थांची संख्या वाढत आहे. २०१४ नंतर वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ६५ टक्क्यांनी वाढली आहे. नव्या शिक्षण धोरणाच्या माध्यमातून देशात प्रथमच भविष्याचा वेध घेणारी शिक्षण व्यवस्था तयार केली जात असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

राजकोट येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल संस्थानच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलत होते. भारताच्या उज्वल भवितव्यासाठी सध्याचे शैक्षणिक धोरण आणि शिक्षण संस्थांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृतकाळात शिक्षण व्यवस्था किंवा शिक्षण धोरण कसेही असो, सरकार त्याचा वेगाने विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. शून्यापासून अनंतापर्यंत आपण प्रत्येक क्षेत्रात संशोधन केले आहे आणि नवनवीन शोध लावले आहेत. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात देशातील शैक्षणिक व्यवस्था आणि धोरण या प्रत्येक गोष्टींवर काम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पंतप्रधानांनी राजकोटच्या गुरुकुलच्या ७५ वर्षांच्या प्रवासाबद्दल शुभेच्छा दिल्या. या संस्थेचे भविष्य आणखी यशस्वी राहील आणि सेवा क्षेत्रात त्याचे योगदान महत्त्वाचे राहील, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. गेल्या सरकारच्या गुलामीच्या मानसिकतेतून आपली महान आणि उच्च शिक्षण व्यवस्थेचा प्रसार होऊ शकला नाही, असेही ते म्हणाले.

**ज्या काळात जगातील अन्य देशांची ओळख राज्य आणि राजघराण्यामुळे होत असे, तेव्हा भारताला गुरुकुलातून ओळखले जायचे. संशोधन आणि शोध हा भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य घटक आहे. नालंदा, तक्षशिला यांसारखी विद्यापीठे प्राचीन गुरुकुल परंपरेची प्रतीके आहेत.**
**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान



Sakaal 25.12.2022

पुढारी

# मुलींचा शिक्षणाचा टक्का वाढवा, सुरक्षिततेचे धडे द्या

## 'यूजीसी'कडून मार्गदर्शक सूचना जारी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये मुलींचा टक्का वाढवा, त्याबरोबरच महिलांच्या सुरक्षित वातावरणासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयी सुविधा तसेच महिला धोरण राबविण्यासाठी आवश्यक यंत्रणा राबवा, असे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

यूजीसीकडून महिलांना उच्च शिक्षण संस्थांमध्ये सुरक्षित वातावरण मिळावे याकरिता मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. या आधी यूजीसीकडून जारी करण्यात आलेल्या सक्षम या महिला धोरणविषयक कार्यक्रम पुस्तिकेचे सर्व शिक्षण संस्थांमध्ये नव्याने वितरण करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याबरोबर महिलांच्या तक्रारी संवेदनशीलपणे हाताळणारे महिला कक्ष (वुमन सेल) असणे आवश्यक आहे, असे यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षण संस्थेमध्ये प्रवेशाच्या वेळी पुरविण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत आयसीसी समिती सदस्य, वैद्यकीय मदत कक्ष, आरोग्य केंद्र, विद्यार्थी समुपदेशक, अँटी रॅगिंग सेल असे संपर्क क्रमांक नमूद करण्यात यावेत. या शिवाय संस्थेमधील वागणुकीसंदर्भातील नियम व अटी माहिती पुस्तिकेत स्पष्ट करण्यात याव्यात, असेही आयोगाने म्हटले आहे.

शिक्षण संस्थेतील भयमुक्त वातावरण हे मुलींना उच्च शिक्षण संस्थांमधील शिक्षणाचा टक्का वाढवण्याबरोबरच महिला शोषण विरोधात, महिला धोरणाविरोधात विविध स्पर्धा, संवाद, वादविवाद, प्रदर्शने याचे आयोजन करावे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केल्याप्रमाणे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी व्यवसायिक धोरण राबविण्यात यावे, असेही संस्थांना आयोगाने आदेश दिले.

Pune Edition
Dec 26, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# प्राध्यापक भरतीमधील आदिवासींचा अनुशेष कायम

### संवर्गनिहाय आरक्षणाचा फटका

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**



**नागपूर :** राज्य सरकारने प्राध्यापक भरतीमध्ये १ एप्रिल २०२२ पासून सहाय्यक प्राध्यापक पदांच्या भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे संपूर्ण महाविद्यालयाला 'एक युनिट' मानून रिक्त पदांना आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षण लावले जात आहे. राज्यात अनेक वर्षांपासून प्राध्यापक भरती बंद आहे. तसेच अनेक आरक्षित प्रवर्गाचा मोठा अनुशेष विषयनिहाय आरक्षणानुसार शिल्लक असताना संवर्गनिहाय आरक्षणाचा घाट घातला जात आहे.

राज्यात ११ एप्रिल २०२२ला शासन निर्णय काढून विषयनिहाय आरक्षण रद्द करून संवर्गनिहाय आरक्षणानुसार प्राध्यापक भरतीचा निर्णय घेतला. केंद्र सरकारने केंद्रीय विद्यापीठे आणि केंद्रीय शिक्षण संस्थामधील सहाय्यक प्राध्यापकांच्या पदभरतीसाठी 'द सेंट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन अॅक्ट २०१९' हा कायदा केला. यानुसार प्राध्यापक पदांच्या भरतीसाठी २०० बिंदूनामावलीचा वापर केला जातो.

> नवीन कायदा लागू करण्यापूर्वी शासनाने डिसेंबर २०२१ पर्यंत रिक्त असलेली प्राध्यापकांची पदे नियमनिहाय आरक्षणानुसार भरावी. संवर्गनिहाय आरक्षणमुळे अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयात विषयनिहाय आरक्षणानुसार शिल्लक असलेला अनुसूचित जमातीचा सहाय्यक प्राध्यापक पदांचा अनुशेष संपुष्टात आला आहे.
>
> **-प्रा. मधुकर उईके,** केंद्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन

अनेक भाजपशासित राज्यात अजूनही विषयनिहाय आरक्षणानुसार प्राध्यापक भरती सुरू आहे. मग महाराष्ट्रातील संवर्गनिहाय आरक्षणाचा अट्टहास का? दिल्ली विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालये आणि इतर अनेक राज्यात विषयनिहाय आरक्षणानुसार प्राध्यापक भरती आजही सुरू आहे. मग महाराष्ट्रातच संवर्गनिहाय आरक्षण का लागू करण्यात आले, असा प्रश्नही आहे. महाविकास आघाडी सरकारने २३ डिसेंबर २०२१ रोजी केंद्र सरकारच्या कायद्याचा अभ्यास करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठित केली होती. या समितीने केवळ ४ दिवसांत अभ्यास केला आणि २८ डिसेंबरला विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये २०२१ला 'महाराष्ट्र शैक्षणिक संस्था विधेयक-२०२१' हे विधेयक मंजूर केले. महाविकास आघाडी सरकारने विशिष्ट समूहाच्या दबावापोटी आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांना खूश करण्यासाठी सदरचे विधेयक पारित केल्याचा आरोप ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशनने केला आहे.

पूर्वी विषयनिहाय आरक्षणनुसार एखाद्या महाविद्यालयात १० विविध विषयांची पदे रिक्त असतील आणि त्यापैकी ४-५ पदे बिंदूनामावलीनुसार अनुसूचित जमातीसाठी राखीव राहायची. आता संवर्गनिहाय आरक्षणानुसार बिंदुनामावली प्रमाणित करताना अनुसूचित जमातीसाठीचे पदच गायब झाले आहे. आता अनुसूचित जमातीला एखादे पद मिळेल किंवा तेही मिळणार नाही. कारण खुला, ओ.बी.सी. आदी प्रवर्गांच्या तुलनेत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आरक्षणाची टक्केवारी कमी आहे. त्यामुळे त्यांचे नुकसान होणार आहे.

लोकसत्ता Mon, 26 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71238500

# 'यूजीसी'ने घेतला पुढाकार

## नव्या शैक्षणिक धोरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे; अहवालही तयार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून शिक्षणपद्धतीमध्ये बदल करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली आहेत. देशातील उच्च शिक्षण संस्थांसाठी ही तत्तेव लागू राहणार असून, सध्याच्या पारंपरिक शिक्षण पद्धतीला छेद देऊन नवी शिक्षणपद्धती कशाप्रकारे विकसित करता येतील, याबाबत 'यूजीसी'कडून सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे.

देशात नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेमध्ये उच्च शिक्षणामध्ये नव्या शैक्षणिक धोरणाच्या पैलूंचा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. या साठी शिक्षणपद्धती बदलण्याची गरज असून, त्यासाठी 'यूजीसी'ने पुढाकार घेतला आहे. संस्थेने मार्गदर्शक तत्त्वांचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला असून, त्यामध्ये विद्यार्थ्यांची शिक्षणपद्धती कशी असावी यावर भाष्य करण्यात आले आहे.



**मार्गदर्शक तत्त्वे काय?**

- विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिकाधिक प्रमाणात दृकश्राव्य व्हायला हवे.
- शिक्षकांनी अधिकाधिक संकल्पना शिल्पकला, चित्रकला, अशा माध्यमातून शिकवाव्यात.
- बंद खोलीमध्ये वर्ग न चालवता शिकवण्यासाठी विषयांशी संबंधित परिसराचा वापर व्हावा.
- आपण शिकवतो ती शिक्षणपद्धती ओळखून त्यामध्ये आवश्यक ते बदल करावेत.
- विद्यार्थ्यांची मातृभाषा, त्याची सामाजिक, आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे अध्यापनात बदल करावेत.

उच्च शिक्षणामध्ये पारंपरिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांची सध्याची शिक्षणपद्धती पुस्तकी ज्ञानावर अवलंबून आहे. त्यामध्ये बदल करण्याची गरज असून, त्यासाठी विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिकाधिक प्रमाणात दृकश्राव्य व्हायला हवे, शिक्षकांनी अधिकाधिक संकल्पना शिल्पकला, चित्रकला, अशा माध्यमातून शिकवाव्यात. बंद खोलीमध्ये वर्ग न चालवता शिकवण्यासाठी विषयांशी संबंधित परिसराचा वापर व्हावा, अशा अनेक गोष्टींचा या अहवालात समावेश करण्यात आला आहे.

'यूजीसी'कडून विविध पद्धतींचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अध्यापन शास्त्राचे वेगवेगळे प्रकार आहेत. प्रत्येक शिक्षक या प्रकारांद्वारे अध्यापन करतो. या प्रकारांमध्ये काय बदल करता येतील आणि शिक्षकांनी कोणते प्रकार आत्मसात करावेत, या संदर्भातही मार्गदर्शन अहवालाद्वारे करण्यात आले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना या पद्धतींचा वापर करणे अपेक्षित असून, तसे होत नसल्यास विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर प्राध्यापक, शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले जावे, याबाबतही 'यूजीसी'कडून सूचना देण्यात आल्या आहेत.

Maharashtra Times 26.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# शैक्षणिक धोरणांतील अडचणी सोडवण्यासाठी सुकाणू समिती

## अध्यक्षपदी डॉ. नितीन करमळकर यांची नियुक्ती; १४ सदस्यांचा समावेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या उपसमित्यांच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडवण्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये १४ सदस्याचा समावेश आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. जून २०२३ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त उपसमितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन येणाऱ्या अडचणींच्या निवारणासाठी उपाययोजना सुचवणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी सुकाणू समिती नियुक्त करण्याचा निर्णय राज्यातील विद्यापीठांच्या संयुक्त बैठकीत (जेबीव्हीसी) घेण्यात आला होता. त्यानुसार विविध विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रम तीन ते चार वर्ष कालावधीचे, पदव्युत्तर अभ्यासक्रम एक ते दोन वर्षे कालावधीचे करणे, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम रचना आणि मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट पर्यायाची अंमलबजावणी, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीचा समावेश करणे, श्रेयांक निश्चितीची अंमलबजावणी, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात विविध कौशल्यांचा समावेश करून प्रत्यक्ष अनुभवासाठीची कार्यपद्धती निश्चित करणे, राज्यातील सर्व विद्यापीठांच्या शैक्षणिक वेळापत्रकात एकसमानता आणण्यासाठीच्या उपाययोजना, श्रेयांक देण्याच्या पद्धतीमध्ये समानता आणण्यासाठीच्या उपाययोजना या संदर्भातील प्रशासकीय अडचणी आणि वित्तीय प्रश्नांबाबत संबंधित घटकांशी चर्चा करून उपाययोजनांची शिफारस समितीकडून करण्यात येईल. या समितीचा कार्यकाळ २०२३-२४च्या अखेरपर्यंत राहील.

समितीसाठी कार्यालय उच्च शिक्षण संचालकांनी तयार करणे आणि आवश्यक मनुष्यबळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या सहमतीने उपलब्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले.

### समितीमध्ये कोण?

डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. व्ही. एस. माहेश्वरी, डॉ. विलास सपकाळ, डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ. आर. डी. कुलकर्णी, डॉ. अजय भामरे, प्रा. अनिल राव, महेश दाबक, श्रीधर जोशी, माधव वेलिंग, व्ही. एन. राजसेखरन पिल्लई, डॉ. प्रशांत मगर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा समावेश आहे.

### शासनाने आर्थिक जबाबदारी झटकली

शैक्षणिक धोरणातील अडचणींची सोडवणूक करण्यासाठी समिती नियुक्त करताना शासनाने आर्थिक जबाबदारी झटकल्याचे दिसून येत आहे. समितीमार्फत विविध विद्यापीठांमध्ये बैठका घेण्यात येतील. संबंधित विद्यापीठांनी बैठकांचे आयोजन करणे, समितीतील सदस्यांचे प्रवासभत्ता, मानधन त्यांच्या विद्यापीठ निधीतून देण्याची कार्यवाही करावी असे नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 28 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71258761

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

{ IMPLEMENTATION OF NEW EDUCATION POLICY }

### SPPU former V-C appointed chairman for Sukanu Committee

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The state government has constituted the 'Sukanu (Steering) Committee' for better implementation of the new education policy (NEP) 2020 in the state from the academic year 2023. Whereas former vice-chancellor (V-C) of the Savitribai Phule Pune University (SPPU), professor Nitin Karmalkar, has been appointed chairman of this 14-member committee and state higher education director, Shailendra Deolankar, has been appointed secretary of the committee.

Apart from Karmalkar and Deolankar, the other members of this committee are: professor Murlidhar Chandekar, former VC, Sant Gadge Baba Amravati University; professor V L Maheshwari, V-C, Kaviyatri Bahinabai Choudhary North Maharashtra University, Jalgaon; professor Vilas Sapkal, V-C, MGM University, Aurangabad; professor Joginder Singh Bisen, pro-V-C, Swami Ramanand Tirth Marathwada University, Nanded; professor R D



Nitin Karmalkar HT FILE PHOTO

Kulkarni, former pro-VC, Mumbai University; professor Ajay Bhamare, pro-V-C, Mumbai University; professor Anil Rao, retired professor; Mahesh Dabhak, businessman, Nashik; professor Prashant Magar, Amravati; retired professor Shridhar Joshi; professor Madhav Welling, pro-V-C, NMIMS Mumbai; and professor V N Rajshekharan Pillai, V-C, Somaiyya (self-financed) University.

A government resolution (GR) was issued in regard of the formation and working of the Steering Committee by the state higher and technical education ministry on December 26, giving details of the committee members and the working of the committee. The GR stated, "The committee will work on various aspects of the NEP implementation which include converting into one or two years the three or four years of the various stream courses, multiple disciplinary syllabus entry and exit in the courses, and also online programme and ODL credit system implementation. Uniform academic calendar for all the universities in the state, credit equivalence, and brand-ing and communication of NEP 2020."

About his appointment as chairman of the committee and its functioning, professor Karmalkar said, "Implementation of the NEP 2020 from the academic year 2023 is a big task and the committee members appointed are very much experienced and have expertise in their own fields. There are various aspects which need working upon on the ground and many new changes will take place during implementation. When the actual implementation starts, we will come across issues and challenges but certainly, it will bring a positive change in our academics."

Hindustan Times 28.12.2022

### शैक्षणिक धोरणासाठी सुकाणू समितीची स्थापना

#### शिफारसींच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडविण्यासाठी निर्णय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या उपसमित्यांच्या अहवालातील शिफारसींच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसाठी उच्च शिक्षण संचालकांनी कार्यालय उपलब्ध करुन द्यावे तसेच आवश्यक मनुष्यबळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही राज्य शासनाने दिले आहेत.

येत्या शैक्षणिक वर्षात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त उपसमितीच्या शिफारसींच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यात आला होता. अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींच्या निवारणासाठी उपाययोजना सुचवणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी सुकाणू समिती नियुक्त करण्याचा निर्णय राज्यातील विद्यापीठांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार ही समिती नेमण्यात आली आहे.

डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीत १४ जणांचा सहभाग आहे. यात डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. व्ही. एस. माहेश्वरी, डॉ. विलास सपकाळ, डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ. आर. डी. कुलकर्णी, डॉ. अजय भामरे, प्रा. अनिल राव, महेश दाबक, श्रीधर जोशी, माधव वेलिंग, व्ही. एन. राजसेखरन पिल्लई, डॉ. प्रशांत मगर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा समावेश आहे.

**समितीची कार्यपद्धत**

पदवी अभ्यासक्रम तीन ते चार वर्ष कालावधीचे करणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम एक ते दोन वर्षे कालावधीचे करणे, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम रचना आणि मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिट पर्यायाची अंमलबजावणी करणे, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीचा समावेश करणे, श्रेयांक निश्चितीची अंमलबजावणी, सर्व विद्यापीठांच्या शैक्षणिक वेळापत्रकात एकसमानता आणण्यासाठीच्या उपाययोजना, श्रेयांक देण्याच्या पद्धतीमध्ये समानता, या संदर्भातील प्रशासकीय अडचणी आणि वित्तीय प्रश्नांबाबत संबंधित घटकांशी चर्चा करून उपाययोजनांची शिफारस समितीकडून करण्यात येईल. या समितीचा कार्यकाळ २०२३-२४ च्या अखेरपर्यंत राहील.



❝ नवीन शैक्षणिक धोरणाची येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी करण्यासाठी तीन टप्प्यांत प्रयत्न राहील. पहिल्या टप्प्यात चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तातडीने सुरू करण्यासाठी प्राधान्य राहील. या धोरणातील अडचणी दूर करून, मार्गदर्शन व उपाययोजना केल्या जातील.

-डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू

प्रभात PuneCity, 29 Dec 2022, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

पुढारी

# शैक्षणिक धोरणातील अडचणींवर समिती

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या उपसमित्यांच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडविण्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये १४ सदस्यांचा समावेश आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर केला आहे.

- डॉ. नितीन करमळकर अध्यक्षपदी नियुक्त

जून २०२३ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त उपसमितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन येणाऱ्या अडचणींच्या निवारणासाठी उपाययोजना सुचविणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी सुकाणू समिती नियुक्त करण्याचा निर्णय राज्यातील विद्यापीठांच्या संयुक्त बैठकीत (जेबीव्हीसी) घेण्यात आला होता. त्यानुसार विविध विद्याशाखांतील पदवी अभ्यासक्रम तीन ते चार वर्षे कालावधीचे, पदव्युत्तर अभ्यासक्रम एक ते दोन वर्षे कालावधीचे करणे, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम रचना आणि मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट पर्यायाची अंमलबजावणी, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात मुक्त आणि दूरस्थ शिक्षणपद्धतीचा समावेश करणे, श्रेयांकनिश्चितीची अंमलबजावणी, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात विविध कौशल्यांचा समावेश करून प्रत्यक्ष अनुभवासाठीची कार्यपद्धती निश्चित करणे, राज्यातील सर्व विद्यापीठांच्या शैक्षणिक वेळापत्रकात एकसमानता आणण्यासाठीच्या उपाययोजना, श्रेयांक देण्याच्या पद्धतीमध्ये समानता आणण्यासाठीच्या उपाययोजना यासंदर्भातील प्रशासकीय अडचणी आणि वित्तीय प्रश्नांबाबत संबंधित घटकांशी चर्चा करून उपाययोजनांची शिफारस समितीकडून करण्यात येईल. या समितीचा कार्यकाळ २०२३-२४च्या अखेरपर्यंत राहील. समितीसाठी कार्यालय उच्च शिक्षण संचालकांनी तयार करणे आणि आवश्यक मनुष्यबळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या सहमतीने उपलब्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले.

डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीत डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. व्ही. एस. माहेश्वरी, डॉ. विलास सपकाळ, डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ. आर. डी. कुलकर्णी, डॉ. अजय भामरे, प्रा. अनिल राव, महेश दाबक, श्रीधर जोशी, माधव वेलिंग, व्ही. एन. राजशेखरन पिल्लई, डॉ. प्रशांत मगर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा समावेश आहे.

My Pune Edition
Dec 29, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# कुलगुरूंसाठी आज कार्यशाळा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना देशात कुठेही जाऊन शिक्षण घेता यावे तसेच यापूर्वी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या क्रेडिटचा त्या शिक्षणात फायदा व्हावा, यासाठी अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट स्थापन करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकल्पाची माहिती देण्यासाठी गुरुवारी सकाळी दहा वाजता विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेश कुमार एका वेबिनारद्वारे देशातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना मार्गदर्शन करणार आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षण पद्धतीमध्ये अनेक बदल करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना एकाच वेळेला दोन पदवी घेण्याची संधी मिळणार आहे, याशिवाय एकाच पदवी शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना इतर विद्याशाखेतील काही विषयही शिकता येतील. याशिवाय एकाच वेळी विविध महाविद्यालयांमधून काही कोर्सेस




शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच एका विद्यापीठातून शिकतानाच संबंधित विद्यार्थी आपल्या घरापासून दूर असलेल्या एका दुसऱ्या विद्यापीठ किंवा महाविद्यालयातही दुसरी पदवी घेऊ शकतो. या सर्व सुविधांचा वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रेडिटचे नियोजन करावे लागणार आहे. हे नियोजन विद्यार्थी आणि महाविद्यालयांना एकाच जागी मिळावे, याद्दष्टीने क्रेडिट बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याद्वारे देशभरातील सर्व विद्यार्थ्यांना मिळालेले क्रेडिट ते एकप्रकारे बँकेमध्ये सुरक्षित ठेवू शकणार आहेत. त्यासाठी क्रेडिट बँक नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार असून, राज्यातील सर्व

My Pune Edition
Dec 29, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education

# विद्यापीठात पर्यावरण अभ्यासक्रम

### विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाचे धडे

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ -** पर्यावरण संवर्धनासोबतच पर्यावरणातील बदलांचा अभ्यास करण्याची संधी आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यापीठाने सिंगापूर येथील 'ब्ल्यू प्लॅनेट स्किल प्रायव्हेट लिमिटेड' सोबत सामंजस्य करार केला असून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाचे धडे देण्यात येणार आहेत.



विद्यापीठाचे मानसशास्त्र विभाग व 'ब्ल्यू प्लॅनेट स्किल प्रायव्हेट लिमिटेड' यांच्यात हा सामंजस्य करार मंगळवारी कुलगुरू कार्यालयात झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र म्हस्के, डॉ. जुही देशमुख, ब्लू प्लॅनेटचे मुख्य कार्यकारी संचालक हर्ष मेहरोत्रा, कौशल्य विभागाचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गौर आदी मान्यवर उपस्थित होते.

याबाबत डॉ. म्हस्के म्हणाले, या कराराच्या माध्यमातून विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाश्वत विकास, फेरवापर, हरित वाहतूक, हरित ऊर्जा, आरोग्य, जल संवर्धन, आरोग्य आणि सुरक्षा, आहारशास्त्र आदी विषयातील शिक्षण घेता येणार आहे. हे अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रेयांक देखील मिळणार आहे.

प्रभात PuneCity, 29 Dec 2022, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

## अधिसभेत कुलगुरूंची घोषणा : परीक्षेसंबंधी तक्रार निवारणासाठी समिती

# विद्यार्थ्यांसाठी एक खिडकी योजना

**पुणे, ता. २८ :** परीक्षा विभागाशी निगडित अनेक अडचणींसाठी विद्यार्थ्यांना थेट विद्यापीठच गाठावे लागते. महाविद्यालय स्तरावर मदत न मिळाल्याने त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांना येथेही तशीच वागणूक मिळते. विद्यार्थ्यांच्या अशा तक्रारींच्या निवारणासाठी विद्यापीठात एक खिडकी योजना असावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी बुधवारी बैठकीत केली. कुलगुरूंनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेत, एक खिडकी योजना आणि फाइल ट्रेकिंग सिस्टिम राबविणार असल्याचे स्पष्ट केले.

विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाच्या आर्थिक लेख्यांना अधिसभेची मान्यता आवश्यकता असते. मात्र, अद्याप अधिसभा पूर्ण क्षमतेने अस्तित्वात आलेली नसताना केवळ प्रशासकीय औपचारिकता पूर्ण करण्यासाठी विद्यापीठातर्फे अधिसभा घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह नवनिर्वाचित अधिसभा सदस्य या अधिसभेला उपस्थित होते. बैठकीत आर्थिक लेख्यांसह परीक्षांबाबत चर्चा करण्यात आली. परीक्षा विभागातील अडचणींसंदर्भात राहुल पाखरे, सचिन गोर्डे पाटील यांनी आयत्यावेळीचा विषय मांडला. यावर बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, डॉ. अपूर्व हिरे आदींनी परीक्षा विभागाच्या कारभाराबाबत उपस्थित केला. त्यामुळे प्र-कुलगुरू डॉ. सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली अल्प आणि दीर्घ मुदतीच्या प्रश्नांवर उपाय सुचविण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यात तातडीने करायच्या उपाययोजनांबाबत दहा दिवसांत, तर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दीर्घकालीन उपाय करण्यासाठीचा अहवाल महिन्याभरात सादर करण्यात येईल.

> **कागदपत्रांसंबंधीच्या तक्रारी टाळण्यासाठी विद्यापीठात फाइल मेकिंग, ट्रेकिंग आणि ॲक्सेस कंट्रोल सिस्टिम लवकरच उभारण्यात येईल. आम्ही ऑनलाइन डॉक्युमेंट सिस्टिम विकसित करत असून, त्याला संलग्न महाविद्यालये आणि संस्थांना लिंक करण्यात येईल.**
> 
> - **प्रा. कारभारी काळे,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### विद्यापीठात 'जी-२०'

विद्यापीठात जी-२० परिषदेशी संबंधित अर्थविषयक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. युवा-२० या कार्यक्रमासाठी विद्यापीठाची निवड झाली असून, केंद्रीय समित्यांनी या संबंधीची पाहणी पूर्ण केल्याची माहिती कुलगुरू डॉ. काळे यांनी दिली. अर्थविषयक समितीच्या महत्त्वपूर्ण बैठक विद्यापीठात होणार आहे. त्याचा समन्वय आणि नियंत्रणाची जबाबदारी विद्यापीठावर सोपवली आहे. हवामान बदलाची मध्यवर्ती कल्पना विद्यापीठाने स्वीकारल्याचे कुलगुरूंनी स्पष्ट केले. जी-२० परिषद समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात येणार असल्याचेही कुलगुरूंनी सांगितले. जी-२०चा फायदा विद्यार्थी, स्टार्टअप सुरू करणाऱ्या नवउद्योजकांना, संशोधकांना व्हावा. तसेच, विश्वातील महत्त्वाच्या देशांमध्ये असलेल्या करिअरच्या संधी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कळाव्या यासाठी प्रचार, प्रसार कार्यक्रम करणारी 'उपक्रम समिती' आणि विद्यापीठ स्तरावर 'जी-२०' कार्यक्रमांच्या आयोजनासाठी एक समिती स्थापन करण्याची सूचना अधिसभा सदस्य सागर वैद्य यांनी केली.

> **निश्चितच परीक्षा विभागातील कामकाजात सुधारणा आवश्यक आहे. त्याचबरोबर महाविद्यालयांकडूनही अनेकदा अंतर्गत गुण भरले जात नाही, त्यामुळे निकालात अडथळा निर्माण होतो. महाविद्यालये विनाकारण विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठवत असतात, त्यांनीही शिस्त पाळणे गरजेचे आहे.**
> 
> - **डॉ. संजीव सोनावणे,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
29/12/2022 Page No. 3

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# Single-window sys to address exam-related issues at SPPU

TIMES NEWS NETWORK

**Pune:** A single-window system to address the grievances related to the exam department will be set up by the Savitribai Phule Pune University (SPPU), vice-chancellor Karbhari Kale announced during the senate meeting on Wednesday.

The announcement was made after senate members highlighted difficulties faced by students who did not receive help from colleges.

According to the University Act, the financial accounts of the university require the approval of the senate. However, as the senate is still not in existence in full capacity, the meeting was held by SPPU to complete the administrative formalities.

Senate members Rahul Pakhre and Sachin Gorde Patil highlighted the issues regarding the difficulties in the exam department. After hearing the problems, a decision was made to appoint a panel under the chairmanship of pro-vice-chancellor Sanjeev Sonawane. The committee will suggest short- and long-term solutions after a thorough investigation.

"The committee will submit two reports. The first will contain immediate measures to be taken by the department. The second report will include long-term measures, and will be submitted after a month. The main objective of this committee is to ensure smooth conduct of examinations," Sonawane said.

"The report regarding immediate measures will be submitted in ten days, while the report for long-term measures with the help of technology will be submitted within a month," Kale said.

## CONSTANT GRIEVANCES

- Senate members highlighted issues faced by the students regarding the difficulties in the examination department
- The university administration decided to appoint a committee under the chairmanship of pro-vice-chancellor Sanjeev Sonawane
- The panel will investigate and find short- and long-term solutions
- A report regarding the immediate measures will be submitted within ten days
- A report for long-term measures will be submitted within a month

## Varsity to host G20 meetings

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will host a few meetings of the crucial G20 summit, vice-chancellor Karbhari Kale informed during the senate meeting on Wednesday. All the newly elected senate members, along with pro-vice-chancellor Sanjiv Sonwane and registrar Prafull Pawar, were present during the meeting.

Kale said, "Many meetings of the G20 council will be held across India. A few of the meetings are planned at the university. For this, a special lecture on G20 will be organized in January for 8 lakh students affiliated with the university."

Kale also said meetings were underway with the central committee organizers for the past few days. TNN

The Times of India 29.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*



# 'पात्रता प्रमाणपत्रामुळे परीक्षेत अडथळा नाही'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणांमुळे पात्रता प्रमाणपत्र मिळण्यासाठी उशीर झाला आहे, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यात अडचण येणार नाही,' असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

'पात्रता प्रमाणपत्र उशिरा मिळालेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयांमध्ये संपर्क करावा. त्यांच्या महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांची यादी पाठविल्यानंतर या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्जांची लिंक पुन्हा सुरू केली जाईल,' असे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

करोनामुळे काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा उशिरा घेण्यात आल्या. त्यामुळे निकालही उशिरा जाहीर झाले आहेत. पुढच्या शैक्षणिक वर्षांसाठी लागणारे पात्रता प्रमाणपत्र निकालाशिवाय उपलब्ध होऊ शकत नाही. विद्यापीठाने हे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढही दिली होती; परंतु त्याच काळात विद्यापीठाकडून परीक्षांचे अर्ज भरण्याची मुदत संपविण्यात आली. त्यामुळे पात्रता प्रमाणपत्र उशिरा मिळालेल्या अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता आले नाहीत.

**"पात्रता प्रमाणपत्र उशिरा मिळालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाद्वारे आमच्याशी संपर्क करावा. त्यांना अर्ज भरण्याची संधी दिली जाईल. पात्रता प्रमाणपत्र उशिरा मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठीच केवळ ही सुविधा असेल.**

**- प्रा. डॉ. संजीव सोनावणे,** प्र-कुलगुरू

**पात्रता प्रमाणपत्र नाही; म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षा देण्यापासून अडविण्यात येणार नाही. काही विद्यार्थी राहिले असल्यास त्यांनी तातडीने महाविद्यालयात संपर्क साधावा. महाविद्यालयांकडून मिळालेल्या नावांनुसार अर्ज भरण्याची संधी दिली जाईल.**

**- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Maharashtra Times 29.12.2022

## News Paper Clippings During December 2022

### Section: Education

लोकमत

# नेट म्हणजे पैसे उकळण्याचे साधन !

## यूजीसीने दहा वर्षांत कमविले १०० कोटींहून अधिक रुपये, नोकरी मात्र दिली नाहीच

डॉ. प्रकाश मुंज
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उच्चशिक्षणावर नियंत्रण ठेवण्याचे काम विद्यापीठ अनुदान आयोग करते. मात्र, याच आयोगाने 'नेट' परीक्षेच्या माध्यमातून तब्बल सव्वा कोटी बेरोजगारांकडून परीक्षा फीच्या नावावर गत दहा वर्षांत सुमारे १०० कोटी रुपये उकळले आहेत. या बेरोजगारांना नोकरी देण्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे.

**शिक्षणाचा बोजवारा**
भाग - २

प्राध्यापक पदासाठी सुरुवातीला पदव्युत्तर पदवी परीक्षेत ५५ टक्के गुणांची अट घालण्यात आली होती. १९८६-८७ मध्ये त्यात एम.फिल. होण्याची अट वाढविली. १९९०च्या दशकात सेट आणि नेट उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. २००९ मध्ये नवा जीआर काढून पीएच.डी. पदवी सेट/नेटसाठी समतुल्य ठरविण्यात आली.

त्यानंतर सातत्याने अनेकवेळा त्यामध्ये बदल करण्यात आले. मात्र, हे सारं काही करताना शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढावा, प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली कौशल्ये त्यांच्यामध्ये अंगीकारावीत, यांचा संबंधितांपैकी कुणीच गांभीर्याने विचार केलेला दिसत नाही.




### 'नेट' निकालाची टक्केवारी का वाढविली?

सहायक प्राध्यापक होण्यासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) लागू करण्यात आली. १९८८ ते २००४ या काळात या परीक्षांचा निकाल ०.२ ते २ टक्के होता. नंतर हा निकाल ३-४ टक्क्यांपर्यंत ठेवला जात होता. २००७ नंतर परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांच्या सहा टक्के पात्र ठरविले. यूजीसीचा हा निर्णय हुशारीचा असला तरी तो शहाणपणाचा नक्कीच नाही. या निर्णयामुळे १० लाखांहून अधिक नेट/सेट आणि पीएच.डी.धारक बेरोजगार झाले आहेत. भरती बंद असल्यामुळे वाढत्या बेरोजगारांपुढे जगण्याचा प्रश्न आ वासून उभा आहे. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पाहता ही गुणवत्ता ढासळल्याचेच लक्षण आहे. बेरोजगारी वाढल्याने आतापेक्षाही कमी वेतनावर काम करण्यास हे तरुण सहज तयार होत आहेत. त्यामुळे विनाअनुदानितसह अनुदानित महाविद्यालयांमध्येही आर्थिक शोषणाला हातभारच लागत आहे.

### बेरोजगारांकडून पैशाची वसुली

- नेट परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांकडून १००० रुपये, इडब्लूएस वर्गासाठी ५०० आणि एस.सी., एस.टी., ओबीसी वर्गासाठी २५० रुपये परीक्षा फी आकारली जाते. चौकटीतील आकडेवारी पाहिली असता गेल्या दहा वर्षांत सव्वा कोटी परीक्षार्थींनी अर्ज भरले होते.
- सरासरी ७०० रुपयांप्रमाणे आत्तापर्यंत १० वर्षांत सव्वा कोटी विद्यार्थ्यांकडून सुमारे १०० कोटींहून अधिक रुपये विद्यापीठ अनुदान आयोगाने उकळले आहेत.
- नेट परीक्षा म्हणजे यूजीसीसाठी आता पैसा वसुलीचे उत्तम साधन बनले आहे. देशात दहा वर्षांत सहायक प्राध्यापक पदाच्या सुमारे दीड लाख जागा रिक्त आहेत.
- महाराष्ट्रात अंदाजे १२ हजार पदे रिक्त असूनही भरती मात्र ऐनकेनप्रकारे प्रलंबित ठेवली जात आहे. तासिका तत्वावर भरती करुन अध्यापनाचे काम निभावले जात आहे.

उद्याच्या अंकात : **सी.एच.बी. प्राध्यापकांची क्रूर चेष्टाच?**

### नेट

| वर्ष | परीक्षार्थी (लाखात) | उत्तीर्ण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०२० | ८.६० | ४७१५७ | ५.४८ |
| २०१९ | ११.७७ | १२०१४० | ६.११ |
| २०१८ | १५.४१ | १००७११ | ६.५३ |
| २०१७ | १४.१० | ६८११८ | ५.२२ |
| २०१६ | ५.५७ | २१८०५ | ५.१२ |
| २०१५ | १०.८४ | १०८५१३ | ४.४८ |
| २०१४ | ११.५१ | ६५१६० | ५.६८ |
| २०१३ | १२.६२ | ५६०४१ | ५.०५ |
| २०१२ | ११.८ | १०१५५७ | ८.१८ |
| २०११ | ४.४८ | २६७५५ | ३.४१ |
| एकूण | ११५.५८ | ७,१६,५६५ | ५.६ |

### सेट

| वर्ष | परीक्षार्थी | उत्तीर्ण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१९ | ७९८७९ | ५४१५ | ६.७८ |
| २०१८ | ६२४०४ | ४०६७ | ६.५५ |
| २०१७ | ६९१८६ | ३२३१ | ४.६७ |
| २०१६ | ७०१०१ | ३५९२ | ५.१२ |
| २०१५ | ६७७५४ | ३७१८ | ५.४८ |
| २०१३ | ६९६४१ | २८१० | ४.०३ |
| एकूण | ४१८९६५ | २२८३३ | ५.४३ |

**पगार भारी; भरती टाळी!**
प्राध्यापकांचे पगार खूप आहेत. म्हणून सरकार ही पदभरती टाळत असल्याचा आरोप आहे.

Kolhapur Main
Page No. 7 Mar 24, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

पुढारी

# पीएच.डी. मुलाखतींसाठी ३० जानेवारीची डेडलाइन

### विद्यापीठ प्रशासनाचे संलग्न संशोधन केंद्रांना निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पीएच.डी. प्रवेश देणाऱ्या सर्व संशोधन केंद्रांची शैक्षणिक आणि प्रशासकीय तपासणी विद्यापीठाकडून पूर्ण करण्यात आली आहे. तसेच पात्र संशोधन केंद्रांना संशोधक विद्यार्थ्यांच्या मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० जानेवारीची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाच्या सहायक कुलसचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार, सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांना कळविण्यात येते की, संशोधन संस्थांच्या शैक्षणिक व प्रशासकीय तपासणी करण्यात आली असून त्यात आढळलेल्या त्रुटींची पुढील ३० दिवसात पूर्तता करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या मान्यतापात्र संस्थांनी त्रुटींच्या पूर्तता केलेल्या असून तसा अहवाल विद्यापीठात जमा केलेला आहे, अशा संशोधन संस्थांना पीएच.डी. प्रवेश मुलाखत प्रक्रियेसाठी विभागीय संशोधन समिती देण्याची कार्यवाही सुरू आहे. सर्व संलग्नित संशोधन केंद्र यांना विभागीय संशोधन समिती विद्यापीठाकडून मिळाल्यानंतर सर्व संशोधन केंद्रांनी दि. ३० जानेवारी २०२३ पर्यंत पीएच.डी. प्रवेश मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून त्याचा अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह शैक्षणिक प्रवेश विभागात जमा करावेत, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार असून त्यांची मुलाखतीची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणार असल्याचे दिसून येत आहे.

Pune Edition
Dec 30, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# 'क्रेडिट बँके'ला प्रतिसाद

### कॉलेजांतून ४.५ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून तयार करण्यात येणाऱ्या 'अॅकॅडमिक क्रेडिट बँके'साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील ४.५ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. अल्पावधीतच या सुविधेला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह 'अॅकॅडमिक क्रेडिट बँकें'च्या नोंदणीसाठी विद्यापीठाकडून एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे संचालन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी केले. माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांनीही महाविद्यालये, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, राहुल पाखरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

उपस्थितांनी विद्यार्थ्यांना 'क्रेडिट बँकें'चे महत्त्व समजावून सांगितले. या शिवाय शैक्षणिक धोरणाच्या इतरही अनेक पैलूंवर या वेळी प्रकाश टाकण्यात आला. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेण्यासाठी आम्ही तुम्हाला सर्व सोयी सुविधा देऊ, मात्र ते समजून घेऊन त्याची योग्य अंमलबजावणी करणे, हे तुमच्याच हातात आहे. यासाठी कोणतीही अडचण आली तर ती सोडविण्यासाठी विद्यापीठ काम करील,' असे डॉ. सोनवणे यांनी उपस्थितांना सांगितले.

डॉ. ढोले म्हणाले, 'विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाबाबत जी समिती नेमली होती, त्या समितीने महाविद्यालयांपर्यंत धोरण पोहोचवणे, प्रशाकीयदृष्ट्या बदल करणे आणि सरकारशी समन्वय साधण्याबाबत अनेक चांगल्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.' या कार्यशाळेचे सूत्रसंचलन डॉ. संजय चाकणे यांनी केले. या कार्यशाळेसाठी अंदाजे दोनशे महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

#### महाविद्यालयातही कार्यशाळांचे आयोजन



येत्या काही दिवसांमध्ये 'क्रेडिट बँकें'सह शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्येही कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. या कार्यशाळांद्वारे धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी उपयुक्त उपक्रमांची माहिती देण्यात येणार असून, महाविद्यालयांनी त्यांच्या शिक्षण पद्धतीत बदल कसे करावेत, याबाबतही मार्गदर्शन केले जाईल, असे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times 30.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Education



# संशोधन केंद्रांत अनियमितता

## बहुतांश ठिकाणे 'कमाई'ची केंद्रे; संशोधनावरही होतोय गंभीर परिणाम

मटा विशेष

Aditya.Tanawade
@timesgroup.com
Tweet : @AdityaTanawade

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये चाललेली बहुतांश संशोधन केंद्रे संशोधनासाठी नसून, कमाईसाठी आहेत का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने नुकत्याच केलेल्या संशोधन केंद्रांच्या तपासणीमध्ये या केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता सुरू असून, संशोधन केंद्रांची मनमानी सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे संशोधनावरही त्याचा गंभीर परिणाम होत असून, खऱ्या अर्थाने संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**संशोधन केंद्रांचा तपशील**

| जिल्हा | संशोधन केंद्रांची संख्या |
|---|---|
| पुणे शहर | १२३ |
| पुणे जिल्हा | २८ |
| नगर | ३५ |
| नाशिक | २९ |
| एकूण | २१५ |

**"विद्यापीठाअंतर्गत होणाऱ्या संशोधनाच्या दर्जामध्ये वाढ व्हावी, यासाठी संशोधन केंद्रांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत अनेक मुद्दे उघडकीस आले असून, बहुतांश ठिकाणी अनियमितता सुरू असल्याचे दिसून आले आहे. महिन्याच्या आत सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

\- प्रा. डॉ. संजीव सोनावणे, प्र-कुलगुरू

### आप्तेष्टांना 'पीएचडी'चा घाट ?

काही संशोधन केंद्रांमध्ये असलेली विद्यार्थी संख्या ही गरजेपेक्षा अधिक आहे. तिथे मार्गदर्शकांची संख्या नसतानाही ही संख्या वाढवण्यात आली आहे. अशा परिस्थितीमध्ये संस्थाचालकांनी आपल्या आप्तेष्टांना 'पीएचडी' मिळवून देण्याचा घाट घातला आहे का, असाही प्रश्न काही विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे.

**नियम धाब्यावर**

पुणे, नगर, नाशिक अशा तीन जिल्ह्यांमध्ये मिळून एकूण १९० संशोधन केंद्रे विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठाच्या नियमांप्रमाणे या केंद्रांमध्ये कारभार होणे अपेक्षित आहे. असे असतानाही बहुतांश केंद्रांनी विद्यापीठाने घालून दिलेले सर्व नियम धाब्यावर बसवल्याचे तपासणीतून उघडकीस आले आहे. अतिरिक्त पैसे आकारणे, गरजेपेक्षा अधिक सहयोगी मार्गदर्शकांचा भरणा करणे, अपेक्षित संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पीएचडी प्रवेश देणे आणि विद्यापीठाला वर्षानुवर्षे विद्यापीठाचा हिस्सा आणि नोंदणी रक्कम न देणे, असे प्रकार केंद्रांमध्ये सुरू आहेत.

**निवृत्तांकडून मार्गदर्शन**

काही केंद्रांमध्ये अजूनही निवृत्त झालेल्या मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. संशोधन केंद्राची मान्यता सुरू ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क घेऊन कमाई करण्यासाठी हे सगळे प्रकार सुरू असल्याचे दिसून आले आहे. हे सर्व गैरप्रकार थांबवण्यासाठी विद्यापीठाने संशोधन केंद्रांना एका महिन्याची मुदत दिली आहे.

**...अन्यथा मान्यता रद्द करणार**

एका महिन्याच्या आत संशोधन केंद्रांनी सुधारणा केल्या नाहीत, तर त्यांना या वर्षीचे 'पीएचडी'चे प्रवेश देण्यास मनाई केली जाणार आहे; तसेच अशा काही संशोधन केंद्रांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

**तपासणीतून आढळलेले मुद्दे**

- गेल्या पाच ते सहा वर्षांपासून केंद्रांनी विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठाचा हिस्सा अद्याप दिलेला नाही.
- विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्कही वर्षानुवर्षे विद्यापीठाला दिलेले नाही.
- विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात येत आहे.
- अनेक केंद्रांमध्ये मार्गदर्शक निवृत्त झाल्यानंतरही मार्गदर्शन केले जात असल्याचे आढळून आले आहे.

Maharashtra Times 30.12.2022

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

# यूजीसीच्या अनुदानासाठी आता नॅक मूल्यांकन बंधनकारक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उच्च शिक्षण संस्थांना राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) मूल्यांकन करून घेणे बंधनकारक असूनही अनेक उच्च शिक्षण संस्थांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. मात्र आता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) मिळणाऱ्या अनुदानासाठी महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन बंधनकारक करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यूजीसीने घेतला आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून विविध निकषांवर उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करण्यात येते. मूल्यांकनानंतर मिळणारी श्रेणी हा गुणवत्तेचा महत्त्वपूर्ण निकष मानला जातो. मात्र अनेक उच्च शिक्षण संस्थांनी नॅक मूल्यांकनाकडे पाठ फिरवली आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीच्या ५५९ व्या बैठकीत नॅक मूल्यांकन अनुदानासाठी बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नॅक मूल्यांकनाकडे दुर्लक्ष केलेल्या उच्च शिक्षण संस्थांना अनुदान मिळवण्यासाठी तरी नॅक मूल्यांकन करून घ्यावे लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे. यूजीसीच्या बैठकीत उच्च शिक्षण संस्थांना यूजीसी कायदा १९५६ च्या कलम १२ब नुसार पात्र ठरण्यासाठी नॅक मूल्यांकन बंधनकारक करण्याचा ठराव मांडण्यात आला होता. हा तो संमत करण्यात आला.

> **नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता सर्वच उच्च शिक्षण संस्थांनी नॅक मूल्यांकन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार आता सरकारकडूनही अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्या दृष्टीने यूजीसीने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन महत्त्वाचे आहे. ज्या उच्च शिक्षण संस्थांनी अद्याप मूल्यांकन करून घेतलेले नाही, त्यांनी आता मूल्यांकन करून घेतले पाहिजे.**
> **- डॉ. भूषण पटवर्धन,** अध्यक्ष, नॅक कार्यकारी समिती

> **सातत्याने नॅक मूल्यांकन करून शैक्षणिक आणि प्रशासकीय गुणवत्ता टिकवणे आणि वाढवणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. या निर्णयाचा सातत्याने गुणवत्तापूर्ण काम करत राहण्यासाठी उपयोग होईल. अनुदान मिळवण्यासाठी नॅक मूल्यांकन करून घेण्याच्या यूजीसीच्या नियमाकडे उच्च शिक्षण संस्थांनी गुणवत्ता सिद्ध करण्यासाठीची संधी म्हणून पाहायला हवे. - डॉ. संजीव सोनावणे,** प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sat, 31 December 2022 https://epaper.loksatta.com/c/

# संलग्नित महाविद्यालयांना विद्यापीठाची मदत

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना व संलग्नित महाविद्यालयांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या 'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत विद्यापीठातील विभागांना आर्थिक मदत करणार आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना करण्यात आले आहे.

यासंदर्भात विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागातर्फे विद्यापीठाच्या सर्व विभागांना या उपक्रमासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरून मोठ्या प्रमाणावर काम केले जात असून विद्यापीठाकडून देखील यासाठी पुढाकार घेत प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत निधी उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे. आतापर्यंत अनेक महाविद्यालयांना हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरम्यान, यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १२ जानेवारी असल्याचे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

प्रभात PuneCity, 31 Dec 2022, Pag https://epaper.dainikprabhat

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

सामना

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाचा हात

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना मदतीचा हात देऊ केला असून, विद्यापीठाच्या 'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत विद्यापीठाने विभागांना आर्थिक मदत देऊ केली आहे. यासाठी अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना करण्यात आले आहे.

### गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्ज करण्याचे आवाहन

विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागातर्फे या संदर्भात विद्यापीठाच्या सर्व विभागांना उपक्रमासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनस्तरावरून मोठ्या प्रमाणावर काम केले जात असून, विद्यापीठाकडूनदेखील यासाठी पुढाकार घेत प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत निधी उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे. आत्तापर्यंत अनेक महाविद्यालयांना हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरम्यान, यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १२ जानेवारी असल्याचे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Edition
Dec 31, 2022 Page No. 10
Powered by : eReleGo.com

# बारावी, दहावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर



## २१ फेब्रुवारीला सुरुवात; सविस्तर माहिती शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) बारावी आणि दहावीच्या लेखी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत बारावीची, तर २ ते २५ मार्च या कालावधीत दहावीची परीक्षा होणार आहे.

राज्य मंडळाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. पुणे, नाशिक, लातूर, मुंबई, नागपूर, कोल्हापूर, अमरावती आणि कोकण या विभागीय मंडळांमार्फत होणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक राज्य मंडळातर्फे १९ सप्टेंबरला जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २० मार्च, दहावीची परीक्षा २ मार्च ते २५ मार्च या कालावधीत घेण्याचे नमूद करण्यात आले होते. या वेळापत्रकाबाबत लेखी सूचना पंधरा दिवसांत मागवण्यात आल्या होत्या. त्यानुसार संघटना, पालक, शिक्षक यांच्याकडून आलेल्या सूचना विचारात घेऊन बारावी आणि दहावीच्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक अंतिम करण्यात आले. प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा, श्रेणी परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना कळवण्यात येईल, असे मंडळाने नमूद केले.

राज्य मंडळाने अंतिम केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक ttps://www.mahasscboard.in/ या संकेतस्थळावर आहे. संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा केवळ माहितीपुरती आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडे येणारे छापील स्वरूपातील वेळापत्रक अंतिम असेल. छापील वेळापत्रकावरून परीक्षांच्या तारखांची विद्यार्थ्यांनी खात्री करून घेऊन परीक्षा द्यावी, असेही मंडळाने स्पष्ट केले.

लोकसत्ता Sat, 31 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71286157

# *News Paper Clippings During December 2022*

## *Section: Education*

**लोकमत**

### एनईपीच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाकडून मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाच्या 'गुणवत्ता सुधार योजनें'तर्गत विभागांना आर्थिक मदत केली जाणार आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, तसेच केंद्र सरकारकडून काम केले जात आहे. विद्यापीठही पुढाकार घेत, एनईपी धोरणाची प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणार आहे. विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागातर्फे विद्यापीठाच्या सर्व विभागांना या उपक्रमासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे 'गुणवत्ता सुधार योजनें'तर्गत निधी उपलब्ध करून देणारे एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे. आतापर्यंत अनेक महाविद्यालयांना हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

Pune Main
Page No. 2 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

### विद्यापीठांच्या परीक्षा एकाच वेळी?

#### चंद्रकांत पाटील यांचे सूतोवाच




म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील सर्व विद्यापीठे; तसेच खासगी विद्यापीठांच्या परीक्षा एकाच कालावधीत करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी विधानसभेत सांगितले.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसंदर्भात विचारलेल्या लक्षवेधीला पाटील यांनी उत्तर दिले. या वेळी त्यांनी सर्व विद्यापीठांच्या परीक्षा एका वेळी आयोजित करण्यात येतील, असे वक्तव्य केले. या संदर्भात राज्यपालांसह बैठकीचे आयोजन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या 'एलएलबी'साठी राज्य सामाइक प्रवेश परीक्षेसाठी उशिरा सूचना निघाल्यामुळे प्रवेश प्रक्रियेत दिरंगाई झाली. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले, अशी शंका उपस्थित करून याबाबतचा लक्षवेधी प्रश्न प्रकाश सोळंके यांनी उपस्थित केला होता. त्याला पाटील यांनी उत्तर दिले.

'राज्यातील विविध विद्यापीठे हे वेगवेगळ्या वेळेत परीक्षा घेतात व निकाल जाहीर करतात. त्यामुळे सामायिक प्रवेश परीक्षेची तारीख बदलत जाते. या सर्व विद्यापिठांच्या पद्धतीमध्ये एकसूत्रता यावी, यासाठी राज्यपाल महोदयांच्या दालनात एकत्रित बैठक घेण्यात येणार आहे. सर्व विद्यापीठांनी एकाच वेळी परीक्षा घ्याव्यात, अशा सूचना देऊन त्यांचे एकत्रित वेळापत्रक तयार करण्यात येईल,' असे पाटील यांनी सांगितले. 'विद्यापीठ, महाविद्यालयांनी मे महिन्यात परीक्षा घ्याव्यात आणि जूनअखेर निकाल लावून एक ऑगस्टपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून महाविद्यालये सुरू करावीत, अशा सूचना सर्व महाविद्यालयांना देण्यात येणार आहेत,' याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

पाटील यांनी विधानसभेत सांगितल्याप्रमाणे जर सर्व विद्यापीठांच्या परीक्षा एकाच वेळी झाल्या तर विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा होणार असून निकाल लागून, इतर विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अडथळे येणार नाहीत. याशिवाय व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या आयोजनातही अडचणी येणार नाहीत. यामुळे केवळ घोषणा न करता उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी आता होत आहे.

Maharashtra Times 31.12.2022

### नवीन वर्षापासून योगशास्त्राचे धडे

#### दोन जानेवारीपासून अर्ज भरता येणार



म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा आणि शारीरिक शिक्षण मंडळातर्फे योग प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून, दोन जानेवारीपासून अभ्यासक्रमाची अर्ज प्रक्रिया सुरू होणार आहे.

इयत्ता बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष व्यक्तींना अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. दोन जानेवारीपासून प्रवेश अर्ज सुरू होणार असून, १४ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. वय वर्षे १८ पूर्ण ते ६० वर्षांपर्यंत कोणीही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. अभ्यासक्रमासाठी ५० जागा असून, प्रथम प्रवेश घेणाऱ्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य यानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. अभ्यासक्रमासाठी भारतीय; तसेच परदेशी विद्यार्थीही अर्ज करू शकतात, असे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

अभ्यासक्रमाबाबतची अधिक माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या वेबसाइटवर पाहता येईल, अशी माहिती क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने यांनी दिली. 'अभ्यासक्रमात योगाभ्यासावर लक्ष केंद्रित केले जाणार असून, विविध आसने, त्यांचे उपयोग, शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाणार आहे. विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळणार असल्याने रोजगाराच्या दृष्टीनेही हा अभ्यासक्रम महत्त्वाचा ठरेल,' असे डॉ. माने यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 31.12.2022

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Education*

# SSC, HSC examination timetable now available on official website

Namrata Devikar

namrata.devikar@htlive.com

**PUNE:** Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE) officials on Friday confirmed that the final time table for HSC or Class 12 and SSC or Class 10 will now be available on the official website www.mahahsscboard.in.

Anuradha Oak, Secretary, MSBSHSE said, "We had earlier issued the tentative dates for the examination. The final time table is for these dates only. Students should ensure and recheck the dates with schools and junior colleges and confirm the time table before the examination."

HSC exams will be held from February 21 to March 20, 2023 while SSC exam will be from March 2 to March 25, 2023.

Hindustan Times 31.12.2022

# दहावी-बारावीच्या परीक्षा जाहीर

## 'सीबीएसई'चेही नियोजन प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. राज्य मंडळाने दिलेल्या वेळापत्रकानुसार २१ फेब्रुवारी ते २१ मार्च दरम्यान बारावीच्या, तर २ मार्च ते २५ मार्च दरम्यान दहावीच्या परीक्षा होणार आहेत. 'सीबीएसई' मंडळाच्या परीक्षाही शुक्रवारी जाहीर करण्यात आल्या असून, १५ फेब्रुवारी ते ५ एप्रिल दरम्यान बारावीच्या तर १५ फेब्रुवारी ते २१ मार्च पर्यंत दहावीच्या परीक्षा होणार आहेत.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) या दोन्ही मंडळांनी एकाच दिवशी परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्य मंडळाच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक यापूर्वीच जाहीर करण्यात आले होते. शुक्रवारी अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले. यंदा राज्य मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दोन्ही परीक्षा शंभर टक्के अभ्यासक्रमावर आधारित असतील. मार्च २०२२ मध्ये करोनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या लेखी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना अनेक सवलती देण्यात आल्या होत्या. या सर्व सवलती काढून टाकण्यात आल्या असून, आता विद्यार्थ्यांना पेपर लिहिण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार नाही; तसेच ज्या शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी शिकत होते, त्याच शाळेत त्यांचे केंद्र होते. आता त्यातही बदल करण्यात आला असून, यंदा विद्यार्थ्यांची केंद्रेही बदलली जाणार आहेत. वेळापत्रकातून जादाचे दिवस वगळण्यात आले आहेत.

" यंदाच्या परीक्षा २०२० मध्ये झालेल्या परीक्षांप्रमाणे होणार आहेत. विद्यार्थ्यांना तारखांची कल्पना यावी, आणि तयारीला वेळ मिळावा यासाठी आम्ही सप्टेंबरमध्येच संभाव्य वेळापत्रक जाहीर केले होते. त्यात फारसे बदल करण्यात आलेले नाहीत. परीक्षांमध्ये गेल्या वर्षी दिलेल्या सवलती काढून टाकण्यात आलेल्या आहेत.

– शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ

## 'जेईईचे' लक्षात घेऊनच नियोजन



राज्य मंडळ व सीबीएसई या दोन्ही मंडळांनी आगामी 'जेईई मेन्स' परीक्षेचे वेळापत्रक लक्षात घेऊनच परीक्षांचे आयोजन जाहीर केले आहे. 'जेईई' देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेमुळे कोणताही अडथळा येऊ, नये याची पूर्ण काळजी घेण्यात आली असल्याचे 'सीबीएसई'कडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times 31.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Research

# जीवशास्त्रीय संशोधनाला आता केंद्रीय पातळीवरून मान्यता

### संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे उच्च शिक्षण संस्थांना आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : देशात जीवशास्त्रीय संशोधनाची नियामक प्रक्रिया, मान्यता आदींसाठी केंद्र सरकारने जीवशास्त्रीय संशोधन नियामक मान्यता संकेतस्थळाची (बायोलॉजिकल रीसर्च रेग्युलेटरी ॲप्रुव्हल पोर्टल) निर्मिती केली आहे. त्यामुळे जीवशास्त्रीय संशोधनामध्ये काम करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांनी या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी या संदर्भातील परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. परदेशी सहकार्य आणि सहभाग असलेल्या आरोग्यविषयक संशोधनाच्या पडताळणीसाठी, द्विपक्षीय करारांची प्रगती आणि त्यांची अंमलबजावणी, सुरू असलेले संशोधन पुढे नेणे, मानवी जीवशास्त्रीय साहित्याचे हस्तांतरण आदींसाठी केंद्र सरकारने १९८० च्या दशकात आंतरमंत्रालय स्तरावर उच्चस्तरीय पडताळणी समिती नियुक्त केली होती. या संशोधनच्या अनुषंगाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र संशोधकांना नियामक प्रक्रिया, मान्यता आदींबाबत माहिती देत्यासाठी जीवशास्त्रीय संशोधन नियामक संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. विज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन अधिकाअधिक लोकांना उपलब्ध होण्यासह उद्योग



निर्मितीसाठीचा हा अनोखा मंच आहे. केंद्र सरकारची मंत्रालये, विभाग यांची मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध असेल, असे नमूद करण्यात आले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या अखत्यारित असलेल्या संस्थांतील संशोधन प्रकल्पांच्या मान्यतेची प्रक्रिया केंद्राच्या संबंधित मंत्रालयाकडून करण्यात येईल. त्यामुळे राज्य सरकारांनी असे प्रस्ताव संबंधित मंत्रालयाकडे पाठवावेत. तर मानवी, प्राणी, वनस्पती आणि पर्यावरणाशी संबंधित संशोधन प्रकल्पांमध्ये आंतरराष्ट्रीय सहभाग किंवा निधीचे सहकार्य असलेल्या अशासकीय संस्थांच्या प्रस्तावांची पडताळणी आरोग्य संशोधन विभाग आणि भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेमार्फत चालवल्या जाणाऱ्या आरोग्य मंत्रालय पडताळणी समितीकडून करण्यात येईल.

**नोंदणी संकेतस्थळ...**

संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्या उच्च शिक्षण संस्था आणि संलग्न महाविद्यालयांनी या तरतुदींचे पालन करून https:// biorrap. gov. in या संकेतस्थळावर नोंदणी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 27 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71249473

पुढारी

# जीवशास्त्रीय संशोधनाच्या मान्यतेसाठी वेबसाइट

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात जीवशास्त्रीय संशोधनाची नियामक प्रक्रिया, मान्यता आदींसाठी केंद्र सरकारने जीवशास्त्रीय संशोधन नियामक मान्यता संकेतस्थळाची (बायोलॉजिकल रिसर्च रेग्युलेटरी ॲप्रूव्हल पोर्टल) निर्मिती केली आहे. त्यामुळे जीवशास्त्रीय संशोधनामध्ये काम करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांनी या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

**शिक्षण संस्थांना नोंदणी करण्याचे 'यूजीसी'चे निर्देश**

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. परदेशी सहकार्य आणि सहभाग असलेल्या आरोग्यविषयक संशोधनाच्या पडताळणीसाठी, द्विपक्षीय करारांची प्रगती आणि त्यांची अंमबजावणी, सुरू असलेले संशोधन पुढे आणण्यासह मानवी जीवशास्त्रीय साहित्याचे हस्तांतरण आदींसाठी केंद्र सरकारने १९८० च्या दशकात आंतरमंत्रालयस्तरावर उच्चस्तरीय पडताळणी समिती नियुक्त केली होती. या संशोधनाच्या अनुषंगाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र, संशोधकांना नियामक प्रक्रिया, मान्यता आदींबाबत माहिती देण्यासाठी जीवशास्त्रीय संशोधन नियामक संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. विज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन अधिकाधिक लोकांना उपलब्ध होण्यास उद्योगनिर्मितीसाठीचा हा अनोखा मंच आहे. केंद्र सरकारची मंत्रालये, विभाग यांची मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध असेल, असे नमूद करण्यात आले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या संस्थांतील संशोधन प्रकल्पांच्या मान्यतेची प्रक्रिया केंद्राच्या संबंधित मंत्रालयाकडून करण्यात येईल. त्यामुळे राज्य सरकारांनी असे प्रस्ताव संबंधित मंत्रालयाकडे पाठवावेत. तर मानव प्राणी, वनस्पती आणि पर्यावरणाशी संबंधि संशोधन प्रकल्पांमध्ये आंतरराष्ट्रीय सहभाग किंवा निधीचे सहकार्य असलेल्या अशासकी संस्थांच्या प्रस्तावांची पडताळणी आरोग्य संशोधन विभाग आणि भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या आरोग्य मंत्रालय पडताळणी समितीकडून करण्यात येईल. त्यामुळे संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्या उच्च शिक्षण संस्था आणि संलग्न महाविद्यालयांनी या तरतुदींचे पालन करून https:// biorrap. gov. in या संकेतस्थळावर नोंदणी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 27, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Research*

सामना

डॉ. विजय पांढरीपांडे

# हिंदुस्थानातील पीएच.डी. संशोधन : सद्यःस्थिती

**पीएच.डी. पदवीसाठीचे संशोधन, त्यासंबंधीचे प्रवेशापासून तर पदवी प्रदान होईपर्यंतचे नियम, संशोधनाची गुणवत्ता, त्याला जागतिक मान्यता मिळावी यासाठीचे प्रयत्न या अतिशय गांभीर्याने घ्यावयाच्या गोष्टी आहेत. कोरे शुद्ध दूध पचत नाही म्हणून त्यात पाणी घालणे शिक्षण संशोधनात कामाचे नाही! हिंदुस्थानातले पीएच.डी. संशोधन हाच संशोधनाचा विषय ठरू शकतो! या विषयावर नव्याने भाष्य करण्याचे कारण म्हणजे नुकतेच यूजीसीने पीएच.डी. प्रबंध सबमिट करण्यापूर्वी पेपर्स पब्लिकेशनची अट आता शिथिल केली आहे.**

हिंदुस्थानातले पीएच.डी. संशोधन हाच संशोधनाचा विषय ठरू शकतो! या विषयावर नव्याने भाष्य करण्याचे कारण म्हणजे नुकतेच यूजीसीने पीएच.डी. प्रबंध सबमिट करण्यापूर्वी पेपर्स पब्लिकेशनची अट आता शिथिल केली आहे. आपल्या संशोधनाला दर्जाची मान्यता मिळावी यासाठी स्टॅण्डर्ड जर्नल्समध्ये पेपर्स प्रसिद्ध केले जातात. आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित होण्यापूर्वी हे संशोधन तीन तज्ज्ञांकडून तपासले जाते. त्याचे महत्त्व, उपयोगिता, सत्यता, नावीन्य याची छाननी होते. विदेशी विद्यापीठात, आपल्याकडे आयआयटीसारख्या उच्च शिक्षण संस्थांत अशा पेपर प्रकाशनाला फार महत्त्व दिले जाते. नव्या नोकरीसाठी, प्रमोशनसाठी आतापर्यंत तरी या संशोधन पेपर प्रकाशनाला महत्त्व होते, पण गेल्या काही वर्षांत तिथेही भ्रष्टाचार, हेराफेरी सुरू झाली. दर्जेदार जर्नलऐवजी नकली ऑनलाइन जर्नलचे प्रस्थ माजले. संपादक मंडळ नावालाच. तज्ज्ञातर्फे तपासणी, रिव्ह्यू मुळी नाहीच. आले तसे प्रसंगी चुकांसह प्रसिद्ध करायचे हा प्रकार सुरू झाला. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये आपले संशोधन निबंध, पेपर सादर करण्याचीदेखील प्रथा आहे, पण तिथेही व्यावसायिक स्वरूप आले. रजिस्ट्रेशन फीच्या नावाखाली हजारो रुपये गोळा करून परिषदा आयोजित केल्या जातात. या परिषदेत सादर होणारे पेपरदेखील आधी तपासणे अपेक्षित असते, पण त्यासाठी तज्ज्ञ हवेत. ते कुठून आणायचे? मग काय पैसे द्या अन् पेपर सादर करा हा धंदा सुरू झाला. आजकाल तर खेडेगावातील महाविद्यालये चक्क आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करतात. नेपाळ, बांगलादेश इथून कुणी आपलेच ओळखीचे बोलवायचे की झाली आंतरराष्ट्रीय परिषद! असा विनोदी कारभार! म्हणूनच कदाचित अशा पेपर प्रकाशनाला महत्त्व देणे यूजीसीने बंद केले असावे, पण संशोधक वाम मार्गाला जात असतील तर त्यात सुधारणा करणे, कडक धोरण स्वीकारणे, नियम शिथिल करण्याऐवजी अधिक निर्बंध घालणे हे सोडून चक्क दुधात पाणी घालणे सुरू आहे!

एखादी अट अत्यावश्यक केली की ती पूर्ण करण्यासाठी वाटेल ते वाम मार्ग आपल्याकडे शोधले जातात. कारण कुठलेही काम गांभीर्याने करायचे नाही, हा आपला कॅज्युअल अप्रोच!



विद्यापीठात शिकवण्यासाठी पीएच.डी. अत्यावश्यक केल्यापासून आपल्याकडे संशोधनाचे पेव फुटले. हे तीन-चार वर्षांत केलेले संशोधन खरेच डॉक्टरेट पदवीसाठी योग्य आहे की नाही हे कसे तपासायचे? त्यातूनच पेपर प्रसिद्ध करणे, परिषदातून पेपर प्रेझेंट करणे अन् नंतर प्रबंध तीन बाह्य तज्ज्ञांकडून तपासून घेणे हे नियम आले. सुरुवातीला हे नियम कडक होते. कटाक्षाने पाळले जात होते. हळूहळू त्यात पळवाटा आल्या. पूर्वी विज्ञान-तंत्रज्ञान अशा विषयातील प्रबंध देशाबाहेर तपासणीसाठी पाठवले जात. मग त्यात वेळ वाया जातो या सबबीखाली देशातच ते इतर विद्यापीठांत पाठवले जाऊ लागले. इथेही ओळखीचे, मैत्रितले परीक्षक निवडणे, त्याला सांगून फेव्हरेबल रिपोर्ट लिहिण्यास भाग पाडणे, त्यासाठी वेळ पडल्यास संशोधक विद्यार्थ्यांकडून पैसे (लाच) घेणे, तोंडी परीक्षा घेण्यासाठी आलेल्या परीक्षकाची स्टार हॉटेलमध्ये सर्व सोय करणे, त्यांना महागड्या भेटी देणे, पर्यटन घडविणे असे प्रकार सुरू झालेत. यापैकी काही बातमी रूपात बाहेर आले, पण बरेचसे झाकले गेले. अगदी आयआयटीचे ७०-८० काळातले नियम अन् आताचे (शिथिल) नियम यात खूप फरक झाला आहे. म्हणजे दुधात बरेच पाणी घातले गेले. दूध नीट पचावे म्हणून!!

पीएच.डी.साठी निवडायचे विषय यातदेखील बराच विनोद असतो. फिजिकल एज्युकेशन हा विषय घेऊ. एकाच गाईडच्या मार्गदर्शनात एक जण एका जिल्ह्यातील कबड्डी खेळाडूवर योगासनांचा परिणाम या विषयावर संशोधन (!) करतो, तर दुसरा कबड्डीऐवजी खो-खो हा खेळ निवडतो. तिसरा एका जिल्ह्याऐवजी दुसरा जिल्हा निवडतो! या सर्व प्रबंधाची अनेक पाने सारखीच. कॉपी पेस्ट हे प्रकार तर इतके वाढले आहेत की, मुळात खरे काय हे तपासणे कठीण. प्रामाणिकपणा कुठे राहिलाच नाही. कसा तरी प्रवेश घ्या, कसा तरी गाईड निवडा, काही तरी विषय घ्या, कसे तरी पेपर सादर करा, प्रकाशित करा, कसा तरी प्रबंध लिहा, कसे तरी तो परीक्षकाकडून क्लिअर करून घ्या अन् शेवटी कशी तरी पदवी मिळवा असे मीडियोकर, प्रदूषित वातावरण आहे आपल्याकडे. नुकतेच एका शिक्षण अधिकाऱ्याचे पीएच.डी. प्रकरण टीव्ही चॅनेलवर गाजलेले पाहिले, पण कारवाई शून्य! सारे लवकर विसरले जाते.

पेपर प्रकाशित करण्यातदेखील अडचणी आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, मानस शास्त्र, व्यवस्थापन या क्षेत्रात काही चांगले जर्नल्स आहेत, पण सोशल सायन्स, आर्ट्स भाषा (मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराथी) या विषयांत चांगले जर्नल्स नाहीत. आता तर मातृभाषेत प्रबंध लिहिले जातात. मग ते कुठे कसे प्रकाशित करायचे? यावर काही धंदेवाईक प्रकाशकांनी पैसे घेऊन प्रबंध प्रकाशन (मोजक्या प्रती) करण्याचा बाजार मांडला आहे. प्रमोशनसाठी विद्यापीठ त्यालाही मान्यता देतात! ते केले नाही तर एखाद्या संघटनेचे कार्यकर्ते आहेतच मोर्चा घेऊन तयार मदतीला. दबाव आणला की काहीही मान्य करून घेता येते आजकाल. काही निवडून आलेले प्रतिनिधीदेखील राजकारण करता करता साईड बिझिनेस म्हणून पीएच.डी. करतात आजकाल. काही नाही तर ओनररी डॉक्टरेट आहेच काहीही न करता मिळवायला! अशी फुकटची पदवी नाकारणारे राहुल द्रविडसारखे विरळाच.

एकूणच पीएच.डी. पदवीसाठीचे संशोधन, त्यासंबंधीचे प्रवेशापासून तर पदवी प्रदान होईपर्यंतचे नियम, संशोधनाची गुणवत्ता, त्याला जागतिक मान्यता मिळावी यासाठीचे प्रयत्न या अतिशय गांभीर्याने घ्यावयाच्या गोष्टी आहेत. कोरे शुद्ध दूध पचत नाही म्हणून त्यात पाणी घालणारी आईची माया शिक्षण संशोधनात कामाची नाही हेच खरे!

*(लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत)*

Pune Edition
Dec 28, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

## News Paper Clippings During December 2022

### Section: Miscellaneous

# शाळा, कॉलेजांमध्ये मतदार साक्षरता मंडळ

## देशातील पहिलाच प्रयोग जिल्ह्यात

म. टा. प्रतिनिधी,पुणे

कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तरुणांमध्ये मतदान प्रक्रियेची जनजागृती करण्यासाठी आता पुणे शहर आणि जिल्ह्यात प्रथमच मतदार साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात पहिला प्रयोग करण्यात येत असून, मोहिमेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता प्रमाणपत्रासह क्रेडिट पॉइंटही मिळणार आहेत. पुणे शहरासह जिल्ह्यातील ४३ कॉलेजांसह १५ शाळांमध्ये मतदार साक्षरता मंडळ स्थापन होणार आहे. ९० विद्यार्थ्यांची मंडळासाठी निवड करण्यात आली आहे.

मतदार साक्षरता मंडळाची आज, बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळा होणार आहे. त्यासाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी आरती भोसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य समन्वयक कार्तिकेयन, वर्शिप अर्थ फाउंडेशनचे संस्थापक पराग मते आदी उपस्थित राहणार आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात राबविला जाण्याची शक्यता आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने अशी मंडळे स्थापण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी वर्शिप अर्थ फाउंडेशन सहकार्य करणार आहे. मतदार साक्षरता मंडळाची शहरातील २०, पिंपरी-चिंचवडमधील १२ आणि ग्रामीण भागातील आठ कॉलेजांमध्ये स्थापना होणार आहे; तसेच शहरातील दहा शाळांचीही यात निवड करण्यात आली आहे. कॉलेजचे विद्यार्थी आणि शाळांमधील १४ वर्षांपुढील विद्यार्थ्यांचा यात समावेश असेल. ही निवड करताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आहे.

### साक्षरता मंडळाचा उद्देश

- नवमतदारांमध्ये निवडणूक प्रक्रियेबाबत जागरुकता निर्माण करणे
- संविधान आणि लोकशाहीची मूल्ये लोकांपर्यंत पोचविण्याचे काम करणे
- प्रत्येक मंडळात किमान २५ जणांचा सहभाग असेल
- निवडणूक आयोगाचा एक समन्वयक अधिकारी, कॉलेज, शाळेचा समन्वयक अधिकारी, कॉलेजचा राजदूत (ॲम्बेसेडर), कॉलेज प्रतिनिधी, अन्य सदस्य अशी मंडळाची रचना असेल



### मंडळाचा फायदा

- उपक्रमात सहभागी होणाऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पदवी गुणवत्ता प्रमाणपत्रात अतिरिक्त क्रेडिट पॉइंट मिळणार
- त्यांच्या बायोडेटात अशा अनोख्या उपक्रमात सहभागी झाल्याची नोंद असेल
- सर्व विद्यार्थ्यांना केंद्रीय निवडणूक आयोगाकडून प्रमाणपत्रही देण्यात येणार
- त्याचाही फायदा विद्यार्थ्यांना होणार

**"विद्यार्थीवर्गाला मतदान प्रक्रियेत सहभागी करणे व जनजागृती करण्यासाठी मतदार साक्षरता मंडळ स्थापन करण्यात येत आहे. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील ४३ कॉलेजांसह १५ शाळांमध्येही मंडळे स्थापन करण्यात आली आहे.**

– आरती भोसले, उपजिल्हा निवडणूक अधिकारी

Maharashtra Times 7.12.2022

## News Paper Clippings During December 2022

### Section: Miscellaneous

लोकमत

# विविध महाविद्यालयांनी थाटला पार्किंगचा जोड धंदा

## विद्यार्थ्यांची होतेय लूट; विद्यापीठाच्या नियमांना तिलांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ॲडमिशनची फी, डेव्हलपमेंट फी, परीक्षा फी अशा नाना तऱ्हेच्या फी भरायच्या, तरीही कॉलेजमधे दुचाकीच्या पार्किंगसाठी दररोज अतिरिक्त पैसे द्यायचे, अशा प्रकारे पुण्यातील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची आर्थिक लूट सुरू आहे. पार्किंग हे महाविद्यालयांसाठी कमाईचा दुसरा धंदा बनला आहे.

पार्किंगच्या नावाखाली दररोज प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५ ते १० रुपये घेतले जातात. अशाप्रकारे रोज शेकडो विद्यार्थ्यांकडून हजारो रुपये, तर महिन्याकाठी लाखो रुपये गोळा केले जात आहे.

महाविद्यालयात दररोज शेकडो ते हजारो विद्यार्थी दुचाकीद्वारे येतात. त्यांना प्रत्येक दिवशी पाच ते दहा रुपये पार्किंगसाठी द्यावे लागतात. याशिवाय विद्यापीठाने पार्किंगसाठी घातलेल्या नियम-अटींचे कुठेही पालन होत नसल्याचे दिसून येते. हे पैसे नेमके कोणाच्या खिशात जातात, हा खरा प्रश्न आहे. हे पैसे किरकोळ वाटत असले तरी दररोज शेकडो दुचाकी या महाविद्यालयांच्या पार्किंगमध्ये ये-जा करतात. त्यांच्याकडून गोळा केले जाणारे हे पैसे महिन्याच्या शेवटी लाखो रुपये होतात. तसेच त्याचा जीएसटीदेखील भरला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.



### मासिक, वार्षिक पासबाबत अनभिज्ञता

महाविद्यालयांसाठी असलेल्या पार्किंग संबंधित नियमावली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार विद्यार्थ्यांकडून पार्किंगसाठी दैनंदिन शुल्क ३ रुपये, महिन्याचा पास ५० रुपये, तर वर्षाला ५०० रुपये आकारावे असे स्पष्ट म्हटलेले आहे. मासिक, वार्षिक पासबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने ९ डिसेंबर २०१४ साली घेतलेल्या निर्णयात नमूद केले आहे. मात्र, याबाबत महाविद्यालयांमध्ये माहितीच दिली जात नाही व त्याचे पालनही केले जात नाही.



### प्रत्यक्षात काय आढळले?

शहरातील फर्ग्युसन रस्ता, टिळक रस्ता, आदी महाविद्यालयांच्या पार्किंगमध्ये जाऊन पाहणी केली असता दोन तासांसाठी दुचाकीसाठी ५, तर चारचाकीसाठी दहा रुपये आकारले जात आहेत. यासह सर्व दर जीएसटीसहित आहेत असे पावतीवर छापलेले असताना, जीएसटी नंबर मात्र छापलेला नाही. वाहन व इतर सामानाची जबाबदारी, नैसर्गिक आपती, चोरी वा नुकसानीबद्दल व्यवस्थापन जबाबदार नाही, असेही पैसे घेऊन पावतीच्या पाठीमागे छापलेले असते. क्वचित ठिकाणी सीसीटीव्ही आहेत. वाहनांचे पाऊसपाण्यापासून संरक्षण होण्यासाठी साधे शेडही नाही.




### विद्यापीठाची महाविद्यालयांसाठी नियमावली

- सायकल पार्किंगची व्यवस्था नि:शुल्क पुरवावी, अपंगासाठी पार्किंगची सुविधा नि:शुल्क हवी.
- **दुचाकी वाहनतळ शुल्क माफक असावे. त्याचे स्वरूप व्यावसायिक नसावे.**
- वाहनतळाची दैनंदिन स्वच्छता, पावसाळी पाण्यापासून बचावासाठी शेड, वाहनतळातील फरशांची डागडुजी करण्यात यावी.
- **दुचाकी वाहनतळावर व्यवस्थित लावण्यासाठी रंगांच्या पट्ट्यांची आखणी. संध्याकाळी प्रकाश व्यवस्था असावी.**
- सीसीटीव्हीची व्यवस्था करणे अनिवार्य आहे.




विद्यापीठ कायद्यानुसार वाहनांना ऊन व पावसापासून बचाव करण्यासाठी शेड हवे, पण त्याचे पालन कोठे होत नाही. विद्यार्थ्यांकडून पार्किंगच्या नावाखाली सक्तीने वसुली केली जाते. विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयांत पार्किंग शुल्क आकारणी व्हायला नको. मात्र, विद्यापीठाचा कॉलेजवर अंकुश नाही. विद्यापीठाच्या वेबसाईटवर याबाबतची नियमावलीही दिसत नाही, तर कॉलेजला पार्किंग पास ही संकल्पनाच माहीतच नाही. हे तेथे मिळणाऱ्या पावत्यांवरून स्पष्ट होते. या संदर्भात कारवाईची मागणी करूनही दुर्लक्ष होते. याबाबत आंदोलन करण्यात येईल.

**- अक्षय जैन,**
प्रदेश सरचिटणीस, युवक काँग्रेस

Hello Pune
Page No. 8 Dec 08, 2022
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2022

### Section: Miscellaneous

# शब्दकोशाची 'महाशक्ती'!

**घरोघरी असूनही** दरवर्षी दोन-तीनदा तरी जगभरच्या अनेक देशांत बातमीचा विषय होणारं, जाड-बारीक विविध परींच्या नाना आवृत्त्या जुन्याच तरीही उपयुक्त असणारं असं पुस्तक म्हणजे ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी- 'ओईडी' हे तिचं आद्याक्षरांनुसार होणारं लघुरूप अनेक पुस्तकांच्या तळटीपांपासून, पुस्तकविक्या दुकानांपर्यंत अनेक ठिकाणी वाचता येतं किंवा ऐकू येतं. प्रत्यक्षात ही 'ओईडी' आजच्या गूगलच्या जमान्यात कालबाह्य व्हायला हवी होती, पण ऑक्सफर्डचाच काय, केम्ब्रिज किंवा अमेरिक वेबस्टर यापैकी कुठलाही खानदानी शब्दकोश इतिहासजमा झालेला नाही. यांपैकी वेबस्टर्स या सर्वांत जुन्या डिक्शनरीचा जन्म १८२८चा. ऑक्सफर्ड डिक्शनरीची छपाई सुरू झाली १८८४ मध्ये. आजवर तिच्यात असलेल्या शब्दांपैकी फक्त २१,८०० शब्दच सन १५७६च्या आधीचे आहेत. म्हणजे आपल्या मराठीत ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ साकारणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या जन्मानंतरच्या ३००व्या वर्षीसुद्धा इंग्रजीत एवढेच शब्द होते! त्यानंतर मात्र इंग्रजीची शब्दसंपदा वाढत गेली, असं 'ओईडी' सांगते. आजघडीला या 'ओईडी'च्या खंडांमध्ये सहा लाख शब्द आहेत. फक्त २०२२ पुरतंच सांगायचं, तर यंदाच्या जूनमध्ये ७०० आणि सप्टेंबरात ६५० नवे शब्द या डिक्शनरीत आले. या ७०० किंवा ६५० पैकी बरेच निव्वळ बोलीतले (सहसा लिहिले न जाणारे) होते, त्यातही एकसंध शब्द कमी होते आणि शब्दप्रयोग जास्त होते... उदाहरणार्थ 'हायब्रिड वर्क' या शब्दांपैकी हायब्रिड - संकरित, वर्क- कार्य, काम हे दोन्ही शब्द आधीपासून आहेतच, पण 'हायब्रिड वर्क' हा शब्दप्रयोग म्हणून करोनाकाळापासून नव्यानंच वापरला जातो आहे, याची दखल 'ओईडी'नं घेतली. या जून- सप्टेंबर शब्दसंपदेच्या बातम्या त्या-त्या वेळी आल्याच, पण आता बातमी आहे ती 'या वर्षीच्या शब्दा'ची. 'गॉब्लिन मोड' हा शब्द 'ओईडी'नं २०२२ चा शब्द म्हणून निवडलाय, हे एव्हाना बऱ्याच जणांनी कुठेतरी बातम्यांमध्ये वाचलं/ऐकलं असेल.



या खंडप्राय ग्रंथाची छापील आवृत्ती यापुढे निघणार नाही, असं २०१० मध्येच जाहीर झालेलं आहे. पण इंटरनेटवर या महाशब्दकोशात सतत भर घातली जाते आहेच!

'गॉब्लिन मोड'च्या आदल्या वर्षीचा - २०२१ सालचा शब्द होता 'व्हॅक्स'. हे लस या अर्थानं वापरल्या जाणाऱ्या 'व्हॅक्सीन'चं लघुरूप. त्याच्या आदल्या वर्षी मात्र 'ओईडी'कर्त्यांनी शब्दच निवडला नव्हता. सरतं वर्ष जगासाठी नेमकं कसं होतं, कशाचा प्रभाव जगावर दिसला, याचं प्रतिबिंब अनेकदा या दर वर्षीच्या शब्दांमधून उमटलेलं आहे. उदाहरणार्थ, २०१६ साली डोनाल्ड ट्रम्प जिंकले, त्या वर्षीचा शब्द 'पोस्ट ट्रूथ' हा होता. २०१३ सालचा शब्द होता 'सेल्फी', तर बॅटरीवर चालणाऱ्या सिगारेटचा सुळसुळाट अगदी शाळकरी पोरांमध्येही होतोय अशी स्थिती युरोप-अमेरिकेत २०१४ मध्ये आली, त्या वर्षीचा शब्द 'व्हेप' असा होता. ही बॅटरीवरली सिगारेट ओढणारे लोक तोंडातून 'धूर' (स्मोक) काढत नसून वाफारे (व्हेपर) काढतात, म्हणून आम्ही 'स्मोकिंग' करत नसून 'व्हेपिंग' करतोय असं म्हणतात. परिणाम दोघांचा सारखाच, पण त्यातून चर्चेत आलेलं हे 'व्हेप' त्या वर्षीचा शब्द झालं.

सन २०१९ चा 'क्लायमेट इमर्जन्सी' हा शब्द, ग्रेटा थुनबर्ग आणि जगभर पसरलेल्या तिच्या तरुण मित्रमंडळींची आठवण करून देणारा होता. त्याच्या आदल्या वर्षी, २०१८ मध्ये निवडला गेलेला 'टॉक्सिक' हा शब्दसुद्धा पर्यावरणवाद्यांच्या तोंडी वारंवार येऊ लागलेला होता. पर्यावरणवादाकडे तरुणांचा ओढा वाढतोच आहे, याच्याशी २०१७ सालच्या 'यूथक्वेक' या शब्दाचा दूरान्वयानं संबंध होता... तरुणांच्या प्रभावामुळे धोरणं बदलू शकतात किंवा एखादा भाग बदलू शकतो, या वास्तवाचं वर्णन करणारा हा शब्द. पण पुढे २०२१च्या डिसेंबरात, 'यूथक्वेक : व्हॉट आफ्रिकन डेमॉग्राफी शुड मॅटर टु द वर्ल्ड' या एडवर्ड पाइस यांच्या पुस्तकात हाच शब्द 'तरुण लोकसंख्येचा विस्फोट' अशाही अर्थानं वापरला गेला.

शब्दाचे अर्थ कसे बदलत जातात, नवे अर्थ कसे प्रस्थापित होतात, याचं उत्तम उदाहरण म्हणजे या वर्षीचा 'गॉब्लिन मोड' हा शब्दप्रयोग. मध्यंतरी 'ओटीटी' वर एक 'गार्डियन' नावाची मालिका आली होती आणि तीत गॉब्लिन नावाचं पात्र होतं, पण त्या गॉब्लिनचा या 'गॉब्लिन मोड'शी काही संबंध नाही. टिकटॉकवर 'गॉब्लिन मोड' हा हॅशटॅग अनेकदा वापरला गेला, तो बहुतेकदा 'तुम्हाला काय वाटायचं ते वाटो, मी असंच करणारेय' अशा प्रकारे वापरला गेला. काहीसा 'दुनिया गयी भाडमें' अशा मनःस्थितीचा हा शब्द. तो यंदाच्या वर्षीचा शब्द ठरलाय. 'ओटीटी' ते ओईडी हा त्याचा प्रवास लाखो लोकांनी आपापल्या परीनं हा शब्द वापरल्यामुळे झालेला आहे. कुणाचीही पर्वा न करता, अगदी स्वतःच्याही भल्याची पर्वा न करता जगणं अशा अर्थाचा शब्द म्हणून यापुढे त्याचा वापर वाढणार आहे, हे आपल्या वास्तवाची भयाणताच दाखवतं! पण वास्तव काहीही असलं तरी, शब्दांचा नवेपणा हेरणारं पुस्तक मात्र चर्चेत येत राहातं, वास्तवाशी शब्दकोशांचा कसा संबंध असतो, याची साक्षही देत राहातं. शब्दसंपदेची शक्ती वाढवत राहातं.

त्यावरनं सहज प्रश्न पडतोय- मराठीत अशी 'या वर्षीचा शब्द' जाहीर करण्याची प्रथा कुणा शब्दकोशानं समजा सुरू केली, तर काय असेल २०२२चा शब्द? 'महाशक्ती' हा शब्द असेल का तो? - नसला, तर मग कोणता असेल?

लोकसत्ता Sat, 10 December 2022
https://epaper.loksatta.com/c/71098638

## *News Paper Clippings During December 2022*

### *Section: Miscellaneous*




# वाचकांच्या शोधात पुस्तकं...

श्याम जोशी
mtedit@timesgroup.com

**मी** भाजी-पोळीचा ॲल्युमिनियमचा डबा हातात घेऊन, वडिलांचं बोट धरून व्ही. टी. स्टेशनवरच्या (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) अफाट गर्दीत आलो. जे. जे. कलाविद्यालयाची वाट चालायची होती. समोरचं अनोळखी, गर्दीनं भरलेले जग पाहून अगदी भांबावून गेलो; पण हळूहळू या नव्या वातावरणाला सरावलो. जे. जे.मधून टेक्सटाइल डिझाइनिंग पूर्ण केल्यानंतर, मला फिनले मिलमध्ये नोकरी मिळाली. आपोआपच स्वतःचा पैसा हाती आला आणि एवढे दिवस ओढ लावणारं स्वप्न साकार होऊ लागलं. पु. ल. देशपांड्यांचं 'बटाट्याची चाळ' हे पुस्तक विकत घेतलं आणि मग काय, एका मागोमाग एक पुस्तक खरेदी. दर महिन्याचा हा सिलसिलाच सुरू झाला. घरातलं वातावरणही वाचनासाठी अनुकूल होतं.



वडील साने गुरुजींच्या प्रभावात होते. ते सतत वाचत असत. वडील बंधूंनाही वाचनाचं वेड होतं. आता मीही वाचनानंदात मशगूल

**मला वाटतं...**

होऊ लागलो. मुंबई आणि पुण्याच्या परिसरातल्या, आवाक्यातील अंतरावरच्या सर्व व्याख्यानमालांचा श्रवणानंदही जोडीला आला. साहित्यिकांच्या जगात रमत होतो. पुस्तकांच्या निमित्तानं मी वेगवेगळ्या ग्रंथालयांना भेट देत होतो. तऱ्हेतऱ्हेच्या अडचणी येत असत. ग्रंथालयाचे वेगवेगळे नियम, सुट्या, वाचकापाशी असणारा मोकळा वेळ आणि ग्रंथालयांच्या कामाच्या वेळाचं गणित काही जमत नव्हतं. या सर्व अडचणींतून मार्ग कसा निघणार, ते कळत नव्हतं. 'वाच ना लय' असं म्हणणारं, नियमांच्या कचाट्यातून सोडवणारं वाचनालय कुठं आणि कसं शोधावं, असा विचार करता करता, आपण स्वतःच हे काम का करू नये, या विचारानं जोर धरला आणि तिथंच मला नवी वाट सापडली.

'ग्रंथसखा'ची स्थापना २००४मध्ये झाली. मराठी शारदेचं अक्षर संमेलन सुरू झालं. नंतर नोकरीही सोडली. निवृत्तीनंतर मिळालेले पैसे आणि राहता बंगला विकून मिळालेले पैसे वापरून ग्रंथालयाची जागा झाली. ग्रंथसंग्रह वाढू लागला. ग्रंथ मिळवण्यासाठी महाराष्ट्राबाहेरही अनेक ठिकाणी गेलो. ठिकठिकाणी विखुरलेली दुर्मीळ पुस्तकं मिळवण्यासाठी धडपड सुरू झाली. पूर्वीपासून जमवलेली हजारो पुस्तकं आधीच 'ग्रंथसखा'त सामील झाली होती.

बदलापूरच्या रसिक वाचकांना 'ग्रंथसखा'ची ओळख व्हावी, म्हणून अनेक उपक्रम केले. 'श्वास'सारखा उत्तम चित्रपट आणि त्यावर अरुण नलावडेसह त्या चित्रपटाच्या निर्मितीशी संबंधित असणाऱ्यांशी परिसंवाद, कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या काव्यवाचनाची मैफल, पालकशाळा, बालकांसाठी सुट्टीतील शिबिरं, काव्यस्पर्धा, दिवाळी अंकांमधील निवडक कवितांचं वाचन आणि त्या कवितेच्या आस्वादासाठी श्रोत्यांशी संवाद, विचारांचं आदान-प्रदान अशा बहुविध उपक्रमांमधून 'ग्रंथसखा' रसिकांच्या मनात रुजत गेलं. बदलापूरच्या सांस्कृतिक जीवनाचं केंद्र बनलं.

वेगळ्या वाटांवरून जाणाऱ्यांची दखल समाजातले जाणकार नेहमीच घेतात. अनिल काळे परिवारानं 'प्रभुराम स्मरण पुरस्कार' देऊन आणि 'संवाद'मध्ये ई-टीव्हीवर मुलाखत घेऊन राजू परुळेकरांनी 'ग्रंथसखा'ला एकदम महाराष्ट्राच्या नकाशावरच पोहोचवलं. दादूमियाँनीही दखल घेतली. या साऱ्याचं फलित म्हणून रवींद्र पिंगे, गंगाधर गाडगीळ, वि. आ. बुवा, निरंजन उजगरे, द. भि. कुलकर्णी अशा मान्यवरांच्या संग्रहातील पुस्तकं 'ग्रंथसखा'च्या संदर्भ दालनात समाविष्ट झाली. अनेक ठिकाणच्या रसिक ग्रंथसंग्राहकांनी त्यांच्याकडील पुस्तकं जतन करण्यासाठी आणि अभ्यासकांच्या उपयोगासाठी 'ग्रंथसखा'च्या हवाली केली. बृहन्महाराष्ट्रातील अनेक रद्दीवाले जणू कुटुंबीयच बनले. त्यांच्याकडं येणाऱ्या पुस्तकांतील निवडक पुस्तकं 'ग्रंथसखा'साठी वेगळी ठेवतात. तसं वेळोवेळी कळवतात. दुर्मीळ पुस्तकांची माहिती वेळेत देतात. अशा अनेकानेक वाटांनी ठिकठिकाणची पुस्तकं, अर्थात मराठीतील अमूल्य अशी अक्षरलेणी 'ग्रंथसखा'ची संदर्भदालनं समृद्ध करीत आहेत.

आज मराठीतील शेकडो कोश, अनेक मौल्यवान ग्रंथांसह अभ्यासकांच्या उपयोगाची एक लाखावर पुस्तकं संदर्भ दालनात आहेत. अभ्यासकांच्या दृष्टीनं ग्रंथसूची हे एक महत्त्वाचं साधन असतं. 'ग्रंथसखा'कडे असे सूचीचे संग्रह तर आहेतच; पण तिथं काही सूची बनवून प्रकाशित करण्याचंही काम चालतं. उदाहरणार्थ, पु. शि. रेगे यांच्या 'छंद' मासिकाची सूची बनवून ती प्रकाशित करण्याचं काम 'ग्रंथसखा'च्या माध्यमातून झालं आहे. डॉ. स. गं. मालशे यांच्या सर्व प्रस्तावनांचं पुस्तक, इतरही अनेक पुस्तकं प्रकाशित केली आहेत. व्याकरण, सूची, कोश या संबंधीचे उपक्रम करणं, हे 'ग्रंथसखा'चं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणून मी नमूद करीन.

मराठी भाषेच्या जडणघडणीत जैन, बौद्ध, ख्रिस्ती वाङ्मय अत्यंत महत्त्वाचं ठरतं. यांचे स्वतंत्र विभाग केले आहेत. मराठीच्या विकासक्रमात ब्रिटिशांची राजवट मोलाची भूमिका बजावून गेली. मराठीतील पहिलं छापील पुस्तकही मुळात त्यामुळंच प्रकाशित झालं. कलकत्याजवळच्या सेरामपूरहून ते प्रसिद्ध झालं. इंग्रज अधिकाऱ्यांना एतद्देशीयांशी त्यांच्या भाषेतून संवाद साधणं शक्य व्हावं, यासाठी 'ग्रामर ऑफ मरहट्ट लँग्वेज' या इंग्रजी नावाचं हे मराठी पुस्तक विल्यम केरेनं लिहून तयार केलं. इंग्रजी आमदनीत मराठीची पुरातत्त्वशास्त्र, भारतशास्त्र, संग्रहालयशास्त्र अशा विविध ज्ञानशास्त्रांशी ओळख झाली. विकासाचे हे सारे ठसे, प्राचीन इतिहासाच्या या पाऊलखुणांचं प्रत्यक्ष दर्शन ग्रंथरूपाने संदर्भदालनात उपलब्ध आहे.

मराठीला असंच मोठं योगदान दिलं आहे ते दिवाळी अंकांच्या परंपरेनं. अनेक श्रेष्ठ लेखक-कवींनी या अंकांमध्ये लिहून साहित्यविश्वात उमेदवारी केली आहे. त्यांच्या वाङ्मयीन विकासाची चिन्हं या दिवाळी अंकांमधून अभ्यासता येतात. दिवाळी अंकांच्या अभ्यासातून, वाचनातून एक प्रदीर्घ कालखंड दृष्टिक्षेपात येतो. सन १९०९मध्ये प्रसिद्ध झालेल्या मासिक 'मनोरंजना'च्या दिवाळी अंकापासून आजपर्यंतचे सुमारे दहा हजारांहून अधिक दिवाळी अंक 'ग्रंथसखा'नं जतन करून ठेवले आहेत आणि ते अभ्यासकांना उपलब्ध करून दिले जातात.

हे सारं मौलिक अक्षरधन अभ्यासकांपर्यंत पोहोचावे, यासाठी मराठी भाषा, इतिहास, संस्कृती संशोधनकेंद्राची निर्मिती झाली आणि २७ फेब्रुवारी २०१५ रोजी 'स्वायत्त मराठी विद्यापीठा'ची स्थापना झाली. या विद्यापीठाचे पहिले मानद कुलगुरू होते, ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी. या स्वायत्त मराठी विद्यापीठाच्या माध्यमातून मराठी विद्वत्तेला सन्मान मिळावा, या तळमळीनं काम सुरू आहे. इथं अभ्यासकाला पूर्वपदवीची अट नाही, तर पूर्वअभ्यासाची आहे. तीव्र जिज्ञासेची अट आहे. ज्ञानतृष्णेची अट आहे. संशोधनाची ओढ आणि मनःपूर्वक परिश्रम घेऊन काम करू इच्छिणाऱ्या कोणत्याही अभ्यासकाला इथं सर्व प्रकारचं सहकार्य मिळतं. अक्षरधनाच्या जपणुकीबरोबरच हे विद्यापीठ भाषा समृद्धीसाठीही प्रयत्नशील आहे. सध्या सार्वजनिक ठिकाणी आणि विविध प्रसारमाध्यमांतून प्रदूषित होणारी भाषा दुरुस्त व्हावी, यासाठी काही प्रयत्न आम्ही करीत आहोत. दुकानांच्या पाट्या आणि फलक लिहिणारे कारागीर फ्लेक्स, निमंत्रण पत्रिका, जाहिरातपत्रके इ. छापणारी मंडळी सहज वापरू शकतील असा सोपा, सहज सुलभ, अचूक शब्द सांगणारा कोश आम्ही तयार करीत आहोत. हा कोश छोटा आणि सुटसुटीत असेल. वापरणं सहज शक्य होईल.

नव्या परिभाषा निर्माण कराव्यात आणि बोलीमध्ये रुजवाव्यात, रुळवाव्यात. नवं विज्ञान, आधुनिक तंत्रं उपयोगात आणावीत आणि त्या मार्गानं नव्या पिढीला पुन्हा एकदा वाचनानंदात रमता यावं. विचारकलहाला न घाबरता स्वतःची भूमिका निश्चित करता यावी. ती ठामपणानं आणि नेमकेपणानं मांडता यावी, यासाठी आपल्या पूर्वसूरींनी केलेलं काम, त्यांचं लिखाण या साऱ्याचा नव्यानं विचार व्हायला हवा. संशोधन व्हायला हवे. स्वतःची विचारांची बैठक निश्चित करण्यासाठी विचारांची नेटकी मांडणी करता यायला हवी. या आणि अशा अनेक गोष्टींसाठी वाचनाची आवश्यकता आहे. अभ्यासाची आवश्यकता आहे. याचसाठी 'ग्रंथसखा' आणि साहित्य गौरव ग्रंथालय कटिबद्ध आहे. साहित्य गौरव या नव्या उपक्रमाविषयी सांगायचं म्हणजे, पूर्वेकडे वाचनसंस्कृतीचा छान आकृतिबंध 'ग्रंथसखा'च्या रूपानं आकाराला आला. बदलापूरच्या पश्चिम विभागातील जनतेची कायमच मागणी होती, की 'ग्रंथसखा'चं भावंड पश्चिमेला बेलवली भागात असायला हवं. अखेर पंधरा वर्षांनी हा भाग्ययोग जुळून आला. बदलापूर पश्चिम विभागातले समाजशील, दातृत्व ही घरचीच संस्कृती परंपरा असलेले राष्ट्रवादीचे नगरसेवक कॅप्टन आशिष दामले यांच्याशी मैत्री झाली. पश्चिमेकडील वाचनप्रिय लोकांची ही भूक भागविण्यासाठी 'यशस्विनी भवन' या इमारतीतील तीन मजले विनामूल्य ग्रंथालयांसाठी त्यांनी विनाशर्त दिले. सुमारे एक लाख पुस्तकं आणि २५ हजार नियतकालिकं असा संग्रह या ग्रंथालयात आहे. प्रा. दामोदर मोरे सरांच्या मार्गदर्शनाखाली साहित्य गौरव ग्रंथालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ अध्यासन' सुरू करण्यात आलं. हेमंतराव टकले यांच्या मार्गदर्शनाखाली' यशवंतराव चव्हाण राजकीय तत्त्वज्ञाना'चं अभ्यासकेंद्रही इथं कार्यरत आहे. सुमारे १०० विद्यार्थी बसू शकतील अशी भव्य वातानुकूलित अभ्यासिका (सर्व संदर्भ ग्रंथांसह) भावी प्रशासकांची चांगली फौज निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. कवी संमेलनं, व्याख्यानं, प्रकाशन समारंभ अशी वाङ्मयीन कार्यक्रमांची रेलचेल या साहित्य गौरव ग्रंथालयामध्ये कायमच सुरू असते. प्रियांका आशिष दामले याच हॉलमध्ये अनेक छोट्या-मोठ्या कार्यशाळा घेत असतात.

चांगल्या वाचकांच्या शोधात पुस्तकं असतात. वाचकांची आणि ग्रंथांची निवांत अशी भेट घडवून आणण्यासाठी ही सगळी धडपड!

स वा द

> नव्या पिढीला पुन्हा एकदा वाचनानंदात रमता यावं. विचारकलहाला न घाबरता स्वत:ची भूमिका निश्चित करता यावी, ती ठाम आणि नेमकेपणानं मांडता यावी, यासाठी आपल्या पूर्वसूरींनी केलेलं काम, त्यांचं लिखाण या साऱ्याचा नव्यानं विचार व्हायला हवा. या आणि अशा अनेक गोष्टींसाठी वाचनाची आवश्यकता आहे.

Maharashtra Times 11.12.2022

# News Paper Clippings During December 2022

## Section: Miscellaneous



मटा विशेष

# घरपोच पुस्तक योजनेला वाढता प्रतिसाद

c-kalyani.Phadke
@timesgroup.com

**पुणे :** कोव्हिडनंतरच्या काळात पुण्यातील ज्येष्ठ नागरिक आणि पुस्तकप्रिय वाचकांसाठी ग्रंथालयांनी राबविलेल्या 'घरपोच पुस्तक' योजनेचा प्रतिसाद अद्यापही कायम आहे. गेल्या काही महिन्यांत सर्व व्यवहार पूर्वपदावर आले असले, तरी वाहनांची गर्दी आणि त्यातून ग्रंथालयापर्यंत पोहोचण्यास होणारा त्रास लक्षात घेऊन बहुतांश वाचकांनी 'घरपोच पुस्तक' योजनेलाच पसंती दिली आहे.

गेल्या काही वर्षांत छापील पुस्तकांचा प्रवास 'ऑडिओ बुक'पर्यंत विस्तारला आहे. नागरिक पुस्तके वाचत किंवा ऐकत असले, तरी ग्रंथालयांमध्ये जाऊन आवडीची पुस्तके घरी आणून वाचणाऱ्या वाचकांची संख्या फारशी कमी झालेली नाही. गेल्या दोन वर्षांत कोव्हिडमुळे त्यावर काही निर्बंध निश्चित होते. या काळात वाचकांची संख्या मर्यादित झाल्याने ग्रंथालये वाचकांच्या घरापर्यंत पुस्तके देत होती. वाचकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे ग्रंथालयांनी या पर्यायाचे योजनेत रूपांतर केले आहे. अनेक 'स्टार्टअप'ही प्रत्यक्ष ग्रंथालय सुरू न करता केवळ घरपोच पुस्तके देत आहेत.

करोनाकाळानंतर आता ज्येष्ठ नागरिकही घरपोच पुस्तके मागवण्याला पसंती देत आहेत; तर पुस्तके खरेदी न करता काही कालावधीसाठी ऑनलाइन पुस्तके 'बुक' करून मागवण्याकडे तरुणाईचा कल असल्याचे चित्र आहे. यामध्ये प्रामुख्याने महिनाभराची पुस्तके देण्यात येत असल्याने या योजना वाचकांच्या पसंतीस उतरत आहेत.

**'व्हॉटसॲप'सह संकेतस्थळांद्वारे यादी**

वाचकांपर्यंत पुस्तकांची यादी पोहोचवण्यासाठी ग्रंथालय, स्टार्टअप कंपनी अद्ययावत पर्याय अवलंबतात. 'व्हॉट्सॲप', 'फेसबुक' गटांसह संकेतस्थळावरून पुस्तकांची यादी प्रसिद्ध करण्यात येत असून, वाचकांना थेट पुस्तके मागवत आहेत.

> **"पुणे मराठी ग्रंथालय लॉकडाउनपासून घरपोच पुस्तकांची योजना राबवत असून, या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. सर्व व्यवहार पूर्वपदावर आले असले, तरी अद्यापही या योजनेचे सुमारे दोनशेहून अधिक सभासद आहेत. प्रामुख्याने कोथरूड, औंध आदी उपनगरांतील ज्येष्ठ नागरिक सभासदांची संख्या अधिक आहे. यासाठी 'व्हॉटसॲप ग्रुप' केला असून, वाचकांना पुस्तकांची यादी पाठवण्यात येते. त्यातील वाचकांनी निवडलेल्या १० पुस्तकांपैकी दरमहा चार पुस्तके घरी देण्यात येतात.**
>
> - शरद घाणेकर, कोषाध्यक्ष, पुणे मराठी ग्रंथालय



> **अनेक वाचकांना ग्रंथालयांपर्यंत पोहोचता येत नाही. त्यामुळे वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचवण्यासाठी फिरत्या ग्रंथालयाचा पर्याय उपलब्ध केला आहे. याचे सुमारे ३५० हून अधिक सभासद आहेत. एका वेळी ७ पुस्तके सभासदांना घरपोच देण्यात येतात. नागरिकांना सभासद होताना आणि व्हॉटस-ॲपवर यादी देण्यात येते. पूर्ण शहरात पुस्तके पोहचविण्यात येत असून, याला प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांकडून अधिक प्रतिसाद मिळतो आहे.**
>
> - अजय पाटील, साहित्य सहवास मोबाइल लायब्ररी

> **दर वेळी पुस्तके आणण्यासाठी पुणे मराठी ग्रंथालयात जाणे शक्य होत नाही. घरपोच योजनेमुळे ठरलेल्या वेळी पुस्तके घरपोच मिळत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी घरपोच पुस्तकांची योजना उपयुक्त ठरत आहे.**
>
> - अनुराधा देशपांडे, बिबवेवाडी

> **घराजवळ ग्रंथालय नसल्याने घरपोच पुस्तकांची योजना फायदेशीर ठरत आहे. ग्रंथालयात जाणे शक्य नसलेल्या नागरिकांना पुस्तके घरपोच मिळत आहेत. पुस्तकांची यादी मिळत असल्याने हवी असणारी पुस्तके घरपोच मागवता येतात.**
>
> - शैला शर्मा, बावधन

Maharashtra Times 24.12.2022

### पुण्यातील श्रुतभवन संशोधन केंद्राचा उपक्रम

# पत्र, प्राचीन ग्रंथांचे डिजिटायझेशन

**पुणे, ता. २७ :** भारतातील प्राचीन ग्रंथ ज्ञानाचे भांडार आहेत. पुण्यातील श्रुतभवन संशोधन केंद्राकडून ७५ लाख हस्तलिखित आणि प्राचीन ग्रंथांचे डिजिटायझेशन केले आहे. तर तीन लाखांवर अधिक दस्तांचे सूचिकरणही केले आहे. भारतीय ज्ञानपरंपरा जोपासणे आणि ती वृद्धिंगत करणे हा या संस्थेचा उद्देश आहे.

भारतीय प्राचीन ज्ञानाची विरासत हस्तलिखितांमध्ये लपलेली आहे. काळामध्ये विलीन होत असलेल्या हस्तलिखितांचे वाचन, अध्ययन आणि संपादन कलांना पुनरुज्जीवित करण्याचे काम या संस्थेद्वारे होत आहे. दिल्लीपासून ते दक्षिणेला सोलापूरपर्यंतच्या प्राचीन हस्तलिखित संग्रहातील ७५ लाख हस्तलिखित पत्रांचे स्कॅनिंग संस्थेच्या माध्यमातून झाले आहे. संस्थेच्या वर्धमान जिनरत्न कोश विभागामध्ये स्कॅनिंग पार पडले असल्याचे श्रुतदीप रिसर्च फाउंडेशनचे सचिव राजेंद्र बाठिया यांनी सांगितले. या ज्ञानसंपदेला सुरक्षित ठेवण्यासाठी ताडपत्रांवर लेझर मार्किंग करून त्यांना सुरक्षित ठिकाणी स्थापित केले जाते. तसेच हस्तलिखित संपादन विज्ञानाचे नियमित अभ्यास वर्ग चालतात.

> **श्रुतभवन संशोधन केंद्र भारतीय ज्ञानपरंपरेचे संगोपन करीत असलेली एक संस्था आहे. संशोधन ग्रंथ व हस्तलिखिते ही प्राकृत, संस्कृत आणि ब्राह्मी भाषेतील आहेत. सध्याच्या पिढीतील अनेकांना या भाषा अवगत नाहीत. येणाऱ्या काळात ही सर्व संपदा एका क्लिकवर हव्या त्या भाषेत उपलब्ध व्हावी, त्याचा भावार्थ एका क्लिकवर कळावा, हे आमचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी वेळ लागेल. पण, त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत.**
>
> - राजेंद्र बाठिया, सचिव, श्रुतभवन संशोधन केंद्र

**संशोधन केंद्राची कामगिरी**

- ७५ लाख हस्तलिखिते, प्राचीन ग्रंथांचे डिजिटायझेशन
- ३६ संग्रहांचे ४० पेक्षा जास्त सूचिपत्र तयार
- संशोधन विभागाद्वारे ३०० पेक्षा जास्त अप्रकाशित ग्रंथांचे प्रकाशन
- ज्ञानसंपदेला सुरक्षित ठेवण्यासाठी ताडपत्रांवर लेझर मार्किंग

**ज्ञानसंपदेची प्रदर्शनी**

कार्तिक शुद्ध पंचमी ज्ञानपंचमी म्हणून साजरी केली जाते. या दिवशी ज्ञानसंपदेची प्रदर्शनी लावली जाते. या प्रदर्शिनीमध्ये सरस्वती देवीच्या वेगवेगळ्या मुद्रांमधील नयनाभिराम प्रतिमा, ताडपत्रांवरील चित्रांकन, वस्त्र तसेच कागदावरील चित्रांकन, ताडपत्रांच्या पेट्या, श्रुतभवनचे प्रकाशन तसेच लाकडाच्या रचना ठेवल्या आहेत. अक्षतांचे १०८ स्वस्तिक तसेच फळ आणि नैवेद्य अशी आकर्षक रचना केली जाते. विशेष उपक्रमात भारतातील सर्व लिप्यांची जननी ब्राह्मी लिपीचे पूजन केले जाते.

Sakaal 28.12.2022

## *Upcoming Events*

# January 2023

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 *Savitribai Phule Jayanti*  | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | | 11 | 12 *Jijau Maa Saheb Jayanti & Swami Vivekanand Jayanti*   | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 *Netaji Subhas Chandra Bose Jayanti & Balasaheb Thackarey Jayanti*   | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

KEEPINSPIRING.ME

“Education is the transmission of civilization.”

- Will Durant -

*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images, Pinterest, Freepik.Com.*